बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बोस्टन अधिवेशनानिमित्त विशेषांक

# गोष्ट ग्लोबल लग्नाची!

शब्द रुची

जुलै–ऑगस्ट २०१३ ● मूल्य १०० रुपये



**STATE BANK NRI SERVICES**
Your global link to India

*It's like taking a loan from family, for family !*

## SBI NRI loans that fulfill your dreams , back home.

**Loans** With easy loan facilities from SBI, you can fulfil your dream of buying a house or a car at the lowest rates.

With 156 foreign offices in 32 countries, correspondent banking relations with 491 global banks, 44 dedicated NRI branches and over 13,000 branches in India, SBI will never let you feel away from home.

SBI NRI Services : NRI Home Loans | NRI Car Loans

INDIAN HEART. GLOBAL BANKING.



For more details on our products and services, step into any of the SBI branches near you or log on to : www.onlinesbi.com/nri

**Toll Free Nos.: Australia:** +1800012473, **Bahrain:** +80081724, **Belgium:** +80076562, **Canada:** +18663284209, **France:** +800740849, **Germany:** +8001830736, **Hong Kong:** +800932045, **Italy:** +800789407, **Japan:** +00 6633812439, **Netherlands:** +8000223031, **New Zealand:** +800449909, **Russia:** +81080029301012, **Singapore:** +8001012333, **South Africa:** +0 800 982 360, **UAE:** +80009119005, **UK :** +0 8081017633, **USA :** +18663284209

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# मॅग्नेटीक महाराष्ट्र

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३
ई-मेल : feedback@midcindia.org वेबसाईट : www.midcindia.org

### औद्योगिक विकासाची सुवर्ण महोत्सवी वाटचाल : एक दृष्टीक्षेप

- ❖ संपूर्ण राज्यात संतुलित औद्योगिक विकास
- ❖ ऑन लाईन एक खिडकी कार्यपध्दती
- ❖ एकूण पाणी पुरवठा क्षमता २,०४५ द.ल.घ.मी.
- ❖ २,८०० कि.मी. हून अधिक लांबीचे रस्ते
- ❖ अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा
- ❖ औद्योगिकरणासोबत पर्यावरण रक्षणाला विशेष प्राधान्य
- ❖ भारतातील सर्वोत्कृष्ट आय.टी. पार्क, हिंजेवाडी, पुणे.
- ❖ भारतातील सर्वात मोठा जेम्स आणि ज्वेलरी पार्क, सिप्झ, मुंबई
- ❖ भारतातील एकूण थेट परदेशी गुंवणूकीपैकी महाराष्ट्रात १/३ गुंतवणूक
- ❖ १,५५,६७६ एकर जमिनीवर २३३ औद्योगिक वसाहतींची निर्मिती

### दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर (डीएमआयसी)

❖ नाशिक, धुळे, शेंद्रा, दिघी येथे ४ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इको फ्रेंडली स्मार्ट शहरांची निर्मिती ❖ स्थायी व टिकाऊ मूलभूत सुविधा निर्माण करणे ❖ मजबूत आर्थिक व्यवस्था उभारणे, शहरी-ग्रामीण दळणवळण वाढविणे उपलब्ध नैसर्गिक साधनांचा उपयोग ❖ संपत्ती व उपजत शक्तींचे एकत्रीकरण करून मानवी कौशल्य वापरून स्थानिक व्यापारास प्रोत्साहन देणे ❖ प्रस्तावित क्षेत्र ६३० चौ.मी.मी. ❖ औद्योगिक नगरीमुळे १५,५०,००० रोजगारांची निर्मिती ❖ डीएमआयसीचा प्रस्तावित खर्च-अंदाजे रु. १,००,००० कोटी ❖ आंतरराष्ट्रीय दर्जाचा निर्यक्षम वस्तूंची निर्मिती करणे ❖ अशुध्द पाण्याचा १०० टक्के शुध्द करुन वापर ❖ शेंद्रा, औरंगाबाद येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन व मेळावा केंद्र ❖ तळेगाव, पुणे येथे अत्याधुनिक बहद्देशीय दळणवळण वाहनतळ प्रकल्प

*औद्योगिक धोरण २०१३ अन्वये 'महाराष्ट्र', उद्योग क्षेत्रातील आपले अग्रस्थान अधोरेखित करीत आहे.*

### विशाल प्रकल्प

राज्यात आजपर्यंत ३५४ विशाल प्रकल्पाअंतर्गत रू. ३ लक्ष कोटींची गुंतवणूक आकर्षित झाली आहे. विशाल प्रकल्प योजना बळकट करण्यासाठी

- ❖ विशाल /अतिविशाल प्रकल्पांना गरजेनुसार एकत्रित प्रोत्साहन
- ❖ सर्वसमावेशक औद्योगिकरणासाठी एकात्मीक औद्योगिक क्षेत्र



### सवलती

- ❖ औद्योगिक विकास अनुदान
- ❖ मुद्रांक शुल्क माफी
- ❖ विद्युत शुल्क माफी
- ❖ विद्युत दरात अनुदान
- ❖ व्याज अनुदान
- ❖ अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी विशेष सवलती

### सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम

- ❖ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना उभारणीच्या कालावधीत सामूहीक प्रोत्साहन योजने अंतर्गत एकत्रित आर्थिक सवलती देणे
- ❖ उद्योग नसलेल्या तालुक्यांसाठी विशेष सवलती देणे

माहिती तंत्रज्ञान | जैव तंत्रज्ञान | अॅग्रो उत्पादन | फार्मास्युटिकल्स | ऑटोमोबाइल | वाइन पार्क्स | वस्त्र उद्योग | पुष्प संवर्धन | सिल्व्हर झोन | केमिकल झोन

## महाराष्ट्र हा विद्येचा, उद्योगाचा अन् कृषी वैभवाचा! निर्धार करूया, जग जिंकण्याचा!

शेती व शेतक-यांच्या अजोड बांधिलकीसाठी जगभर २९ कारखाने, १४६ कार्यालये व डेपो, २९२९ वितरकांच्या जाळ्यासह ८००० हून अधिक सहकारी असलेली आंतरराष्ट्रीय कंपनी

**आजमितीस जगात**

- कृषि पाईपांसहित ठिबक सिंचन उत्पादनात प्रथम
- केळी व डाळींबाच्या टिश्युकल्चर रोप निर्मितीत प्रथम
- आंबा फळप्रक्रियेतही प्रथम
- कांदा व भाजीपाला प्रक्रियेसाठी तिस-यास्थानी

**पुरस्कार व सन्मान**

**क्रॉफर्ड रीड मेमोरिअल ॲवार्ड** (इरिगेशन असोसियेशन यु.एस.ए.)
**कंपनीचे संस्थापकांना 'पद्मश्री' पुरस्कार बहाल** - सायन्स अँड इंजिनिअरींग (भारत सरकार)
**भारताचा जलरक्षक** (युनेस्को आणि वेस्ट-नेट-नो)
**जगातील सर्वोत्तम ब्ल्यू चिप कंपन्यांना आव्हान देणारे** (स्टँडर्ड अँड पुअर)
**आशियातील ४००० कोटी रूपयांपर्यंतच्या सर्वोत्तम २०० कंपन्यांमधील मानकरी** (फोर्बेस आशिया)
**पृथ्वीवरील हरिततंत्र धारक १०० भविष्यवर्ती कंपन्यांपैकी एक** (ग्लोबल क्लीनटेक आणि दी गार्डियन)
**क्लायंट लिडरशिप ॲवार्ड** (जागतिक बँक व आय.एफ.सी.)
**छोट्या शेतक-यांच्या विकासात तुमच्या योगदानासाठी आम्ही आपले ऋणी आहोत** (हॉवर्ड बिझिनेस स्कूल)
**बेस्ट वॉटर कंपनी** (युनेस्को, जलस्त्रोत मंत्रालय व वॉटर डायजेस्ट)
**पर्यावरण क्षेत्रासाठीचा - 'द फायनान्शियल टाइम्स - आर्सेलर मित्तल बोल्डनेस इन बिजनेस' पुरस्कार** (फायनान्शियल टाइम्स - लंडन)
**'नव्या शाश्वततेचे अर्ध्वयू'** - १००० कंपन्यांमधील पहिल्या १६ त स्थान (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम)
**सर्वसमावेशी शेती उद्योग** - नेतृत्व पुरस्कार (इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन - वर्ल्ड बँक)

आंतरराष्ट्रीय १२, राष्ट्रीय ११३, राज्यस्तरीय ३९, राष्ट्रीय स्तरावरील गौरवान्वित संस्था ५५, राष्ट्रीय प्रतिष्ठीत व्यक्तिंद्वारा गौरव २ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरांवरील गौरवलेल्या संस्थेद्वारे मानांकन ११ अशा एकूण २३२ पुरस्कारांनी सन्मानित



**थेट सूर्यदेवाच्या भागीदारीसाठी कटीबद्ध असणारा समाजभिमुख उद्योग.**
**एकात्मिकपणे ग्रामीण विकासासाठी धडपडणारी ही एकमेव संस्था.**
**शेतक-यांची लाडकी कंपनी**

**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.**
कल्पना कणापरी. ब्रम्हांडाचा भेद करी.®
**जळगाव - महाराष्ट्र - भारत**
www.jains.com

**प्रकल्प:** • भारत • अमेरिका • ब्राझिल • चिली • इंग्लंड • स्वित्झर्लंड • स्पेन • टर्की • इस्त्रायल • ऑस्ट्रेलिया

जैन पाईप | जैन ठिबक | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्यूकल्चर | जैन हरितगृहे | जैन सौरबंब | जैन ज्योत | जैन जीवन सोलर पंप | भवरलाल अँण्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फौंडेशन, जळगाव | गांधी रिसर्च फाऊंडेशन


"I never knew it was so easy
to get a loan for my business!"
Loan Scheme for
Traders & Professionals
HIGHLIGHTS
• Easy processing
• Low margins
• Attractive rates
• Loan up to ₹ 5 crore
• 33% of projected turnover as the OD limit
Aap ka sapna, humara saath.
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
Toll-Free No.: 1800-233-4526
Website: www.bankofmaharashtra.in Net Banking: https://www.mahaconnect.in



Quick-n-EZ™
LANGUAGE
BMM
Special
50% OFF
on all products
Who knows Marathi?
Quick-n-EZ Language Inc.
Flash Cards
Learning Marathi / Hindi has never been so quick and easy. Quick-n-EZ offers laminated Practice chart, Flash cards, Smart chart and website learning tools which are unique, colorful and fun to engage kids and to foster mother tongue at the same time.
Laminated Chart
Buy $25 worth of products and get free shipping or pick up at Columbia, MD
FREE GIFT* TO ALL
Find out how at:
www.Quick-n-EZ.com
or call 410-730-0667
* No purchase necessary




**त्वरा करा! आता मिळत असलेला व्याजाच्या कमी दराचा पूर्ण लाभ घ्या.**

स्वत:च्या मालकीचे घर असण्याच्या स्वप्नाची पूर्तता होण्याची प्रतीक्षा आता संपली. युनियन बँक ऑफ इंडियाने आपले गृह कर्जावरील व्याजाचे दर द.सा. 10.25%# पर्यंत कमी केले आहेत आणि एवढेच नव्हे, तर आमचे गृह कर्ज तुम्हाला देत आहे आणखी कितीतरी लाभ.

• 5 दिवसात मंजुरी • 30 वर्षांपर्यंत कमाल कालावधी • मुदतपूर्व परतफेडीसाठी दंड नाही • व्याजाची आकारणी रोज कमी होत जाणाऱ्या शिल्लक रकमेवर • ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा • टॉप अप कर्ज सुविधा

# ₹75 लाखांपर्यंतच्या कर्जासाठी फ्लोटिंग रेट हा बँकेच्या बेस रेटशी संलग्न

युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक

हेल्पलाईन नं.: 1800 22 2244 (टोल फ्री नं.) | 022 2575 1500 (सशुल्क)
022 2571 9600 (एनआरआयसाठी) | www.unionbankofindia.co.in

Union Bank of India

Download " PointART " mobile app
Visit: pointart.mobi

Open App & Capture this Image

Available on all App stores & on all leading Mobile platforms



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

## बोस्टन अधिवेशन विशेषांक

**जुलै–ऑगस्ट २०१३, वर्ष १**

**अंक सात–आठ, मूल्य १०० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

अक्षरजुळणी–मांडणी : **योगिता मोरे**

मुखपृष्ठ : **मनोज आचार्य**

जाहिरात व संपर्क : **धनश्री धारप**

**शब्द रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

विश्वपटावर सप्तपदी – **स्मिता भागवत** / ९
ग्लोबल दांपत्यांशी गप्पा – **मेधा आलकरी** / १४
'एकजीव' जगाची सुरुवात – **आल्हाद गोडबोले** / १९
बैल गाभण... कितवा महिना? – **मीना परांजपे** / २५
आमचा जावई बेन्ड सोनाळकर! – **निरुपमा सोनाळकर** / २८
पहिल्या पिढीतील ग्लोबल लग्न – **जया हुपरीकर** / ३१
मोना आणि डॅरल – **सुधीर शं. कुलकर्णी** / ४१
रिश्ता वही, सोच नई! – **रंजना पाटील** / ४४
आंतरदेशीय विवाह – **डॉ. माधवी मेहेंदळे** / ४६

### ललित–वैचारिक

'व्हिसल ब्लोअर' – हिरो की अपराधी? – **अपर्णा पाटील** / ५२
या जन्मावर... या जगण्यावर... – **कुमार केतकर** / ५८
पहिल्या 'स्वदेशी' बँकेचे सामाजिक–सांस्कृतिक योगदान!
– शब्दांकन : **राजीव जोशी** / ६१
मराठी पाऊल पडते पुढे... – **वसंत वसंत लिमये** / ७३
भटका व्यंगचित्रकार इ.पी. उन्नी – **प्रभाकर वाईरकर** / ७९
मराठी भाषा एक मानसिक द्वंद्व! – **रविराज गंधे** / ८३
बदलतं मराठी नाटक – **राजीव जोशी** / ८६
क्षितिज पश्चिमेचे – **कुमार केतकर** / ९०
दृश्यकला कोश साकारताना... – **साधना बहुळकर** / ९४
प्रयोजन महाराष्ट्रनायकांच्या चरित्रकोशांचे – **दीपक जेवणे** / ९८
जागर आरोग्याचा – **श्रीधर पाटील** / १०२



# संपादकीय...

भारतीय हिंदुत्वाची आणि विश्वबंधुत्वाची शिकवण जगाला देण्यासाठी एक नरेंद्र तपस्वी विवेकानंद होऊन शतकापूर्वी शिकागोला गेला. मानवतेला साद घालणारे त्याचे शब्द तिथल्या जनांच्या हृदयावर ठसले, तो नरेंद्र इतिहास घडवता झाला आणि हिंदुत्वाचे ते रूप अमेरिकेचा व्हिसा न मिळणारा दुसरा नरेंद्र मोडीत काढता झाला. 'जय श्रीकृष्ण'चा जप करणाऱ्या गुजरातमधील नरेंद्राने भाजपच्या लाल 'कृष्णा'ना अडचणीत आणले. त्याच्या 'कृष्ण'लीला सोयीच्या नसल्याने जेडीयु आघाडीतून बाहेर पडली. तिला 'तत्त्वा'चा आठव झाला. सतरा वर्षांच्या सोयरीकीचे २०१३मध्ये तीनतेरा वाजले ते २०१४च्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून. ग्लोबल खेड्यात सामावून घेताना आपण, जगाच्या एकषष्ठांश लोक, मनाने किती लोकल आहोत हे जगाने पाहिले.

गेल्या पंचवीस वर्षांत जगणे गतिमान झाले, जीवनशैली आमूलाग्र बदलली, माहिती-तंत्रज्ञानाने ज्ञानाच्या खिडक्या घराघरात उघड्या झाल्या. असे घडत असताना वैचारिक दिवाळखोरी जपण्याची किमया या देशाने घडवली. पैसा बोलू लागला, माणूस आत्मकेंदी झाला. 'प्रतिक्रियांचा देश' अशी नवीच ओळख निर्माण झाली. या देशात सत्तेवर नसलेल्यांना सतत प्रश्न पडतात आणि सत्तेवरचे लोक फक्त प्रतिक्रिया देतात, त्यांना कधी प्रश्नच पडत नाहीत, असा अजब व्यवहार इथे सुरू आहे.

सोयीची असते ती सोयरीक, नाहीतर कशाचे सुतक नाही ही इथली मानसिकता. ही सोयरीक सामंजस्याने, मन:पूर्वक झाली तर ती कुणाशी हा प्रश्न उरत नाही. दोन जीवांना एकत्र आणण्यात, सोयरीक जमवण्यात जात-भाषा-धर्म अशी सोय बघितली जात होती, तो काळ आपल्या कोशात जगणाऱ्यांचा होता. आज काळ बदलला आहे, आपण 'ग्लोबल' होत आहोत तशी संस्कृती बदलली आहे. आज दोन भिन्न देशांतील पूर्णत: भिन्न पिंडांचे, भाषा-धर्म-सीमा या कशाचेही बंधन न मानता सोयरीक जमवत आहेत. बदलत्या जागतिक वातावरणातले हे नवे संकर सुदृढ वैश्विक समाजाची निर्मिती करू शकतील का, हे काळच ठरवेल. तरी आज वैचारिक मोकळेपणा येताना दिसतो. यातही सोयीची सोयरीक होत असली तरी त्यातून गळून पडणाऱ्या अतिरेकी रुढी-परंपरा ही इष्टापत्ती ठरू शकते. अशा ग्लोबल सहचरांचे अनुभव या अंकात आहेत. 'गोष्ट ग्लोबल लग्नाची' ऐकताना एकूणच विवाह आणि बदलती परिमाणे या संदर्भात पडणाऱ्या प्रश्नांची उकल करून घेण्याचा हा प्रयत्न आहे. यासाठी अनेकांनी मोकळेपणाने आपले मनोगत कथन केले आहे.

'शब्द रुची'च्या या बोस्टन अधिवेशन विशेषांकात जया हुपरीकर यांनी पाहिलेल्या 'ग्लोबल लग्ना'च्या पहिल्या पिढीचा काळ, स्मिता भागवत, मेधा अलकारी, डॉ. माधवी मेहेंदळे यांनी ग्लोबल दांपत्यांशी केलेली बातचीत, सुधीर कुलकर्णी आणि निरुपमा सोनाळकर यांनी आपल्या मुलांच्या लग्नासंदर्भात मांडलेला अनुभव आणि आल्हाद गोडबोले यांनी उलगडलेले एका कुटुंबाचे सर्वधर्म-प्रांत-भाषा यांच्या मिलाफाचे आदर्श उदाहरण, अशा लेखांतून याविषयी ऊहापोह झाला आहे.

कुमार केतकर यांनी जागवलेल्या श्रीकांत लागू या अष्टपैलू व्यक्तित्वाच्या आठवणी, अपर्णा पाटील यांनी दाखवलेले 'व्हिसल ब्लोअर', प्रभाकर वाईकरांनी आणखी एका व्यंगचित्रकाराची करून दिलेली ओळख, रविराज गंधे यांचे मराठीविषयक भाष्य, राजीव जोशी यांनी मांडलेला नाटकांचा प्रवास आदी सकस वाचनीय लेखनही या अंकात आहे.

अमेरिकेत दर दोन वर्षांनी होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात 'ग्रंथाली' गेली २२ वर्षे सहभागी झाली आहे. त्यातून तिथल्या लेखकांची पुस्तके निर्माण झाली. सुदेश हिंगलासपूरकर गेल्या सर्वच ११ अधिवेशनांना ग्रंथाली प्रतिनिधी म्हणून हजर राहिले. त्यांनी या काळात अधिवेशनात झालेले बदल पाहिले. वैज्ञानिक प्रगतीचा नेमका वापर तिथे जसा केला जातो, त्याचे अनुकरण आपल्याकडे होताना दिसत नाही हे त्यांचे निरीक्षण आहे. शिकागो येथील गेल्या अधिवेशनात 'ग्रंथाली'ने आपली ३०० पुस्तके इ-बुक रूपात नेली. त्याला तिथे चांगला प्रतिसाद मिळाला. आपल्याकडे ती मानसिकता रुजायला काही काळ जाईल हे खरे, तरी ती भविष्याची गरज ध्यानी घेऊन 'ग्रंथाली'ची सर्वच पुस्तके आता इ-बुक रूपात उपलब्ध होत आहेत.

हा अंक सिद्ध करताना अनेकांचे साहाय्य झाले. जाहिरातीच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळाले. लेखकांनी आमच्या विनंतीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि चांगले साहित्य पाठवले. 'ग्रंथाली' परिवारातील या साऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

महाराष्ट्रातले खेडे-खेडे ते ग्लोबल खेडे हा 'ग्रंथाली' वाचनप्रसार असाच अव्याहत सुरू राहणार आहे.

पुढील अंक सप्टेंबरचा.

**– अरुण जोशी**



॥ श्री अन्नपूर्णा ॥
सहकारात् समृद्धिः
ESTD. 1917
NKGSB
CO-OP. BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)
Across 4 states and 95 years,
your bank has touched many lives.
ATTRACTIVE DEPOSIT SCHEMES
Aadhaar Enabled Savings Account
Auto Sweep
Nishchint Society Account
Pension Account
NRE Account
LOAN PRODUCTS
HomeLoan
Consumer Loan
SME Loan
Education Loan
Profina
Medifina
VALUE ADDED SERVICES
Demat
Life & Non Life Insurance
Franking Facility
QuickNet
Banking at click of mouse
Money Transfer
MoneyGram
XPRESS MONEY
Send now. Receive now.
Pan Card Facility
I-Connect Easy Tax Payment
QuickMobil
Banking at your finger tips
Awaiting AD-1 License from RBI to deal in Forex Transactions shortly.
SAAD
Regd. Office: Laxmi Sadan, 361, V.P. Road, Girgaum, Mumbai, India - 400004
Customer Care No.: 022 2860 2000 www.nkgsb-bank.com

# विश्वपटावर सप्तपदी



स्मिता भागवत

अनेक शतकांपूर्वी द्रष्ट्या संतांनी समाजाच्या डोळ्यांत 'विश्वची माझे घर' या संकल्पनेच्या स्वप्नाचे काजळ रेखले. काळ पुढे सरकत होता आणि भविष्याच्या गर्भात दडलेला हा विचारही! मराठी पावलांनी महाराष्ट्राबाहेरची वाट धरली. विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकात तर या पावलांनी भारताबाहेर पडण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला. संतांनी वर्तवलेले स्वप्नील भविष्य, 'ग्लोबल व्हिलेज'च्या रूपात वर्तमान बनले. सुरुवातीस देशांतर करणाऱ्या पिढीस नातवंडे – काहींना पतवंडे झाली. उच्च शिक्षण प्राप्त करून नशीब अजमावण्याच्या हेतूने समुद्र लांघणाऱ्या पहिल्या पिढीच्या हृदयात, नवे जाणण्याच्या कुतूहलासोबत भययुक्त धडधड होती. म्हणून परदेशी वास्तव्य करायचे ठरवले तरी त्यांनी आपल्या संस्कृतीस घट्ट धरून सुरक्षित निवांतता प्राप्त करण्याचा आटापिटाही केला. जन्मदात्यांच्या पसंतीची भारतीय सहचरी पसंत करणे हा त्याचाच परिपाक! अपवादाने कुणी 'इकडची' सहचरी (क्वचित सहचर) केली; पण तशांच्या मनात अपराधी भाव होता. समाजानेही त्यांची 'मड्डम' घरात आणून धर्म विटाळला, अशी संभावना केली.

गेल्या ५०–६० वर्षांत मात्र विविध देशांचे लोक स्थलांतर करते झाले. अमेरिका–कॅनडा स्थलांतरितांचे – (इमिग्रंट्सचे) माहेरघर बनले. त्यामुळे इथे विविध संस्कृतिधारकांची प्रचंड सरमिसळ झाली. त्यात सुसंस्कृत नागरिकांना विसंवाद इष्ट नाही, हे अलगद कळले. स्वसंस्कृतीचा आदर करणे म्हणजे इतरांची संस्कृती हीन ठरवणे हे समीकरण खोटे असल्याचेही! एकमेकांच्या संस्कृतीचा आदर करणे योग्य आणि आपलाच हेका चालू ठेवणे अयोग्य आहे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. परिणामी, समाजात पारदर्शक विचारांची स्थापना झाली आणि मोकळ्या मनाने निरीक्षण करण्याची वृत्ती जन्मली. या मिश्र समाजात जन्मलेल्या पिढीच्या मनात परंपरागत पूर्वग्रह आणि गृहितकांनी प्रवेश केला नाही. सहज सामंजस्य आणि अनौपचारिकता त्यांचे स्वभावविशेष बनले. म्हणून नवी पिढी 'विश्वाचे अंगण' आंदण मिळाल्याची खात्री बाळगून विश्वपटावर सप्तपदी योग्य ठरवती झाली.

हा बदल स्थलांतरितांच्या पहिल्या पिढीने सहज स्वीकारला, असे नव्हे. कारण ही होती 'पासिंग फेज'! 'असे' लग्न ठरवणाऱ्यांच्या जन्मदात्यांच्या मनात 'ही' लग्ने लेकरांना दुःखी करतील का, आपण मुलांच्या दुःखास

कारणीभूत झालो का, स्थलांतर केले नसते तर मुलांची फरफट टळली असती का, अशा लग्नांमुळे अनैतिक समाजाची निर्मिती होईल का, याचे दूरगामी परिणाम मानवमात्राच्या सुखाची वाट लावणारे ठरतील का... प्रश्नांचे वादळ घोंगावत होते. ही पिढी, स्थलांतर केले ही आपली चूक होती की अपराध, या प्रश्नाच्या समेवर वारंवार ठेचकाळत होती. हे विवाह कुतूहल नि संशयाने बघणाऱ्या समाजास, कालांतराने या बहुतेक जोड्या निवांत-सुखी असल्याचे जाणवले. परंपरागत लग्न ही अंधारात घेतलेली उडी असते. तसे केलेल्या आपल्यापेक्षा मुले अधिक सुखी आहेत, हे कबूल करणे अवघड वाटले तरी ज्येष्ठांना त्यातील वास्तव जाणवले. मग अनिवासी तसेच निवासी भारतीय जन्मदाते आपल्या 'दो या तीन' बछड्यांच्या अशा 'इंटरनॅशनल' कुटुंबात जगभर बागडू लागले. 'ग्रंथाली' वाचक चळवळीस ओढ शोध आणि बोध घेण्याची! ऱ्होड आयलंडला भरणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाच्या निमित्ताने त्यांना 'ग्लोबल मॅरेजेस' हा विषय खुणावू लागला. असा विशेषांक काढण्याचा बेत त्यांनी कानी घातला आणि मनात अशा खूप जोड्या रुंजी घालू लागल्या. साऱ्यांना सामावणे अशक्य नि अनिष्टही! म्हणून वानगीदाखल काही वैशिष्ट्यपूर्ण जोड्यांचे विचार मांडणे योग्य ठरवले आहे.

वाईचे गंगाधर देशपांडे स्थलांतरितांच्या पहिल्या पिढीचे प्रतिनिधी! ते कॅनडात स्थायिक झाले. ब्रॅम्प्टनच्या वाचनालयाच्या एका दालनास त्यांचे नाव दिले जावे असे त्यांचे कर्तृत्व! टोरोंटो मराठी मंडळात ते आणि त्यांच्या सुविद्य पत्नी निशा अत्यंत हिरीरीने काम करत. आता ज्येष्ठांत गणना झालेले अनुभवसंपन्न देशपांडे 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार...' या कक्षेस पोहोचून मंडळाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष झाले आहेत. मुलांचे संगोपन करताना त्यांनी भारतीय संस्कृतीची नाळ तुटू नये यासाठी प्रयत्न केला, पण आपलीच संस्कृती श्रेष्ठ, यातील 'च' गाळून! त्यांच्या दोन्ही सुना अमराठी! मोठी फ्रेंच-कनेडियन तर धाकटी पंजाबी! सुना आणि गोजिरवाण्या नातवंडांना ते शंभर वर्षांहून अधिक जुना वडिलोपार्जित वाडा, तिथला 'बालपणीचा काळ सुखाचा' आणि शाळेच्या आठवणी सांगत. सारे मनापासून ऐकत. त्यांचा मोठा नातू निकलस विश्वविद्यालयात शिकत असताना त्याला सारे बघण्याची इच्छा अनावर होणे, ही त्याची प्रचिती! निकलसच्या फ्रेंच-कनेडियन आईनेही ती इच्छा अवास्तव वा बुझ्र्वा ठरवली नाही. निकलस वेकेशनमध्ये वाईस जाऊ शकणार होता. पण तेव्हा देशपांड्याच्या नजिकच्या नातेवाईकाने घेतलेली ती मूळ वास्तू मोडकळीस आली होती म्हणून तिथे नवी वास्तू उभारण्याचा बेत आखला होता. निकलसला ती बघायची असल्याचे कळताच त्या सुहृदाने तो येईतो वाडा न पाडण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांनी आजोबा-देशपांडे ज्या शाळेत शिकले ती शाळा बघण्याचे निकलसचे स्वप्न पूर्ण करण्यासही मदत केली.

ओटावाच्या मराठी मंडळात उत्साहाने काम करणारे मूळ बडोद्याचे श्रीनिवास आणि सुधा कान्हेरे! मराठी आणि गुजराती संस्कृतीतील नीर-क्षीर-विवेकबुद्धीने नेमके टिपणारे सालस दांपत्य! स्वेच्छेने स्थलांतर केले तरी सुरुवातीस प्रत्येकास स्वजनांची उणीव दुखावत असते. अशा प्रत्येकासाठी श्रद्धास्थान ठरण्याचा जणू या दांपत्याने वसा घेतला. कान्हेरे बडोदे, नैरोबी, इंग्लंड अशी मजल-दरमजल करत तीन लेकरांसह १९६८ साली ओटावास पोहोचले आणि तिथलेच झाले. दुधातील साखरेगत ते समाजात मिसळले. निरलस वृत्तीबरोबरच ओटावात कान्हेरे यांचा योगाबद्दलचा अभ्यास आदरास पात्र ठरला आहे. ओटावाच्या इंडोकनेडियन संस्थेत ते विनामूल्य योगाचे प्रशिक्षण देतात. अशा सुसंस्कृत दांपत्याने पूर्वग्रह, गृहितके यापासून दूर राहून, मोकळ्या वातावरणात मुलांचे संगोपन केले. अमुक पदवी म्हणजेच करिअर, असा हट्टाग्रह न धरता त्यांनी मुलांना हवे ते करण्याची मुभा दिली. म्हणून त्यांच्या तिन्ही मुलांनी 'हटके' म्हणण्याजोग्या क्षेत्रात यशाची पाऊलखूण उमटवली.

नैरोबीत जन्मलेली त्यांची ज्येष्ठ कन्या मेधा स्टिफन रसेल! औपचारिक शिक्षण घेताना शूटिंगसारख्या आगळ्या छंदाचा ध्यास घेणारी! पुढे Ontario Ministry of Finance मध्ये काम करत छंद जोपासणारी! स्टिव्ह नावाने लोकप्रिय असलेला Stephen Russel अभारतीय असण्यास महत्त्व न देणारी! दोन्ही घरांनी हा संबंध विनाविरोध स्वीकारला, असे नव्हे; पण विरोधाचे कारण भिन्न धर्मीय हे नसून त्यांना एकमेकांशी जुळवून घेता येईल ना, ही काळजी होती. तरी लेकाच्या मैत्रिणींच्या गोतावळ्यात मेधा सर्वात अधिक पसंत असल्याचे स्टिव्हच्या आईने मोकळ्या मनाने सांगितले. संवादाच्या माध्यमातून उभयतांच्या वडीलमाणसांच्या मनातील शंकांचे निर्मूलन करूनच ७ एप्रिल १९७९ रोजी मेधा-स्टिव्ह चतुर्भुज झाले. मेधाच्या परंपरांचा आदर व्यक्त करण्यासाठी बुद्धिनिष्ठ पण हौसेने



**स्टिव्ह व मेधा रसेल**

पौरोहित्य करणाऱ्या सहस्रबुद्धे यांच्या हस्ते हिंदू विवाह संपन्न झाला. दुसऱ्या दिवशी रसेल मंडळींचे मन जपणारी चर्च मॅरेज सेरिमनी झाली. लग्नाआधी मेधाकडे मेंदीचा कार्यक्रम हौसेने पार पडला तर स्टिव्हने आताशा आपल्याकडेही दिसू लागलेली बॅचलर पार्टी दिली. त्यात मेधाचे वडील आणि त्यांचे मित्र उपस्थित होते. त्या काळी सरसकट अशी लग्ने होत नसत. म्हणून ओटावा सिटिझन या वृत्तपत्राने या आगळ्या लग्नाचे पूर्ण 'कव्हरेज' देऊन कौतुक केले.

या लग्नास तीसहून अधिक वर्षे झाली आहेत. ते केवळ गुण्यागोविंदाने नांदत नाही, तर पोटापाण्याचे व्यवसाय सांभाळून लग्नपूर्व छंदासही प्राधान्य देत आहेत. शूटिंगच्या करिअरमध्ये त्यांची अविरत घोडदौड चालू आहे. उभयतांनी अनेक बक्षिसे आणि पदके प्राप्त केली आहेत.

हे दोन्ही किस्से भारताबाहेर जन्मलेल्यांचे! बागेश्री पराडकर–ब्रायन मेलिन्सन हे दांपत्य सर्वार्थाने वेगळे! उदय व मृदुला पराडकर यांच्या बागेश्रीस सारे श्री म्हणतात. तीन भावंडांत ती मधली! मोठी अनु आणि धाकटा परेश! घरात समतोल वातावरण! संस्कार आणि स्वातंत्र्य दोन्हीचा आदर करणारे! म्हणून अनुचा ठरवून विवाह झाला असूनही तिचा सहचर बंगाली ऑस्ट्रेलियन आहे. परेशला कॉलेजजीवनात मंगलोरियन कॅथलिक मैत्रीण मिळाली. पुढे मैत्री जन्मभराची सहचरी करणाऱ्या लग्नगाठीत रूपांतरित झाली.

श्रीची कथा अत्यंत सुरस! तिचे बालपण नाशिकमध्ये तर पुढची वाटचाल बंगलोर येथे झाली. बंगलोर युनिव्हर्सिटीच्या माउंट कार्मल कॉलेज ऑफ होम सायन्समध्ये श्री पदवीधारक झाली. मग तिला पत्रकारिता खुणावू लागली. म्हणून पदव्युत्तर शिक्षणासाठी ती पुण्यास गेली. शिक्षण संपवून तिने टाइम्स ऑफ इंडियात प्रवेश केला, तेव्हा ९० चे दशक मध्यावर पोहोचत होते. सुरुवातीस ती वार्ताहर म्हणून काम करू लागली. पुढे फेमिना मासिकाची बेंगलोरची कॉरस्पाँडंट बनली. मग तिने बंगलोर टाइम्सची पूर्ण जबाबदारी सोपवणारे ब्युरो चीफ हे पद प्राप्त केले.

जे मिळवले त्यात तिला समाधान नव्हते की चाकोरीबद्ध शिक्षणाचे आता आकर्षण नव्हते. मनी वेगळ्या जगाचा शोध घेण्याची मनीषा उचंबळत होती. साहस स्वभावाचा अंगभूत धर्म! म्हणून तिने AIESEC (http://www.aiesec.org) यांच्याशी संपर्क साधला आणि एक वर्षासाठी 'टोरोंटो स्टार' या कनेडियन वृत्तपत्रात प्रशिक्षण (एक वर्षाची इंटर्नशिप) घेण्याची संधी मिळवली. त्यानुसार तिने १९९९ मध्ये भारताचा निरोप घेतला. गंमत म्हणजे AIESEC's Toronto Chapter या नात्याने तिला विमानतळावर घ्यायला आलेला इसम ब्रायन होता. ब्रायन नव्या भूमीवर भेटलेला पहिला माणूस! तो श्रीपेक्षा चार वर्षांनी लहान! त्यामुळे हा प्रथमदर्शनी प्रेमाचा किस्सा मात्र नव्हता. श्रीची भेट झाली तेव्हा ब्रायन यॉर्क युनिव्हर्सिटीच्या Business administration of Schulich School चा विद्यार्थी होता. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या डॉर्ममध्ये (हॉस्टेलसदृश रहिवासाची व्यवस्था) त्याचे वास्तव्य होते. संस्थेने त्यास श्रीला घ्यायला विमानतळावर पाठवले असले तरी राहण्याची व्यवस्था संस्था करणार नव्हती. तिची

**मेधा रायफल शूटिंग करताना**



कल्पना होती की जागा त्यांनी दिली तरी भाडे भरायचे असेल. पण जागा शोधण्यापासून सारे तिचे तिनेच करायचे होते. श्रीसाठी टोरोंटो शहर – नव्हे कॅनडा देश अत्यंत नवा आणि अनोळखी! ब्रायनला परिस्थिती जाणवली. निर्मळ मनाने त्याने समाधानकारक सोय होईतो ती त्याच्या डॉर्ममध्ये राहू शकेल, असे सांगितले. भारतीय संस्कृतीत वाढलेली श्री थोडी गोंधळली. पण ब्रायनच्या नितळ नजरेत तिला अनाम विश्वास जाणवला. तातडीने मनाचा कौल घेऊन तिने ब्रायनच्या सज्जनतेवर विश्वास ठेवला – अर्थात होकार दिला. ब्रायन विश्वासाच्या कसोटीत उतरला. चार दिवस त्याच्याकडे राहून श्रीने जागा शोधली तरी मैत्री जमली. कॅनडात एकच वर्ष प्रशिक्षण घ्यायचे होते. स्काईपची सोय भविष्याच्या गर्भात असूनही श्रीचे शिक्षण पूर्ण झाल्यावरही मैत्री फुलत राहिली. केवळ इ–पत्र नि फोनाफोनीच्या मदताने!

ठरल्याप्रमाणे तिने कॅनडाचा निरोप घेतला. २००० साली तिला सिंगापूरच्या टाइम्समध्ये कॉपी एडिटरचे काम मिळाले. हे पद काहीसे उपसंपादकाच्या पदासारखे! वार्ताहराने आणलेल्या बातमीची विश्वासार्हता तपासणे, त्यात कायदेशीर त्रुटी नसल्याची खात्री करून घेणे, कैचीत धरू शकणाऱ्या इतर उलट्या कोलांट्या (लूप होल्स) नसल्याचे तपासणे, मगच लेख तयार करण्याचे हे काम जिकिरीचे तरी बुद्धीस खाद्य पुरवाणारे! तिने ते लीलया पेलले. सुमारे तीन वर्षे तिने हे काम केले.

२०००च्या जून महिन्यात ब्रायनला बंगलोरच्या इन्फोसिस टेक्नॉलॉजीज्मध्ये चार महिन्यांचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली. एका पार्टीच्या निमित्ताने पुन्हा भेट झाली. पुढे तो इन्फोसिसच्या टोरोंटो शाखेत पूर्णवेळ नोकरी करू लागला. या काळात मैत्री घट्ट होण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला. जुजबी मैत्रीचा थांबा ओलांडून मैत्री गहिरी बनली. स्वाभाविकच भारतीय संस्कृती जपणाऱ्या श्रीच्या जन्मदात्यांचा जीव कासावीस होऊ लागला. मुलांनी या मैत्रीस नात्याचे रूप द्यावे वा मैत्री संपवावी असा त्यांनी आग्रह धरला. वास्तविक श्री आणि ब्रायन एका देशात राहत नव्हते. उभयतांच्या मनात विवाह करण्याचा आग्रह नव्हता. पण पराडकर दांपत्यास असा आग्रह धरणे योग्य वाटले. त्यावेळी श्रीची विवाहित बहीण अनु ऑस्ट्रेलियात होती. निर्णय घेण्यासाठी श्री आणि ब्रायन यांनी ऑस्ट्रेलियात भेटायचे ठरवले.



श्री आणि ब्रायनचा लग्नविधी

दोघे ऑस्ट्रेलियास पोहोचले. निवांत चर्चा करण्यासाठी ते ब्रिस्बेनला गेले. त्या संवादाची परिणती २००१ च्या जुलै महिन्यात सिडनीस अनुकडे साक्षगंध करण्यात झाली. अंगठीची देवाण–घेवाण करून उभय पक्ष पुन्हा आपापल्या कामावर – भिन्न देशांत रुजू झाले. २००२ सालच्या १८ फेब्रुवारीस बंगलोरला आर्य समाज पद्धतीने त्यांचा विवाह संपन्न झाला.

लग्न झाले तरी श्रीच्या इमिग्रेशनची प्रक्रिया पूर्ण होईतो 'लाँग डिस्टन्स रिलेशनशिप'ला पर्याय नव्हता. पुनश्च श्रीने बंगलोरहून सिंगापूर गाठले तर ब्रायनने टोरोंटो! जीवनाचा थाट 'मधु इथे अन् चंद्र तिथे' असा! २००४ सालच्या एप्रिल महिन्यात श्रीचे टोरोंटो क्षेत्री

श्री आणि ब्रायन मुलांसह



आगमन झाले आणि खऱ्या अर्थाने दांपत्यजीवन सुरू झाले. त्यांना दोन मुले आहेत. मोठा रोशन आर्थर मेलिन्सन पाच वर्षांचा तर लेक मीराबेला तीन वर्षांची!

ब्रायन इथलाच - लंडन ऑंटारियोचा! हे लंडन इथून जणू हाकेच्या अंतरावर! जन्मदाते इंग्लिश-जर्मन! ब्रायन एकुलता एक! श्री आणि ब्रायन यांचे सहजीवन म्हणजे सुसंस्कृत सहजीवनाचे उत्तम उदाहरण! भिन्न मत असण्याचे स्वातंत्र्य आहे नि प्रेमापोटी मताला मुरड घालण्याची दिलदार वृत्तीही! साधकबाधक चर्चा करून, संवादाच्या माध्यमातून निर्णय घेतले जातात. भिन्न धर्म, देश, संस्कृती, नवऱ्याचे वय पत्नीहून कमी असणे... या कसल्याचाही बाऊ नसतो. मोकळ्या पारदर्शक मनाने संवाद साधला तर प्रश्न दाहक बनत नाही, असे त्यांना वाटते. सर्व धर्मांत चांगल्याचा स्वीकार आणि वाईटाचा निषेध आहे; हे स्वीकारले की भिन्न वाटणाऱ्या संस्कृतीत साम्यस्थळे दिसू लागतात, असे त्यांना वाटते. उदाहरणार्थ, आपल्याकडे नातवास आजोबाचे नाव देण्याची प्रथा आहे. रोशनच्या नावातील आर्थर हे त्याच्या आजोबांचे नाव आहे.

बहुतांश लोक समस्यांचे भय बाळगून मळलेली वाट पसंत करतात. देश सोडताना मनात प्रगतीची आस आहे, असे म्हणणारेही प्रगती म्हणजे बदल, हे विसरतात. प्रगतीची आस बाळगणाऱ्यांनी बदलाचे भय का बाळगावे? जातीजमातीस चिकटून राहल्याने आयुष्य निवांत होते, या भ्रमास तार्किक विचाराची बैठक नाही; तरी पुरोगामी असण्याचा आव आणणारे काही स्थलांतरित भिन्न संस्कृतीचा बागुलबोवा करतात. हा विरोधाभास हास्यास्पद आहे, हे त्यांना का कळत नाही, असा प्रश्न श्रीला पडतो. वास्तविक जीवनाचा प्रवाह विविध वळणे घेत पुढे सरकतो. म्हणजे त्यात बदल अपरिहार्य! मग बदल भयभीत का करतो? हा रोखठोक प्रश्न ती विचारते. ग्लोबल मॅरेजेसची प्रक्रिया वाढली तर बुझर्वा प्रश्नांच्या भिंती विरघळतील आणि सशक्त निकोप समाजाची निर्मिती होईल, असे तिचे प्रांजळ मत आहे.

इथले बहुतेक यशस्वी ग्लोबल विवाहित श्रीच्या मतास अनुमोदन सुचवतात. ग्लोबल व्हिलेजची संकल्पना साकार होत असताना सप्तपदीस विशिष्ट प्रदेश, भाषा वा संस्कृतीच्या सीमा अडसर ठरू नयेत, असे त्यांना वाटते. स्त्री-पुरुष आकर्षण नैसर्गिक असले तरी स्थैर्य आणि सुखाचा शोध घेताना समाजाने लग्नसंस्था निर्माण केली आहे. कोणत्याही संस्थेचा गाडा समंजसपणा अंगीकारल्याविना उत्तम चालू शकत नाही. या नियमास लग्नसंस्था अपवाद नाही. समंजसपणा विशिष्ट जाती-जमातीची वा धर्म-संस्कृती-भाषेची मक्तेदारी नाही, हे पटले की विश्वपटावरील सप्तपदीचा - ग्लोबल मॅरेजेसच्या संदर्भातील विरोध आपसूक गळून पडेल. तुम्हाला काय वाटते?

- स्मिता भागवत

53 Townley Cres. Brampton ON
L6Z4S9 Canada.1 289 752 8885
smitacap@gmail.com


## नाही चिरा नाही पणती - स्मिता भागवत




इतिहास केवळ तारखांचा रोजमेळ नसतो. संवेदनशील मनात, अतीतात दडलेल्या समर्थ महानुभावांविषयी आदराची ज्योत असते-असायला हवी. इतिहास आपली पाळेमुळे! मुळे छाटली तर बॉन्साय निर्माण होतात. पुढच्या पिढीचे व्यक्तिमत्त्व चहू अंगानी फुलले पाहिजे, असे वाटत असेल तर मुळे छाटली जाणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी, असे मला मनापासून वाटते म्हणून हा लेखनप्रपंच.

इतिहासाच्या पानावर सोनेरी अक्षरात उल्लेख व्हावा, अशा कित्येक समर्पितांची, साधी जाणीव आजच्या पिढीकडे नसली तर ते ती पुढच्या पिढीस कशी देणार? या अवस्थेवर मात करून नव्या पिढीस अनोख्या आनंदाची किंचित चुणूक मिळवून देणे व महानुभावांना मानवंदना देणे, हे या पुस्तकाचे प्रयोजन आहे. इतिहासात महत्त्व न लाभलेल्या - काही इतिहासात महत्त्व मिळालेल्या महानुभावांच्या, पण अंधारात राहिलेल्या घटनांच्या त्यात समावेश आहे.

- स्मिता भागवत

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# ग्लोबल दांपत्यांशी गप्पा



**मेधा आलकरी**

स्वतःच्या टापटिपीची शेखी मिरवत कोकणस्थ ब्राह्मणांनी देशस्थांना गैरशिस्त म्हणणं आणि त्याला उत्तर म्हणून देशस्थांनी कोकणस्थांच्या कंजुषीवर मुक्ताफळं उधळणं, मराठ्यांनी आपल्या ९६ कुळांचा आणि पाच कळशींनी आपल्या कळशांचा अभिमान बाळगणं, सारस्वतांनी सिकेप्यांच्या स्वयंपाकावर तोंडसुख घेणं आणि मग सिकेप्यांनी त्यांच्या जेवणाला नाकं मुरडणं, विदर्भातील जोड-क्रियापदांची थट्टा आणि बेळगावी हेलांची टवाळी, 'टू स्टेट्स'मधील पंजाब्यांचा पेट्रोलपंपांचा आकडा अन् मद्राशांचा डिग्रींचा सोस! विवाहामुळे एकत्र आलेल्या जाती-पोटजातींमधील म्हटलं तर हे लाडिक भांडण, कधीमधी विकोपाला जात असलं तरी, त्यात गमतीचा भागच जास्त असतो. मुख्य चालीरीती, भाषा, सणवार साधारण सारखेच असतात. ह्या पार्श्वभूमीवर एखादा कुलभूषण 'गोरी मड्डम' घेऊन आला, किंवा लाडक्या लेकीनं दूरस्थ दादल्याशी लगीन घाटलं तर घरात महाभारत घडत असेल की आपल्या उदार भारतीय संस्कृतीनुसार त्यांना आपल्यात सहज सामावून घेतलं जात असेल? प्रेमाचा पहिला बहर ओसरल्यावर खुद्द जोडीदारांना लग्नाचा निर्णय जाचक तर नसेल वाटत? अशा ह्या आंतरदेशीय लग्नांतील 'वेलीवरची फुलं' दोन संस्कृतींच्या झगड्यात भांबावत असतील का? आणि त्याउलट अशा भिन्न प्रकृतीच्या माणसांचं दांपत्यजीवन हे विश्वशांतीच्या हुंडीत पडलेलं मोठं दान म्हणावं का? अशा अनेक प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मी काही ग्लोबल दांपत्यांशी गप्पा केल्या.

आमच्या अगदी शेजारच्या घरात राहणाऱ्या मिकीनं टोमोको ह्या जपानी बाईशी लग्न केलं. त्याला २ मुलं आहेत. मिकी म्हणजे मायकल लोबो. हा मुंबईचा अँग्लो-इंडियन. दर रविवारी चर्चमध्ये जाणारा, तिथे गाणारा कॅथलिक ख्रिश्चन; तर टोमोको हनावा गावातील बौद्धधर्मीय जपानी मुलगी. लग्नानंतर ती दोघं गोव्यात राहतात. शालिनी बहुगुणा ही युनिसेफमध्ये उच्चपदस्थ, लखनौमध्ये जन्मलेली अगदी भारतीय वळणाची मुलगी. ती क्रिस्टोफर ह्या नॉर्थविच इथे जन्मलेल्या ब्रिटिश इसमाशी विवाहबद्ध झाली. गंमत म्हणजे शालिनीच्या मनात ह्या ब्रिटिश लोकांबद्दल आणि त्यांच्या जुलमी राजवटीबद्दल फारच आकस होता. पण परमेश्वरानं लग्नाची गाठ तिथेच बांधली होती. ही जोडगोळी आता नोकरीनिमित्तानं मियान्मार (बर्मा) इथं राहते. अक्षय सावंत (हे यु.पी.चे सावंत) हा बरेलीमध्ये जन्मलेला, दिल्लीत वाढलेला,

इंजिनीयरिंगची पदवी घेण्यासाठी रशियात गेला असता कॉलेजमध्येच तातियानाच्या प्रेमात पडून डिग्री घेताच विवाहबद्ध झालेला, प्रतिगामी विचारांच्या कुटुंबातील मुलगा. एक मुलगा-एक मुलगी असलेलं हे चौकोनी कुटुंब आता जरी ब्रिटनमध्ये राहत असलं तरी तान्यानं (तातियाना नावाचं भारतीयकरण) चार वर्षं दिल्लीत एकत्र कुटुंबात काढली आहेत. पल्लवी ही अमेरिकेत स्थलांतरित होणाऱ्या भारतीय परिवारांपैकी पहिल्या पिढीतील मराठी मुलगी, तर डायर ह्याचे वाडवडील अठराशे सालापासून अमेरिकेत वसलेले ज्यू. डायरला आपली खरी ओळख आणि फोटो प्रसिद्ध करणं प्रशस्त वाटेना म्हणून ह्या लेखापुरती त्यांची नावं बदलली आहेत. गीता वर्मा ही युनॉप्समध्ये डायरेक्टरच्या पदावर कार्यरत असलेली, भारतीय मूल्यं, भारतीय इतिहास, हिंदी भाषा (सहीसुद्धा हिंदीत करते) ह्या साऱ्यांचा सार्थ अभिमान असलेली. गझल, कविता, जुनी गाणी ह्यात रमणारी. ती विवाहबद्ध झाली तिच्यापेक्षा वयानं लहान असलेल्या राहुल कपिला याच्याशी. राहुल केनियात स्थायिक झालेल्या तिसऱ्या पिढीतील भारतीय. त्याचा व त्याच्या वडिलांचा जन्म नैरोबीतला. म्हणून भारतीय मूळ असलं तरी तो आफ्रिकनच. 'तो आला, त्यानं पाहिलं, त्यानं जिंकिलं' असं पाहताक्षणी प्रेमात पडले ते फक्त अक्षय आणि तान्या. त्यांची कोवळी वयं त्याला कारणीभूत असावीत.

पल्लवी आणि डायरसुद्धा कॉलेजच्या नृत्यस्पर्धेत भेटले होते. परंतु त्यांनी लगेच लग्नाच्या आणाभाका घेतल्या नाहीत. ही थोडी आधुनिक पिढी. २००८ मध्ये त्यांचं लग्न झालं ते सहा महिन्यांच्या भेटीगाठीनंतर आणि ते सुद्धा दांपत्यजीवनाच्या बारीकसारीक बाबींचा विचार करून. अमेरिकेत स्थायिक पालकांना बहुधा हे अपेक्षित असावं, कारण घरून काही आडकाठी नव्हती. अक्षय-तान्याचा लग्नाचा निर्णय ९५ सालचा. आई व कर्मठ विचारांचे आजोबा ह्यांचा लग्नाला कडाडून विरोध. अभ्यास करायला जाऊन 'नसते धंदे' केले म्हणून पिताजी नाराज. पण ती दोघं आपल्या निर्णयावर ठाम होती. 'लाख मना लें दुनिया, साथ ना ये छुटेगा' म्हणत शेवटी एकदाचं सूप वाजलं. आज सासूबाई ह्या रशियन सुनेवर बेहद्द खूश आहेत. आणि माहेरी अभावानं आढळणाऱ्या मायेच्या ओलाव्यात सासरी चिंब भिजून सूनबाईही कृतार्थ आहेत.

मिकी-टोमोकोचं लग्नही ह्याच काळातलं. १९९३ साली झालेलं हे लग्नसुद्धा काळानुरूप विरोधातून



शालिनी आणि क्रिस्टोफर

तावूनसुलाखून तरलेलं. त्यांची पहिली भेट झाली फ्रान्समधील castle of calcasone इथे. भेटताक्षणी लगेच विचार जुळले का? ह्या प्रश्नाला उत्तर देताना मिकी म्हणाला , ''अगं, विचार तिथे नसून इतिहासात रमले होते. आम्ही दोघं टूरिस्ट गाईडची बडबड ऐकत होतो .'' त्यानंतर झालेल्या 'प्रीती'भोजनामुळे त्यांची ओळख वाढली. तिथून रस्ते जरी वेगळे झाले तरी कुठेतरी तार जुळली होती. सणावारांचं निमित्त काढून शुभेच्छा पाठवल्या जायच्या. अशी तीन वर्षं सरल्यावर मिकीच्या आमंत्रणावरून टोमोको भारताची सैर करायला आली. दुर्दैवानं तो मुंबईतील काळा दिवस होता. ९२ सालच्या बॉम्ब धमाक्यानंतर मुंबई पेटली होती. त्यातून तिला जपत काळजीपूर्वक गोव्याला नेलं. आणि तिथे ही दोघं प्रेमात पडली. पूर्ण दक्षिण भारत दाखवायची कल्पना बासनात गुंडाळली गेली आणि १५ दिवस एकत्र घालवल्यावर धीर-गंभीर समुद्राच्या साक्षीनं विवाहबंधनात अडकून घ्यायचा निर्णय ह्या दोघांनी घेतला. दोन संस्कृती, दोन धर्म एक झाले.

गीतानं मात्र निर्णयाप्रत येण्यास नऊ वर्षांचा काळ जाऊ दिला. भारताच्या प्रेमापोटी, ह्या धेडगुजऱ्या भारतीय संस्कृतीशी आणि भिन्न प्रकृतीच्या माणसाशी आपलं कसं जमेल ह्यावर विचार करण्यात तिनं बराच काळ जाऊ दिला. कुटुंबीयांच्या बाबतीत मात्र इथे गंगा उलटी वाहत होती. दोन्ही कुटुंबं लग्नाची गळ घालत होती.

शालिनीचंही थोडंसं असंच. पस्तिशी उलटून गेली आहे आणि एकदाचा तो soulmate तुला सापडलाय तर उडवून टाका बार लवकरात लवकर असा कुटुंबीयांनी सततचा लाकडा लावला. शालिनी आणि क्रिस जकार्ता

इथं कामानिमित्तानं एका कॉन्फरन्समध्ये भेटले. औपचारिक गप्पांमध्येसुद्धा आपली मतं बरीच जुळताहेत असं त्या दोघांनाही जाणवलं. लग्नाचा दिवस उजाडायला इथंही ४–५ वर्षं गेलीच. विचार जुळले म्हटलं तरी मूलभूत विचारसरणीत फरक असल्यामुळे सहजीवन सुरू झाल्यावर अगदी छोट्या–छोट्या गोष्टींत तफावत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यात मुख्यत्वेकरून होत्या खाण्या–पिण्याच्या सवयी, मनोरंजनाची निवड, आणि हो, देशाचं राजकारणसुद्धा. पण प्रेमवश, आपल्या जीवनात त्यांनी ह्या साऱ्याची सुंदर सरमिसळ केली आहे. क्रिस आता थोडं जास्त तिखट–मिठाचं शाकाहारी जेवण आवडीनं जेवतो. ह्युमरनं परिपूर्ण अशा काही ब्रिटिश फिल्म्स व टीव्ही मालिका आता तिच्या खास आवडीच्या झाल्या आहेत. यश चोप्रा यांच्या काही निवडक मनोरंजक सिनेमांची ओळख क्रिसला शालिनीमुळे झाली. होळी हा त्याचा खास आवडता भारतीय सण ती दोघं आवर्जून साजरा करतात. शालिनी प्रत्येक नाताळ सासरी जाऊन, भेटवस्तूंची खरेदी करून आनंदात घालवते. NDTV वरील अण्णा आंदोलन असो वा आर्थिक धोरणाची चर्चा, क्रिस मनापासून ऐकतो. त्याला भारतीय राजकारणात चांगलाच रस आहे. शालिनीचा ब्रिटिशांकडे बघण्याचा दृष्टिकोन बराच मवाळ  झाला आहे.



राहुल आणि गीता



मिकी आणि टोमोको

भारतीय मनाला न रुचणारं गारढोण अन् थोडंसं बेचव अन्न शालिनीही हसतहसत घशाखाली उतरवते. भांडणाचा विषय कोण कसं खातं हा नसून थोडा वेगळ्याच धर्तीचा आहे. ऑफिसमधील जबाबदाऱ्या असल्यामुळे शालिनीला स्वयंपाकीणबाईनं रांधलेलं वरणभात, भाजीपोळी असं साधं पण आयतं जेवण हवं असतं. तर क्रिसला थोडा हमारा थोडा तुम्हारा करत दोघांनी मिळून मजेत बनवलेलं वन–डिश जेवण आवडतं. त्याकरता सामुग्री आणण्यासाठी दोघांनी एकत्र बाजारहाट करणं त्यास भावतं. ह्या cook together वरून दोघांचं कधी कधी बिनसतं. अर्थात शेवट नेहमी गोडच होतो. वाचनाच्या ओढीनं दर्जेदार ब्रिटिश साहित्याची दालनं क्रिसनं शालिनीसाठी उघडून दिली. ड्राय

एकमेकांची संस्कृती अशी मुळापासून जाणून घेण्याचा प्रयत्न अक्षय आणि तान्या यांनीही मनापासून केला. दिल्लीतील वास्तव्यात तिनं हिंदीची शिकवणी लावली होती. जात्याच हुशार असल्यामुळे तिनं ती भाषा इतकी पटकन आत्मसात केली की थोड्याच दिवसांत भाजीवाल्यांशी आणि रिक्षावाल्यांशी घासाघीस करण्यात ती पटाईत झाली! बहुधा त्या गोऱ्या मुखड्यातून येणाऱ्या विदेशी बोलांना ऐकताना त्यांचं छान मनोरंजन होत असावं आणि मग थोड्याशा नफ्यावर ते पाणी सोडत असावेत. तान्या माहेरहून एक अतिशय मौल्यवान वस्तू घेऊन आली होती . रशियन टू इंग्लिश डिक्शनरी! मग अक्षयच्या कुटुंबीयांनीसुद्धा इंग्लिश टू रशियन अशी डिक्शनरी  खरेदी

केली. सुरुवातीच्या दिवसांत रोजचं संभाषण ह्या शब्दकोशामार्फतच होत असे. अक्षय रशियातील चार वर्षांच्या वास्तव्यात उत्कृष्ट रशियन बोलावयास शिकला होता आणि आता तान्या पण हिंदी बोलते. भाषेचा मोठ्ठा अडसर दूर झाल्यावर जवळीक वाढली असं त्यांच्या कुटुंबीयांचं म्हणणं पडलं. तान्या तर खरी ग्लोबल संकल्पना मांडते. तिच्या मते, जगातील विभिन्न म्हणवल्या जाणाऱ्या संस्कृतींत वेगळेपणा थोडा व समानता अधिक आहे. एकमेकांच्या संस्कृतीबद्दल आदर आणि आपलेपणा दाखवला, भिन्न संस्कृतीतील अधिक संपन्न विचाराला आपल्या आचरणात प्रवेश दिला तर आपण सकारात्मक जीवन जगून त्याचा आनंद उपभोगू शकतो.



अक्षय-तान्या आणि त्यांची मुलं

विविध संस्कृतींतील समानता दाखवताना डायरनं असं निदर्शनास आणून दिलं की दोन्ही समाजांत कुटुंबाचं सुख आणि शिक्षण ह्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीयांचा विवाहसोहळा मंडपात होतो तर ज्यू लोकांचा चुप्पहखाली. आपल्याकडे जशी सप्तपदी तशी त्यांच्याकडे वधुवरांसाठी सात आशीर्वचनं.

मिकी आणि टोमोकोचे व्यवसाय म्हणाल तर अगदी वेगळे. युद्धानंतरचा जपानचा उद्धार जवळून पाहिलेली, सृजनात्मक लेखन आणि अफाट वाचन करणारी ही संवेदनशील स्त्री. मिकी अवजारांशी खेळणारा इंजिनीयर. मात्र दोघांच्या आवडी-निवडी जुळल्या. पाश्चिमात्य शास्त्रीय संगीत, कला, प्रवास, वाचन, मित्रांचा गोतावळा आणि दोघांच्या रक्तात भिनलेली उद्योजकता, खाण्यापिण्याच्या सवयींमुळे बेबनाव असंही कधी झालं नाही. दांपत्यजीवनात कधी सहमतीचे आनंदाचे तर कधी विसंवादाचे सूर उमटतातच. ह्या ग्लोबल जोडप्यांनी मला आवर्जून सांगितलं की अशा वेळी आम्ही प्रयत्नपूर्वक विचारविनिमय करून सामोपचारानं तोडगा काढत असतो. भारतामध्ये धर्म हा एकत्र नांदण्यातील महत्त्वाचा पैलू. तू तुझा, मी माझा धर्म आचरायचा ठरवलं तरी मुलांचं काय? मिकी व कुटुंबीय ख्रिश्चन म्हणून गोव्यात असले की चर्चमध्ये जातात आणि जपानला गेले की तितक्याच श्रद्धेनं बौद्ध मोनेस्टरीत जातात. व्यक्तिशः धार्मिक असलेलं हे कुटुंब प्रत्येक प्रार्थनास्थळी जाऊन त्या एकाच परमपित्यासमोर नतमस्तक होतं. सर्वधर्मसमन्वयाची भावना मुलांच्या मनात खोलवर रुजली नाही तरच नवल!

शालिनी म्हणते, मी आध्यात्मिक असले तरी क्रिस नास्तिक आहे. परंतु मानवी मूल्यांवर दृढ आस्था असल्यामुळे आमची कृती समान असते. डायर मुलांना एकाच धर्मात वाढवण्याच्या पक्षातला. परंतु दोन्ही निधर्मी संस्कृतींची ओळख त्यांना असेल असं त्यानं ठासून सांगितलं. विविधतेतील एकात्मता हे भारताविषयी केलं जाणारं विधान आम्हांस तंतोतंत लागू पडतं असं गमतीनं म्हणताना गीतानं हा विरोधाभास उलगडून दाखवला. राहुलला समुद्रकिनारा आवडतो तर तिला डोंगरमाथा. तिला थंडी आवडते, त्याला अजिबात सोसत नाही. (रात्रभर एसी बंद-चालू करण्याचा मजेदार खेळ खेळला जातो!) तो जाझ संगीताचा दिवाना, ठेका त्याच्या रक्तात भिनलेला (तसा तो आफ्रिकनच) तर आमची गीता हळुवार, मंजुळ अशी जुनी हिंदी गाणी गाणारी. गोल्फ त्याचं वेड तर ही मैदानी खेळांची वैरी. ती म्हणते, ''ह्या खेळात मला रुची संपादन करवण्याचा विफळ प्रयत्न त्यानं सोडून दिलाय आणि गझलांच्या शब्दांतील सूक्ष्म भेद त्याला समजावून सांगण्याच्या फंदात आता मी पडत नाही. पण त्यामुळे आमचं आयुष्य कधीच नीरस नसतं. ह्या वादविवादांमुळे आयुष्यात पदोपदी आव्हान आहे, कसा एक सळसळता प्रवाह आहे आणि म्हणूनच मजा आहे.'' कधीतरी राहुल चिडलेला असला तर त्याच्या अस्खलित स्वाहिलीत बोलू लागतो. गीता मग तितक्याच हिरिरीनं हिंदीतून बडबडू लागते. ह्या टोमण्यांचा शब्दार्थ कळत नसला तरी मथितार्थ दोघांनाही उमजतो. ह्या भिन्न स्वभावांना एका सूत्रात बांधून ठेवतं ते त्यांच्यामधील अपार प्रेम आणि एकमेकांच्या कुटुंबीयांबद्दलची आत्मीयता.

आपल्याकडे असते तशी चुलत, मावस भावंडांची पलटण क्रिसकडे नाही ह्याचं शालिनीला खूप वाईट वाटतं. आई-बाबा, बहीण-भाऊ एवढंसं कुटुंब अन् त्यातच हे

खूश. शालिनीला आठवतात त्या ह्या फौजेबरोबर घालवलेल्या उन्हाळी सुट्ट्या. क्रिसला स्वतःसाठी असा वेगळा वेळ हवा असतो. नुकतीच वीस दिवसांची सुट्टी घेऊन ही दोघं भारतात आली होती. १० दिवस शालिनीच्या वयस्कर आईवडिलांसोबत काढले आणि मग दहा दिवस ते एका हिलस्टेशनला होते. त्या दिवसांत शालिनीला फार अपराधी वाटत होतं. आपण भारतात आहोत अन् आई-वडिलांबरोबर नाही ही टोचणी तिला लागून राहिली होती . आता आता कुठे भारतीय मानसिकता लक्षात तो घेऊन लखनौमध्ये असताना तरी सगळे दिवस नातेवाईकांच्या गोतावळ्यात घालवतो. आपल्याकडे एक गैरसमज आहे की विदेशात मुलं मोठी झाली की आपल्या पालकांना विचारत नाहीत, म्हातारपणी त्यांची काळजी घेत नाहीत आणि म्हणून वृद्धाश्रमांची संख्या जास्त आहे. ब्रिटिश संस्कृतीशी जवळून संबंध आल्यावर शालिनीचं असं मत झालंय की असे ठोकताळे आखणं बरोबर नाही. भारतातसुद्धा अशा पाल्यांचं प्रमाण आहे. काही काळजी घेतात, काही वाऱ्यावर सोडतात. ब्रिटनमध्ये प्रेमाविण फक्त कर्तव्य-भावनेतून काळजी घेत आहेत हे चित्र मात्र दिसत नाही.

ह्या ग्लोबल लग्नाच्या गोष्टीतील मजेदार किस्से ऐकायची मला खूप उत्सुकता होती. मिकी जेव्हा त्याच्या भावी सासूला टोकियोच्या विमानतळावर पहिल्यांदा भेटला तेव्हा त्यानं तिच्याशी हस्तांदोलन करून दोन्ही गालांचा ओझरता मुका घेतला. त्याच्या ह्या कृतीनं म्हातारी एकदम भांबावली. तिचा जपानी जावई असता तर तो थोडा वाकला असता, मग ती अजून थोडी वाकली असती, प्रत्युत्तर म्हणून तो तिच्याहून अधिक लवला असता आणि तिचं अभिवादन केलं असतं. हा म्हणायचा कल्चरल शॉक! शालिनी म्हणते, भेट स्वीकारायच्या आधी थोडा वेळ नको नको म्हणणं ही भारतीय पद्धत ती अजून तरी क्रिसच्या गळी उतरवू शकली नाही. त्याला वाटतं नको म्हणणं म्हणजे असभ्यपणा, अहंकाराचं लक्षण.

अक्षयच्या आयुष्यातला मॉस्को विमानतळावरील प्रसंग असाच मजेशीर. ९/११ नंतर महिनाभरात तो सहकुटुंब सासुरवाडीस गेला होता. तान्या व साशा (खरं तर साक्ष्या. साशा हा रशियन टच) सामानाची वाट बघत सामानकक्षात थांबल्या आणि अक्षय इमिग्रेशनवाल्या बाईकडे त्याचा भारतीय पासपोर्ट घेऊन गेला. भाषा येते, इंजिनीयर आहे ह्या गोष्टी ९ /११ मुळे थोड्या संशयास्पद वाटलेल्या. मग तिनं प्रश्नांची सरबत्ती सुरू केली आणि शेवटी विचारलं, ''बायको कुठे असते सध्या?'' तो म्हणाला, ''ती काय तिथे सामानकक्षात उभी आहे.'' बाईनं तान्याला बोलावून विचारलं, ''नवरा टाकून सामानाची कसली काळजी करते आहेस?''

तान्या हसून उत्तरली, ''अग बये, नवरा कुठं जातोय? सामान गेलं तर मिळणार नाही परत.'' तेव्हा मॉस्कोत 'हरवले ते गवसले ना' असे दिवस होते. तान्याच्या उत्तराची पद्धत पाहून ती दोघं नवरा-बायको असल्याची तिची पूर्ण खात्री पटली आणि तिनं हसतहसत रशियात तुमचं स्वागत असो म्हणत पासपोर्टवर शिक्का मारला.

आता ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर ग्लोबल लग्नांचं प्रमाण वाढेल की घटेल असा प्रश्न मी ह्या जोडप्यांना केला असता सर्वांनी एकमुखानं 'वाढेल' असाच निर्वाळा दिला. ग्लोबल लग्नाची गोष्ट इतर लग्नांपेक्षा फार काही वेगळी नाही असं त्याचं मत पडलं. दोन माणसं इतकी जवळ येतात, एकत्र नांदू लागतात. ती जर एकमेकांच्या संस्कृतीचा आदर करायला शिकली, कधीमधी येणाऱ्या टोमण्यामुळे थोडीफार भांडू लागली, अशी वादळं सामोपचारानं शमवायला शिकली तर हे विश्वशांतीच्या दिशेनं टाकलेलं नन्हं, अगदी छोटंसं पाऊल असेल. अशा ग्लोबल लग्नाच्या ग्लोबल मुलांना मग बेगडी सीमारेषा सतावणार नाही. सर्वधर्म समन्वयाचा सर्वोच्च मंत्र ते अंगिकारतील. त्यांच्या मनाची खुली कवाडं सर्वांना सामावून घेत अधिक सहिष्णू व क्षमाशील बनतील. इराकमधील सुन्नी-शियांचा झगडा काय किंवा आपल्याकडील हिंदू-मुसलमानांचा झगडा काय, द्वेषाच्या ह्या त्सुनामीतून तरून सुखरूप तीराला लागली होती ती मिश्र कुटुंबंच. मिश्रविवाहांनी एक धोका मात्र पक्का ध्यानात ठेवायचा. कधी कधी सगळं सोडून नवं बनण्याच्या प्रयत्नात दोन्ही संस्कृतींतील उत्तम गोष्टींचा त्याग होऊन स्वतःची ओळखच हरवून बसते. 'जुनं ते सोनं, नवं ते हवं' म्हणत चांगल्या गोष्टी टिकवायच्या आणि चिरकाल टिकणाऱ्या मानवी मूल्यांशी तडजोड करायची नाही. आपापली संस्कृती जपत असताना ग्लोबल संस्कृतीचा भाग होणं म्हणजेच खऱ्या अर्थानं वसुधैव कुटुंबकम् ह्या संज्ञेला जागणं.

**- मेधा आलकरी**
ए-५०२, रूपेल हाईट्स
मरियन कॉलनी, मेरी इमॅक्युलेट गर्ल्स हायस्कूलजवळ,
बोरीवली (पश्चिम), मुंबई ४००१०३
भ्रमणध्वनी : ९८२००९५७९५
medhaalkari@gmail.com



# ‘एकजीव’ जगाची सुरुवात

आल्हाद गोडबोले

पुणे, अलाहाबाद की तंजावर? ठिकाण महत्त्वाचं नाही; ते आपल्या भारत देशातलंच आणि घटना साधारण पंधरा-वीस वर्षांपूर्वीची. म्हणजे ‘ग्लोबल व्हिलेज’ अर्थात ‘सारं जग हे एक खेडं’ अशा विश्वात्मक कल्पनेनं आर्थिक उदारीकरणाची भूमिका स्वीकारल्यानंतरच्या काळातली. सहकारी तत्त्वावर अकराहून अधिक कुटुंबं किंवा घरं ज्या इमारतीत असतात, त्यांना ‘सोसायटी’ म्हटलं जात असलं, तरी विश्वात्मक समाजाची कल्पना शे-दोनशे घरांच्या ‘सोसायटी’तही अजून रुजत नसल्याची बोचरी जाणीव करून देणारी, अशी एक घटना.

एक पुरुष आणि एक महिला -म्हणजे दाम्पत्य- या सोसायटीतल्या एका फ्लॅटमध्ये राहत होतं. कुणाच्या अध्यात ना कुणाच्या मध्यात. पण ‘समाजा’च्या नीतामत्तेच्या परंपरा निष्ठेनं पाळणाऱ्या सोसायटीतल्या सदस्यांना एक दिवस कळलं, की या दोघांचं लग्न झालेलं नाही - थोडक्यात, त्यांची ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ आहे. फक्त विवाहित जोडप्यांनाच सोसायटीत स्थान असायला हवं, या धारणेतून त्या दोघांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रकरण कोर्टात गेलं. त्यांच्या ‘बेकायदेशीर’ संबंधांबद्दल न्यायालयानं शिक्षा द्यावी, हा बहुजनांचा - म्हणजे सोसायटीतल्या बहुमतातल्या सज्जनांचा- दावा फेटाळला गेला. ‘अल्पमतातल्या’ जोडप्याचं वर्तन शंभरातल्या उर्वरित नव्याण्णव जोडप्यांना अयोग्य वाटलं तरी कायद्यानं ते अनैतिक ठरवता येत नाही, हे न्यायालयानं सांगितलं.

विवाह न करता पती-पत्नीच्या नात्याप्रमाणे एकत्र राहणारी अशी जोडपी त्यापूर्वीही होती; आजही अनेक आहेत, पण त्यांना समाजमान्यता मिळण्यासाठी कदाचित पुढचं शतक उजाडण्याची वाट पाहावी लागेल. काळ कितीही झपाट्यानं बदलत असला तरी भारतीय समाजमानस बदल स्वीकारताना किती सावध असतं, याची उदाहरणं अनेक देता येतील. उपरोल्लेखित उदाहरण

प्रतिगामी, किंबहुना, बुरसटलेल्या विचारसरणीचं म्हटलं तरी वैवाहिक जीवनाबद्दलच्या आधुनिक, पाश्चिमात्य कल्पना इथे अजून परक्याच मानल्या जात आहेत, हे यातून अधोरेखित होतं.

विसावं शतक संपून एकविसावं शतक उजाडत असतानाच्या संधिकाळात इंग्लंड-अमेरिकेतली किंवा प्रगत, पाश्चिमात्य राष्ट्रांमधली परिस्थिती काय होती?

उत्क्रांतीच्या आदिम अवस्थेत स्वैराचार अस्तित्वात होता. मानव समूहानं राहू लागल्यावर समूहविवाह, बहुपतिकत्व, बहुपत्नीकत्व आणि एकपत्नीकत्व या क्रमानं त्यात बदल होत, विवाहसंस्थेचं हे बहुतांशी सर्वमान्य स्वरूप विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून जगात रुजू लागलं. इंग्लंड आणि युरोपीय देशांत एकपति-पत्नीकत्वाची प्रथा आदर्श मानली जाऊन ती कायद्यानुसार रूढ होत गेली. पण दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वच थरांतल्या घड्या विस्कटल्या, तशी सामाजिक, विशेषत: विवाहसंस्थेची घडीही नवं, सोयीचं रूप स्वीकारू लागली. लिव्ह इन रिलेशनशिप, विवाहबाह्य मातृत्व, एक-पालक कुटुंब म्हणजे 'सिंगल पॅरेण्ट फॅमिली' या त्याच अर्धशतकात रुजलेल्या प्रथा-परंपरा किंवा संस्था.

इंग्लंड-अमेरिकेत १९६० सालानंतर विवाहसंस्थेचं महत्त्व ओसरू लागलं. 'विवाहबाह्य' संबंध, विवाह न करता जन्मास आलेलं 'अनौरस' अपत्य किंवा विवाहबाह्य मातृत्व-पितृत्व यासंबंधीच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल होऊ लागला. नैतिक-अनैतिकतेची पारंपरिक मूल्यं शिथिल होत चालली.

थॉमसन फाउंडेशनच्या फेलोशिपच्या निमित्तानं मी १९८२ साली पाच महिने इंग्लंडमध्ये राहिलो होतो. तेव्हा ब्रेण्टचे उपनगराध्यक्ष असलेले पद्माकर ऊर्फ पीटर पेंडसे बोलताबोलता म्हणाले होते, 'ब्रिटन इज सफरिंग फ्रॉम टू डिसिजेस. वन इज, बेटिंग ऑन सॉकर (फूटबॉल) अॅण्ड अनदर इज, सिंगल पॅरेण्ट फॅमिलीज.' फूटबॉल सामन्यांवर त्यावेळी लक्षावधी पौंडांचा जुगार खेळला जात असे आणि तो कायदेशीर होता. त्यानंतर तीस वर्षांनी आपल्या देशात 'आयपीएल क्रिकेट'च्या नावानं चालू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जुगाराला कायदेशीर मान्यता देण्याची मागणी ललित मोदी आणि त्यांचे बोलविते धनी आज प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीत्या करत आहेत.

वैवाहिक संबंध नसताना अपत्यासहित वास्तव्य असलेल्या सत्तावीस हजार महिला याच काळात इंग्लंडमध्ये होत्या आणि घरांसह इतर हक्क-सुविधा त्यांना कशा पुरवाव्यात, असा प्रश्न तेव्हा लंडन महानगर परिषदेपुढे होता. 'सिंगल पॅरेण्ट फॅमिली'ला ब्रिटननं त्यापूर्वीच कायदेशीर मान्यता दिलेली होती.

युरोप-अमेरिकेतली परिस्थिती यापेक्षा वेगळी नव्हती. अमेरिकेत १९८५ साली एक पाहणी करण्यात आली. त्यात ४९ टक्के म्हणजे निम्म्या अमेरिकन महिलांनी विवाह न करता अपत्यास जन्म देण्याच्या पर्यायास संमती-कौल दिला होता!

अशा 'अनौरस' अपत्यांचं प्रमाण, या काळात, युरोप-अमेरिकेत सर्वत्रच वाढलं. अमेरिकेत १९७५ साली १४.३ टक्के कृष्णवर्णीय महिला 'कुमारी माता' होत्या. १९८८ साली हे प्रमाण २५.७ टक्क्यांवर गेलं. अविवाहित माता आणि त्यांची मुलं अशा कुटुंबांची संख्याही गेल्या अर्धशतकात वाढत गेली आहे. अमेरिकेतील जनगणनेनुसार १९७० साली १०.८ टक्के मुलांचा सांभाळ त्यांच्या माता करत होत्या. १९८१ साली हे प्रमाण १८.१ टक्क्यांवर पोचलं.

मुद्दा हा, की द्यूत ('बेटिंग'ला जुगार म्हटलेलं अनेकांना आवडत नाही!) आणि 'एक-पालक कुटुंब' या दोन्ही क्षेत्रांत भारत अजूनही पन्नास वर्षं मागे आहे, असं म्हणायला हरकत नाही! कारण, या दोन्ही बाबी आपल्या देशात कायदेशीर नाहीत आणि समाजमान्य देखील नाहीत. यापुढच्या काळात आपण युरोप-अमेरिकेच्या बरोबरीनं वाटचाल करू का, याचं उत्तर काळच देईल. या बदलांना पुरोगामी विचारसरणी म्हटलेलंही अनेकांना आवडणार नाही. पण जोडीदाराची निवड स्वत: करणं, काही काळाच्या सहवासानंतर विवाहाचा निर्णय करणं, अपत्याविना किंवा विवाह न करताही 'संसार' करणं, एकमेकांशी पटलं नाही तर घटस्फोट घेणं, पुनर्विवाह करणं, नव्या जोडीदाराबरोबर राहणं, मैत्री कायम ठेवून अलग होणं किंवा वयाच्या उतरतीला पुन्हा एकत्र येणं अशा गोष्टींना 'समाज काय म्हणेल' याची फिकीर न करता वागणाऱ्यांचं प्रमाण वाढतं आहे आणि नव्या पिढीतला बदल तर अधिक वेगवान आहे. आपल्याला योग्य वाटतं त्याप्रमाणे वैवाहिक जीवनाची वाटचाल करण्यासाठी त्यांना आता भारत सोडून युरोप-अमेरिकेत जाण्याची गरज भासणार नाही.

याचा अर्थ, तथाकथित स्वैराचारी जगण्यासाठीच याआधीच्या दोन-तीन पिढ्या भारतातून पाश्चिमात्य राष्ट्रांत गेल्या होत्या का, असा प्रश्न कुणी उपस्थित करतील; पण

स्वैराचार राहो, जोडीदार निवडण्यापुरतंही स्वातंत्र्य न मिळण्याच्या काळात पश्चिमेकडच्या सुधारणेचं वारं गेल्या अर्धशतकात स्थलांतरित झालेल्या भारतीय तरुणांना खुणावत होतं, हे नाकारता येणार नाही.

फेलोशिपच्या निमित्तानं पाहायला मिळालेला इंग्लंड, त्यानंतर हौसेनं केलेली कॅनडाची ट्रिप, फ्रान्स-जर्मनी-रशियाच्या भेटी यातून पाश्चिमात्य राष्ट्रांतले सामाजिक



स्कॉटिश मार्गो 'केरन' आणि प्रभासमवेत



**भारतीय प्रभा, केनयन गुजराती भानुप्रसाद भट यांच्या कन्येचा-कल्पनाचा - आयरिश पती ब्रॅन्डन आपला 'इण्डो-आयरिश' मुलगा जेम्स याच्यासमवेत.**

बदल जवळून पाहता आले. इंग्लंडमध्ये तर अनेक नातेवाईक कायमचे स्थायिक झाले आहेत. माझी पत्नी पूर्वाश्रमीची साधना जोगळेकर. पुण्यातल्या नू.म.वि. प्रशालेत शिक्षक असलेले तिचे काका माधव जोगळेकर स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात भारत सोडून केनयाला गेले. तिथे शिक्षक, पुढे प्राध्यापक म्हणून दोन-तीन दशकं नावाजले आणि तिथंच स्थय्यिक झाले. प्रभा, शकुन, विजू, चारू, नीला ही त्यांची पाचही मुलं साधारण १९६५-७० सालाच्या सुमारास एकापाठोपाठ नकुरू हे त्यांचं मूळ गाव सोडून लंडन किंवा 'कंट्रीसाइड'मध्ये स्थिरावली. १९८२ सालातल्या वास्तव्यात या पाचही कुटुंबांच्या घरी राहण्याची संधी मला मिळाली. त्यांची मुलं-मुली म्हणजे पुढची पिढी आता युरोप खंड ओलांडून सातासमुद्रापार गेली आहेत; जात आहेत.

प्रभा सर्वात थोरली. भानुप्रसाद भट हा त्यावेळी केनयात राहत असलेला गुजराती तरुण तिच्या प्रेमात पडला आणि मुलगी पाहणं, बैठक वगैरे सोपस्कार बाजूला ठेवून उभय कुटुंबांच्या संमतीनं पहिला आंतरप्रांतीय प्रेमविवाह त्याच्या कुटुंबात १९५९ साली पार पडला. दोघांनी इंग्लंडला जाऊन रेडब्रिज इथं संसार थाटला. कल्पना ही त्यांची थोरली कन्या. ब्रॅण्डन या आयरिश तरुणाशी तिचं मैत्र जुळलं आणि त्याचं रूपांतर विवाहात झालं. विनयनं इंग्लिश तरुणीच पसंत केली, तर टीनानं वैवाहिक बंधन नाकारलं.

हसमुख शाहबरोबर विवाह करून शकुनही इंग्लंडला गेली. त्यांचा मुलगा अजय. शिकताशिकता युरोपमध्ये गेलेल्या अजयनं डच जोडीदार निवडली.

डॉक्टर होण्यासाठी लंडनमध्ये आलेला विजू शिक्षण पूर्ण झाल्यावर अंगावरचा कोटही थेम्सच्या पात्रात सोडून 'लेक डिस्ट्रिक्ट'मध्ये गेला. वैद्यकीय व्यवसायातलं स्वत:चं प्राविण्य सिद्ध केल्यावर, एका निसर्गरम्य टेकडीवर अडीच-तीन एकरांच्या हवेलीवजा देखण्या वास्तूत त्यानं मार्गो या स्कॉटिश तरुणीबरोबर संसार थाटला. हे सारं १९७०-८० च्या दशकात होत असताना तब्बल अकरा



लेक डिस्ट्रिक्टमध्ये स्थायिक झालेला विजू (उजवीकडे) आपल्या भारतीय नातेवाईकांसमवेत

विजूचे 'थॅच रूफ'चे – काही वर्षांपूर्वी 'ब्रिटनमधील सर्वोत्कृष्ट' असा किताब मिळालेले देखणे घर.



वर्षं विजू आणि मार्गो 'एकत्र' राहत होते. विजूच्या भारतातील आणि इंग्लंडमधल्याही काही नातेवाईकांनी या संबंधांबद्दल त्यावेळी नाकं मुरडली होती. पण विवाह हे बंधन नव्हे, तर डोळस साहचर्य असायला हवं, हे त्या दोघांनी आजवर निष्ठेनं चालवलेल्या संसारातून दाखवून दिलं.

विजू आणि मार्गो यांच्या घरी १९८२ आणि १९८७ साली असं दोनदा वास्तव्य करून आल्यानंतर, जात–धर्म–देश–भाषा यांची वेस ओलांडून डोळसपणानं एकत्र आलेल्या जोडप्याचं हे आदर्श उदाहरण वेळोवेळी इतरांना सांगण्याचा मोह आजही आवरता येत नाही. मार्गोला आता अल्झायमर झाला आहे. सत्तरीजवळ पोचलेला विजू पूर्वीच्याच मायेनं तिला सांभाळतो. तिला घेऊन २००५ साली तो भारतात येऊन गेला. तेव्हा कोकणातल्या रिळे या मूळ गावाला त्यानं आवर्जून भेट दिली. आपल्या मुळांची अशी ओढ पुढच्या पिढीत ओसरणं स्वाभाविक असलं तरी कुणा नातेवाईकाच्या लग्नकार्याच्या निमित्तानं किंवा सहलीसाठी भारतात येऊन एकमेकांच्या भेटीगाठी अजूनतरी घेतल्या जातात. पुढच्या पिढीत ते कदाचित घडणार नाही आणि त्याबद्दल खंत वाटून घेण्याचंही कारण नाही.

विजू–मार्गोचा थोरला मुलगा केरन ऊर्फ किरण (भारत आणि स्कॉटलंड यांच्या संस्कृतींचा मिलाफ उभयतांनी अशा नावात शोधला हाता!) तर कोलम धाकटा. डेन्मार्क आणि कॅनडात किंवा विद्यार्थिदशेतच ते आपल्या मैत्रिणीची कशी निवड करताहेत, हे कधीतरी खट्याळपणानं विजू इ–मेलवर कळवत असतो आणि आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरदेशीय विवाहाची परंपरा पुढच्या पिढीत आणखी एक पाऊल पुढे जाणारच, असं उत्तर आम्ही त्याला देत असतो. असो.

चारूची बायको कोलेट ही फ्रेंच, तर नीलाचा जोडीदार इंग्लिश. अनिता आणि माया या चारू–कोलेट यांच्या कन्या. अनिताचं लग्न गेल्याच वर्षी झालं. इंग्लंड–अमेरिकेत अमुक धर्माचा किंवा अमुक देशाचाच मुलगा अथवा मुलगी असं 'अभिमानानं' सांगण्याची प्रथा फारशी नसल्यानं 'तुझा जावई मूळचा जर्मन की ऑस्ट्रियन' असं विचारण्याच्या फंदात आम्ही पडत नाही आणि 'क्रिशची आताची आई अमेरिकन की रशियन' याचाही शोध घेत नाही. किंबहुना, कुणी घेऊही नये.

पुण्यात शिकत असतानाच्या काळात छान मैत्री झालेल्या माझ्या दोन मैत्रिणींची लग्नं रीतिरिवाजाप्रमाणे इथंच झाली होती. 'अ'चा नवरा अभिनयक्षेत्रातला,

नावाजलेला. दोघांचा म्हटलं तर प्रेमविवाह. पण नोकरी करता करता तिला अमेरिकेला जाण्याची संधी मिळाली आणि १९८०च्या सुमारास तिथं नव्यानंच उघडलेल्या संगणकाच्या दालनानं तिच्यापुढे एक पेच टाकला. 'आयटी' वगैरे शब्द त्यावेळी कम्प्युटरच्या डिक्शनरीतही नव्हते. त्यामुळे छोट्या पडद्यापलिकडच्या त्या जगात करिअर करायची तर भारत सोडून अमेरिकेत स्थिरावणं भाग होतं. त्याहून मोठा प्रश्न वैवाहिक जीवनाचा होता. पण उभयतांनी विचारपूर्वक वेगळं होण्याचा निर्णय करून उभयतांच्या भरारीचा मार्ग निवडला. आणि कायदेशीरदृष्ट्या 'घटस्फोटित' असले तरी मैत्री कायम ठेवण्याचा पर्याय मोकळा ठेवला. विशेष म्हणजे पुढची वीसेक वर्षं- 'तो' अगदी अचानक हृदयविकाराच्या झटक्यानं जाईपर्यंत- दोघांचंही मैत्र छान राहिलं. 'त्या'च्या दुसऱ्या पत्नीबरोबर 'ती'ची असलेली मैत्री तर आता घरोब्यासारखी दाट झाली आहे!



भारतीय चारू, फ्रेंच कोलेट आणि त्यांच्या फ्रेंच भारतीय मुली- अनिता आणि माया

काही काळ आखातात वास्तव्य करून परतल्यावर, वकिली व्यवसायात बस्तान बसत असलेल्या नवऱ्याच्या अपघाती निधनानं 'ब' हादरली होती. दोन लहान मुलं. तिचा आधार असलेल्या वडिलांचं छत्रही हरवलेलं. तशात 'विधवे'कडे एखाद्या संस्थेची जबाबदारी सोपवताना उपकाराची भावना अधिक. आणि पुनर्विवाह करावा म्हटला तरी दोन मुलांसह स्वीकारणारा पुरुष आजही तसा दुर्मिळच. अर्थातच, सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी हिलाही अमेरिका-भेटीचा योग आला आणि एका घटस्फोटित अमेरिकनानं तिच्यापुढे विवाहाचा प्रस्ताव मांडला, तेव्हा जात-धर्म-देश यांच्या वेशी ओलांडण्याचा धाडसी निर्णय तिनं घेतला. आज अमेरिकेतल्या धनाढ्य 'एनआरआय'पैकी एक अशा मानमरातबात, आयटी क्षेत्रात तिनं नवऱ्याबरोबर स्वत:चंही स्थान निर्माण केलं आहे.

उदाहरणं खूप देता येतील. मुद्दा हा, की विवाहाच्या बाबतीत नीती-नियम, रूढी, परंपरा वगैरेंचं कुंपण किती असावं आणि ते पाळलं नाही तर संस्कृती, परंपरा, अस्मिता वगैरे लयाला पोचणार नाही का? जग जेवढं जवळ येत जाईल आणि जाती-धर्म-देश-भाषा यांच्या वेशी ओलांडून दोन जीव एकत्र नांदतील (कदाचित पुन्हा दुरावतील) अशा प्रत्येक वेळी शेजार-पाजारच्या बघ्यांच्या भुवया उंचावणारच. पुढे काही झालं की, 'बघा, आम्ही म्हटलंल होतंच' असं ऐकवणार. पण समाज किंवा समूहातले बहुतेक सारे बहुमतवाले म्हणतात तेच बरोबर असं मानण्याचं कारण नाही. आपला आतला आवाज, अंतर्मनाचा कौल अधिक महत्त्वाचा. फक्त तो प्रामाणिक हवा; डोळस हवा.

आपला धर्म कोणता, देश कोणता, याचा विचार न करता लग्न केलं तर ते टिकेल का, भिन्न संस्कृतींचा परिणाम संसारावर-मुलाबाळांवर होईल का, असे प्रश्न मागच्या शतकातही पडत होतेच. तरीही वेशी ओलांडून वैवाहिक जीवनाचा- प्रसंगी विवाहाशिवाय एकत्र राहण्याचा- पटलं नाही म्हणून विभक्त होण्याचा किंवा मैत्री कायम ठेवून पुनर्विवाहाचा पर्याय ज्यांनी निवडला, त्यांना आपला निर्णय योग्य होता हे काळाच्या कसोटीवर सिद्ध करून दाखवण्याच्या जबाबदारीचं भान होतं. युरोप-अमेरिकेत जाऊन असा चाकोरीबाहेरचा प्रपंच केलेल्या बहुतेकांनी ते पेललं. भारतीय समाजमानसाची काटेकोर, काहीशी कठोर चौकट ओलांडताना पाश्चिमात्य जगातल्या मोकळेपणानं स्वैर आचारापेक्षा जबाबदारीचं ओझं त्यांच्यावर टाकलं, असं म्हणावं लागेल. तिथल्या 'स्वैराचारा'च्या पार्श्वभूमीवर संस्कृती-परंपरा घेऊन आलेले भारतीय विवाहसंस्थेला अधिक चांगला आकार देऊ शकतात, वरकरणी वाटणाऱ्या बंडखोरीतून वैवाहिक जीवनातील निष्ठेचं मूल्य जगापुढे ठसवू शकतात, अशा भावनेतून असेल किंवा प्रसंगी तडजोड करून अथवा समंजसपणानं असेल, पण त्यांनी घरं दुभंगू दिली नाहीत. वैवाहिक जीवन टिकवण्याचा प्रयत्न केला. विवाहसंस्था हा



जयंत काळे आणि
विनायक गोखले सपत्नीक

खूप मोठा चर्चेचा विषय आहे. ‘ग्लोबल लग्नाची गोष्ट’सुद्धा ‘अरेबियन नाइट्स’प्रमाणे हजार रात्री सांगून संपणारी नाही. पण धर्म-देश-भाषा आदींची कुंपणं ओलांडून दोन जणांनी एकत्र येण्यातूनच जग अधिकाधिक जवळ येत जाईल, एवढं नक्की.

टोरान्टो-मॉन्ट्रियलच्या भेटीत ‘एकता’ मासिकाचे अशोक पांगारकर, विनायक गोखले, तसंच श्याम जकाते, विद्युल्लेखा अकलूजकर, जयंत काळे आदींशी केलेल्या चर्चेत ‘लग्नाच्या गोष्टी’चाही विषय निघाला, तेव्हा सहज एक गोष्ट लक्षात आली, की परदेशातील भारतीयांचे (तसंच, तिथे ज्यांनी भारतीय जोडीदार निवडले, त्यांचे) संसार अधिक यशस्वी झाले, दीर्घकाळ टिकले. याचा आणखी एक अर्थ असा, की परदेशस्थ भारतीयांना नात्यातला मोकळेपणा, निवडीचं स्वातंत्र्य हवं असलं तरी स्वैराचार नको होता. भारतीय आणि परकीय सांस्कृतिक परंपरांमधलं चांगलं तेवढं वेचून विवाहसंस्थेला चांगला आकार देण्याचा प्रयत्न त्यांनी केला, असं म्हणता येईल.

आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंदरदेशीय विवाहांना समाजाकडून विरोधच होताना दिसला, तरी त्याचं समर्थन करण्याचं कारण नेमकं हेच आहे. दोन भिन्न जाती-धर्मांचे, वेगवेगळ्या देशांचे दोन जीव एकत्र येतात, तेव्हा अनेक अडचणींतून, तडजोडींतून त्यांना वाटचाल करावी लागते. नात्यातला समंजसपणा त्यातून वाढतो. दोन जाती-धर्मांतील तेढ कमी करायला, दोन देशांमधलं अंतर कमी करायला अशी जोडपी नकळत मदत करत असतात.

हिटलरच्या जर्मनीनं ज्यूंचा संहार केला, पण त्याच जर्मनीत एक जर्मन आणि एक ज्यू अशा जोडीदारांना जर्मनांनीच वाचवल्याची उदाहरणं आहेत. ‘बॉम्बे’सारखा चित्रपट कोणत्याही धर्माचा द्वेष करणाऱ्यांना अंतर्मुख करतो. तसंच, स्वातंत्र्यापूर्वीच्या शे-दीडशे वर्षांत तत्कालीन आसाममध्ये चहाच्या मळ्यात मजुरी करण्याच्या निमित्तानं आलेले कित्येक चिनी मजूर ईशान्येतल्याच भारतीय मुलींशी विवाह करून तिथं स्थायिक झाले. परंतु १९६२ च्या युद्धानंतर अशा चिनी-भारतीय कुटुंबांना परागंदा व्हावं लागलं, हे रिटा चौधुरीच्या ‘माकाम’ कादंबरीतनं वाचायला मिळतं, तेव्हा जाती-धर्माच्या भिंती आणि देशाची कुंपणं मोडल्याशिवाय जगाचं ‘एक खेडं’ ही संकल्पना साकार होऊच शकणार नाही, याची खात्री पटते.

‘ग्लोबलायझेशन’ हा एकविसाव्या शतकातला परवलीचा शब्द आहे. ते केवळ व्यापाराच्या माध्यमातून होणार नाही. त्यासाठी अशा भिंती आणि कुंपणं तोडून एकत्र येणाऱ्या जोडप्यांचीच गरज आहे. अशी शेकडो जोडपी जगभर दिसू लागतील, त्यांची मुलं आपला धर्म ‘मानवधर्म’ म्हणून सांगतील किंवा ‘नॅशनॅलिटी’च्या रकान्यात ‘वर्ल्ड’ असं लिहिण्याची मुभा मिळेल, तेव्हाच हे जग खऱ्या अर्थानं खेड्यासारखं एकजीव होईल.

ते ‘एकजीव’ होण्याची सुरुवात दोन जीवांच्या अशा एकत्र येण्यातून होऊ शकेल, म्हणूनच ‘ग्लोबल’ लग्नाचं धाडस दाखवणाऱ्यांना सलाम करायला हवा.

**– आल्हाद गोडबोले**
५०१ श्रीरामेश्वरभवन सोसायटी,
समतानगर, पोखरण रस्ता क्र. १, रेमण्डसमोर,
ठाणे (प) ४००६०६
alhadgodbole@gmail.com

# बैल गाभण... कितवा महिना?



**मीना परांजपे**

आमचे लग्न झाल्यावर काही महिन्यांतच माझा व माझ्या नवऱ्याचा कशावरून तरी वादविवाद झाला. अर्थात ही घरोघर होणारी गोष्ट. त्यात नवल काहीच नव्हते. बहुतेक आम्ही लोकांसमोर – विशेषत: सासुसासऱ्यांसमोर वाद न घालण्याचे पथ्य पळत असू. पण त्या दिवशी कसे कोण जाणे, माझ्या सासुबाईंच्या कानावर काही शब्द पडले. मी ह्यांना म्हणत होते, ''तुम्ही आता अजिबात ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नाही आहात. त्यामुळे तुम्ही शांत झाल्यावर मी पुढचा मुद्दा सांगेन.''

माझ्या सासुबाई मला म्हणाल्या, आमच्या वेळी वेगळी गोष्ट होती. नवऱ्याशी वाद घालण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांनी म्हटलं सूर्य पश्चिमेला उगवतो तर आम्ही विचारायचे किती वाजता? नवरा म्हणाला की बैल गाभण आहे तर आपण विचारायचे कितवा महिना?

आमच्या लग्नात भाषा–धर्म –देश–जात इत्यादी गोष्टीत कुठलाही वेगळेपणा नसताना ही स्थिती. पुरुषी अहंकाराला विझवायला घातलेली ही हलकीशी फुंकर होती किंवा त्याला समजूदारपणे बढावा देण्याचे सोंग होते, हे नेमके सांगणे कठीण आहे.

ह्याचा अर्थ लग्न टिकवण्याच्या प्रक्रियेत वादविवाद–अहंकार ह्यांना किती महत्त्व द्यावे हे सूज्ञास सांगणे नलगे. आमच्या लग्नाला ५० वर्षे होत आहेत. दोन्ही घरच्या संमतीने, पसंतीने, एकच देश–धर्म–जात असलेल्या दोन कुटुंबांत सोयरिक जमली. मुलाबद्दल अथवा मुलीबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळवायची, वेगवेगळ्या लोकांकडून मिळवायची पद्धत होती. दोन्ही कुटुंबांची वागणूक, मूल्ये–चालीरीती साधारणपणे सारख्या असाव्यात असे बघायचे. त्यामुळे संघर्ष कमी होतील असा समाज असावा. बारीकसारीक प्रसंग–पद्धती सोडल्या तर आम्हाला कुठल्याही प्रकारचा विसंवाद–त्रास सहन करावा लागला नाही.

लग्नानंतर आम्ही कॅनडात आलो. आमचे दोन्ही मुलगे येथेच वाढले, शिकले व आपापल्या सहचरी शोधून चतुर्भुज झाले. त्यांची गोष्टच वेगळी! भारतातून अगदी लहान असताना इकडे आलेली किंवा इकडे उत्तरअमेरिकेत जन्मलेली मुले बव्हंशी मिश्र संस्कृतीत वाढतात. घरात जास्तकरून ज्या प्रांतातून आले असतील तिथले वातावरण असते. इथल्या राहणीमानाचा परिणाम म्हणून इथलीही सावली पडते. अशा वेळी मुलांना भारतीय परंपरेतील arranged marriage आवडत नाही. त्यांच्या मित्रमंडळात

अनेक प्रकारचे मित्र-मैत्रिणी असतात. त्यातून जे संबंध भावतात ते पुढे जातात. कधीकधी त्यातून जोड्या जमतात. आमचा थोरला मुलगा प्रसाद. तो इलेक्ट्रिकल-कंप्युटर इंजिनीयर झाला व कॅलिफोर्नियात नोकरी करू लागला. सिलिकॉन व्हॅलीचा चढता काळ होता तेव्हा. आयटी, कंप्युटर, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी क्षेत्रांत बरेच भारतीय तेथे काम करत होते. ह्या लोकांना खूप भाव होता. त्यातल्या एका कंपनीत आमच्या भावी सूनबाईही काम करत होत्या. तिचे नाव जिगवेन. तिने बेजिंगमध्ये इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंगची पदवी घेतली. नंतर कॅलिफोर्नियात येऊन इथे एमए केले. एका चांगल्या कंपनीत नोकरी मिळवली. तिच्या व आमच्या मुलाच्या -दोन्ही कंपन्यांची स्की ट्रिप निघाली. तेथे हे दोघे भेटले. प्रेम जमले, वाढले व १९९७ मध्ये दोघांचे लग्न झाले. नेहरूंच्या काळातल्या हिंदी-चिनी भाई भाई ह्या घोषणेत थोडा फरक करून आम्ही बनलो हिंदी-चिनी व्याही व्याही.

आमच्या सुनबाईचे आई-वडील माओच्या शिकवणीनुसार ख्रिस्ती, बौद्ध अथवा इतर कुठलाही धर्म न पाळणारे! आमचा मुलगा केवळ जन्माने हिंदू. घरातल्या वातावरणामुळे जे काही संस्कार झाले त्यातून मिळालेले हिंदू वातावरण! बहुधा आम्हाला आवडेल म्हणून असेल, पण ह्या दोघांनी कॅलिफोर्नियात सिव्हिल मॅरेज व आमच्या गावी व्हान्कुवरला हिंदू पद्धतीने लग्न केले. दोन्ही समारंभ थाटात पार पडले. गेली १६ वर्षे ही जोडी नांदा सौख्यभरे ह्या आशीर्वादाने सुखात जगतेय!

ह्या लग्नाला जिंगवेनचे आई-वडील व बहीण असे पाहुणे चीनमधून आले. हिंदू पद्धतीने झालेल्या लग्नात तिच्या बहिणीने इंग्रजी-चिनी अशी दुभाष्याची भूमिका वठवली. मूळ संस्कृत मंत्राचे इंग्रजी भाषांतर! तिने ते कुठल्या स्वरूपात त्यांना चिनी भाषेत सांगितले कोण जाणे! पण लेकीच्या प्रेमापोटी, तिच्या हट्टामुळे त्यांनी हिंदू पद्धतीने कन्यादान केले. मला प्रश्न पडला की बिचारा माओचा आत्मा किती दु:खी झाला असेल!

ह्या लग्नानंतर आमचे व्याही अनेकदा लेकीकडे-जावयाकडे आले. नातवाच्या-नातीच्या जन्माच्या वेळी ४-६ महिने मदतीला आले. आम्हीही गेलो. त्यांनी आमचा वान्कुवरमध्ये पाहुणचार घेतला. आम्ही चीनमध्ये गेल्यावर त्यांनी त्याची सव्याज फेड केली. या भेटींतून भावनिक आपलेपणा निर्माण झाला. सहवासाच्या अनुभवावरून मते बनली. त्यामुळे पूर्वग्रह व गैरसमजुतींना थारा मिळाला नाही. हिंदी-चिनी विवाह सुरुवातीला मान्य नसणाऱ्या माझ्या विहिणीने 'तुझ्या नवऱ्यासारखाच नवरा तुझ्या धाकट्या बहिणीला बघ' असे आपल्या लेकीला सांगितले!

दुसरी जोडी माझ्या धाकट्या मुलाची. श्रेयस व लॉरा ह्यांची. एकमेकांना भेटण्यापूर्वी लॉरा भारतात बरेच आठवडे हिंडून आली होती. भारतीय मुलगाच जोडीदार म्हणून निवडायचे तिने ठरवले होते. ती न्यू यॉर्कच्या एका लायब्ररीमध्ये नोकरी करत होती. ह्याच क्षेत्रात तिने एमए केले आहे. श्रेयस बॉस्टनमध्ये इलेक्ट्रिकल/कंप्युटर इंजिनीयर म्हणून नोकरी करत होता. मित्रांनी त्यांची ओळख करून दिली. ती झपाट्याने वाढली, हळूहळू प्रेमात बदलली. पुढे २००१ साली ह्या जोडीने एकमेकांना जीवनसाथी म्हणून निवडले. गेली १२ वर्षे ही जोडी देखील सुखाने नांदते आहे. बॉस्टन-कॅलिफोर्निया करतकरत ह्यांनी २००४ पासून वान्कुवरलाच घर केले आहे. त्यामुळे दोन्हीकडचे आई-वडील खूश आहेत. ते देखील वान्कुवरपासून जवळच राहतात.

आमच्या दोन्ही मुलांनी-सुनांनी आम्हाला एकेक नातू व एकेक नात अशी चार नातवंडे दिली आहेत. आज मितीस आमचा बहुरंगी-बहुढंगी परिवार मिश्र संस्कृतीची मजा चाखतो आहे. सुरुवातीची २-४ वर्षे एकमेकांना समजून घेण्यात गेली. पण तेवढ्या भांडवलावर खूप फायदा झाला. आज आमचा परिवार प्रेमाने व एकोप्याने वाटचाल करतो आहे.

आमच्याकडची उदाहरणे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी नाहीत. वान्कुवरमध्ये हल्ली भारतीय वंशाचे बरेच लोक खऱ्या अर्थाने ग्लोबल व्हिलेजमध्ये राहताहेत. आपले जोडीदार आपणच शोधायचे असे त्यांना वाटते. आई-वडिलांना बाजूला राहावे लागते.

केवळ वधू-वरच लग्नामुळे जोडले जातात असे नाही तर दोन्ही बाजूची कुटुंबेही जोडली जातात. अशा वेळी सगळ्यांनी काही पथ्ये पाळली तर जीवन सुखावह होते. ती पथ्ये म्हणजे समजूतदारपणा दाखवणे, दुसऱ्याचे मत केवळ वेगळे आहे म्हणून सदोष मानणे, त्यावर टीका करणे हे चांगले नाही. दुसऱ्याच्या मताचा आदर करायला शिकले पाहिजे. आई-वडिलांनी जर दुराग्रही धोरण सोडले तर सगळ्या कुटुंबाचा जीवनप्रवास सुखाचा होतो.

माझ्या दोन्ही सुनांना डोहाळजेवण-बारसे हे प्रकार फारसे आवडले नाहीत. त्या दोघी तेव्हा कॅलिफोर्नियात

होत्या. नोकरीतून फार थोडी रजा मिळाली होती. आम्ही नातवंडे पाहायला-मदतीला गेलो. पण मीही पूर्ण वेळ नोकरी करत होते. मला २-३ आठवडेच रजा मिळाली. पण पुढे त्या दोघी ३-४ महिन्यांनी तान्हुल्यांना घेऊन वान्कुवरला आल्या तेव्हा सर्वामते असे ठरले की नातवंडांना भेटायला यावे असे आमंत्रण देऊन सगळ्या मित्रांना झोकात मोठी पार्टी ठेवावी. चीनमध्ये अशीच पार्टी देतात असे एका सुनेने सांगितले तर दुसरीने नातीला परकर-पोलके हवे असे सुचवले. तिने नंतर मंदिरात जाऊन देवाचा आशीर्वाद देखील घेतला.

कधी कधी लहानसहन गोष्टीमुळे एकमेकांची मने राखली जातात, चांगुलपणाचा ठसा मनात उमटतो. नात्याची वाटचाल योग्य मार्गाने सुरू होते. त्याउलट कधी क्षुल्लक कारणांनी मिठाचा खडा पडतो आणि मग दूध नासायला वेळ लागत नाही. जरा आपल्या आजुबाजूला आपल्या मित्रमंडळीत, नातेवाईकांत बघा. भारतातून इकडे आलेल्या, आता ६० ते ७० वयोगटात असलेल्या पिढीत आंतरराष्ट्रीय विवाह कमी दिसतील. बघून-सवरून, पत्रिका जमवून, क्वचित अनेकदा भेटून-बोलून किवा प्रेमलग्ने केलेले लोक पाहा. केवळ एका वंशाचे, देशाचे आहेत म्हणून त्यांचे संसार सुखाचे आहेत का? कुठे कमालीचा आत्मकेंद्रितपणा दिसतो तर कुठे आपलेच घोडे दामटण्याची वृत्ती दिसते. सुखी लग्नासाठी लागणारे भांडवल वेगळेच असते. ते कदाचित एक देश-धर्म असल्यामुळे मिळवता येईल, परंतु मिश्र विवाहात ते जमणारच नाही असे नाही. ह्या गोष्टी त्या जोडीदारांच्या प्रयत्नावर आणि मनोबलावर अवलंबून असतील. ह्या प्रयत्नांना घरातल्या लहान-मोठ्यांची साथ असेल तर मार्ग सुकर होतो. कधी ही साथ मनापासून मिळते तर कधी नाइलाजाने.

आमच्या काही मित्रांना मिश्रविवाह पसंत नव्हते. पण आपण नाही म्हटले तरी ते करणारच. मग पुढे केवळ वाईटपणाच लक्षात राहतो म्हणून नाइलाजाने मान्यता दिली जाते. कुणाला म्हातारपणी आपल्याला ह्यांची मदत लागली व त्यांनी नाही म्हटले तर, अशी भीती असते. कुणाला नातवंडांचा सहवास मिळेल किंवा नाही असा प्रश्न पडतो. मग विरोध गिळला जातो. हळूहळू विरोधाची धार बोथट होते. एवढे खरे की मोठ्या लोकांचे सहकार्य लाभले तर मिश्रविवाहाचे प्रश्न थोडे सोपे होतील.

प्रश्न असतो तो हा की भाषा-धर्म-देश ह्या पलीकडे जाऊन वेगवेगळ्या अस्मिता राहतील का? अस्मिता राखाव्या लागतात. एकमेकांचा आधार बनून, एकमेकांना समजून घेऊन आणि संवेदनशीलातेची कास धरून. भिन्न संस्कृतीचा परिणाम होणारच. तो कदाचित मुलांवर जास्त होईल. पण त्यामुळे जीवनात विविधता येईल. अनुभवाच्या कक्षा रुंदावतील. ह्या गोष्टी घडाव्यात असे म्हणून घडत नसतात. कधी संधी मिळते आणि एकातून दुसरी, त्यातून तिसरी अशी जडण-घडण आकार घेते. म्हणतात ना की प्यार हो जाता है, ती काही ठरवून होणारी गोष्ट नाही.

गेल्या ५० वर्षांत आंतरजातीय/प्रांतीय विवाहांची संख्या वाढली असावी असे वाटते. आंतरदेशीय-भिन्न धर्मीय विवाहदेखील पूर्वीपेक्षा जास्त दिसून येतात. पण अजूनही माना वळवून लोक त्यांची दखल कुतूहलाने घेतात. जग ग्लोबल व्हिलेज होते आहे हे मान्य केले की ह्या विवाहात स्वाभाविकता वाटायला हवी. माझ्या आजीच्या शब्दांत, 'जोड्या स्वर्गात देवाने ठरवलेल्या असतात फक्त पृथ्वीवर मानव त्यांच्या लग्नगाठी बांधतात.'

जागतिक परिणाम काय होतील? चांगले का वाईट? ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या खेळात भाग घेणारे खेळगडी आपल्या भूमिका कशा वठवतात ह्यावर अवलंबून असेल. लग्नामागे एक महत्त्वाचा मुद्दा असावा- सहजीवनातील सौख्याचा. आणि ते मिळते कौटुंबिक सुसंवादातून. घराच्या बाहेर पडल्यावर सोसावे लागणारे ताण-तणाव, आशा-निराशा व करियरमधील यश-अपयश कुणाला सांगणार? तब्येतीबाबत होणारे चढ-उतार कुणाला समजणार? तर आपल्या जीवनसाथीला! तसे करता येण्यातच आहे कौटुंबिक सुसंवाद! तो साधण्यासाठी देश-वंश-भाषा इत्यादीमधील भिन्नता आड येऊ नये.

ह्या संदर्भात खूप वर्षापूर्वी वाचलेल्या कवी गुलजार यांच्या ओळी आठवल्या-

*उन्हे ये जिद थी के हम बुलाते । हमे ये उम्मीद वो पुकारे ।।*

अशावेळी तोंडातून बोल उमटले नाहीत तर 'पड जाती दरारे.' तेव्हा दरारे टाळण्यासाठी वेळीच हाक मारा आणि थांबवा आपल्या जीवनसाथीला. म्हणजे तुम्ही कायम नांदाल सौख्यभरे.

**- मीना परांजपे**

paranjpe@sfu.ca

# आमचा जावई बेन्‍र्ड सोनाळकर!



**निरुपमा सोनाळकर**

आमची मुलगी शेफाली व बेन्‍र्ड यांचा विवाह नोव्हेंबर २००५ मध्ये झाला. माझे पती अतुल व मी लग्नानंतर जर्मनीत राहत होतो. त्यावेळी माझे सासू-सासरे लंडनला राहत असल्यानं बाळंतपणाला मी लंडनला गेले होते. त्यामुळे शेफालीचा जन्म लंडनमधला. मात्र ती वयाच्या तिसऱ्या महिन्यापासून जर्मनीत वाढली. शिक्षणही जर्मनीत झालं. जर्मनीतच हाम्बुर्ग इथं तिचं मेडिकलचं शिक्षण चालू असताना तिला व तिच्या दोन-तीन मैत्रिणींना ऑस्ट्रियामध्ये व्हिएन्ना मेडिकल युनिव्हर्सिटीत काही प्रोफेसर डॉक्टर वेगवेगळ्या विषयांचे एक-दोन आठवड्यांचे सेमिनार विद्यार्थ्यांच्या लहान ग्रुप करता घेत असल्याचं कळलं. ह्या कारणानं शेफाली सेमिनारसाठी व्हिएन्नाला जाऊ लागली. बेन्‍र्ड आज फिजिक्स इंजिनीयर असून, फिजिक्स रिसर्चमध्ये काम करतोय. शेफाली व्हिएन्नाला जाऊ लागली त्यावेळी तो युनिव्हर्सिटीमध्ये एका प्रोफेसरच्या हाताखाली, व्हिएन्ना आणि टोरांटो (कॅनडा) इथं रिसर्च करत होता. तसंच, मेडिकलच्या विद्यार्थ्यांना सेमिनारमध्ये मेडिकल फिजिक्स शिकवत होता.

तिथेच झाली शेफाली आणि बेन्‍र्ड यांची भेट.

एकदा शेफालीनं मला व अतुलना, 'बेन्‍र्ड इतका छान शिकवतो की विषय संपूच नये असं वाटतं,' असं कळवलं. आम्हा दोघांना 'त्या विषयातून' एक 'नवीन विषय' सुरू होत असल्याची शंका तेव्हाच आली.

काही महिन्यांनी शेफालीनं 'बेन्‍र्डला हिंदुस्थान बघण्याची इच्छा असून, हर्षद (शेफालीचा धाकटा भाऊ), मी व बेन्‍र्ड हिवाळ्यात येऊ' असं कळवलं.

२००३ मध्ये अतुल व मी जर्मनीहून पुण्याला परतलो होतो. तरी वर्षातले तीन-चार महिने मात्र जर्मनीत आमचं वास्तव्य असे. २००४ च्या मे महिन्यात मी एकटी काही दिवसांकरता हाम्बुर्गला गेले होते. माझ्या ट्रॅव्हल एजन्सीच्या कामाकरता. त्यावेळी शेफाली व हर्षद एकाच फ्लॅटमध्ये राहत असत. माझ्या मदतीनं भारताची ट्रिप ठरवायला बेन्‍र्ड हाम्बुर्गला येत असल्याचं शेफाली म्हणाली. पण ही भेट फक्त माझा ट्रॅव्हल एक्स्पर्ट म्हणून सल्ला घ्यायला नाही याची खात्री मला झाली. मी फोनवर अतुलशी त्याबाबत बोललेही. ''बघ तुला कसा वाटतोय बेन्‍र्ड,'' असं अतुल म्हणाले.

शेफाली सतत बेन्‍र्डचं गुणगान गात होती. हर्षद त्याला दुजोरा देत होता.

बेन्‍र्डचं व्यक्तिमत्त्व, वागणं पहिल्या भेटीतच

आवडण्यासारखं आहे. शिवाय, अतिशय सन्मानानं वागण्याचा ऑस्ट्रियन लोकांमधला पोलाइटनेस त्याच्यात मुरलाय. समोरची माणसं त्याच्या वागण्यानं विरघळतात, असं म्हणायला हरकत नाही.

भारतभेटीचा विषय निघाला. ''हर्षदला जमलं तर आम्ही तिघं, नाहीतर बेन्र्ड आणि मी येत्या नोव्हेंबरमध्ये पुण्याला येऊ. नंतर आमची राजस्थानला जायची व्यवस्था तू करशील का?'' शेफालीनं विचारलं.

मी १९८५ पासून ट्रॅव्हल ट्रेडमध्ये आहे आणि अनेक जर्मन, ऑस्ट्रियन, स्वीस माझ्या कंपनीतर्फे भारतात जाऊन आलेले आहेत. त्या सर्वांची व्यवस्था मी वेळोवेळी ताज, लीला ह्या हॉटेल्समध्ये करत आले आहे. आम्ही आणि मुलंही अनेकवेळा ह्या हॉटेलांमध्ये राहिल्यानं त्या हॉटेल्सचा बहुतेक स्टाफ आम्हाला ओळखतो. शेफालीला राजस्थानात फिरताना बेन्र्डलाही त्या हॉटेल्सचा अनुभव द्यायची इच्छा होती. तिनं अनुभवलेलं त्यानंही अनुभवावं अशी तिची इच्छा होती.

मी सगळं ऐकून घेतलं आणि दोघांना एकच प्रश्न केला, 'शेफाली, तू आणि बेन्र्ड पुण्याला याल तेव्हा, अणि नंतर राजस्थानात फिरायला जाल त्यावेळी हॉटेल्स बुक करताना मी बेन्र्डची ओळख कोण म्हणून करून द्यावी? 'शेफालीचा मित्र' अशी ओळख करून देणं योग्य होणार नाही याची तुला कल्पना आहे, बेन्र्डला नसावी. तुमचं नक्की नातं काय, हे सांगितलंत तर पुढील व्यवस्था करण्याचा विचार करता येईल.''

माझ्या ह्या प्रश्नानंतर दोन दिवस बेन्र्ड गप्प होता. माझ्या अवतीभवती होता, पण संभाषण होत नव्हतं. मीही त्याला विचार करण्याची मोकळीक द्यावी म्हणून औपचारिक गोष्टी बोलत होते.

दोन दिवसांच्या शांततेनंतर आणि विचार–विनिमयानंतर दोघं माझ्याकडे आले व म्हणाले, ''आम्ही दोघांनी एंगेजमेंट करायचं ठरवलं आहे. त्याबद्दल तुझी आणि पापाची परवानगी (आशीर्वाद) घेण्याकरता आम्ही नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये पुण्याला येऊ.''

२००४ च्या डिसेंबरमध्ये हर्षदसह दोघं पुण्याला आले. आमची ओळख वाढत गेल्यावर आम्ही दोघं 'सोल मेट्स' असल्याचं आम्हाला जाणवलं. आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे, असं दोघांनी आम्हाला सांगितलं.

घरातल्या घरात छोटा समारंभ करून साखरपुडा झाला. त्यानंतर तिघं राजस्थानला न जाता आपण सगळेच



बेन्र्ड–शेफाली दिव्या ग्रेससह

कुठेतरी जाऊ ही कल्पना त्यांनी मांडली. मग आम्ही पाच जण ३–४ दिवस पाचगणीला जाऊन आलो. बेन्र्ड स्किइंग एक्स्पर्ट होताच, शिवाय पॅरा ग्लायडिंगही करत असे. त्याच्या आणि हर्षदच्या प्रोत्साहनानं त्या दोघांच्या पाठोपाठ मी देखील (वयाच्या पासष्टाव्या वर्षी) माझी अनेक वर्षांपासूनची पॅरा ग्लायडिंगची हौस पुरवून घेतली.

लग्न २००५ च्या नाव्हेंबरमध्ये पुण्यात करण्याचं नक्की झालं. लग्नाआधी दोन महिने बेन्र्ड–शेफाली पुण्याला आले होते. त्यावेळी दोघं माझ्याबरोबर एका स्नेह्याच्या मुलीच्या लग्नाला आले. बेन्र्डनं लग्नविधी लक्ष देऊन बघितला. विधींच्या अर्थाचे प्रश्न विचारले. घरी आल्यावर ''आमचंही लग्न असं साग्रसंगीत करायचं, फक्त मला विधींचा अर्थ समजावून सांगण्याकरता इंग्रजी बोलणारे गुरुजी असावेत'' अशी विनंती केली.

लग्न साग्रसंगीत झालं. दोघंही खूश होते. बेन्र्डनं आणखी एक विनंती केली होती, की ''ऑस्ट्रियात लग्नानंतर Walf dance करण्याची पद्धत आहे. तेव्हा आपण

एका संध्याकाळी हा कार्यक्रम ठेवू.'' ह्या कार्यक्रमाला कोणाला आमंत्रण द्यायचं हे बेर्न्ड-शेफालीनं ठरवलं.

जर्मनी/व्हिएन्नाहून मिळून २०-२५ पाहुणे या लग्नाला आले होतेच, शिवाय भारतातील नातेवाईक व स्नेह्यांना मिळून "only young people and those who have remained young are welcome" म्हणून आमंत्रणं पाठवली! आलेल्या प्रत्येकानं या कार्यक्रमाचा आनंद अनुभवला.

लग्नानंतर व्हिएन्नाला परतण्याआधी बेर्न्डनं मला, ''ममा, ऑस्ट्रियात लग्नानंतर नवरा आपल्या बायकोला उचलून घरात नेतो. इथे काय पद्धत आहे?'' असं विचारलं. मी 'उंबरठ्यावरचं माप ओलांडण्याच्या' रीतीबद्दल सांगितल्यावर त्यानं माझ्याकडून 'माप' आणवून बरोबर नेलं. ते माप आजही त्यांच्या घरात दारामागे ठेवलेलं आहे.

शेफाली जर्मनीत वाढलेली असूनही आम्ही शेफाली व हर्षद यांना लहानपणापासून मराठी शिकवलं आहे. पण शिक्षण जर्मन भाषेत आणि वाढलेलीही जर्मनीतच असल्यामुळे शेफालीची जर्मन भाषा उत्तम होती. ऑस्ट्रियातही थोडंफार वेगळ्या पद्धतीनं पण जर्मनच बोललं जात असल्यानं दोघांमध्ये सामायिक भाषा तीच होती.

माझ्याकडून दोन्ही मुलांना लहानपणापासून भारतीय संस्कृतीची ओळख होत गेली. आमच्याकडे सर्व हिंदू सण साग्रसंगीत साजरे होत. दिवाळीला दाराला तोरण (झेंडू व ॲव्होकॅडोची पानं) बांधण्यापासून, रांगोळी, सुगंधी उटण्यानं स्नान व दिवाळीचे खाद्यपदार्थ ह्या सर्वांची ओळख मुलांना झाली होती. प्रत्येक सणाचं महत्त्व, विशेषत: लॉजिकल स्पष्टीकरण, शिकवलं. जर्मनी/ऑस्ट्रियातले इस्टर, ख्रिसमस हे सणही आमच्याकडे तेवढ्याच उत्साहानं, आनंदानं साजरे होत असत. त्यामुळे लग्नानंतर बेर्न्ड तितक्याच हौसेनं दिवाळी साजरी करत आला आहे. अगदी लक्ष्मीपूजन, पाडव्याला सुट्टी घेऊन (व्हिएन्नात दिवाळीची सुट्टी नसते), उटणं लावून आंघोळ करण्यापासून, ओवाळून घेण्यापर्यंत (आणि पाडव्याला शेफालीला प्रेझेंट देण्यापर्यंत) सर्व हौसेनं करतो.

ख्रिश्चन धर्माबद्दल त्याला आदर, आपुलकी कधी नव्हती. तो चर्चमध्येही जात नसे. त्यामुळे शेफालीनं चर्चमध्ये जाण्याचा प्रश्नच आला नाही.

अतुल व माझ्याशी झालेल्या संभाषणात बेर्न्डनं हिंदू धर्माची तत्त्वं समजावून घेतली व ती पटल्यानं त्यानं ती मन:पूर्वक स्वीकारली आहेत. त्यांचं तो पालन करतो.

लग्नानंतर दोन-तीन महिन्यांनी बेर्न्डनं फोन करून, ''मी सोनाळकर बोलतोय!'' अशी स्वत:ची ओळख करून दिली. आम्हाला तो गंमत करतोय असं वाटलं, पण आमचा विश्वास बसावा म्हणून त्यानं त्याचा पासपोर्ट, आयडी कार्ड वगैरेची कॉपी पाठवून त्यानं नाव बदलल्याची खात्री करून दिली.

तो एकदा पुण्याला आला असताना आमच्या एका स्नेह्यांनी त्याला विचारलं, ''काय बेर्न्ड, आता तुझा ख्रिसमस साजरा करणार का?'' त्यावर त्यानं ''मी हिंदू आहे'' एवढंच उत्तर दिलं.

भारतीय लोकांना आयुष्याची खरी मूल्यं समजतात. इथल्या लोकांनी भारतात जाऊन ते इथे (युरोपमध्ये) किती कृत्रिम जीवन जगत आहेत याची जाणीव करून घ्यावी, असं तो त्याच्या नातेवाईकांना आणि व्हिएन्नात मित्रमैत्रिणींना सांगत असतो.

बेर्न्ड आणि शेफालीच्या अशा या सुंदर आणि आनंदी संसारात दिव्या ग्रेस नावाची एक सुंदर कळी फुलली आहे.

ग्लोबल लग्नं सर्वत्र जास्त प्रमाणात व्हावी आणि ती भाषा, धर्म आणि संस्कृती ह्याच्या पलिकडे जाऊन यशस्वी होतील असं बेर्न्ड-शेफाली या दोघांचंही मत आहे. त्यामुळे माणसं एकमेकाला जास्त समजू शकतील. गैरसमजुतीमुळे आणि दुसऱ्या समाजाबद्दलच्या अज्ञानामुळे असलेला त्यांच्यातील दुरावा नष्ट होऊ शकेल, असं दोघंही म्हणतात.

शेफालीला भारतीय समाजाची कल्पना असल्यानं आणि बेर्न्डला तेवढी माहिती नसल्यानं एका मुद्याबद्दल त्यांचं दुमत आहे. ग्लोबल मॅरेजेस मोठ्या प्रमाणावर सर्वत्र होतील का ह्याबद्दल बेर्न्डचं मत पूर्ण सकारात्मक आहे. शेफालीच्या कानावर मधूनमधून भारतातील काही भागांत होणाऱ्या ऑनर किलिंगच्या गोष्टी येत असल्यानं, ज्या जमाती अजून त्या मुद्यावर भांडताहेत, मुलामुलींचे जीवही घ्यायला मागेपुढे पाहत नाहीत, त्या भारतात मात्र श्रीमंतवर्ग किंवा थोडंफार जग बघितलेला उच्च मध्यमवर्गीय समाज सोडला, तर ग्लोबल मॅरेजेस हा विषय खूप दूर आहे, असं शेफालीचं मत आहे.

**- निरुपमा सोनाळकर**
nirupama.sonalkar@gmail.com
nirupama@sonalkar.de

# पहिल्या पिढीतील ग्लोबल लग्न



**जया हुपरीकर**

कालच मैत्रिणीच्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस आम्ही साजरा केला. त्यांचे लग्न भारतात झाले, पण संसार मात्र अमेरिकेतच झाला. आमच्यासारखे चाळीस-पन्नास वर्षे इथे राहिलेल्यांची हीच समान गोष्ट! सगळा मित्रवर्ग समदु:खी/समसुखी! आलो तेव्हा पाच-दहाच जोडपी होतो. शिकत असलेले तरुण होते, तेवढेच. एकजण मात्र अमेरिकन मुलीशी लग्न करून पस्तावला होता. त्याची अमेरिकन बायको आणि मुले त्याची 'काळा' म्हणून टिंगल करत, वरचेवर सगळ्यांसमोर त्याला हिणवत असत.

कालांतराने त्याने डिव्होर्स घेतला. ग्लोबल लग्नाची माझी ही पहिली ओळख! त्यानंतर, शिकत असलेल्या तरुणांनी अमेरिकन मुलींशी लग्ने केली, काहींनी तर अगदी वैदिक पद्धतीने लग्न केले. त्यातील सगळ्यांशी संबंध राहिला नसला तरी ती बरीचशी लग्ने अजूनही टिकून आहेत खरी! अगदी व्हिसासाठी केलेली लग्नेही मुलाबाळांसह टिकून आहेत! तेव्हा 'टिकणे' हे सर्वस्वी व्यक्तीच्या स्वभावावर अवलंबून असते, जुळवून घेण्याच्या वृत्तीवर अवलंबून असते. चांगल्या घरातील, उच्चशिक्षित मुली संसारात जमवून घेताना दिसतात तर शिक्षण अपुरे असलेल्या, जगातील इतर कोणाशी कधी संबंध न आलेल्या मुली मराठी घरात जमवून घेऊ शकत नाहीत. तसे एखत्र राहण्याची वेळच येत नाही, पण काही कारणांनी एकत्र आलोच तर हा फरक जाणवते खरा!

आमच्या पिढीने अमेरिकेत संसार केल्याने आमची मुले जन्माने अमेरिकन, पण आमच्या संस्काराखाली वाढली. त्यामुळे आमच्यासारखेच त्यांनाही ते सोपे नव्हते. आमचे आचार नि विचार त्यांना पटत नसत. त्यांचे लग्नाचे वय झाल्यावर तर मतभेद अधिकच जाणवू लागले. आम्हा सर्व आई-वडिलांना मराठी सोयरीक आवडली असती, निदान हिंदू तरी असावे असे पुढे वाटायला लागले. पण काय झाले नि काय! एकेक जण त्यांना हव्या त्याच्याशी लग्न करायला लागली. मग तो/ती भारतीय – गुजराती, साउथ इंडियन, बंगाली वगैरे असेल किंवा अमेरिकन, अगदी कृष्णवर्णीयसुद्धा! करीन तर हेच नाहीतर मला लग्नच करायचे नाही इथवर मुलांची मजल गेली. आई-वडील जे होतेय ते हताशपणे पाहत होते. मुलांच्या मनाप्रमाणे मग ते त्यांचे लग्नसमारंभही करून द्यायला लागले. बऱ्याचदा नुसते चेक्स लिहिण्यापुरतेच आई-वडिलांना विचारले जाई. उसन्या उत्साहाने आई-वडील कार्य पार पाडत असत. आशा एकच, की आपल्या मुलांना आनंद/सुख मिळावे. त्यासाठी

आपल्याला मन मारावे लागले तरी चालेल.

ही अशी ग्लोबल लग्नांना सुरुवात झाली. पण सगळे मुलांच्या मनासारखे करूनही त्यातील बरीचशी लग्ने टिकली नाहीत. एके वर्षी तर आमच्या मित्रमंडळात सात–आठ मुलांचे डिव्होर्स झाले. त्याचा त्रास मुलांपेक्षा त्यांच्या आईवडिलांना म्हणजेच आमच्या मित्रमंडळाला अधिक झाला. मुलांचे आयुष्य इथेच गेल्याने ज्यांना कुणीच भेटत नाही अशांचे लग्न लांबत जाते. अशा मुला–मुलींना कधीकधी स्वत:बद्दल वैषम्य वाटायला लागते, एकप्रकारचा कॉम्प्लेक्स त्यांच्यात येतो. आईवडील तर त्यांच्या लग्नाच्या काळजीने हैराण होतात. खरे म्हणजे त्यांनी काळजी करण्याचे कारण नसते, मुलांच्या लग्नाचा प्रश्न कधीच मुलांनी स्वत:च्या हातात घेतलेला असतो. त्याबाबतीत आईवडिलांना काहीच सुचवायची जरुरी राहिलेली नसते. कित्येकदा, मुले लग्नाच्या बाबतीत चूक करत असतानादेखील आईवडील विरोध करायला घाबरतात, मुले सोडून जातील या भीतीने! दिवसेंदिवस असे प्रकार खूप पाहण्यात येताहेत.

यापुढे ग्लोबल लग्ने होणारच. खरे म्हणजे आमच्या पिढीने अमेरिकेचे नागरिकत्व घेतले तेव्हाच हे भविष्य अटळ झाले. तरीही स्वप्ने होती की आपली संस्कृती टिकवण्यात आपल्याला यश मिळेल. ती ग्लोबल लग्नाने किती टिकेल ही शंका आहेच. विशेषत: आमच्या नातवंडांना कसे वळण लागेल, हे कळत नाही. सध्या आम्ही असताना ती काही गोष्टी पाळताना दिसतात. उदाहरणार्थ, देवाला, मोठ्यांना नमस्कार (सांगून), प्रसाद न नाकारणे (आवडीचा पदार्थ नसला तरी) वगैरे. आमची मुले लग्न करून धर्म बदलल्याचे तरी जाहीर करत नाहीत (फक्त मुस्लिम धर्म मान्य करावाच लागतोच), प्रत्येकजण आपापला धर्म ठेवताना दिसतो. त्यांच्या मते ते कुठल्याच धर्माचे नाहीत. खरे म्हणजे, त्यांनी ज्या त्या धर्मातील चांगल्या गोष्टी जपल्या नि कुठल्याच धर्माचे स्तोम माजवले नाही, तर ती सुधारणा म्हणावी लागेल. भविष्यात धर्मावरून होणारी युद्धे तरी टळण्याची आशा!

लग्नानंतर मुली माहेरचेच नाव लावतात. मात्र मराठीशीच लग्न झाले असेल तर त्या नाव बदलताना दिसतात. त्यांच्या मुलांचे नाव मात्र वडिलांचेच लावले जाते. मुलगी झाली तर तिचे मधले नाव वडिलांचे न लावता त्या जागी अमेरिकन पद्धतीनुसार मुलीचे नावच ठेवतात. हे बदल मामुली खरे, पण बऱ्याच लोकांना त्याचाही त्रास होताना आढळते.

अशी ही ग्लोबल लग्नाची गोष्ट. अमेरिकेत वर्षानुवर्षे चालत असलेली, पण मराठी समाजात सध्या रुजत असलेली. गोष्ट सगळ्यांची समान असली तरी वैयक्तिक अनुभव निराळेच असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हेच खरे. लग्ने आधीच ठरलेली असतात, असे आपल्याकडे म्हणतात ते खरेच वाटायला लागते, आमच्या मुलांच्या गोष्टी अनुभवून! शेवटी आपल्या हातात काहीच नाही, हेच खरे! अमेरिकेला अजून सवय झाली नाही ती समलिंगी लग्नांची. सध्या समाज वाद घालतोय तो या मुद्यावर. मराठी समाजाला कदाचित त्यालाही तोंड द्यावे लागेल, पुढेमागे, केव्हातरी! नाहीतरी वारा येईल तशी पाठ फिरवायची सवय अंगवळणीच पडलेय आमच्या पिढीला इथे अमेरिकेत राहिल्याने! आता होईल ते ते पाहावे, इतकेच उरलेय!

**– जया हुपरीकर**
jayahuprikar@sbcglobal.net

**गेल्या अधिवेशनात शिकागो येथे प्रसिद्ध पुस्तके**




**संवादने**
**विद्या हर्डीकर–सप्रे**

**मनातल्या वावटळी**
**प्रगती कोळगे**



**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

**टपालखर्च प्रत्येकी ३० रुपये**



Best Wishes to Granthali's 'Shabda Ruchi'
for the Boston Adhiveshan Special Issue
We welcome NRI deposits
TAX FREE
Non Resident (External) Rupee Accounts (NRE) Tax Free
Non Resident Ordinary Rupee Accounts (NRO)
Foreign Currency Non-Resident Accounts (FCNR) Tax Free
Inbound personal Remittance Services through Money Gram / Express Money
VISA debit card for NRE accounts
*Conditions Apply
Saraswat Bank
The Saraswat Co-operative Bank Ltd. (A Scheduled Bank)
India's Largest, Number One Urban Co-operative Bank !
NRI Desk - 91-22-22070126 International Banking Division - 91-22-24671191 to 95 (5 lines)
customerservicecentre@saraswatbank.com

# मॅक्सेल पुरस्कार

## उद्योग-जगतातील नामवंतांचा गुणगौरव सोहळा

संपूर्ण महाराष्ट्रातील उद्योग-जगताला ज्या मानाच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण तो म्हणजे मॅक्सेल! कारण मॅक्सेल पारितोषिके म्हणजे सर्वोत्तमता! गुणवत्ता! आणि प्रयोगशीलता! उद्योगातील नवतेला देशातील सर्वोत्तम कर्तृत्ववंतानी दिलेली दाद! त्यांनी केलेला गौरव होय.

यंदा हा 'मॅक्सेल सोहळा' मुंबईतील वैभवसंपन्न अशा एनसीपीएच्या संकुलातील 'जमशेद भाभा थिएटर'मध्ये पार पडला. देशाचे गृहमंत्री आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे हे या सोहळ्याचे प्रमुख अतिथी होते. या सोहळ्यात उद्योग आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील अनेक नामांकित हजर होते तसेच अनेक बिझनेस लीडर्स उपस्थित होते. 'कॉर्पोरेट लॉयर' म्हणून विख्यात असलेले नितीन पोतदार हे मॅक्सेलचे संस्थापक आहेत. तर पद्मश्री कुमार केतकर, ज्येष्ठ वैज्ञानिक पद्मभूषण रघुनाथ माशेलकर, न्यायमूर्ती अरविंद सावंत, 'एल अँड टी फायनान्स'चे श्री. देवस्थळी आणि 'महाराष्ट्र फौंडेशन'चे प्रमुख अमेरिकास्थित उद्योगपती सुनील देशमुख हे 'मॅक्सेल फौंडेशन'चे सल्लागार आहेत.

ह्या शानदार सोहळ्याचे प्रास्ताविक करताना मॅक्सेल फौंडेशनचे संस्थापक नितीन पोतदार ह्यांनी ह्या पुरस्काराचे वेगळेपण सांगितले. ज्याप्रमाणे कला, साहित्य-संस्कृती क्षेत्रात गौरव पुरस्कार दिले जातात तसे प्रोत्साहन उद्योगक्षेत्राला देण्यासाठी हा उपक्रम सुरू केलेला आहे व यंदाचे हे दुसरे वर्ष आहे. पुढे बोलताना ते म्हणाले, शालेय शिक्षणात इयत्ता आठवीपासून इतिहास-भूगोलाच्या बरोबरीने करिअर गाईडन्स व उद्योजकता हे विषय मराठी शाळांनी शिकवले पाहिजेत.

'मॅक्सेल फौंडेशन'ची भूमिका मांडताना त्यांनी सांगितले की, मॅक्सेल ही मराठी उद्योजक, कॉर्पोरेट लीडर्स आणि संशोधक उद्यमशीलतेचा सन्मान करणारी चळवळ आहे आणि आमचे उद्दिष्ट भावी पिढ्यांना नवा प्रबळ आत्मविश्वास देणे हेच आहे आणि असेल!

'मॅक्सेल फौंडेशन'च्या या सोहळ्याचे प्रमुख अतिथी असलेले केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे ह्यांनी भाषणात त्यांच्या सर्वव्यापी आणि समग्र एकात्मिक विकासाचे महत्त्व विशद केले. भारताने सर्वच पातळ्यांवर विकासाचा वेग वाढवण्याची आणि त्यासाठी समाजाच्या सर्व स्तरांवर झटून प्रयत्न होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उद्योगविश्व, कॉर्पोरेट यांनी आपली पारंपरिकता टाकून आणि नवनवीन क्षेत्रात उंच भरारी घेऊन समाजातील अखेरच्या माणसांपर्यंत विकास घडवून आणला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आणि मॅक्सेलचा हा उपक्रम महाराष्ट्राच्या पुढील पिढीला नक्कीच नवीन वाट आणि आत्मविश्वास देणारा असेल असे प्रतिपादन केले

ह्याप्रसंगी बोलताना डॉ. माशेलकर ह्यांनी ''मूलभूत संशोधन आणि नवे शोधण्याची ऊर्जा यांची एकत्रित शक्ती अनेक अशक्य भासणाऱ्या गोष्टी शक्य करते. आपल्याला जगात सर्वोत्तम आणि सर्वोच्च ठरायचे असेल तर संशोधन आणि संशोधनाची वृत्ती आपण अगदी शालेय स्तरापासून विकसित करण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले. तसेच त्यांनी हजारो वर्षे प्रत्यक्ष वापरात असलेल्या उपलब्ध ज्ञान आणि त्याचे उपयोजित तंत्र यांचे पेटंट प्राप्त करण्यासाठी भारतीयांनी फार मोठं कष्ट घेण्याच्या गरजेची आवश्यकता आहे असे सांगितले.

यावर्षीच्या पारितोषिक विजेत्यांमध्ये 'मर्सिडीज बेंझ, इंडिया'चे संचालक सुहास कडलसकर (अॅवॉर्ड फॉर एक्सलन्स इन बिझनेस लीडरशीप), 'अलाहाबाद बँके'च्या अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक श्रीमती शुभलक्ष्मी

**मॅक्सेलच्या सोहळ्यातील मोलाचा क्षण...**






पानसे (ॲवॉर्ड फॉर एक्सलन्स इन बिझनेस लीडरशीर), 'गद्रे मरीन एक्सपोर्टस्' प्रा. लिमिटेड'चे मालक दीपक गद्रे (ॲवॉर्ड फॉर एक्सलन्स इन आंत्रप्रेनुअरशिप), 'यूएस एरोटीम'चे अध्यक्ष आणि सीईओ सुहास काकडे (ॲवॉर्ड फार एक्सलन्स इन आंत्रप्रेनुअरशिप), 'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन'चे सहसंस्थापक आणि संचालक विवेक सावंत (ॲवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इनोव्हेशन्स.), 'मनोरमा इन्फोसोल्यूशन्स'च्या प्रमुख श्रीमती अश्विनी दानीगौंड (ॲवॉर्ड फार इमर्जिंग एक्सलन्स) यांचा समावेश होता. या मंडळींची नावे पाहिली तरी त्यांच्या कर्तृत्वाचा ग्राफ किती उच्चत्तम गुणवतेचा आहे ते आपल्या लक्षात येतेच. मराठी उद्योजक आणि बिझनेस लीडर्स स्वतःच्या कर्तबगारीवर आणि धाडसी प्रतिमेच्या बळावर जगाच्या उद्योगविश्‍वात कसे प्रतिष्ठा पावत आहेत ते आपण अनेकदा पाहतो. पण मॅक्सेलने ज्यांचा गौरव केला आहे त्यांचे कार्य पाहिले की, त्यांचा फक्त अभिमानच वाटू शकतो. या सर्व पारितोषिक विजेत्यांमध्ये सर्वात लक्ष वेधून घेतले ते 'प्राज इंडस्ट्रीज'च्या अत्यंत प्रेरणादायी नेतृत्वाचा आदर्श निर्माण करणाऱ्या प्रमोद चौधरी यांनी! प्राजचे कार्य आता जगभर मान्यता पावलेले आहे. मॅक्सेलच्या लखलखत्या सोहळ्यात प्रमोद चौधरी यांना 'लाइफटाइम अचिव्हमेंट ॲवॉर्ड' देऊन त्यांचा, त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

## मॅक्सेल ॲवॉर्ड्स् फॉर महाराष्ट्र कॉर्पोरेट एक्सलन्स संकल्पना

महाराष्ट्र राज्य भारताची औद्योगिक तर मुंबई ही आर्थिक राजधानी होय. गेल्या दोन दशकांतील मुक्त अर्थव्यवस्थेमुळे आणि जागतिक अर्थव्यवस्थेशी निगडित वाढत्या एकात्मकतेमुळे महाराष्ट्रासह भारतातील उद्योगक्षेत्रात खूप मोठे बदल झालेले दिसतात. जागतिकीकरणाच्या परिणामांमुळे नव-नवीन सेवाक्षेत्रांसह सर्वच औद्योगिक क्षेत्रांमधे देशात आणि परदेशात मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचबरोबर माहिती आणि तंत्रज्ञानाच्या उगमामुळे भौगोलिक आणि व्यापाराच्या सीमा मोडून पडल्या आहेत. Today Idea is capital! त्यामुळे उद्यमशीलता काही निवडक लोकांची मक्तेदारी राहिलेली नसून, ज्यांच्याकडे कल्पकता आहे अशांना संधी प्राप्त झालेली दिसते. आजवर महाराष्ट्राने कॉर्पोरेट क्षेत्रात, विविध उद्योगांमध्ये बिझिनेस लीडर्स दिलेले आहेत. त्यांनी दृढ निश्चयाने आणि अथक परिश्रमाने या क्षेत्रामध्ये स्वत:चा असा ठसा उमटविलेला दिसतो. पुढील काळांत या नवीन अर्थव्यवस्थेत व्यवसायाच्या आणि कॉर्पोरेट क्षेत्रात नेतृत्व सिद्ध करण्याच्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत. अशा वेळी महाराष्ट्रातील आजची पिढी सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्यात मागे पडणार नाही ही आशा नव्हे खात्री आहे! महाराष्ट्रातील उद्योग-जगतातील आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील दिग्गजांनी त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वाने एक ना अनेक शिखरं गाठली, पण हे कर्तृत्व महाराष्ट्रातील लोकांपर्यंत मांडलं गेलं नाही हे प्रकर्षाने जाणवतं. उद्याचा महाराष्ट्र घडताना अशा कर्तृत्वाचा आणि अनुभवाचा वारसा पुढील पिढीला देणं गरजेचं आहे. त्यामानाने संगीत, साहित्य, नाट्य, कला, चित्रपट आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांना अधिकच सन्मान प्राप्त झाला. तो योग्यच आहे, पण त्याचबरोबर उद्योगक्षेत्रातील आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्तृत्व आणि कामगिरीला देखील योग्य सन्मान प्राप्त झाला तर एक नवीन महाराष्ट्र घडलेला दिसेल! काळाच्या पलीकडे जाऊन ज्यांनी मोठी स्वप्नं बघितली आणि आपल्या सकारात्मक दृष्टीकोनाच्या आणि मेहनतीच्या बळावर घवघवीत यश प्राप्त केलं, अशा शिल्पकारांना आणि त्यांच्या नेतृत्वाचा सन्मान करण्यासाठी मॅक्सेल ॲवार्ड्स फॉर महाराष्ट्र कॉर्पोरेट एक्सलन्सची संकल्पना मॅक्सेल फौंडेशनतर्फे कॉर्पोरेट लॉयर नितीन पोतदार यांनी मांडली. या संकल्पनेला जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, लार्सन टुब्रोचे ग्रुप सीईओ व संचालक वाय.एम. देवस्थळी, ज्येष्ठ संपादक कुमार केतकर, निवृत्त न्यायाधीश अरविंद सावंत, अमेरिकेतील उद्योगपती सुनील देशमुख यांचे ॲडवायझरी बोर्ड लाभलेले आहे. त्यातूनच मॅक्सेल ॲवॉर्डस् फॉर महाराष्ट्र कॉर्पोरेट एक्सलन्सचा उपक्रम साकारला जात आहे.

# परिचय : मॅक्सेल एक्सेलन्स ॲवॉर्ड विजेत्यांचा




*"एम्केसीएल म्हणजे ५००० छोट्या छोट्या आयटी उद्योगाचं एक नेटवर्क आहे. एक उद्योजकतेची मोठी प्रयोगशाळा महाराष्ट्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जवळपास २५,००० लोकांना घेऊन आम्ही काम करीत आहेत. मी जेव्हा शिंदेसाहेबांच्या हातून मॅक्सेल ॲवॉर्ड स्वीकारत होतो तेव्हा मी त्या २५००० सहकाऱ्यांच्या ५०००० हातांनी ते स्वीकारत होतो अशी माझी भावना आहे."*

विवेक सावंत यांच्या शक्तिशाली आणि प्रतिभावान नेतृत्वाखाली 'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड'ने गेल्या काही काळात मोठीच झेप घेतली आहे. महाराष्ट्रात सर्वदूर आयटी शिक्षण आणि इ-लर्निंगचे विशाल जाळे विणण्यात, अत्यंत प्रगत असे माहिती आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण भारतभर पोहोचवण्यात सावंत यांना गौरवशाली यश प्राप्त झाले आहे. अर्थात यात सर्वाधिक भर आहे तो ग्रामीण भारतावर! नॉलेज कॉर्पोरेशनने अल्पावधीतच शिक्षण, शासकीय कारभार, जनतेचे ज्ञानाच्या पातळीवरचे सबलीकरण आणि ज्ञानावर आधारलेला समाज निर्माण करण्याचे कार्य या स्तरावर अभिमानास्पद काम आणि बांधीलकी सिद्ध केली आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी निर्मिलेल्या It Task Force सह शिक्षणाशी संबंधित धोरणे आखणाऱ्या अनेक कमिट्यांवर सावंत हे कार्य करत आहेत.

---

आयटी सोल्युशन्सचा प्रवेश आणि प्रयोग आरोग्याशी निगडित उद्योगात करून देत अश्विनी दानीगौंड यांनी चाकोरीबाह्य उद्योजकतेचा एक नवा महामार्ग जगापुढे आणून आपले आगळेवेगळे नेतृत्व हजारो पटीने सिद्ध केले आहे. 'मनोरमा इन्फोसोल्युशन्स'चा ग्राहक अक्षरशः जगभर पसरला आहे. कंपनी कोल्हापूरसारख्या छोट्या शहरातून आपले कार्य करीत आहे. या कंपनीची विशेष खासियत म्हणजे कंपनीतील सर्व निर्णयाधिकार हे निष्णात महिलांच्या हाती आहेत. पुरोगामी महाराष्ट्राला प्रगतीची आणि उद्योजकतेची नवी दिशा देणाऱ्या अश्विनी दानीगौंड यांनी प्रतिष्ठेचा 'बेस्ट टेक्नोलॉजी सोल्युशन्स प्रोव्हायडर' हा सन्मानही प्राप्त केला आहे.




*"उद्योजिका दानीगौंड यांनी निष्ठा, अथक परिश्रम, नव्या तंत्राचा वापर करत आपण कोल्हापूरपासून सुरुवात करून आपला व्यवसाय देशाबाहेर कसा विस्तारला ते सांगितले."*




*"आंत्रप्रेनुअरशिपचा हा प्रवास खूपच आव्हानात्मक आणि समाधान देणारा होता. प्राजचं हे आजचं यश हे माझ्या एकट्याचं नसून आमच्या टीमचं यश आहे. अजूनही आमचे महत्त्वाचे ५० सहकारी गेले २० वर्षे प्राजच्या प्रवासात आमच्याबरोबर आहेत हे मी अभिमानाने सांगू शकतो. आज प्राज जगातल्या ५०हून अधिक देशात काम करीत आहे याचं सारं श्रेय माझ्या टीमचं आहे."*

**प्र**मोद चौधरी म्हणजे एक अद्वितीय माणूस.. सदैव नव्या-नव्या कल्पकतेने भारलेलं एक सदाजागृत मन! त्यांची गणना संपूर्णपणे नवनवीन कल्पनांना जन्म देणारे 'मास्टर माइंड' म्हणूनच केली जाते. ही जगावेगळी आणि आगळीवेगळी कल्पकता हेच त्यांच्या कंपनीचं सर्वात सशक्त बलस्थान आहे. तीच त्यांची महाकाय ताकद आहे. चौधरी गेली पस्तीस वर्षे व्यवसाय आणि उद्योजकतेची नित्य नवी शिखरे आपल्या स्वामित्वाखाली आणत आहेत. १९८४ या वर्षात त्यांनी 'प्राज'ची स्थापना केली आणि अगदी सुरुवातीपासूनच त्यांनी हरित आणि स्वच्छ तांत्रिकतेवर लक्ष केंद्रित केले. त्याचबरोबर त्यांना जोड दिली ती नूतनीकरणक्षम इंधन स्रोत निर्मितीची! सतत नव्या वाटांचा शोध घेणारी, नवे अर्थपूर्ण प्रयोग प्रत्यक्षात आणणारी संस्था म्हणून आज 'प्राज' जगभर विख्यात आहे. जैव-तंत्र प्रक्रिया आणि जैव-व्यवस्था ही 'प्राज'ची खास विशेषतः आहे. यात अल्कोहोल/प्युएल इथेनॉल वनस्पती, ब्रुअरी वनस्पती यांची लागवड, मशागत, जल-व्यवस्थापन, शेतकीसाठी आवश्यक तंत्रसुविधा यांचा विशेष सहभाग आहे. 'प्राज' ही केवळ गुंतवणूकदारांना स्वतःच्या भव्य विकासाने आकर्षित करणारी संस्था नसून ती जगातील सर्वोच्च पर्यावरणीय भान राखणारी कंपनी आहे. जगातील पाच खंड आणि पन्नास देशातील उद्योगांना जैव-इंधन पुरवणारे ते एक समर्थ निर्मितीकेंद्र आहे. भारत सरकारच्या 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन' विभागांतर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या असंख्य पोरितोषिकांनी 'प्राज'ला अनेकदा गौरवण्यात आले आहे. Chemtech ward, ICORE ward अशा जागतिक मोलाच्या पारितोषिकांनी तर प्राजचा गौरव झालेला आहेच. पण मुख्य म्हणजे 'फोर्ब्ज'नेसुद्धा 'प्राज'ला बेस्ट इन आशिया म्हणून सन्मान प्रदान केला आहे. जगातील प्रत्येक देशात 'प्राज'ला एक मानाची ओळख आहे. आज २०१३ मधील एक खास ज्ञानसाम्राज्य म्हणजे फक्त 'प्राज'!

**भा**रतातील सर्वात विशाल सामुद्रिक निर्यातगृह उभे करणारे, अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता, अव्वल दर्जाची कल्पकता आणि भविष्याला कवेत घेणारी दृष्टी म्हणजे दीपक गद्रे! 'राष्ट्रीय उत्पादकता परिषदे'चे तब्बल सात वेळा 'मरीन एक्सपोर्ट'मधील अतुलनीय कामगिरीसाठी त्यांनी पारितोषिक संपादन केले आहे. सुरमई तंत्र, साधन संपत्तीचा पुनर्वापर आणि फिशरी वेस्ट प्रक्रिया या क्षेत्रात 'गद्रे मरीन एक्सपोर्ट' नवनवे उच्चांक करते आहे ते गद्रे यांच्या नेतृत्वाखाली!

*"मासळी व्यवसायाचा संबंध आंत्रप्रेनुअरशिप ॲवॉर्ड्स्शी लावल्याबद्दल मी मॅक्सेल फाऊंडेशनचा आभारी आहे. मासळी व्यवसायाला मॅक्सेल ॲवॉर्डमुळे नक्कीच प्रतिष्ठा प्राप्त होईल असं मी मानतो. त्यांचे आभार."*






*“मॅक्सेल फौंडेशनच्या अडवाईसरी बोर्डच्या दिग्गजांच्या उपस्थितीत हा अवॉर्डस् घेताना मला फारच अभिमान वाटतो. One recognition billion inspiration या नितीन पोतदारांच्या विचारांशी मी संपूर्णपणे सहमत आहे. उद्याच्या पिढीला खरोखरच अशा कार्यक्रमातून प्रेरणा मिळेल याची मला खात्री आहे.”*

सुहास कडलसकर हे नाव देदीप्यमान अशा यशाची जणू नाममुद्रा आहे! कॉर्पोरेट आणि उद्योग विश्वातील दिग्गजांनी ज्याच्या उद्योगदृष्टीचा आणि दूरगामी वैचारिकतेचा सदैव गौरवच केला आहे असे हे नाव सर्वोत्तमत्तेचे समर्थ प्रतीक असलेल्या ‘मर्सिडीज बेंझ’ला भारतीय बाजारपेठेत प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा हा माणूस म्हणजे स्वतंत्र कर्तृत्वाची लखलखती भरारी! मानवी साधन-संपत्ती (एच आर) आणि पर्यावरणीय भान या क्षेत्रातील मोठे सन्मानाचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. यात अर्थातच ‘वर्ल्ड एचआरडी कॉंग्रेस’मध्ये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या FLME या गौरवशाली पुरस्काराचा समावेश आहे!

---

सुहास काकडे यांचा डिझाइन इंजिनीअर, प्रशिक्षित पायलट इथून सुरू झालेला प्रवास ‘युएस एरोटीम’चे सीईओ आणि अध्यक्ष या मुक्कामावर पोहोचला आहे. हे यश म्हणजे असामान्य कर्तृत्व, सर्वोत्तम नियोजन आणि व्यवस्थापन याचबरोबर विलक्षण बुद्धिमत्ता यांचे जणू प्रतीकच आहे. ‘कॉर्पोरेट मॅनेजमेंट’च्या विस्ताराला, सखोलतेला आणि त्या विषयाला अनेक नवे पैलू प्राप्त करून देण्याचं सर्व श्रेय सुहास काकडे यांनाच दिलं पाहिजे. काकडे यांनी अनेकानेक FORTUNE ५०० कंपन्यांसाठी काम केले आहे.



*“आपण जगत असताना स्वर्गात जाऊ शकतो याचा अनुभव मला मॅक्सेल ॲवॉर्ड स्वीकारताना झाला. त्याचे धन्यवाद. नितीन पोतदारांनी सांगितलं हा ॲवॉर्ड सोहळा आमच्यासाठी नसून पुढच्या पिढीच्या तरुणांसाठी आहे. मला त्यांचा हा विचार खूपच आवडला म्हणून मी अमेरिकेहून इथं आलो. जास्तीत जास्त मराठी उद्योजकांनी मोठं यश मिळवावं असं मला वाटतं.”*




*“कुठलंही ॲवॉर्डस् म्हटलं की प्राईव्हेट सेक्टरच्या बँकांनाच दिले जाते पण खरे आवाहन हे पब्लिक सेक्टर बँकिंगमध्ये जास्त असते. आणि म्हणून मला हा मॅक्सेल ॲवॉर्ड स्वीकारताना खूपच आनंद होत आहे. एकीकडे करोडो रुपयांची उलाढाल करून जे यश मिळतं, त्यापेक्षा जेव्हा खेडेगावातल्या एखाद्या गरजू महिलेला आम्ही १००० किंवा ५०० रुपये देतो आणि त्यामुळे तिच्या आयुष्यात होणारे बदल बघतो तेव्हा आम्हाला जास्त आनंद होतो. अशा प्रगतिशील बँकेने ‘मॅक्सेल’ची चळवळ आपलीही मानली आणि अर्थपूर्ण सहकार्य केले.*

*मॅक्सेलच्या या सोहळ्यात संस्थेचे सन्माननीय सल्लागार अरविंद सावंत, उद्योगपती सुनील देशमुख ह्यांनी मार्गदर्शन केले. आणि सोहळ्यात ‘एमपीएक्स’चे अध्यक्ष जिग्नेश शहा यांचे ‘कॅपिटल बिल्डिंग’ या विषयावर चपखल आणि उद्बोधक भाषण झाले. मॅक्सेल फौंडेशनचा हा सोहळा म्हणजे महाराष्ट्रातील उद्योगांचे, उद्योजकांचे जणू एक कॉर्पोरेट संस्कृतीचे गेट टूगेदर असल्याची भावना सर्वच उपस्थितांमध्ये होती.”*

**त्या** जिथे-जिथे गेल्या तिथे-तिथे त्यांनी भरभराट आणली, वैभव आणलं. हाती घेतलेले प्रत्येक कार्य सर्वश्रेष्ठतेला नेऊन ठेवले. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून त्यांनी आपल्या कर्तृत्व प्रवासाला दमदार सुरुवात केली. नंतर त्यांनी ‘कार्यकारी संचालक’ या नात्याने ‘विजया बँके’ला आपल्या कर्तबगारीने उंचीवर नेले आणि आज विलक्षण बुद्धिमत्ता, धडाडी आणि निर्णयशक्ती या गुणांच्या जोरावर त्या ‘अलाहाबाद बँके’च्या चेअरमन आणि प्रमुख संचालक म्हणून कार्यरत आहेत. अमेरिकन विद्यापीठातून एमबी पदवी धारण केलेल्या श्रीमती शुभलक्ष्मी पानसे म्हणजे एक ऊर्जामय स्रोत, एक प्रेरणा! नवनवीन कल्पना अमलात आणून अत्यंत गुंतागुंतीचे बँकिंग व्यवहार सुलभ करणारी कल्पकता ही त्यांची खासियत! त्यांची आव्हानांना सामोरे जाऊन त्यावर यशस्वी मात करण्याची धाडसी वृत्ती हीच त्यांची गेल्या सदतीस वर्षांतील ओळख आहे. त्यांच्या दूरदर्शी कार्यशैलीने बँकिंग क्षेत्राला सतत नव्या सर्वोत्तमतेला नेले आहे.



टीजेएस्‌बी बँक
टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड
(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)

विश्वास आयुष्यभराचा




• मोबाईल बँकिंग • व्हिजा डेबिट कार्ड • डिमॅट सुविधा
• फॉरेक्स सेवा • ई-बँकिंग • RTGS / NEFT

प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय :
टीजेएस्‌बी हाऊस, प्लॉट क्र. बी ५, रोड क्र.२, वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४.
दूरध्वनी क्र : ०२२ - २५८७ ८५०० | www.tjsb.co.in

# मोना आणि डॅरल



सुधीर शं. कुलकर्णी

गेल्या शतकात उत्तर अमेरिकेत साठच्या दशकाच्या अखेरीस येऊन स्थायिक झालेल्या भारतीयांना असलेली आपल्या मुला-मुलींची लग्ने इथेच स्थायिक झालेल्या इतर भारतीयांच्या मुला-मुलींबरोबर व्हावी ही इच्छा स्वाभाविकच होती. आम्हीही- मी व माझी पत्नी शीला- त्याला अपवाद नव्हतो. सन १९६९ मध्ये जन्मलेली आमची मोठी मुलगी- मोना - घरातील मराठी वातावरणात वाढत होती. आम्ही दर तीन वर्षांनी दोन्हीकडच्या आजी-आजोबांना भेटण्यासाठी दोन महिने तिला भारतात घेऊन जात होतो. तसेच हिंदू सणांच्या वेळी स्थानिक देवळात होणाऱ्या कार्यक्रमांनाही आम्ही तिला घेऊन जात होतो. त्यामुळे ती जरी भारतात वाढलेली नसली तरी तिच्यावर भारतीय संस्कृतीचा प्रभाव होता हे निश्चित. तिचे लग्न डॅरल कॅरन नावाच्या अमेरिकन तरुणाशी १९९५ मध्ये झाले. त्याचे पूर्वज फ्रान्समधून प्रथम कॅनडाच्या क्युबेक प्रांतात व नंतर अमेरिकेच्या न्यू यॉर्क राज्यात स्थायिक झालेले होते. तो जन्माने कॅथलिक ख्रिश्चन आहे.

मोना व डॅरल एकाच ऑफिसमध्ये काम करत होते आणि ते भेटले ऑफिसच्या कॉपिंग मशीनवर. तिथे त्यांच्या कॉमन मित्राने त्यांची ओळख करून दिली, परंतु त्यावर वर्ष-दीड वर्षाने ते मित्र बनले. सन १९९४च्या सुरुवातीपासून ते एकाच विभागात - मार्केटिंगमध्ये काम करू लागले. एकत्र मीटिंग्जना जाऊ लागल्यामुळे मैत्री वाढली. दोघांना एकाच तऱ्हेच्या संगीताची आवड आहे हे लक्षात आल्यावर सीडींची अदलाबदल होऊ लागली आणि त्यानंतर एक-दोन महिन्यांनी दोघे डेटिंग करू लागले.

दोघांनाही जॉगिंग, हायकिंग करण्याची आवड असल्याने ह्या गोष्टी ते एकत्र करू लागले. जवळीक निर्माण झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की त्यांची आयुष्यातील ध्येये व कौटुंबिक मूल्ये सारखीच आहेत. मग डॅरलने मोनाला आपण लग्न करावे का अशी विचारणा केली. परंतु एंगेजमेंट जाहीर करण्याआधी त्यांनी दोन्ही बाजूच्या आई-वडिलांना, वेगवेगळे भेटून, त्यांना आपला निर्णय सांगून, त्यांची मते जाणून घेण्याचे ठरवले. डॅरलच्या आई-वडिलांना भेटायला गेल्यावर डॅरलच्या आईने प्रश्न विचारला, तुमची मुले कशी दिसतील? म्हणजे तिला म्हणायचे होते, गोरी की सावळी? दोघांनी उत्तर दिले, त्यांचा रंग हे आताच कोणी सांगू शकत नाही. मात्र मुलांना कुठल्या धर्मानुसार वाढवणार ह्यावर



**डॅरल–मोना आणि मुलं**

दोघांनीही स्पष्टीकरण केले की मुलांना दोन्ही धर्मांची तोंडओळख करून देणार व ती सज्ञान झाल्यावर आपला धर्म निवडतील. नियोजित लग्नसमारंभ दोन्ही पद्धतीनुसार करण्याचे त्यांनी जाहीर केले.

ते दोघे लग्नासंबंधी भेटायला येणार हे कळल्यावर आम्हाला त्यांचे फार कौतुक वाटले. आमच्याशी चर्चा करण्यासाठी आल्यावर आम्हीही मनमोकळेपणे आमचे विचार त्या दोघांसमोर मांडले. त्याआधी दोन वर्षांपूर्वी कॅलिफोर्नियात राहणाऱ्या माझ्या मोठ्या भावाच्या (अरविंद) मुलीने– मनीषाने – एका अमेरिकन युवकाशी लग्न केले होते व त्या लग्नाला आम्ही मुलांसह गेलो होतो. ह्या लग्नामुळे आमच्या विचारांत बराच बदल झाल्याने मोनाचा मार्ग चांगलाच सोपा झाला होता. तिने आपल्या पसंतीचा नवरा, मग तो अमेरिकन असो, निवडला होता. जगातील सर्व आई–वडिलांना आपल्या मुला–मुलींचे भावी संसार सुखाचे व्हावेत ही एकमेव इच्छा असते! आम्हीही त्याला कसे अपवाद असणार?

डॅरलच्या मते लग्नाच्या वेळी तो बराच धार्मिक होता. मात्र नंतरच्या चर्चच्या राजकीय धोरणांमुळे त्याला कॅथलिकसारखे संघटित धर्म आवडेनासे झाले आहेत. परंतु दिवाळी, गणेशचतुर्थी अशा धार्मिक समारंभांना तो हजर असतो व उत्साहाने आमच्यात सहभागी होतो. डॅरल जेव्हा चर्चला जात असे त्यावेळी मोना त्याच्यासोबत जात नसे, कारण चर्चची काही तत्त्वे तिला पसंत नसत. ते एकमेकांच्या मताला किंमत देतात त्यामुळे त्या दोघांनी आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व राखलेले आहे. आपल्या दोन्ही मुलांना भारतीय संस्कृती आणि इतिहास शिकवणे, धार्मिक शिक्षणापेक्षा महत्त्वाचे आहे असे मोनाला वाटते आणि डॅरल तिच्याशी सहमत आहे.

लग्नानंतर त्या दोघांना घेऊन आम्ही सर्व भारतभेटीसाठी जानेवारी १९९७ मध्ये मुंबईला गेलो. माझ्या सासऱ्यांचा– भाऊकाकांचा चार खोल्यांचा प्रशस्त ब्लॉक माहीम भागात आहे. नेहमीप्रमाणे तिथे उतरायचे ठरवले. मात्र त्यामुळे भाऊकाकांना टेन्शन आले. दोन कारणांनी – एक, आपले भात, भाजी, आमटी व चपाती असलेले शाकाहारी जेवण डॅरलला आवडेल का? दुसरे, त्याहून त्यांना काळजी पडली शौचालयाची. त्यांच्याकडे भारतीय पद्धतीचा संडास असल्याने! मुंबईतील डॅरलचे वास्तव्य सुखकर व्हावे ह्या इच्छेने त्याची व मोनाची सोय जवळच्या हॉटेलमध्ये करावी का अशी विचारणा भाऊकाकांनी केली. मोनाने तिच्या लहानपणापासून अनेक वेळा भारतभेटी केल्या असल्याने तिचा प्रश्न नव्हता. डॅरलशी त्यासंबंधी बोलल्यावर त्याने हॉटेलची सूचना पहिल्याच फटक्यात फेटाळून लावली. हॉटेलमध्ये राहून फॅमिलीच्या सहवासाला तसेच भारतीय संस्कृतीच्या परिचयाला मुकणार ही त्याची तक्रार आम्हालाही पटली. त्या भेटीतील तीन आठवड्यांच्या अवधीत तो आमच्या–सारखेच जेवत होता आणि जमिनीवर अंथरलेल्या गादीवर झोपत होता.

पहिल्या भारतभेटीआधी आम्ही दोघांनी व मोनाने डॅरलला बऱ्याच सूचना देऊन त्याची मानसिक तयारी करून ठेवली होती. त्या म्हणजे : १) घरात बूट, चपला, स्नीकर्स

वापरायचे नाहीत – बाहेर काढून ठेवायचे!

२) हाताने जेवण्याचा प्रसंग आला तर फक्त उजवा हात वापरायचा. कोणी वाढत नसेल तर वाढून घेण्यासाठी मात्र डावा हात वापरला तरी चालेल. (खरकटे म्हणजे जेवतानाचा उजवा हात आणि उष्टे म्हणजे डबल डिपिंग हे डॅरलला समजावून सांगावे लागले.)

३) वयाने मोठे असलेल्यांचा आदर राखण्यासाठी त्यांना वाकून नमस्कार करावा.

ह्या पहिल्या भेटीत मोना व डॅरलची आमच्या सर्व नातेवाईकांशी भेट व्हावी ह्या उद्देशाने गेट–टूगेदरचा समारंभ मुंबईतील एका हॉलमध्ये आयोजित केला होता. त्या समारंभात मोना–डॅरलभोवती नातेवाईकांचा गराडा पडला. त्यावेळी डॅरल कुणीही भेटवस्तू दिल्यावर लगेच त्यांना वाकून नमस्कार करत सुटला. बहुधा त्या गोंधळात त्याच्या समजुतीचा घोटाळा, आमच्या पूर्वसूचनांमुळे झाला असावा हे मी ताडले. म्हणून त्याला बाजूला घेऊन मी समजावून सांगितले की फक्त वयस्कर लोकांना वाकून नमस्कार करायचा, बाकीच्यांना हात जोडून नमस्कार करायला हरकत नाही.

इथे वाढल्याने मोनाला बाहेरच्या अमेरिकन वातावरणाशी जुळवून घेणे सोपे गेले. मात्र डॅरलची भारतीय संस्कृती समजून घेण्याची Learning curve थोडी लांब होती. लग्नानंतर चार वेळा तो आमच्याबरोबर भारतात जाऊन तीन–तीन आठवडे राहून आलेला आहे. प्रत्येक भेटीत सकाळी जवळच्या शिवाजी पार्कभोवती जॉगिंगसाठी तो जात असतो. जॉगिंगनंतर कट्ट्यावर विश्रांती घेत असता तेथील लोकांशी गप्पा मारायला त्याला आवडते. त्याच्या मनमोकळ्या स्वभावामुळे तिथल्या वास्तव्यात आमच्या नातेवाईकांत तसेच तेथील शेजाऱ्यापाजाऱ्यांत मिळून–मिसळून वागल्याने तो त्यांच्यात लोकप्रिय झालेला आहे.

डॅरलला फोटोग्राफीची खूप आवड आहे. एका भेटीत तो दादरच्या रानडे रोडवरील कोहिनूर सिनेमासमोर (आता त्याचा नक्षत्र शॉपिंग मॉल झालेला आहे) फोटो घेत असता तिथल्या एका दुकानदाराने भारतीय पद्धतीनुसार नाव, गाव व इथे कसा आला अशा चौकश्या करण्यास सुरुवात केली. डॅरलची उत्तरे ऐकून तो दुकानदार म्हणाला, ''एका भारतीय मुलीशी लग्न केल्याने तू आमचा पण जावई आहेस!'' आणि त्याने आग्रहाने डॅरलला चहाही पाजला. ह्या घटनेने सर्वसामान्य (नातेवाईक व ओळखीचे असलेल्यांच्या व्यतिरिक्त) भारतीयांची आदरातिथ्याची डॅरलला चांगलीच कल्पना आली व त्याचा उल्लेख तो मधूनमधून करत असतो.

मोना व डॅरल ह्या दोघांना मी प्रश्न विचारला, ''गेली १८ वर्षे एकत्र संसार करताना तुमचा काय अनुभव आहे?'' मोनाने उत्तर दिले की दुसऱ्या धर्माच्या, वर्णाच्या तसेच संस्कृतीच्या व्यक्तीशी मिळतेजुळते घेण्याचा स्वभाव असला पाहिजे. कुठल्याही लग्नात मग ते समधर्मीय किंवा समजातीय असले तरी तिथेही 'देणे आणि घेणे' (Give and Take) हा प्रकार चालतोच. मात्र अशा ग्लोबल लग्नात काही वेळा थोडी जास्त तडजोड करणे भाग पडते. ह्या संबंधी डॅरल म्हणाला, ''अशी लग्ने यशस्वी होण्यासाठी पूर्वग्रह किंवा धर्माबद्दल तसेच वर्णाबद्दल आकस असता कामा नये. थोडे उदार (Liberal) असणे जरुरीचे असते. आम्ही दोघेही धर्माच्या बाबतीत कट्टर नसल्याने त्याबाबतीत संघर्ष घडून आला नाही. मी कॉलेज जीवनात सियॅटल ते अटलांटिक सिटी हे अंतर लंग कॅन्सर निधी उभारणीसाठी सायकलीने कापले. तसेच त्यानंतर बॅकपॅकिंग करून युरोपचाही प्रवास केलेला आहे. त्यामुळे असेल त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची मला सवय जडलेली आहे. माझ्या मनात इतर संस्कृती किंवा पद्धतींबद्दल आदर तसेच कुतूहलही आहे.''

सोशल मीडिया–फेसबुक, ट्विटर वगैरेंमुळे – तसेच २४/७ बातम्यांच्या चॅनेल्समुळे जग आज जास्त मोकळे (open) होत आहे तसेच जवळही येत चालले आहे. ह्या 'जागतिक खेड्यात' आता जात, धर्म व वर्ण ह्यांच्या भिंती उखडून जात आहेत. त्याचा परिणाम म्हणजे आंतरजातीय, आंतरधर्मीय तसेच आंतरवर्णीय लग्ने आज सर्रास होत आहेत. अमेरिकेतील काही राज्यांत व युरोपमधील काही देशांत समलिंगी तसेच सिव्हिल युनियनसारखे संबंधही समाजाला हळुहळू मान्य होत आहेत. त्यासाठी आता कायद्यातही बदल करण्यात येत आहेत. ही जग बदलण्याची निशाणी नाही काय? बदलत्या जगाबरोबर चालायचे असेल तर मोना व डॅरलच्या मते, सर्व प्रकारची लग्ने स्वीकारणे जरुरीचे ठरेल!

**– सुधीर शं. कुलकर्णी**
14 Windlass Dr.
Latham NY 12110
USA
sudhirk18@hotmail.com

# रिश्ता वही, सोच नई!



**रंजना पाटील**

लग्न या संस्कार संकल्पनेचं सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्य जपण्याचं कौतुक करणारं, जात-धर्म-देश-रंग यांच्या भिंती नाहीशा करण्याची दिशा दाखवणारं आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेचा पाया मजबूत करणारं असं 'गोष्ट ग्लोबल लग्नाची' हे शीर्षक बोलकं आहे.

आता हेच पाहा ना, ही फोटोमधली सपना मोठ्या डोळ्यांची, हसरी आणि तृप्त जीवन जगणारी सपना, आपले डच पती, डेनिस आणि मुलगी सेलेना, मुलगा डॅनियम यांच्याबरोबर दिसणारी, 'A Complete family' चं यापेक्षा सुंदर चित्र काय असेल?

भारतीय ओरिजीनची सपना, वयाच्या ११ व्या वर्षी तिच्या उच्चपदस्थ आई-वडिलांबरोबर हॉलंडला पोचली. (स्थलांतरीत झाली.)

भारतामध्ये येणं-जाणं अखंड असलं आणि जवळच्या नातलगांच्या भेटी वरचेवर होत असल्या तरी तिची मुळं रुजू लागली हॉलंडच्या मातीत, ऱ्हाईन नदीच्या तीरावर. दोन संस्कृतींमधील सकारात्मक जीवनसत्त्वांनी एक सुंदर कलम जीव धरू लागलं.

सपनाचं शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, तिनं हॉटेल मॅनेजमेंटची पदवी संपादन करण्याचं ठरवलं. तिच्या महाविद्यालयाच्या बाजूलाच एका डच महिलेचं उपाहारगृह होतं. त्या उपाहारगृहामध्ये सपनाची नेहमी ऊठबस असे. त्या डच मालकिणीचा तरुण, देखणा भाऊ डेनिस आणि बुद्धिमान सपनाची इथेच पहिली भेट झाली. दोघंही एकमेकांना आवडू लागले. पुढील वर्षभर त्यांच्या अनेक भेटीगाठी झाल्या. दोघांचे सूर चांगलेच जुळले. जात, धर्म, देश स्वत:ची व्यवसायिक महत्त्वाकांक्षा, भविष्यातील योजना आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, कौटुंबिक पार्श्वभूमी, सांस्कृतिक भिन्नता आणि त्यांना जोडण्याची आपली क्षमता यावर दोघांनी सर्वांगाने ऊहापोह केला. एक वर्षानंतर 'त्यानं', 'तिला' रीतसर मागणी घातली.

सपनाची संपूर्ण तयारी (मनाची) झाल्यानंतर आपल्या आईवडिलांना आपलं आणि डेनिसचं मनोगत सांगितलं. मोकळेपणाने पुन्हा सगळ्या पैलूंचा ऊहापोह झाला आणि अंतिम निर्णय होकारात्मक झाला.

सपनाचे आईवडील सुधीर आणि स्वाती प्रभू सारस्वत असून मुंबईमध्ये वाढलेले आणि उच्चपदस्थ अधिकाराच्या पदावर कार्यरत असणारे, व्यवसायानिमित्त हॉलंडला स्थायिक झालेले, जगभर सफरी करणारे आहेत.

त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन व्यापक आहे. त्याचबरोबर ते भारतीय संस्कृती आणि शिष्टाचारांचं जतनसुद्धा मोठ्या श्रद्धेनं आणि आत्मीयतेनं करत आहेत.

अर्थात आपल्या कन्येच्या निर्णयक्षमतेवर त्यांचा पूर्ण विश्वास असल्यानं आणि डेनिसला प्रत्यक्ष भेटल्यानंतर त्यांनी त्या आंतरराष्ट्रीय, आंतरधर्मीय विवाहाला आनंदानं मान्यता दिली. (तशी रिस्क कोणत्याही विवाहात असतेच म्हणा!)

डेनिसची आजी – वडिलांची आई– थोडी साशंक होती. मुलगी युरोपीयन पाश्चिमात्य संस्कृतीमधली असती तर एवढा फरक जाणवला नसता. पण पौर्वात्य संस्कृती, पूर्णत: वेगळ्या अशा कुटुंबातून येणारी मुलगी आपल्या लाडक्या नातवाचा संसार सुखाचा करेल ना, अशी थोडीशी भीती त्यांना वाटत असावी. पण जेव्हा डेनिसच्या संपूर्ण कुटुंबानं भारतीय पद्धतीनं तीन–चार दिवस चालणारे लग्नसोहळे पाहिले, अनुभवले आणि मनमुराद आनंद लुटला तेव्हा सर्व शंकांचं अभ्र वितळून गेलं.



सपना–डेनिस

सपना म्हणते, ''आता मी सुद्धा डच नागरिक आहे. डच लोक मुळातच फार सहिष्णू आणि सामंजस्य जपणारे. आम्हा दोघांची जीवनमूल्यं फार मिळतीजुळती आहेत. आम्ही एकमेकांच्या देशाचा, धर्माचा, संस्कृतीचा मनापासून आदर करतो. नात्यांची जपणूक डोळसपणे करतो. एकमेकांची मतं एकमेकांवर लादत नाही. म्हणूनच आम्ही दोघंही एकमेकांशिवाय स्वत:ची कल्पनाच करू शकत नाही.''

आंतरजातीय विवाह म्हणजे सुद्धा पूर्वी भारतामध्ये रक्तपातापर्यंत जायचे. आज काही अपवाद वगळता, परिस्थिती बदलली आहे. दृष्टिकोनही बदलला आहे. आपले तरुण/तरुणी शिक्षण, व्यवसाय, नोकरीच्या निमित्तानं जगभरातील कानाकोपऱ्यात जात–येत आहेत. विकसित देशांमधली सुबत्ता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि स्थैर्य लक्षात घेऊन आपला जोडीदार निवडू लागले आहेत. अनेक भारतीय मुलामुलींनी युरोपीयन, कोरियन, अमेरिकन नव्हे तर आफ्रिकनही जोडीदार निवडले आहेत आणि असे विवाह अत्यंत यशस्वी झालेले आहेत.

'रबने बनादी जोडी' हे जरी खरं असलं तरी विवाह हा दोन मनांना जोडणारा, दोन कुटुंबांना आणि दोन संस्कृतींना जोडणारा सेतू आहे. माणसाला समजण्याची कला आहे. आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग आपल्या कुटुंबीयांच्या मन:शांतीची जपणूक करून की अधिक समृद्ध आणि विकसित करणं आणि स्वत:चं व्यक्तिमत्त्व संपन्न आणि परिपक्व करणं असाच आहे.

असे आंतरराष्ट्रीय विवाह भविष्यात निश्चितपणे मोठ्या प्रमाणावर होतील. विश्वशांती नांदावी म्हणून प्रत्येकाला ते गरजेचं वाटेल. वांशिक द्वेषभावना मावळू लागेल आणि 'वसुधैव कुटुंबकम्' निश्चितपणे आकार घेईल. ग्लोबल लग्न घडून येणं ही काळाची गरज आहे तिला अव्हेरून चालणार नाही. कारण–

'रिश्ता वही, सोच नई!'

**– रंजना पाटील**
(९८२२०१५६९३)
ranjana.patil@strapsandbelts.com



# आंतरदेशीय विवाह

**डॉ. माधवी मेहेंदळे**

'लग्न' या प्रकारावर बोलावे तेवढे, लिहावे तेवढे, विचार करावा तेवढे थोडे आहे. मुळात दोन भिन्न ठिकाणी वाढलेल्या, भिन्न कुटुंबांतील, दोन भिन्न व्यक्तींनी एकत्र राहणे ही संकल्पना समस्या निर्माण करणार नाही असे अशक्य आहे. दोन व्यक्तींच्या आपापसांतील व्यवहार-भावना-अपेक्षा यांच्या समस्या; याबरोबर दोन कुटुंबातील तशाच आपापसांतल्या समस्या यांची भर पडते.

आता नोकरी, उद्योगधंदा, शिक्षण अशा कारणांमुळे तरुणपिढीचे स्थलांतर होणे अपरिहार्य आहे. वेगवेगळ्या भौगोलिक व सांस्कृतिक परिस्थितीत वाढलेल्या व्यक्तींच्या आपापसांतील ओळखीमुळे, मैत्रीमुळे, प्रेमामुळे आता आंतरदेशीय लग्न ही नवीन बाब राहिलेली नाही. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये असे संबंध नैसर्गिक आहेत.

पण मुद्दा एवढ्यावर थांबत नाही. आपला समाज आंतरजातीय विवाहालाही कडाडून विरोध करणारा होता. म्हणजे 'होता' असे सुधारित समाजाविषयी बोलता येईल. अजूनही भारतात 'Honour killing' सारखे अघोरी प्रकार घडतात. अल्प प्रमाणात असलेल्या आपल्या सुधारीत समाजामध्येही कुटुंबीयांनी ठरवून दिलेल्या लग्नात (arranged marriage) शक्यतो स्वजातीय, स्वधर्मीय, स्वप्रांतीय जोडीदाराला प्राधान्य दिले जाते. असे असावे यात फार आश्चर्य नाही. वावगेही नाही. लग्नानंतरचे एकत्रित आयुष्य जगण्यातील समस्या अशा प्रकारच्या लग्नात कमी येतात. कारण अर्थातच जोडीदाराच्या पार्श्वभूमीविषयी, ज्या वातावरणात त्याचे/तिचे संगोपन झाले आहे त्याविषयी कुटुंबीयांची मानसिकता काय आहे याविषयी माहिती असते. त्यामुळे अनपेक्षित असे फारसे काही त्यात उरत नाही. या सगळ्यात व्यक्तिसापेक्ष मुद्दे - म्हणजे प्रत्येकाचे स्वभाव, त्याचे कंगोरे यामुळे येणारे तणाव यात धरलेले नाही. ते जगाच्या पाठीवर कुठेही असणारच.

जागतिकीकरणामुळे आता जास्त प्रमाणात आंतरदेशीय विवाह होऊ लागले आहेत. एकमेकांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीशी पूर्ण अनभिज्ञ असलेले हे जोडीदार एकमेकांशी नाते कसे निभावत असतील अशी असे कुतूहल वाटते.

इतिहासात राजेरजवाडे राजकीय कारणांसाठी, म्हणजे दुसऱ्या देशाच्या राजाशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी; तिथल्या मुलीशी विवाह करण्याची प्रथा होती. तेव्हा त्या मुलीची संमती, तिचा आनंद याचा किती विचार केला जात असेल कोण जाणे. महाभारतातील राण्या कुंती,

गांधारी अशी अनेक उदाहरणे राजघराण्यांच्या इतिहासात व पुराणात सापडतात.

हल्लीच्या काळातही राजे, संस्थानिक यांची रया कमी झाली असली तरी त्यांची राजघराण्यातील 'प्रतिष्ठा' अबाधित ठेवण्याच्या उद्देशाने (Royal blood) एका राजघराण्याचा वैवाहिक संबंध दुसऱ्या राजघराण्याशी जोडला जातो. मग ते आंतरदेशीय असले तरी 'राज'घराणे आहे याला जास्त महत्त्व दिले जाते. उदाहरणार्थ, ग्वाल्हेर संस्थानचा थेट नेपाळच्या राजघराण्याशी अशा प्रकारचा संबंध जोडला गेला.



सती–रॉबिन

काही ठिकाणी 'गोऱ्या' कातडीला सामाजिक प्रतिष्ठा जास्त असल्याने स्वत:चे व होणाऱ्या मुलांचे सामाजिक स्थान उंचावण्याच्या हेतूने आंतरदेशीय विवाह गोऱ्या कातडीच्या जोडीदाराशी केला गेला आहे.

नव्या युगात ओळख–सहवास–मैत्री–प्रेम–विवाह या टप्प्यांतून सर्व जोडपी गेलेली दिसतात. बऱ्याच अशा जोडप्यांशी बोलल्यावर असे लक्षात आले, की त्यांचे अथडळ्यांचे बरेचसे टप्पे समान आहेत. तसेच त्यांची भारतीय कौटुंबिक पार्श्वभूमी बरीचशी सारखी आहे. म्हणजे ज्या भारतीय मुलामुलींनी असे विवाह केले आहेत. त्यांचे आईवडीलदेखील आधुनिक विचारसरणीचे आहेत. घरी जात–पात, धर्म यांचे अवडंबर नाही; उलट विश्वबंधुत्वाची संकल्पना आहे. शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्तर बराच उच्च आहे. कुठलेही कर्मकांड नाही. काही ठिकाणी तर कुटुंब नास्तिक आढळले.

अशा पार्श्वभूमीतून आलेल्या तरुणपिढीचे पाऊल अधिक पुढची पायरी गाठणे म्हणजेच अशा परदेशी नातेसंबंधात गुंतणे स्वाभाविक आहे. घरी पारंपरिक पार्श्वभूमी असेल तर असे पाऊल उचलण्यास सहजासहजी कोणी धजावणार नाही. त्याला कुणीतरी क्रांतिकारकच हवा.

दुसरा एक मुद्दा आढळून आला म्हणजे परदेशी जोडीदार जरी निवडला तरी त्या जोडीदारात बरेचसे भारतीय 'गुण' आढळले किंवा भारतीय गुण आढळल्यामुळेच तसा जोडीदार निवडला गेला असेल. सती व रॉबिन यांची जोडी म्हणजे भारतीय असलेली सती व आयरीश असलेला रॉबिन यांची जोडी.

सती ज्या वातावरणात वाढली ते अगदी मोकळे, स्वातंत्र्य असलेले वातावरण होते. कुठल्याही अर्थाने सतीला किंवा तिच्या घरच्यांना पारंपरिक म्हणता येणार नाही. 'Spiritual single' अशा एका मजेशीर वेबसाइटवर दोघांनीही आपापली नावे घातली होती. नाव नोंदवलेल्या लोकांना ती वेबसाइटच अपेक्षा जुळणारी 'स्थळे' सुचवते. सती व रॉबिनला असेच एकमेकांचे 'स्थळ' सुचवले गेले. दोघे दोन आठवडे एकमेकांशी फोनवर बोलले आणि सतीला भेटायला रॉबिन लगेचच भारतात आला.

आल्याआल्याच त्याला दोन संस्कृतींमधला फरक लक्षात यायला लागला. त्याआधी 'भारत' या देशाविषयी रॉबिनने व 'आयर्लंड' या देशाविषयी सतीने कधी विचारही केला नव्हता. 'बेलफास्ट', जिथे रॉबिनचे घर आहे, त्याचे नावही सतीने कधी ऐकले नव्हते. रॉबिनने भारताबद्दलच्या काही डॉक्युमेंटरीज त्याने पाहिल्या होत्या. त्याला वाटले होते की देशाच्या एखाद्या छोट्या भागात अशी गर्दी असेल. पण सगळीकडे एवढी माणसे बघितल्यावर त्याला धक्काच बसला. गरिबीचे खुलेआम दर्शन त्याला अस्वस्थ करून गेले.

तो भारतात आल्यावर सतीचे सर्व कुटुंब मावश्या–मावस बहिणींसकट त्याला बघायला–भेटायला हजर होते. रॉबिनला वाटले होते, त्यांच्या देशातील प्रथेप्रमाणे आधी दोघांचा परिचय, नंतर डेटिंग, नंतर कोर्टशिप, नंतर एकत्र राहणे, असे सगळे घडेल. लग्नाचा विचार त्याने फारसा केला नव्हता. एकत्र राहिल्यानंतर कालांतराने जर लग्नाचा विचार

केला तरच पुढे कुटुंबीयांशी परिचय करून घेण्याची त्यांची पद्धत. इथे तर आल्याबरोबरच सारा गोतावळा हजर होता.

सती अतिशय पुरोगामी व स्वतंत्र वातावरणात वाढली. तिच्या घरचेही तसेच. ती म्हणाली, 'मी अजिबात पारपंरिक नसूनही, रॉबिनशी वागताना आपण आपल्या संस्कृतीशी किती बांधले गेलो आहोत हे माझ्या लक्षात आले. मानसिकताच वेगळी होती. लग्नाशिवाय एकत्र राहू शकणे मला चालणार होते. तरीही माझी वाटचाल मात्र निश्चितपणे लग्नाच्या दिशेने होती.'

आता त्यांच्या नात्याला ५ वर्षे झाली आहेत. लग्नही झाले. दोघेही एकमेकांच्या देशात बराच काळ सलग राहिले आहेत. महिनोन्‌महिने बर्फामुळे घरातच बसणे सतीने अनुभवले. मैलोन्‌मैल माणूस दृष्टिपथास पडत नाही असे एकटे रस्ते तिने पाहिले. स्वच्छ उन्हाच्या प्रदेशातल्या सतीला बर्फाळ थंडीचा बराच त्रास झाला.

व्यक्तिस्वातंत्र्य, प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची स्पेस देणे पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये आहे. आपल्याकडे अजून या संकल्पना फारशा रुजलेल्या नाहीत. जसजसा आर्थिक व शैक्षणिक स्तर वर गेला तसतशा व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना आपल्याकडे प्राथमिक अवस्थेत सुरू झाल्या. पण भारतीय व्यक्ती ही मुख्यत: 'कौटुंबिक' व्यक्ती आहे.

परदेशात सगळे आपापले वेगळे व एकटे असतात. कुटुंबीय असतात, पण लांब. घरात असली तरी त्यांची दारे बंद असतात, ती थंडीमुळेही व संस्कृतीमुळेही. आईच्या-सासूच्या बंद दारावर टकटक करायची. लांबूनच चौकशी करायची. आत जाऊन गप्पा मारणे सहजासहजी नाही. अदबशीर वागणं मात्र आहे.

सती म्हणाली, 'सर्वात आवडलं ते म्हणजे मी कशी आहे, माझे केस कसे आहेत, माझं आधीचं emotional baggage काय आहे, माझं आधी लग्न झालं होतं का या कशातच कोणालाही काडीचा रस नाही. मी जशी आहे; माझ्या गुणदोषांसकट; तशी त्यांनी मला स्वीकारली. यामुळे फारच मोकळं वाटलं. आपल्याबद्दल कुठलंही मत बनवायचा ते प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे कोण आपल्याबद्दल काय म्हणेल याचा मनावर अजिबात ताण नसतो.'

तटस्थपणाही आहे पण हाक मारल्यावर माणसे वेळेला हजरही असतात. सतीला ताप आल्यावर खूप सारी 'Get well soon' ची कार्डे आली. पण माणसे भेटायला आली नाहीत. माणसांशी गप्पा मारायच्या होत्या तिला. पण इन्फेक्शन होऊ नये म्हणून माणसं भेटायला यायची तिथे पद्धत नव्हती आणि आपला आजारपणातला अवतार लोकांसमोर नको; म्हणून तिथल्या आजारी माणसालाही दुसरी कुणी भेटायला यायला नको असतात.

पण सतीला आवडले ते तिथले काम वाटून घेण्याचे नियोजन. कुटुंबातील म्हाताऱ्या व लहान मुलांसाठी करायची कामे नीट आपापसांत वाटून घेतली जातात. म्हणजे सोमवारी कुणी फिरायला न्यायचं, लायब्ररीचं पुस्तक कुणी बदलून आणायचे आणि तितक्याच वक्तशीरपणे ती कामे केलीही जातात.

आयरीश पुरुष हा टिपिकल 'पुरुष' आहे. स्वयंपाकघरात काम करणं त्याला माहिती नाही. सतीने आपल्या पद्धतीचा स्वयंपाक करून व खाऊ घालून आता रॉबिनला पूर्ण शाकाहारी बनवले आहे.

घरात फक्त दोन पलंग असताना सहा-सात नातेवाईक खोलीत खाली सतरंजी टाकून झोपू शकतात हे रॉबिनच्या कल्पनेच्याही बाहेरचे होते. त्याला ते बघून धक्का बसला. पोळा, होळी, संक्रात, गुढीपाडवा, दसरा, दिवाळी, आपली सणांची यादी संपतच नाही. त्यांच्याकडे एक ख्रिसमस काय तो महत्त्वाचा.

सतीला वाटते, की पाच वर्षे झाली तरी आमचे नाते अजून ताजे आहे. त्यात खूप एक्साईटमेंट आहे. कारण अजून आमची एकमेकांशी ओळख करून घ्यायची प्रक्रिया सुरूच आहे. There is so much to discover, so much to tell.

सती म्हणते- 'आपल्या पार्टनरकडून अपेक्षा किंवा त्यानं आपल्याशी कसं वागावं याचे आराखडे सगळे आपल्या संस्कृतीशी निगडित असतात. आपलं जगणं पदोपदी कल्चरल असतं. रॉबिनकडून त्यामुळे काहीच अपेक्षा ठेवता येत नाहीत. मला व त्याला सारखं एकमेकांबद्दल नवं काहीतरी सापडत असतं. सकाळी उठल्यावर नवरा-बायकोनं समोरासमोर बसून चहा प्यावा अशी माझी अपेक्षा तर मी पावलोपावली त्याला 'थँक्य यू' म्हणावं अशी त्याची अपेक्षा.'

सगळ्या भावना कशा अनुभवायच्या त्याचीही त्यांची पद्धत वेगळी असते. सतीची मुलगी दोन्ही संस्कृतींमधले चांगले आत्मसात करते आहे. सतीशी बोलताना एक मजेदार गोष्ट अशी लक्षात आली की सती दोन्ही संस्कृतींमधले फरक शोधात होती पण रॉबिन मात्र साम्य शोधत होता.

सती व रॉबिन दोघेही कबूल करतात की एवढी भिन्न संस्कृती, भौगोलिक परिस्थिती तरीही सतीसाठी सर्वात जवळची व्यक्ती रॉबिन आहे आणि रॉबिनसाठी सती.

अंजू व ह्यूब ही जोडी भारतीय व डच. त्यांच्या लग्नाला चाळीस वर्षे झाली. ती दोघे हॉलंडमध्ये राहतात. अंजू पुण्याची. पुरोगामी कुटुंब. विश्वबंधुत्वावर गाढ विश्वास. ह्यूब भारतात आला आणि त्याने कोवळ्या वयाच्या अजूंचे मन जिंकले. अंजू तिच्या मैत्रिणीचे घर रंगवत असताना ह्यूबने तिला प्रथम पाहिले आणि अंजूच्या त्या रूपाची त्याला मोहिनी पडली. तो अंजूच्या घरी जायला लागला. त्याची स्वत:च्या आयुष्याची दिशा तेव्हा भरकटली होती. अंजूच्या घराने त्याला आपले म्हटले आणि अंजूनेही. हे त्याकाळचे प्रचंड धाडसच. कारण त्यांनी कुणीच याआधी अशी कुणाची आंतरदेशीय लग्ने झालेली पाहिली नव्हती. अंजूच्या बहिणींची आंतरजातीय लग्ने झाली होती. अंजूला विचारले, तुझ्या घरच्यांनी त्याची काही चौकशी केली नाही का? त्यावर तिने सांगितले, की ह्यूब ज्या वर्तमानपत्रामध्ये नोकरी करत होता त्या संपादकांना अंजूच्या वडिलांनी पत्र पाठवले. त्याकाळी फोन-इमेल असे काही उपलब्ध नव्हते. त्या संपादकांचे पत्ररूपाने छान उत्तर आले. ह्यूब बारा भावंडांपैकी एक होता. त्याच्या मोठ्या भावाचे अंजूच्या वडिलांना अतिशय छान पत्र आले. या दोन पत्रांच्या आधारे लग्न करण्याचा निर्णय घेतला गेला. ह्यूबला लग्न करणे जरुरी वाटत नव्हते. परंतु पुरोगामी वातावरणात वाढलेली असली तरीसुद्धा अंजूला ह्यूबबरोबर हॉलंडला विनालग्नाचे जायचा पर्याय रुचत नव्हता.

**अंजू-ह्यूब**



लग्न रजिस्टर पद्धतीने झाले. धर्माचे, धर्मांतराचे असे कुठलेही प्रश्न यांमध्ये आले नाहीत. सती व रॉबिनचे लग्न मात्र हिंदू पद्धतीने झाले होते ते व्हिसा लवकर मिळावा या उद्देशाने आणि त्यासाठी सतीच्या सांगण्यावरून त्याने हिंदू धर्मातील गीता, वेद, उपनिषद यांचे वाचन केले होते. त्यामुळे त्याला हिंदू धर्म आवडला. भारतातील जन्माने हिंदू असलेल्या किती लोकांनी असा हिंदू धर्माचा अभ्यास केला असेल कोण जाणे? आणि असा अभ्यास न करताच ते हिंदू धर्माचा व त्यातील कर्मकांडाचा पुरस्कार व इतर धर्मांचा तिरस्कार करत असतील-असेही असू शकेल.

ह्यूबला 'अंजू' व 'हॉलंडमधील परिस्थिती' यांच्यामधील दुवा बनावे लागले. अंजूने डच भाषेत प्रगती करून स्वत:चे हॉलंडमधील जीवन सुसह्य बनवले. आता तर तिला मराठीत बोलण्यासाठी पहिली पाच मिनिटे शब्दांसाठी चाचपडावे लागते. ती आता विचारही डच भाषेत करते व मग ते मराठीत अनुवादित करते. व्यक्तिस्वातंत्र्याविषयीच्या पाश्चात्त्य लोकांच्या संकल्पना भारतीयांच्या कौटुंबिक संकल्पनेपेक्षा वेगळ्या आहेत, हा अनुभव अंजूलाही आलाच.

डच कुटुंबातले लोक घरात असताना जेवण मात्र एकत्र घेतात. त्यांच्यात बऱ्यापैकी, पुरुषाने पैसा कमवायचा व बाईने घरची व्यवस्था अशी संकल्पना आहे. आता अर्थातच जसजशी स्त्री घराबाहेर अर्थार्जनासाठी पडली तसतशी परिस्थिती बदलते आहे. अंजूला ही बाब भारतीयांसारखीच वाटली. मुले मात्र अठरा वर्षांची झाली की घराबाहेर पडतात. आपापली राहतात. म्हाताऱ्यांना सरकार आर्थिक साहाय्य करते. तरुण मुलांनी म्हाताऱ्या लोकांना बाकी इतर बाबतीत मदत करावी असा सरकारचा आग्रह असतो. त्याला तिथे 'Informal help' म्हणतात. अनेक वर्षे हॉलंडमध्ये राहिल्यामुळे अंजू आता वृत्तीने, विचाराने युरोपीयन झाली आहे. त्यामुळे तीही आता त्यांच्यासारखाच विचार करते. तिला 'वांशिक भेदभावा'ला सामोरे जावे लागले का असे विचारले तेव्हा म्हणाली, 'डच लोकांना पौर्वात्य संस्कृतीविषयी कुतूहल आहे. ते मला माहिती विचारायचे. माझे डच भाषेतील प्रावीण्य बघून माझं कौतुक करायचे.' तिला वांशिक भेदभाव स्पष्टपणे नाही पण काहीसा अस्पष्ट जाणवला, पण तो त्रासदायक नव्हता.

अंतर्मुख होऊन विचार केल्यावर अंजूला असे वाटले की भारतीयांना कुटुंबाची 'गरज' असते. त्यामुळे कुटुंबप्रधान संस्कृती आहे. युरोपमध्ये समाजाचा व सरकारचा ढाचा असा आहे की कुटुंबाची गरज पदोपदी जाणवत नाही. त्यामुळे व्यक्तिप्रधान संस्कृती आहे.

तुझ्या 'आईवडिलांना' तू मदत करू शकत नाही याबद्दल काय वाटते असे विचारल्यावर 'भाऊ होता व आर्थिक मदत करण्यासारखी माझी परिस्थिती नव्हती' असे ती म्हणाली.

आपल्या आईवडिलांची एकुलती एक असलेली सुरभी हिने अमेरिकन जेरेमीशी लग्न केले. आंतरदेशीय लग्नामुळे येणाऱ्या अडचणी तिला फारशा जाणवल्या नाहीत कारण ती जास्त अमेरिकन मनोवृत्तीची तर जेरेमी जास्त भारतीय मनोवृत्तीचा आहे. परंतु आता सुरभीचे आईबाबा म्हातारे आहेत. तिला बहीणभाऊ नसल्याने आईवडिलांची तिला आता खूप काळजी वाटते व त्यांना आपण, आपले कर्तव्य असतानाही, मदत करू शकत नाही याचे शल्य ती उरात बाळगते.

जेरेमी भारतीय पद्धतीप्रमाणे मुलांना आपल्याजवळ झोपवायचा. पण त्याला मुले आपल्या अंगाखाली दबली जातील की काय अशी भीती वाटायची.

सुरभीच्या बोलण्यातून जाणवले, की जेव्हा जेरेमीशी लग्न करायचे की नाही याचा विचार ती करत होती तेव्हा ही खूप मोठी बांधिलकी व जबाबदारी आहे हे तिला कळत होतं. त्यावेळी जेरेमीत असलेले 'भारतीय' गुण बघून निर्णय घेणे जरा सोपे झाले होते.

पण कुठेतरी अमेरिकेत जास्त प्रमाणात होणाऱ्या घटस्फोटांविषयी ती विचार करत असावी. जेरेमीचे आईवडील अजूनही एकत्र आहेत हा दिलासा होता. सुरभी म्हणते, की 'भारतात घटस्फोट कमी होतात कारण स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाही. ते वाढलं की घटस्फोटांचं प्रमाण वाढेल.'

पण आर्थिक स्वातंत्र्य असूनही लग्न 'सहन' करत राहणाऱ्या स्त्रिया भारतात अजूनही बऱ्याच दिसतात. कदाचित मुलांसाठी त्या असे करत असाव्यात किंवा घटस्फोटाकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोन अजून फारसा उदार नसल्याचा तो परिणाम असावा.

स्पॅनिश ज्युडिथ व भारतीय अश्विन यांचा पाच वर्षांपूर्वी विवाह झाला. ते भारतात राहतात. अश्विन खेड्यातल्या छोट्या शेतकऱ्यांना एकत्र आणण्याचं काम करतो. शिक्षणाने Occupational Therepist असणारी ज्युडिथ त्याच्याबरोबर शेती करते. ती सर्वार्थाने भारतीय झाली आहे. अंजू जशी डच भाषा शिकून 'डच' झाली तशी अगदी ग्रामीण लोकांशी बोलता येईल अशी मराठी आत्मसात करून ज्युडिथ मराठी झाली आहे. ती भारतीय कपडे घालते. तिचे म्हणणे– 'आधीच माझ्या 'स्पॅनिश' दिसण्यामुळे मी इतरांपेक्षा वेगळी उठून दिसते. मग कपडेही वेगळे घातले तर अजूनच उठून दिसेन. 'स्पॅनिश' दिसणं माझ्या हातात नाही पण स्पॅनिश कपडे न घालता भारतीय कपडे घालणे माझ्या हातात आहे.' अश्विनचं कुटुंब नास्तिक असल्यामुळे 'धर्म', 'देव' हा काही प्रश्न नव्हता.

अश्विनच्या आईला वाटत होते, की परदेशी लोक भारतात आले की सारखे 'हे काय–हे कसं–हे का?' असे विचारत असतात आणि त्यांची उत्तरे देताना आपल्याला दमायला होतं. आता सून परदेशी तर सततच तिला उत्तरं द्यावी लागतील पण ज्युडिथ सर्वार्थाने भारतीय झाल्यामुळे काही प्रश्न आला नाही. तिचे स्पॅनिश असणे बहुधा ती स्वत: पण विसरली असावी.

ज्युडिथच्या आईवडिलांचा या लग्नाला विरोध होता का असे विचारल्यावर फारच मजेदार उत्तर आले. अश्विन म्हणाला, 'बहुधा त्यांना हायसं वाटलं असावं की ज्युडिथनं भारतीय नवरा निवडला. कारण तेवढीच घटस्फोटाची शक्यता कमी.'

ज्युडिथ तिच्या आईवडिलांबरोबर लहानपणी बऱ्याचदा भारतात टूरिस्ट म्हणून यायची. त्यांनी भारतातील अनेक प्रेक्षणीय स्थळे बघितली आहेत. त्यामुळे जसा रॉबिनला सतीला भेटायला आल्यावर 'दृश्य' स्वरूपाचा धक्का बसला तसे ज्युडिथ व तिच्या कुटुंबीयांच्या बाबतीत झाले नाही. भारत कसा 'दिसतो' हे त्यांना माहीत होते. ज्युडिथच्या वडिलांचा व्यवसायानिमित्त एका सिंधी कुटुंबाशी बराच संबंध यायचा त्यामुळे त्यांना भारतीय विचारसरणीची माहिती होती.

वाढलेल्या आंतरदेशीय व्यापारधंद्यामुळे भारताची ओळख जगाला होते आहे. तसेच अजून एक गोष्ट आहे ज्यामुळे भारत पाश्चात्त्यापर्यंत पोचला आहे, ते म्हणजे 'योगा' आणि 'मेडिटेशन.' सुरभीच्या सासू–सासऱ्यांना यामुळेच भारतीय संस्कृती माहीत होती व त्याबद्दल आदर होता.

मराठी नंदिनीने अमेरिकन काळ्या पीटरशी लग्न केले. दोघे अमेरिकेत राहतात. गोऱ्या कातडीला महत्त्व देण्याची भारतीयांची मानसिकता आहे. त्यामुळे 'काळ्या'शी लग्न

झाल्यावर थोडेसे विचित्र वाटले असणार.

नंदिनीने सांगितले, अमेरिकेत राहणारी भारतीय जोडपी तिने बघितली. भारतीय नवऱ्यांना भारतीय बायको दिवसभर त्याच्याएवढेच ऑफिसचे काम करत असली तरी तिने घरातले सगळे काम करावे अशी अपेक्षा असते. अमेरिकन नवऱ्यांना तशी अपेक्षा नसते.

आपल्या संस्कृतीपेक्षा आपली भाषा पीटरला समजत नाही याचे नंदिनीला वाईट वाटते. तिला सारखी सगळ्या प्रसंगांवर शाब्दिक कोट्या मराठीमध्ये करायची सवय आहे. तसे आता करता येत नाही. पीटरला सतत कुणीतरी बरोबर आहे याची सवय नाही. नंदिनी मग मैत्रिणीकडे राहायला जाते, त्याला एकटे राहता यावे म्हणून. त्यांना मूल अजूनतरी नाही. पण झाल्यावर भारतीय आयांसारखे त्यांना सतत कुठल्यातरी क्लासला अडकवून ठेवायला दोघांनाही आवडणार नाही. पीटर ख्रिश्चन आहे पण लग्न अमेरिकेतल्या देवळात हिंदू पद्धतीने झालं. धर्मांतर न करता. दोघांना जोडणारा एक भारतीय दुवा म्हणजे आपले 'हिंदी सिनेमे.' दोघेही ते आवडीने एकत्र बघतात.

भारतात गेले, की सारखे आपल्या लोकांमधला-संस्कृतीमधला व पीटरमधला दुवा होण्याचे काम करणे नंदिनीला कंटाळवाणे वाटते.

पीटरला समजत नाही की सकाळचा चहा, नाश्ता, जेवण, दुपारचा चहा, रात्रीचे जेवण एवढे पाच वेळेला तुम्ही लोके का खाता, तेही एकत्र! तो खोलीत जाऊन भूक नाही म्हणून दार बंद करून घेणार. मग नंदिनीला सारे जण त्याला काय झाले असे सतावणार.

नंदिनी म्हणाली, 'आम्ही दोघंही वयाने मोठे आहोत त्यामुळे जास्त मॅच्युअर आहोत. त्यामुळे who cannot you live without असा विचार आम्ही केला नाही त्याऐवजी who can you live with असा विचार केला.'

नंदिनीची आई म्हणाली, 'नंदिनी पुरोगामी आहे. पण ते सगळं वरवरचं असतं. जरा उकरलं की आता आपण सगळे भारतीय असतो. आपली मानसिकता वेगळी असते. नंदिनी मुलं होण्याबद्दल विचार करते तर पीटरला मुलं कशासाठी हवी तेच समजत नाही. उगाच खर्च होईल असं तो म्हणतो. तिकडचे लोक कपडे बदलावे तेवढ्या सहजतेने जोडीदार बदलतात. आपण लग्न झाल्यावर एक महिन्यात लगेच किंवा ऊठसूट घटस्फोटाची भाषा करत नाही पण ते सहज करू शकतात.'

भारतीय नकुल रशियन ॲना ही दोघे आजच्या पिढीचे खरे प्रतिनिधित्व करणारी आहेत. त्यांचे लग्न ठरले आहे. अजून झाले नाही. दोघेही ऑस्ट्रेलियाच्या एका विद्यापीठात संशोधन करतात. नकुलने वयाच्या २९ वर्षांमधली ९ वर्षे भारतात व २० वर्षे भारताबाहेर काढली आहेत. त्यामुळे तो जन्माने भारतीय वंशाचा असला तरी तो मनाने जागतिक नागरिक आहे. भारताबाहेर बरीच वर्षे काढलेल्या पालकांची मुले-पुढची पिढी अशीच आहे. त्यांचे देशापेक्षा, धर्म-जातीपेक्षा, माणुसकीशी, साऱ्या जगाशी नाते आहे. नकुलला ॲना 'रशियन' आहे यापेक्षा तिला तिच्या करियरमध्ये काहीतरी मिळवण्याची महत्त्वाकांक्षा आहे याचे महत्त्व जास्त आहे. कित्येक भारतीयांना केवळ भारताबाहेर ऑस्ट्रेलियात राहायला मिळणे हेच मोठे ध्येय वाटते. पण नकुलला त्याच्या कितीतरी पुढे जायचे आहे. सामान्य ध्येय असणारी जोडीदार त्याला नको होती. त्याची महत्त्वाकांक्षा समजून घेणारी आणि स्वत:ची तेवढीच उच्च महत्त्वाकांक्षा असणारी जोडीदार त्याला हवी होती. दोघांचीही ध्येय गाठण्याची वाटचाल ती दोघे एकत्र करणार. मग त्यापुढे इतर गोष्टी त्यांना गौण वाटतात.

'देशाभिमान' या संकल्पनेबद्दल नकुलला विचारलं तर तो म्हणाला, 'देशप्रेमाची व्याख्या काय यावर विचार केला पाहिजे. ऊठसूट देशप्रेमाच्या गोष्टी करणारी बरीच भारतीय मंडळी मला माहिती आहेत जी आपल्या देशाला भ्रष्टाचाराने लुटत आहेत. देशाचं नुकसान करत आहेत. त्यांना देशप्रेमी म्हणायचं का - की जे आपापल्या परीनं, पद्धतीनं देशाच्या विकासात हातभार लावतील त्यांना देशप्रेमी म्हणायचं?'

'Sense of belonging' हा प्रश्न नकुलच्या पिढीला नाही. चाळीस वर्षे हॉलंडमध्ये राहिलेली अंजू निश्चित डच आहे, ज्युडिथ भारतीय आहे, नंदिनी व सुरभी अमेरिकेत राहत असल्या तरी निश्चित भारतीय आहेत. तशी नकुलची पिढी कुठल्याही एका देशाची नाही. त्या पिढीचे लोक जगाचे नागरीक आहेत. ते कुठल्याच एका देशाचे वा संस्कृतीचे नाहीत आणि मुख्य म्हणजे त्याबद्दल त्यांना कुठलीच आंतरिक अस्वस्थता नाही.

**- डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com

# ‘व्हिसल ब्लोअर’ – हिरो की अपराधी?

**अपर्णा पाटील**

व्हिसल ब्लोअर ही संकल्पना खूप आदर्शवादी आणि प्रेरणादायी वाटते. प्रत्यक्षात गैरव्यवहारांविरोधात जिहाद पुकारलेल्या या मंडळींच्या वाट्याला येणारं आयुष्य एखाद्या गुन्हेगारापेक्षा निराळं नाही. गुन्हे, खटले, टीकेची राळ आणि खासगी आयुष्याचा पंचनामा यात त्यांचा आदर्श गुदमरवण्याचा प्रयत्न केला जातो. शिवाय स्वतःचं आयुष्य गमावण्याची, कुटुंबाचा छळ होण्याची भीती आयुष्यभर त्यांचा पाठलाग करते. जगासाठी, त्या–त्या देशासाठी ते हिरो ठरतात, तर देश चालवणारे सत्ताधीश, प्रशासकीय यंत्रणा यांचे शत्रू...

अमेरिकन नॅशनल सिक्युरिटी एजन्सी (एनएसए) ही लाखो ग्राहकांचे टेलिफोन रेकॉर्ड, इंटरनेटवरील माहिती गोळा करत आहे. देशांतर्गत आणि देशाबाहेर केल्या गेलेल्या सगळ्या फोनच्या संभाषणांचे रेकॉर्ड गुप्तपणे सरकारला दिले जाताहेत. फॉरेन इंटेलिजन्स सर्व्हिलन्स कोर्टानं (फिसा) एफबीआयला २५ एप्रिल रोजी विशेष आदेश देऊन हे अधिकार दिले आहेत. या अधिकारांच्या जोरावर तीन महिन्यांच्या कालावधीत सरकार लाखो टेलिफोन संभाषणं, इंटरनेटवरील डाटा, संदेशाची देवाणघेवाण या सगळ्याचा डाटा आपल्या ताब्यात घेत आहे. याची मुदत १९ जुलै रोजी संपणार आहे...

६ जून २०१३ रोजी ‘द गार्डियन’ नावाच्या ब्रिटिश दैनिकानं ही बातमी देऊन जगभरात खळबळ माजवली. विशेषतः बराक ओबामा सरकारची दुसरी टर्म सुरू होऊन फक्त काही महिने उलटले असताना अशी बातमी यावी, यामुळे कल्लोळ माजणं अपरिहार्यच होतं. कोणता माणूस कोणाशी फोनवर बोलला, त्याची वैयक्तिक माहिती, तो किती वेळ बोलला, कोणाशी, कुठून बोलला, अशी सगळीच माहिती सरकारकडे पोचती केली जात आहे. ९–११च्या घटनेनंतर बुश सरकारनं दहशतवाद्यांना पकडण्यासाठी डाटा गोळा करण्याचं काम सुरू केलं होतं. दहशतवादाविरोधाची लढाई लढताना, ज्या व्यक्तिस्वातंत्र्याचा डंका अमेरिका मिरवत असते, त्यावरच घाला घालणारा हा प्रकार आहे. हे उघड होताच गोंधळ माजणं साहजिकच होतं. दहशतवादाला नष्ट करण्यासाठी अमेरिकन सरकारनं झिरो टॉलरन्सचं धोरण स्वीकारलं आहे. त्याच धोरणाआड चक्क हेरगिरी केली जात आहे. त्याच धोरणाला ‘प्रिझम’ असं नाव दिलं, जे धोरण वर्तमानपत्रातून उघड झालं होतं.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष म्हणून पुन्हा शपथ घेताना बराक ओबामा यांनी देशातील जनतेला पारदर्शी कारभाराचं वचन दिलं होतं. प्रत्यक्षात दहशतवाद्यांची माहिती गोळा करण्याच्या नावाखाली लाखो लोकांच्या फोनवरील संभाषण, इंटरनेटवरील

डाटा स्वतःच्या ताबा घेण्याचं हे प्रकरण एनएसए प्रिझम लिकेज म्हणून खळबळ उडवून देणारं ठरलं. ही बातमी आल्यानंतर ओबामांनी तातडीनं स्पष्टीकरण देणं आवश्यक होतं. उलट, या बातमीमागे नेमका कोणाचा हात आहे, हे शोधण्यासाठी यंत्रणा कामाला लावली. दोन दिवसांनंतर एडवर्ड स्नोडेन हा तरुण आपणच या बातमीचा सोर्स असल्याचं सांगत मीडियासमोर आला.

२९ वर्षांचा एडवर्ड हा सीआयएचा माजी कर्मचारी आहे. या गुप्तचर संघटनेच्या आयटी विभागात तो काम करत होता. दिलेलं काम आदेशानुसार करायचं, प्रतिसवाल करायचा नाही, अशा परंपरेत काम करणं त्याला जमलं नाही, म्हणून त्यानं आपल्याच देशाच्या सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात खेचलंय. यामुळे झालंय काय, तर एडवर्ड हा व्हिसल ब्लोअर की आरोपी, असा सामना रंगला.

एडवर्ड उत्तर कॅरोलिनात वाढला, त्यानंतर एनएसएचं मुख्यालय असलेल्या मेरिलँड भागात. त्याचं शिक्षण अपूर्णच राहिलं होतं, तरीही कमी काळात त्यानं मोठी झेप घेतली. लष्करी प्रशिक्षण घेऊन विशेष दलात प्रवेश करण्याचं त्यानं ठरवलं. दोन्ही पाय फ्रॅक्चर झाल्यानं त्याला कामधंदा शोधण्याची वेळ आली. त्यानं सुरक्षारक्षक म्हणून काम करायला सुरुवात केली. लवकरच त्याला सीआयएच्या आयटी विभागाच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळण्याचं काम मिळालं. तिथे असताना काही छुप्या कामगिरीसाठी निवडलं गेलं. अशा कामांसाठी त्याला परदेशीही पाठवलं. २००८मध्ये बराक ओबामा यांचं सरकार आलं, त्यावेळी त्यांनी बुश सरकारच्या अनेक योजनांना; विशेषतः सुरक्षा योजनांना; विरोध केला होता. मात्र सरकार येताच एकही गोष्ट बदलली नाही. त्यामुळेच एडवर्डनं ओबामाविरोधी भूमिका घेतली. रिपब्लिकन नेते रॉन पॉल यांच्यासाठी निधी गोळा करण्याचं काम केलं. त्यासाठी त्यानं डेल आणि हवाईमध्ये कामही केलं.

एडवर्ड स्नोडेन अलीकडे बूझ ॲलन हॅमिल्टन या एनएसएसाठी काम करणाऱ्या कंपनीत काम करत होता. ए.एन.एस.ए.मधल्या कारवाईचा गौप्यस्फोट करण्यापूर्वी त्यानं हाँगकाँगला पलायन केलं. आपण असं केल्यानं आपलं कुटुंब आणि आयुष्य दोन्हीही धोक्यात असल्याची जाणीव त्याला आहे. त्यामुळेच त्या खळबळजनक बातमीमागे कोण आहे, हे सरकारनं शोधून काढण्यापूर्वीच त्यानं इंटरनेट, मीडियामधून स्वतःला लोकांसमोर आणलं. त्याची आई सध्या मेरिलँडमधल्या कोर्टात काम करतेय. एडवर्ड सीआयएचा माजी कर्मचारी असल्यामुळे त्याला शोधून काढणं अवघड नाही.



एडवर्ड स्नोडेन

पण हाँगकाँग सरकारच्या आश्रयाखाली त्याचा जीव धोक्यात नाही, इतकाच दिलासा देणारा भाग आहे.

अमेरिकेतल्या एडवर्डनं हे सगळं उघडकीस आणण्यासाठी ब्रिटिश दैनिकाची मदत घेतली. ''मला अशा जगात राहायचं नाही, जिथे जे काही केलं जातं किंवा बोललं जातं, ते रेकॉर्ड होतंय,'' अशी खंत व्यक्त करत त्यानं एनएसएमध्ये केल्या जात असलेल्या सुरक्षा योजनांची माहिती उघड केली. गेल्या चार वर्षांपासून तो एनएसएसाठी काम करत असलेल्या वेगवेगळ्या संस्थांमध्ये काम करतोय. त्यामुळे गुप्तचर यंत्रणेच्या कामाचा अनुभव त्याला आहे. तिथल्या बारीकसारीक गोपनीय कारभाराची माहिती आहे. त्यामुळेच एडवर्ड हा जगातला सगळ्यात जास्त नुकसान करणारा 'व्हिसल ब्लोअर' ठरला आहे.

गेल्या दहा वर्षांत व्हिसल ब्लोअरची संख्या वाढत चालली आहे. एका क्लिकसरशी अत्यंत गोपनीय, धक्कादायक आणि संवदेनशील माहिती लोकांसमोर उघड होऊ शकते. याच भीतीमुळे सरकार, गुप्तचर यंत्रणा आणि प्रशासकीय यंत्रणा अधिक सावध झाली आहे. छोट्या कंपन्यांपासून अमेरिकन सरकारपर्यंत सगळेच या 'व्हिसल ब्लोअर'ना धास्तावलेत.

खरं तर एखाद्या कंपनीत काही गैरकारभार होत असेल तर आपल्या बॉसकडे जाऊन त्याबाबत सांगणारे किंवा जाब विचारणारे किती जण असतील? समजा असतील, तर त्यांना काय उत्तर मिळतं... आम्ही वरून दिलेल्या आदेशाचं पालन

करतोय, तुम्हीही तेच करा. नोकरी वाचवण्याच्या धडपडीत तेही केलं जातं. कानावर हात आणि तोंडावर बोट ठेवत काम करण्याचा स्वभाव अंगवळणी पडत चाललाय. त्यामुळेच गेल्या काही वर्षांत बहुतांश कार्यालयांमध्ये व्हिसल ब्लोअर नावाच्या पॉलिसीचं महत्त्व आपल्या कर्मचाऱ्यांना समजावून सांगितलं जातं. कंपनीच्या, कर्मचाऱ्यांच्या आणि लोकांच्या हिताला बाधा आणणारी कोणतीही गोष्ट लक्षात आणून देणारा कंपनीसाठी हिरो ठरावा, यासाठी ही योजना मांडली गेली. पण कंपनी लहान असो वा मोठी, व्हिसल ब्लोअरच्या वाट्याला येणारी संकटं पाहून नको ती हिरोगिरी असं म्हणावं अशीच स्थिती आहे. विशेषतः जर कंपनी देशातील नामवंतांपैकी एक असेल किंवा बलाढ्य लोकांविरोधात रणशिंग फुंकलं असेल, तेव्हा मात्र अशा व्हिसल ब्लोअरला स्वतःची नोकरी, आयुष्य आणि कुटुंब असं सगळंच पणाला लावावं लागतं. कुठेतरी अज्ञातवासात राहून सरकार, देश, कंपन्या यांना हादरा देण्याचं व्रत हाती घेत जगावं लागतं.

आज आपण रोजच फेसबुक, गुगल वापरतोय. तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. अशा या संवाद माध्यमांवर सरकारची नजर असेल, तर नक्कीच ते आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर अतिक्रमण ठरेल. सरकार लोकांवर पाळत ठेवतंय, असाच त्याचा सरळसरळ अर्थ निघतो. जर सरकारला दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी अशा गोष्टी करायच्या असतील, तर त्यांनी जनतेला विश्वासात घ्यायला हवं, असा साधासोपा विचार या गौप्यस्फोटामागे आहे. पण त्याची किंमत एडवर्ड स्नोडेनला मोजावी लागणार यात शंकाच नाही. तो त्याचा मैत्रिणीबरोबर कुठे राहत होता, तो कसा लोकांमध्ये मिसळत नव्हता, उपचाराचं कारण सांगून तो कसा हाँगकाँगला पळाला, अशा बातम्या देऊन त्याच्याविरोधात जनमत तयार केलं जातंय. तरी जनमत हे स्नोडेनच्याच बाजूनं आहे.

एडवर्ड यापुढच्या आयुष्यात लोकांसाठी हिरो ठरणार असला तरी सरकार, प्रशासकीय यंत्रणांच्या दृष्टीनं आरोपीच असेल. सत्य जगापुढे मांडण्याचा अपराध त्यानं केलाय. त्याची शिक्षा म्हणून विजनवास त्याच्या वाट्याला येणारच. तरीही अशा मार्गावर स्वतःला झोकून देणारी माणसं कमी नाहीत. ही माहिती ज्या पत्रकार ग्रीनवाल्ड यांच्यामुळे उघड करणं शक्य झालं त्यांनाही यातले धोके, पुरावे आणि कायद्याच्या कचाट्यातून निर्धोक राहण्याची पूर्वतयारी करून घ्यावी लागली.

गेल्या काही वर्षांत अशी अनेक प्रकरणं उघडकीस आणण्यासाठी सातत्यानं पुढाकार घेतला जातो. त्यामुळे सरकार, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणा, न्यायव्यवस्था सगळेच अडचणीत येत आहेत. आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी पुन्हा चुका आणि गैरव्यवहार करत आहेत. तर अशा गैरव्यवहारांना लोकांसमोर आणणाऱ्या व्यक्तींना मात्र न्याय मिळत नाही, अशी असंख्य उदाहरणं सांगता येतील. विकीलिक्सच्या माध्यमातून जगभरातील राजकीय स्कँडल्स, भ्रष्टाचार लोकांसमोर मांडू पाहणारा ज्युलियन असांज जणू मोस्ट वाँटेड गुन्हेगार असावा, अशा थाटात सगळं जग त्याच्या मागे हात धुऊन लागलं आहे.

ॲनी मॅकन हिनं एमआय-५ मधलं आपलं पद १९९६मध्ये सोडलं. त्याला कारण होतं, तिचा सहकारी डेव्हिड शायलर यानं आपल्याच संस्थेला जाब विचारला होता. एमआय-५ ही ब्रिटनमधली गुप्तचर संघटना. तिचं गेल्या काही काळातलं अपयश आणि वाढती गुन्हेगारी याविरोधात सवाल करण्याचा गुन्हा शायलरनं केला. त्याहीपेक्षा जास्त, या यंत्रणेनं लोकांची टेलिफोनवरील संभाषणं बेकायदा टॅप करण्याचं कारस्थान केलं होतं, त्याविषयी उघड नाराजी व्यक्त केली होती. आपल्या सहकाऱ्यानं घेतलेल्या सत्याची बाजू योग्य वाटल्यानं स्वतःही राजीनामा देणारी ॲनी एकटीच नाहीये.

जेसलिन रडाक ही अमेरिकेत ९-११नंतर स्थापन केलेल्या विशेष न्याय विभागात कायदे सल्लागाराचं काम करत होती. जॉन वॉकर लिंड, ज्याचा उल्लेख अमेरिकन तालिबानी असा केला जातो, त्याला अफगाणिस्तानात पकडण्यात आलं. त्यानंतर खटला चालवण्यात आला. त्याला आपली बाजू मांडण्यासाठी वकील नेमला आहे, ही माहिती तिनं इ-मेलनं कळवली होती. ही माहिती या खटल्यासाठी अत्यंत



डेरेक पास्कील

महत्त्वाची होती. केससाठी उपयोगी असलेले तिचे इ-मेल्सच चोरीला जाण्याचं प्रकरण घडलं. त्यामुळे लिंडचा खटला त्याच्या प्रतिनिधीशिवाय चालवला गेला. यामुळे चिडलेल्या जेसलिननं राजीनामा दिला. हे प्रकरण नंतर तिनं 'न्यूज वीक'च्या माध्यमातून लोकांसमोर आणलं. तिच्या या कृतीचं कौतुक व्हिसल ब्लोअर म्हणून केलं गेलं. पण ओळख जाहीर झाल्यानं तिची पुढचं आयुष्य कठीण झालं. ती जिथे काम करत होती, तिथे तिला सक्तीच्या बिनपगारी रजेवर पाठवलं गेलं. सरकारच्या दृष्टीनं ती देशद्रोही होती. तिच्या मित्रमैत्रिणींनी तिच्याशी बोलणंही थांबवलं. तिच्या मुलांनाही मित्र मिळेनात. घरातलं उत्पन्न निम्म्यावर आलं. तिला काम मिळू नये म्हणून कायद्यानं डी-बार करण्याचा घाटही घातला. त्याची कायदेशीर लढाई लढण्यासाठी एक लाख डॉलर्स खर्च करावे लागले. तिला आता काम मिळालंय तरी तिनं जे गमावलंय त्याची भरपाई मात्र कधीही होणं शक्य नाही.

डेरेक पास्कील यांनी ब्रिटन सरकारच्या राजकीय धोरणांची चिरफाड केली, त्यामुळे त्यांना परराष्ट्र खात्यातल्या आपल्या नोकरीवर पाणी सोडावं लागलं. शिवाय त्यांच्यावर गोपनीय कागदपत्रं उघड केल्याचा खटलाही चालवण्यात आला. त्यांनी वर्तमानपत्रातून ब्रिटिश सरकारच्या धोरणाचा, विशेषतः मुस्लिम जनतेविषयीच्या दृष्टिकोनाचा, पर्दाफाश केला होता. परराष्ट्र खात्यानं, सरकारला इराक युद्धामुळे देशातील मुस्लिमांमध्ये असंतोष निर्माण होण्याचा इशारा दिला होता. शिवाय संशयित अतिरेकींना गुप्तपणे अमेरिकेच्या स्वाधीन करण्याचा घाट घातला जात होता. ज्यामुळे चौकशीपायी अशा लोकांचा छळ होण्याची शक्यता होती. ब्रिटनचं हे धोरण मुस्लिमविरोधी होतं. एक सच्चा देशप्रेमी नागरिक करेल, तेच कर्तव्य पास्कील यांनी ही कागदपत्रं उघड करून पार पाडलं. मात्र मीडियातून हा प्रकार उघड झाल्यानं सरकारनं पहिली कृती केली ती त्यांना अटक करण्याची. त्यांच्यावर खटला चालवला गेला. त्यातून ते निर्दोष सुटले. इतरांना नोकरी, पगार असं गमावावं लागतं, पण पास्कील यांनी स्वातंत्र्य गमावलं होतं. आता मुस्लिम समाजाच्या उद्धाराच्या कामात त्यांनी स्वतःला झोकून दिलं आहे. सध्या ते सतराव्या शतकातील कलांचा अभ्यास करण्यात आपला वेळ व्यतीत करत आहेत.

सेथ फ्रीडमनच्या वाट्यालाही वेगळं काही आलं नाही. ब्रिटनमधल्या इंधनच्या किमतीचा अभ्यासक व पत्रकार असलेल्या सेथ यांनी नोव्हेंबर २०१२मध्ये इंधन किमती निश्चितीबाबतच्या स्कँडलचा पर्दाफाश केला. त्यानंतर त्यांची



सेथ फ्रीडमन



आयलीन चब



हेलनी डोनेली



ॲनी मॅकन



पॉल मूर



जेसलिन रडाक

नोकरी गेली. मग त्यांचं खासगी आयुष्य उकरून काढण्यात आलं. त्यांच्या फोनवर, इ-मेलवर पाळत ठेवली गेली. अजून कायदेशीर लढाई संपली नाही, पण करिअरला मात्र ब्रेक लागलाय.

आयलीन चब आणि त्यांच्या सहा सहकाऱ्यांनी केंटमधल्या एका वृद्धाश्रमातील गैरप्रकार उघडकीस आणला. त्यानंतर त्यांचं आयुष्यच पालटलं. नोकरी जाणं ही त्याची पहिली पायरी होती. मग घरातलं सामान, मग घर, त्यानंतर थेट देशच सोडण्याची वेळ आली. अशी अनेक उदाहरणं आहे. तर पॉल मूर यांनी उघडकीस आणलेला घोटाळा ते काम करत असलेल्या बँकेलाही महागात पडला. मूर एचबीओएस बँकेत व्यवस्थापक होते. २००८मध्ये बँकेतील घोटाळ्याचं प्रकरण उघडकीस आणलं म्हणून त्यांना कामावरून काढण्यात आलं. पुढे कायदेशीर लढाईत उतरल्यावर बँकेनं त्यांना लाखो पौंडांच्या बदल्यात मामला रफादफा करण्याची तयारी दाखवली. बँकेची अंतर्गत धोरणं, बाबी उघड न करण्याच्या बोलीवर हा सगळा मामला पार पडला. मूर सध्या स्वतःची 'रिस्क कन्सल्टन्सी' चालवत आहेत. कोणाला वाटेल मूर यांनी काहीच गमावलं नाही, पण त्यांना कोणी विचारलं तर ते सांगतील, तुम्ही सात लाख पौंड वर्षाला कमावत असाल, तुमच्या मुलांना तुम्ही हवं ते देत असाल, समाजात तुम्ही एक प्रतिष्ठित व्यक्ती असाल आणि एका फटक्यात हे सगळं तुम्ही गमावलं तर काय होईल? तुम्ही जगण्यास लायक नाही असं तुम्हाला वाटेल. तुमचे मित्र तुम्हाला 'यापुढे काँटॅक्ट करू नकोस', असं सांगतात तेव्हा काय वाटेल, हे मी अनुभवलंय. त्या काळात मी सतत मरणाचा विचार करायचो. माझी पत्नी मला साथ देणारी नसती, तर कदाचित या जगात नसतो. मूर यांच्या या म्हणण्यानंतर ते इतरांच्या तुलनेत नशीबवान आहेत, असं म्हणू शकत नाही.

हेलनी डोनेली ही नर्स म्हणून काम करत होती. ब्रिटनमधल्या स्टँडफोर्ड या हॉस्पिटलमधले कर्मचारी रुग्णांच्या आरोग्याची कशी हेळसांड करतात, हे तिनं लोकांसमोर आणलं. नोकरी तर जाणार होतीच, पण तिचे सहकारी कसे क्षणात बदलले, याचं तिला आश्चर्य वाटतं. असे निर्णय घेणं आणि तडीला नेण्याची किंमत ती जाणून होती आणि तिनं ती मोजलीही.

ब्रॅडली मॅनिंग या अमेरिकन जवानाचं उदाहरण तर सगळ्यात महत्त्वाचं मानता येईल. अमेरिकन सैन्य आणि सरकारच्या कारवायांची गोपनीय माहिती विकिलिक्सला पुरवल्याबद्दल मॅनिंगवर एकूण २२ आरोप ठेवण्यात आले

आहेत. ३ जूनपासून त्याच्यावरील खटल्याच्या सुनावणीला सुरुवातही झाली आहे. बगदादमध्ये असताना अमेरिकन सैन्यानं केलेले हल्ले, कारवाया यांची माहिती, व्हिडिओज त्यानं विकिलिक्सला दिल्यानं अमेरिकेत खळबळ उडाली होती. त्याच्यावरील खटला सुरू झाला असताना एडवर्ड स्नोडेननं उडवून दिलेल्या माहितीच्या महास्फोटानं अमेरिकाच नाही तर जगभर भूकंप झालाय. त्याचे पडसाद आगामी राजकारणावर पडणार यात शंकाच नाही. तरीही एडवर्ड स्नोडेनच्या धाडसामुळे अशा अनेक व्हिसल ब्लोअरना आपला आवाज बुलंद करण्याची ताकद नक्कीच मिळेल. तरी या निमित्तानं, यंत्रणांमधील चुका आणि दोषांवर, गैरव्यवहारांवर बोट ठेवणाऱ्यांचं, त्याचा पर्दाफाश करणाऱ्यांचं आयुष्य किती संघर्षमय झालंय, हे चित्र अस्वस्थ करणारं आहे.

**इतिहासाची पुनरावृत्ती**

चाळीस वर्षांपूर्वीच्या वॉटरगेट प्रकरणाची आठवण नुकतीच ताजी केली गेली. इतिहास पुन्हा एकदा त्याच वळणावर आला आहे. अमेरिकेत जूनच्या प्रारंभी उघडकीस आलेल्या एनएसए प्रिझम लिकेज प्रकरणात वॉटरगेटशी साम्य सांगणारी बरीच स्थळं आहेत. एक म्हणजे, रिचर्ड निक्सनप्रमाणे बराक ओबामा पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्ष झाले आहेत. सीआयएला दिलेल्या अमर्याद अधिकारामुळे वॉटरगेट प्रकरण घडलं होतं. तर एनएसए प्रिझम लिकेज प्रकरण अशाच अधिकारांचा सरकार कसा गैरवापर करतंय, हे सांगण्यासाठी उघडकीस आणलं गेलं आहे. वॉटरगेट प्रकरण लोकांपर्यंत पोहोचवणारे पत्रकार बॉब वूडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन यांच्याप्रमाणे एडवर्ड आणि ग्रीनवाल्ड आजचे हिरो ठरले आहेत. प्रकरण उघडकीस येताच ओबामा सरकारनंही निक्सनप्रमाणे सारवासारव करण्याची धडपड सुरू केली आहे. वॉटरगेट प्रकरणाची अखेर निक्सन यांच्या गच्छंतीनं झाली, त्याच इतिहासाची पुनरावृत्ती होणार काय, हाच काय तो प्रश्न बाकी आहे.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

**गेल्या अधिवेशनात शिकागो येथे प्रसिद्ध पुस्तके**




**तेजस्विनी**
**स्मिता भागवत**
मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.

**परक्या भूमीवर घर**
**स्मिता भागवत**




मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.




**गजानन सबनीस**
यांच्या
**'ही आपलीच माणसं'**
या पुस्तकाचा
**इंग्रजी अनुवाद**
मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.

# या जन्मावर... या जगण्यावर...

**कुमार केतकर**



एव्हरेस्ट मोहिमेपासून अंतराळसफरीपर्यंत आणि नाटक–साहित्यापासून ऑलिंपिकमध्ये खेळल्या जाणाऱ्या खेळांपर्यंत प्रत्येक घडामोडीत रमत जगण्यावर मन:पूत प्रेम करणारे प्रसिद्ध मोती व्यावसायिक आणि रसिकमनाचे कलावंत श्रीकांत लागू यांचे ७ मे २०१३ रोजी निधन झाले. जगण्यावर रसरसून प्रेम केलेल्या या आपल्या परपस्नेह्या३चे हे हृद्य व्यक्तिचित्र...

श्रीकांत लागू यांच्या कितीतरी गोष्टी करायच्या राहून गेल्या. ते जर आज पंचविशीत असते, तर त्यांनी एव्हरेस्ट शिखरावर स्वारी केली असती. लवकरच चांद्रयान यात्रा सुरू होणार आहेत. त्या प्रवासासाठी त्यांनी नाव नोंदवले असते. उत्तर आणि दक्षिण ध्रुवांवर किमान दोन–तीन महिने राहून त्यांना शास्त्रीय प्रयोग करायला आवडले असते. समुद्राच्या तळाशी जायला, ॲमेझॉन जंगलाच्या अगदी निर्मनुष्य आणि गर्द–घनदाट गाभाऱ्यात जायला, अरेबियन वाळवंटातून जीपने वा उंटावरूनही प्रवास करत क्षितिजाचा शोध घ्यायला, कोलंबस, वास्को–द–गामांच्या सामुद्री साहसाचा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने मागोवा घ्यायला श्रीकांतला आवडले असते...

ते सर्व राहून गेले आणि तो त्या अथांग–अंतिम प्रवासावर ७ मे रोजी निघून गेला. बाकी सर्व साहसी प्रवास करून आल्यावर त्याने त्या प्रवासातील थरार सांगितला असता, छायाचित्रे उत्साहाने सर्वांना दाखवली असती, लेख लिहिले असते, पुस्तके लिहिली असती, प्रवासवर्णनीय गप्पांच्या मैफली त्याने त्याच धुंदीत रंगवल्या असत्या. परंतु आता तो ज्या प्रवासाला गेला आहे त्यातील थरार, त्यातील गूढ, त्यातील साहस आपल्याला तो सांगू शकणार नाही.

गेली तीन–चार वर्षे त्याचे तारुण्य हरपताना आम्ही सर्वजण पाहत होतो. सत्तरी ओलांडल्यानंतरही त्याची उमेद पंचविशीतलीच होती. परंतु उमेद तीच पण पंच्याहत्तरीनंतर शरीर मात्र साथ देत नव्हते. श्रीकांतच्या मनाची तडफड त्यामुळेच होत असे. त्याचे स्विमिंग, वॉकिंग, जॉगिंग, ड्रायव्हिंग गेली काही वर्षे कमी होत होते. परंतु त्याचे मन हा शारीरिक ब्रेक मानायला तयार नव्हते. तब्येतीविषयीचे प्रश्न विचारलेले त्याला आवडत नसे. आपण आजारी पडू शकतो, थकू शकतो, हतबल होऊ शकतो ही कल्पनाच त्याला मान्य नसल्यामुळे त्याला ते शारीरिक वास्तव अंगवळणी पडत नव्हते. त्या हतबलतेने त्याच्या मनावर मात करेपर्यंत तो त्याच्या जीवश्च–कंठश्च मित्र–दांपत्याला, अशोक–सुनीती जैनला भेटण्यासाठी दादरहून वर्सोव्याला जात असे. मुंबईतील

प्रवासाचा शीण आणि त्यानंतर येणारा अशक्तपणा यांनी श्रीकांतच्या अशोक-सुनीती भेटींमध्ये खंड पडला नाही. आता मात्र अशोक-सुनीतींना सर्वार्थाने आध्यात्मिक एकटेपण किंवा 'स्पिरिच्युअल लोनलीनेस' तीव्रतेने जाणवत राहणार आहे.

श्रीकांत म्हणजे एक प्रचंड ऊर्जास्रोत होता. जराही अतिशयोक्ती न करता असे सहज म्हणता येईल, की श्रीकांतने त्याच्या ७८ वर्षांच्या आयुष्यात हजारो लोकांनी ती ऊर्जा दिली आहे. ऑलिंपिक सामन्यातील प्रत्येक खेळातील विक्रम, त्या खेळातील बारकावे, त्यांचे नियम व संकेत त्याच्या मुखोद्गत असत. फूटबॉलचा युरोपीयन कप असो वा वर्ल्ड कप, तो त्याच्या दादरच्या घरातून त्या सामन्यांच्या जागी, अर्जेंटिना वा जर्मनीत प्रत्यक्ष हजर असल्याचा आनंद घेत असे - आणि देतही असे. रात्री दोन वाजताही (मोबाइल नसतानाच्या काळात) त्याचा फोन येई, 'पाहतोयस ना फायनल, ब्राझील घेणार कप'! त्याच्या अचाट उत्साहामुळे कित्येक जण विम्बल्डन पाहायला लागले आणि फूटबॉलचा थरार अनुभवायला शिकले.

श्रीकांत नेहमी (विशेषत: संध्याकाळनंतर) मित्रांच्या गराड्यात, गप्पाष्टकांत, पार्ट्यांमध्ये असे. त्याला त्या सर्वांच्या अनुभवांमध्ये रस असे. तो त्याच्या तो त्याच्या कुतूहलातून आलेले प्रश्न विचारून ती गप्पाष्टके चैतन्यमय करत असे. त्याला पार्ट्या म्हणजे, आनंदाची उसळती कारंजीच. अखंड सूर्यग्रहणांचा जगभर वेध घेणारा श्रीकांत, त्याची प्रवासवर्णने आणि ग्रहणवर्णने त्या गप्पांमधून सादर करत असे. त्याचा तो अनुभव सार्वत्रिक अनुभव होऊन, प्रत्येकाला असे वाटू लागे, की आपणही ते ग्रहण त्याच्याप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेत वा चीनमध्ये जाऊन पाहिले आहे!

त्याच्या चेहऱ्यामुळे व डोळ्यांच्या ठेवणीमुळे तो डॉ. श्रीराम लागूंचा (चुलत) भाऊ असल्याचे बहुतेक लोक ओळखत. काहीजण तर त्यालाच 'डॉ. श्रीराम लागू' म्हणून मानत! (खरे म्हणजे इतके साम्य त्यांच्यात होते, असे आम्हाला वाटत नसे.) डॉक्टरांवर, त्यांच्या अभिनयावर, त्यांच्या सर्जनशीलतेवर, व्यक्तिमत्त्वावर त्याचे नितांत प्रेम (श्रद्धाही) होते. स्वत: श्रीकांतने कित्येक नाटकांमध्ये काम केले होते आणि नाट्यसंस्थांच्या निर्मितीत, त्यांच्यामधील कलहांमध्ये आणि पडद्यामागच्या कलाकारांच्या (सर्व प्रकारच्या) भानगडींमध्ये त्याचा सहभाग असे. इतका, की कलाकारांचा समांतर इतिहासही तो सहज लिहू शकला असता.

जयवंत दळवी, विजय तेंडुलकर यांच्यापासून पु.ल.

**कथा सागरी साहसाची...**

जर्मनीतील वास्तव्यादरम्यान समाजशास्त्राचा एक प्राध्यापक वुल्फगॅंग्र कनाबे मला भेटला. तो भारताच्या किनाऱ्यावरून सागरी प्रवास करणार होता. त्याच्या त्या सागरी प्रवासातील उर्वरित टप्पा 'वास्को-द-गामा'च्या मार्गाने होणार होता. ज्या बोटीने तो प्राध्यापक प्रवास करणार होता ती बोट 'मरकॅटर', त्याने स्वत: बांधली होती. त्याच्या त्या महत्त्वाकांक्षी प्रवासाची कल्पना मला माझे जर्मनीतील मित्र रमेश शर्मा यांनी दिली. त्यांच्या या योजनेचा वृत्तांत मी त्यावेळी 'ऑब्झर्व्हर' दैनिकात प्रसिद्ध केला. जर्मनीचा जगाशी व्यापार कधी सुरू झाला, भारताशी त्या देशाचा संबंध कधी प्रस्थापित झाला, भारत-जर्मनी व्यापाराचे संबंध प्रस्थापित करण्यात कुणी पुढाकार घेतला, याचा ते शोध घेणार होते. 'वास्को-द-गामा' कालिकतला आल्यानंतर पाचच वर्षांनी, म्हणजे १५०३ साली, एका जर्मन दर्यावर्दीचे जहाज भारताच्या किनाऱ्यावर आले होते; परंतु ते जहाज भारताच्या सागरी कक्षेत कुठेतरी बुडाले होते. वुल्फगॅंग्र कनाबे यांनी त्या जहाजाची, त्यावेळच्या दर्यावर्दीची आणि भारत-जर्मन व्यापाराची बरीच माहिती जमा केली होती. त्या संशोधनाचा बाकी भाग भारतातच पूर्ण करणे शक्य होते. अशा साहसांबद्दल कितीही आकर्षण वाटले, तरी तेवढे धैर्य माझ्याजवळ नव्हते, परंतु माझ्या मित्रांमध्ये, वास्कोचे वा कनाबे यांचे 'स्पिरिट' असलेले श्रीकांत लागू नक्की होते. त्यांना मी ही कथा सांगताच ते एकदम स्फुरण आल्यासारखे म्हणाले, ''मी त्या बोटीवर जायला तयार आहे.'' कनाबे यांनी भारतीय नौदलाची परवानगी घेतली होती. भारतीय नौदलाचे कमांडर अजित गुपचूप यांची त्यांच्याबरोबर प्रवास करण्यासाठी रीतसर नियुक्तीही केली होती. अशा रीतीने प्राध्यापक कनाबे, रमेश शर्मा, श्रीकांत लागू आणि मी एकत्र आलो. त्या योगायोगाला चित्तथरारक परिमाण दिले, ते अजित गुपचूप आणि श्रीकांत लागू यांनीच. त्यातूनच साकारला 'मरकॅटर'चा सागरी प्रवास...



त्याला पुस्तके चाळायला वेळ कधी मिळायचा हे मला कधीच कळले नाही. श्रीकांतचा पुस्तके भाषांतर करायचा उत्साहही तितकाच असे. त्याच्या भाषांतरित पुस्तकांचे विषयही वेगवेगळे. जॉर्ज ऑर्वेलचे राजकीय पुस्तक 'ॲनिमल फार्म' असो वा साहसी प्रवासवर्णने असोत, श्रीकांतला त्यातील आशय, साहित्यगुण आणि शैली भावत असे. इतकी, की तो थेट त्यांच्या भाषांतरांना सुरुवात करत असे.

देशपांडे, वसंत कानेटकरांपर्यंत, प्रायोगिक रंगभूमीपासून व्यावसायिक रंगभूमीपर्यंत, मराठी चित्रपटांपासून हॉलिवूडपर्यंत, शाम बेनेगल-जब्बार पटेलपासून आल्फ्रेड हिचकॉकपर्यंत सर्व नाटक-सिनेमांत त्याचे चित्त रमत असे. अनेक नाटकांचे अभिवाचन आणि नंतर त्या नाटकांच्या रंगीत तालमींमध्ये तो सामील असे. असे असूनही त्याने कधीही विद्वान समीक्षक असल्याचा आव आणला नाही. माधव मनोहर त्याच्या बैठकीत आणि पुष्पा भावेही त्याच्या गप्पांच्या मैफलीत रमत असत.

श्रीकांत देव, धर्म, पूजा, अध्यात्म, बाबा-बापू-बुवा अशा गोष्टींच्या पूर्ण विरोधी होता. अंधश्रद्धाविरोध हा त्याच्या विचाराचा आणि व्यवहाराचाच सहज भाग होता. गंमत म्हणजे, 'लागूबंधू मोतीवालें'च्या दुकानात येणारे बहुतेक गिऱ्हाईक शुभ खडे, शुभ-अशुभ मुहूर्त वगैरे गोष्टी पाहणारे होते. परंतु म्हणून श्रीकांत त्यांच्याशी कधी तुच्छतेने वागला नाही. (त्याचे कारण केवळ 'धंदा' हे नव्हते!) श्रीकांतच्या वागण्यात एक सभ्यता आणि सहिष्णुता होती. त्यांची श्रद्धा त्यांच्यापाशी - त्यांचा तो 'सांस्कृतिक लोकशाहीचा अधिकार!' आपला 'अश्रद्ध' विचार हा आपला अधिकार!

पण श्रीकांत वेगळ्या अर्थाने कमालाची श्रद्धाळू होता. कुसुमाग्रज हे त्याचे श्रद्धास्थान. (श्रीकांतने कुसुमाग्रजांचे नाव एका ताऱ्याला दिले, ते अमेरिकेतील अशा एका अंतराळशास्त्रीय संस्थेत पैसे भरून. परंतु त्या अस्सल श्रीकांतशैलीतील पुढाकारामुळे एक मजेशीर हंगामा माजला होता.) कुसुमाग्रजांना नाशिकला जाऊन भेटायचे आणि त्यांच्याबरोबर काही तास व्यतीत करायचे हा त्याच्या श्रद्धाळू नैतिकतेचाच भाग होता. कुसुमाग्रजांना अखेरच्या दिवसांतही तो नित्यक्रम श्रीकांतने चुकवला नव्हता.

एवढे सगळे उद्योग करून, दुकानातही पुरेसे लक्ष देऊन

त्याने अगदी अलिकडे केलेले भाषांतर म्हणजे, इधी नावाच्या पाकिस्तानातील आधुनिक संताचे आत्मचरित्र 'मानवतेसाठी'! पाकिस्तानला गेलो असताना आकस्मिकपणे एका चर्चा-परिसंवादाच्या वेळेस, आमची सर्वांची इधी यांच्याशी भेट झाली. त्यांनी त्यांचे आत्मकथनही प्रसिद्ध केले आहे, हे कळताच, त्याच्या काही प्रती आम्ही भारतात घेऊन आलो. सोबत असलेल्या श्रीकांतने भारतात पोचण्यापूर्वीच, प्रवासात ते वाचून पूर्ण केले आणि त्या पुस्तकाचा अनुवाद करण्याचे ठरवले! (नुकतेच ते 'मानवतेसाठी' या नावाने रोहन प्रकाशन, पुणे यांनी प्रसिद्ध केले आहे.)

श्रीकांतचे व्यक्तिमत्त्व इतके सर्वंकष, इतके सर्वव्यापी आणि इतके मनस्वी होते, की त्याने थक्क व्हायला होते. 'ग्रंथाली'सारखी वाचक-साहित्य चळवळ असो वा रक्तदान करण्याचा उपक्रम असो, श्रीकांत सर्व प्रकारच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचा अविभाज्य घटक होता. आता त्या सर्वांनाच श्रीकांतचे त्यांच्यातून जाणे ठसठसत राहणार आहे. आश्चर्य म्हणजे, वयाच्या साठीपर्यंत दरवर्षी दोन वेळा श्रीकांत रक्तदान करत असे. मृत्यूनंतर त्याने नेत्रदान केले. आता, निदान या नेत्रांनी तो या जगात आहे, हीसुद्धा एक समाधानाची बाब आहे. अशावेळी या जन्मावर, या जगण्यावर सर्वार्थाने शतदा प्रेम करणारा हा माणूस त्यामुळे आपल्यात आज नाही असे तरी कसे म्हणणार?

**- कुमार केतकर**
हुंडीवाले ब्लॉक्स, कोपरी
ठाणे (पूर्व)
ketkarkumar@gmail.com

# पहिल्या ‘स्वदेशी’ बँकेचे सामाजिक-सांस्कृतिक योगदान!

शब्दांकन : **राजीव जोशी**

‘‘युवावर्गाला’ डोळ्यांसमोर ठेवून भारताच्या भविष्याचा विचार!’’
– सेंट्रल बँकेचे अध्यक्ष मोहन टांकसाळे

आपला देश हा महाकाय आहे. इथल्या बँकिंग क्षेत्राला महान परंपरा आहे. ब्रिटिशांच्या कालखंडात स्थापन झालेल्या आणि आज देशाच्या भरभराटीला शंभरहून अधिक वर्षे हातभार लावणाऱ्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया या सरकारी बँकेला ४ लाख कोटींहून अधिक व्यवसाय करणारी प्रगतिशील बँक म्हणून ओळखले जाते. परंतु केवळ नफा करणे, प्रगती करणे असे मर्यादित हेतू न ठेवता, देश–व्यक्ती–उद्योग–वित्त यांचा समन्वय साधून आपला व समाजाचा उत्कर्ष साधणे हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून बँकेने आपले सामाजिक–सांस्कृतिक योगदानाचे धोरण राबवलेले आहे. बँकेचे विद्यमान अध्यक्ष टांकसाळेसाहेबांच्या शब्दांत सांगायचे तर – ‘‘आम्हाला देशाची अर्थव्यवस्था आणि समाजाला बळकट करायचे आहे.’’ हे काम कशा पद्धतीने केले जाते ह्याचा आढावा आपण घेणार आहोत.

कुठलाही समाज म्हटला की त्यात दोन वर्ग असतात – आहे रे आणि नाही रे! ज्यांच्याकडे काही नाही अशा वंचितांना आधार देणे, जगण्यासाठी मदत करणे हे समाजाचे विशेषत: ज्यांच्याकडे काही आहे, खूप काही आहे त्यांनी करायला हवे. केवळ मी, माझा असा अप्पलपोटी स्वार्थी विचार न करता जगणे आणि दुसऱ्याला जगवणे हेही तितकेच महत्त्वाचे असते. अशी धारणा ठेवून सेंट्रल बँकेने आपले कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी धोरण आखले आणि त्याची तंतोतंत अंमलबजावणी केलेली आहे. साधारणपणे अशा योगदानाचे दोन पर्याय असतात. एक म्हणजे आपल्याकडील पैसा देणगीरूपाने फक्त ‘दान’ करणे आणि अर्थसाहाय्य देऊन सामाजिक उपक्रम चालू राहण्यास हातभार लावणे. आणि दुसरा मार्ग म्हणजे – पैसा देणे आणि स्वत: त्या सामाजिक संस्थेच्या कामात सहभागी होणे. त्या प्रक्रियेत सामील होणे. आणि सेंट्रल बँक नेमके हेच करते आहे. कोणत्याही संस्थेला केवळ अर्थ–साहाय्य देऊन थांबत नाही, तर त्यांचे कार्य कसे चालले आहे, मदतीचा विनियोग कसा होतो आहे आणि कार्यपूर्ती होते आहे की नाही हेसुद्धा पहिले जाते. व्यक्तिगत सहभाग हे त्याचे वैशिष्ट्य आहे.



सेंट्रल बँकेचे अध्यक्ष मोहन टांकसाळे

## सेंट-संस्कृतीचा सहभाग - समाजकार्याला मोलाची साथ!

उच्चभ्रू समाज ज्या सेंटचा-परफ्युमचा वापर करतो, त्याअर्थी नव्हे, तर 'सेंट्रल'मधील 'सेंट' हा मध्यवर्ती कल्पून ही समाजसेवेची संस्कृती कार्यरत आहे. बँकेचे अध्यक्ष टांकसाळेसाहेब ह्यांच्या सुविद्य पत्नी नंदिनी टांकसाळे ह्यांनी स्वत:ला ह्या कार्यात जोडलेले आहे. त्यांच्याबरोबर अनेक सेंट्रल बँक अधिकारी व कर्मचारी ह्यांच्या 'होम-मिनिस्टर्स' अर्थात पत्नींची मोलाची साथ आहे. आपले पती बँकेच्या नोकरीच्या माध्यमातून अर्थ-विश्वात काम करत असताना आपणही खारीचा वाटा उचलावा ह्या उदात्त हेतूने हा 'महिला-सहभाग' आहे, कौटुंबिक साथ आहे. आणि हीच प्रभावी असल्याचे सेंट-संस्कृतीद्वारे सिद्ध होते आहे.

टांकसाळेसाहेबांचे ह्याबाबत मत काय आहे, हे विचारल्यावर ते म्हणाले - ''निधी दिला की आर्थिक मदत केल्याचे सांगता येते, कागदोपत्री दर्शवता येते. परंतु आपण जेव्हा व्यक्तिश: अशा संस्थेत जातो, त्यांचे कार्य पाहतो तेव्हा आपल्याला जाणीव होते, समाजातील काही घटकांची काय व कशी बिकट परिस्थिती आहे ह्याची कल्पना येते, आपल्याला समाजभान येते. विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास नव्हे तर 'उन्नती...दुर्बळाला सबळ' करण्याची संधी मिळते का, हे पाहणे. त्याचे जीवनमान सुधारले का?त्याला रोजगार मिळवण्यासाठी, उपजीविकेसाठी मदत होते आहे का? शिक्षण घेणे शक्य होते आहे का? ज्यांना मानसिक-शारीरिक स्तरावर मदतीची आवश्यकता आहे अशांना आणि मुलींना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी सेंट-संस्कृती काम करते. केवळ मुंबई नव्हे, तर सेंट्रल बँकेच्या देशभरातील एकूण ७७ विभागीय केंद्रांतील प्रबंधकांच्या पत्नींचा सहभाग ह्या प्रकल्पात आहे. तसेच चार चीफ मॅनेजर्सच्या पत्नी ह्यात सहभागी होत असतात. हे आमचे जणू एक विस्तृत कुटुंबच आहे असे म्हटले तरी चालेल. अधिकारी व कर्मचारी ह्यांच्या पत्नी जेव्हा अशा योजनांत सहभागी होतात, तेव्हा त्यांना एक प्रकारचे मानसिक समाधान लाभते. ज्या विशाल बँकेसाठी आपले पती १२-१६ तास काम करतात, त्या बँकेसाठी आपल्यालाही 'फूल ना फुलाची पाकळी' या स्वरूपात सहभागी होता येते. हा आनंद किती मोलाचा आहे. शिवाय, अशा कामामुळे मान्यता मिळते , समाधान लाभते ते पैशांत मोजता येणार नाही. बरे, हे सामाजिक कार्य करताना माझ्यातील बँकर थोडा स्वार्थी विचारही करतो, तो असा की आम्ही सेंट-संस्कृतीद्वारे तरुण पिढीशी कनेक्ट झालो तर त्याचा उपयोग बँकेला भविष्यकाळात होतो, कारण हाच युवावर्ग उद्या आमच्या बँकेचा खातेदार-ठेवीदार किंवा कर्जदार होणार असतो, इतकेच नव्हे तर तो आणि त्याचे संपूर्ण कुटुंब ह्यांनाही तो विश्वासाने आपल्याच बँकेकडे घेऊन येणार असतो. म्हणजे आज जी समाजसेवा आम्ही कोणत्याही स्वार्थी हेतूने करत नसलो तरीही उद्या आम्हाला ग्राहक मिळू शकतात. अर्थात आम्ही त्यासाठी हे काही करत नाही. असे कार्य केल्याने आमची बँक लाखो




**समाजकार्याला मोलाची साथ!**

लोकांच्या नजरेत येते, आम्ही असंख्य लोकांपर्यंत पोहोचू शकतो. ज्याला समाजातील ग्रासरूट असे संबोधले जाते त्या वर्गाकडे –तळागाळातील जनतेकडे आम्ही जातो हे माझ्या दृष्टीने खूप मोलाचे आहे. आज सर्वसमावेशक बँकिंग म्हणजेच Financial inclusion चा विचार आणि प्रसार व्हावा असे म्हटले जाते, ते काम आम्ही या माध्यमातून करतो आहोत.''

गरीब मुलांची फूटबॉलची टीम तयार करणे, त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना पहिल्यांदा पोशाख–ड्रेस दिल्यावर झालेला आनंद आणि त्यांनी मुंबई लीग जिंकणे, हे करताना बँकेने त्यांना स्टायपेंड दिला होता. बँकेतील कर्मचारी जे विशेष काम करतात आणि बँकेबाहेर काही सामाजिक उपक्रम राबवतात त्यांचा बँकेमार्फत सत्कार केला जातो.

**सांस्कृतिक कार्यक्रमांना सेंट्रल बँकेचे प्रायोजकत्व**

आज आपण पाहतो की अनेक गाण्याच्या, नृत्य आणि विविध कला–सांस्कृतिक कार्यक्रमांना 'प्रायोजक' लागतात. सेंट्रल बँक ही मदत सातत्याने करत असते. ह्यामागे बँकेची प्रसिद्धी हा हेतू नसून तरुण कलावंताना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यामार्फत कलेचे संवर्धन करणे असा सांस्कृतिक दृष्टिकोन आहे. 'आरोही'सारखा संगीताचा उपक्रम आहे, त्याला सेंट्रल बँकेचे सातत्याने प्रायोजकत्व मिळते ह्याचे कारण हेच की त्यांच्यातर्फे युवा–उगवत्या कलावंतांना प्रोत्साहित केले जाते. योग्यवेळी दाद आणि साथ मिळाली तर अस्सल कलावंतांची कला फुलू शकते आणि आपल्या देशाला लाभलेला सांस्कृतिक वारसा जतन केला जातो. जगन्नाथ रथयात्रेला मदत केली तर त्या यात्रेत सामील होणाऱ्या लाखो लोकांसमोर आपली बँक दृश्य रूपात दिसू शकते आणि आपल्या बँकेची माहिती त्यांना कळू शकते. आपल्यासारख्या महाकाय देशात असे प्रयत्न जरुरीचे आहेत. ह्याबाबत टांकसाळे ह्यांची मते फार प्रांजळ आहेत. ते सांगतात– ''असे संस्कृती–कलेचा वारसा पुढे नेणारे उपक्रम हे सहसा आर्थिक बाबतीत सक्षम नसतात. त्यांना अर्थसाहाय्याची गरज असते. आम्ही बँक म्हणून त्यांना मदत करतो, त्यातून एक प्रकारचा ठोस संदेश मिळू शकतो की चांगल्या कामाला चांगले लोक–चांगले कॉर्पोरेट्स मदत करतात. माझ्या दृष्टीने देशातील तरुणवर्ग म्हणजे देशाचे कॅपिटल आहे, साधन–संपत्तीप्रमाणे भांडवल आहे. त्यांची शक्ती ही योग्य जागी वापरली गेली पाहिजे. त्यांना दिशा दिली तर ती ऊर्जा देशाच्या प्रगतीला कारणीभूत ठरू शकेल. ही अनमोल मानवी संपत्ती वाया जाऊ नये, म्हणून तिचा चांगल्याबाबतीत सहभाग असेल तिथे आर्थिक पाठबळ देण्यास आम्ही नेहमीच तयार असतो. संगीताप्रमाणे आम्ही नाट्यकलेला सपोर्ट करतो. कारण तेही संपर्काचे प्रभावी माध्यम आहे. मी स्वत: अनेक कार्यक्रमांना हजेरी लावतो, आवर्जून जातो, कारण ती संस्था, त्यामागे असलेली माणसे कळतात. लोकांशी संपर्क साधता येतो. मी प्रायोजकत्व केले म्हणून मला मान द्या, मोठेपणा द्या, अशी माझी प्रवृत्ती नाही. अनेकदा मी वेळेअभावी लता–आशा अशा दिग्गज कलावंतांच्या

कार्यक्रमांना देखील जाऊ शकत नाही. परंतु वेळ असेल तर छोट्या संस्थेच्या समारंभात आवर्जून सहभागी होतो. काही ठिकाणी अल्प प्रेक्षक असतात, कोणाला वाटेल की अशा कार्यक्रमाला इतक्या मोठ्या बँकेचा अध्यक्ष कसा उपस्थित राहिला? पण माझ्या मनात अशी भावना नसते.''

स्वत: रसिक असल्याने श्री. टांकसाळे दिवाळी पहाटेच्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाला सर्वसाधारण रसिक प्रेक्षक बनून येतात, कौशिकीच्या गाण्याचा आनंद घेतात. 'प्रात:स्वर'ला ही आवर्जून जातात. तरुण प्रेक्षक संगीतात रममाण झाला आहे हे पाहून त्यांना आनंद होतो कारण केवळ गाणे ऐकतात म्हणून कौतुक नाही तर ह्या तरुण पिढीला संस्कृतीची ओढ आहे हे खूप महत्त्वाचे आहे असे ते मानतात. आज एकत्र कुटुंब पद्धती नाही, कुटुंब संस्था तुटते आहे, अशा पार्श्वभूमीवर असे सांस्कृतिक धागे आपल्याला... विशेषत: तरुणवर्गाला एकत्र बांधून ठेवणार आहेत असे त्यांना ठामपणे वाटते.

**आजचा युवक आणि चंगळवाद ह्याबद्दल...**

श्री. टांकसाळे ह्यांना युथ हा मोठा घटक वाटतो. 'त्यांच्याशी कनेक्ट व्हा' असा त्यांचा आग्रह असतो. पूर्वीची पिढी पैसे वाचवा - मोजका खर्च करा असा मंत्र जपणारी होती आणि आज खर्च ,शॉपिंग, एन्जॉयमेन्टचा जमाना आहे, त्याबाबत ते म्हणतात - Desire to earn in rightful manner, Desire to earn for quality life! Keep moral Strong! Be first class citizen! Create society! Create values for youths!

**आजची बँकिंग व अर्थ व्यवस्था**

आज पुन्हा एकदा बँका गावागावात जात आहेत, पूर्वी मोठ्या गावात जात होत्या, तर आता अगदी २००० लोकसंख्या असलेल्या गावात बँक पोहोचलेली आहे. नवे रक्त, तरुणाई बँकेच्या नोकरीकडे करिअर म्हणून पाहते आहे. ही बाब टांकसाळेसाहेबांना कौतुकाची वाटते. कारण ४० वर्षांपूर्वी खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले होते, तसे आज बँकिंग क्षेत्र पुन्हा गावागावाचा, तळागाळातील प्रत्येकाचा विकास करण्यासाठी झटत आहे, ह्यातूनच समाज घडणार आहे, देशाची प्रगती होणार आहे.

ते संस्थेला महत्त्व देतात. ''व्यक्ती कधीच मोठी नसते, बँक महत्त्वाची, बँकेचे 'सेंट -संस्कृती'चे कार्य लोकांपर्यंत पोहोचवा, ते अधिक हायलाइट करा, माझ्यापेक्षा माझे विचार.. युवकवर्गाशी कनेक्ट होण्याची संकल्पना मांडा!'' असे तळमळीने म्हणणारा, असामान्य विचारांचा अस्सल कलावंत मनाचा रसिक बँकर म्हणजेच सेंट्रल बँकेचे अध्यक्ष श्री. मोहन टांकसाळे. त्यांच्या सेंट्रल बँकेला आणि सेंट-संस्कृतीला अभिवादन!

शब्दांकन - **राजीव जोशी**

rmjoshi52@yahoo.co.in


## ग्रंथालीची नवी प्रकाशने




**माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**

**नारायण विष्णू आठवले**

**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

नारायण विष्णू आठवले यांनी सांगितलेल्या या कटाची पार्श्वभूमी, घातपाती कृत्ये, अटक, न्यायालयीन पातळीवरील संघर्ष आणि वेगवेगळ्या तुरुंगांतील बंदिवास यांची आणि जीवनाची साद्यंत कहाणी...

**माझं साहित्यिक खटलं**

**अॅड. यशवंत हडप**




**मूळ किंमत २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**
**टपाल खर्च ३० रु.**

वडील वि.वा. हडप यांच्या साहित्यातील योगदानामुळे प्रसिद्ध लेखकांची घरी ऊठबस असे. त्यातूनच यशवंत हडप यांचा बऱ्याच लेखकांशी स्नेह जुळला. त्यांच्या आयुष्याशी समरस होत लिहिलेले हे लेख. मनोरंजक व उद्बोधक माहिती देणारे...




We are thankful to our 42000+ employees for their commitment & dedication
and
65 Million+ customers for their faith & support



**Mrs. V. R. Iyer**, Chairperson & Managing Director,
Bank of India with ET 2nd Most Trusted Bank Brand Award 2012

Bank of India
*Relationship beyond banking*

www.bankofindia.co.in
Toll Free No. 1800 220 229




## ताठ कणा

मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

## सत्तरीचे बोल

मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.




जगातील दहा न्यूरोस्पायनल सर्जनची नावे घेतली तर त्यामध्ये डॉ. पी. एस. रामाणी यांचा समावेश होतो. असे मोठे कर्तृत्व गेल्या तीस वर्षांत त्यांनी बजावले आहे. पाठीच्या कण्यावरील शस्त्रक्रियांच्या संदर्भात त्यांनी जी नवी तंत्रे संशोधिली त्यामुळे तर त्यांचे नाव या क्षेत्रांत अजरामर झाले आहे. त्यांचा जगभर मोठा शिष्यपरिवार आहे. ते न्यूरोसर्जनच्या आंतरराष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष आहेत.

अशा या जागतिक ख्यातीच्या डॉक्टरचे हे आत्मकथन. गोव्याच्या सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या डॉ. रामाणी यांनी ध्येयनिष्ठेने शिक्षण घेतले, कौशल्य कमावले आणि कण्यावरील शस्त्रक्रियेस या देशात मान्यता मिळवून दिली. त्यांची ही जीवनाचे विविध पैलू उलगडून दाखवणारी पुस्तके...




## जीवन आणि स्वास्थ्य

## Life and Health

(दुसरी आवृत्ती)

मूल्य प्रत्येकी १२० रु.
सवलतीत प्रत्येकी ७० रु.






## Salient Feaures

- Insta Online account opening
- Remittance through Money Transfer Services Scheme vizMoneyGram, ExpressMoney & Western Union
- Portfolio Investment Scheme to invest in Indian secondary market
- Attractive interest rates on NRE/NRO deposits.
- World Currency Card in multiple currencies

**For more details, please visit us at,**
**IDBI Bank Limited,** Plot No.1 & 2, Kohinoor Bhavan, Opp. Swami Narayan Mandir, Near Dadar Railway Station, Mumbai - 400014. **Or contact:** (022) - 24166043 /24147141.

**IDBI Bank Limited, Regd. Office:** IDBI Tower, WTC Complex, Cuffe Parade, Mumbai – 400 005.
**Toll Free Numbers reachable from any landline/Mobile phones:** 1800-200-1947/ 1800-22-1070,
**Non- Toll Free Number:** 022-66937000.
**Visit us:** www.idbi.com

IDBI BANK
banking for all

*With Best Compliments*
*from*

# A
# Well
# Wisher


UHT PROCESSED TONED MILK IN
MAHANAND TETRA PAK
• 100% Tamper evident
• Free from bacteria
• No boiling required
• No need of refrigeration
• Retains all Nutrients in Milk
• 90 days shelf life
• Can be consumed directly
Convenient 500ml pack
MAHANAND
Wholesome
Nutritious Milk
Product of Mahanand Dairy, Goregaon, Customer Care 022-2685 6572



The habit of creating
complete habitats.
CIDCO understood that by merely establishing residential and commercial infrastructure, you can't create a city, which 2 million people would love to call home.
Even at the time of its formation in 1970, CIDCO could picture the needs of the future. After four decades, today, it has metamorphosed undeveloped lands into a city and several new towns that are complete in all respects.
Along with essential infrastructure, CIDCO gave the citizens a lifestyle beyond their common imagination. With hugely successful cultural initiatives like the Navi Mumbai Festival and Aurangabad Auditorium, it gave them – what they needed most – a sense of ownership.
With cooperation and harmony as their foundation, CIDCO's habitats give a unique glimpse of prosperity and unity. It's this harmony that has translated into the lives of the innumerable happy citizens.
CIDCO
WE MAKE CITIES
• Navi Mumbai • Vasai-Virar Sub Region • New Aurangabad • New Nashik • New Nanded • Oras-Sindhudurg • Waluj Mahanagar • Khopta Township • Aurangabad Fringe Area • Latur Fringe Area • Chikhaldara Hill Station • Jalna New Town • Meghdoot, New Nagpur
City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd.
Registered Office: 2nd Floor, Nirmal, Nariman point, Mumbai - 400 021. Tel: +91-22-6650 0900. Fax: +91-22-2202 2509.
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai - 400 614. Tel: +91-22-6791 8100. Fax: +91-22-6791 8166.
www.cidcoindia.com


सत्यमेव जयते
Government of Maharashtra
MAGNETIC
MAHARASHTRA
Proudly Announces its New Industrial Policy
to Retain its Industrial Leadership
Shri Prithviraj Chavan
Chief Minister
Shri Ajit Pawar
Dy. Chief Minister
Shri Narayan Rane
Minister for Industries
Shri Sachin Ahir
Minister of State for Industries
INDUSTRIAL POLICY 2013
Mega Projects
The State attracted 354 Mega Projects with an investment of Rs. 3 Lakh crores. The new policy aims to strengthen the Mega Projects Scheme with
Customized Package of Incentives for Mega Projects / Ultra Mega Projects
Integrated Industrial areas for holistic industrialisation
Incentives
Industrial Promotion Subsidy
Stamp Duty Exemption
Electricity Duty Exemption
Power Tariff Subsidy
Interest Subsidy
Special Incentives for Food Processing Sector
Policy Targets
To achieve manufacturing sector growth rate of 12-13 percent
To achieve manufacturing sector share of 28 per cent in GSDP
To create 2 million jobs in 5 years
To attract investments of INR 5 lakh crore (INR 5 trillion)
MSME Sector
MSMEs, to be supported with Package Scheme of Incentives to provide a basket of fiscal measures to help in the critical initial stage of operations.
Special incentives for no industry talukas
Investor Facilitation and Ease of Doing Business
Integrated single window portal, Maha-e-Biz to facilitate clearances
Integrated Cell, under Principal Secretary (Industries)
Simplification of administrative procedures
www.maharashtra.gov.in
www.midcindia.org
Directorate General of Information & Public Relations, Government of Maharashtra


बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या
बोस्टन अधिवेशनास आणि
'शब्द रुची' विशेषांकास
हार्दिक शुभेच्छा!
प्रमोद हिंदुराव
अध्यक्ष, सिडको

# मराठी पाऊल पडते पुढे...

**वसंत वसंत लिमये**

१९५४ साली शेर्पा तेनसिंगच्या सन्मानार्थ जवाहरलाल नेहरूंनी दार्जिलिंग येथे 'हिमालयन माउंटेनियरिंग इन्स्टिट्यूट' ची स्थापना केली. यानंतरच्या काळात महाराष्ट्रातून हिमालयात मोहिमा जाऊ लागल्या. गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्रात अनेक क्लब-मंडळे स्थापन झाली. प्रशिक्षणाच्या सोयी वाढल्या. आणि साहजिकच मराठी गिर्यारोहणात संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती झाली. क्षेत्र समृद्ध झालं.

घरच्याच चौकात मंद उजेडात चाळीस एक माणसं निःशब्द बसली होती. एका भिंतीवर एव्हरेस्टच्या दक्षिण खांद्यावरील साऊथ कोलमधील केशरी तंबू जीवघेण्या वाऱ्यात फडफडत रांगेत उभे होते. भूषण हर्षे यावर्षीच्या एव्हरेस्ट ल्होत्से मोहिमेचा थरार ऐकवत होता. ल्होत्से वरील विजय, त्यानंतर एव्हरेस्टवर तिरंगा आणि भगवा फडकला आणि निःशब्द, अवाक् चौकात वाहवा आणि टाळ्यांचा गजर झाला.

आमच्या 'हाय प्लेसेस' संस्थेचे आणि 'गिरीप्रेमी'चे सदस्य एका घरगुती कौतुक सोहळ्यासाठी जमले होते. निमित्त होतं- गिरीप्रेमी एव्हरेस्ट ल्होत्से मोहीम २०१३. आशिश माने यानं ल्होत्से १६ मे रोजी तर १७ मे रोजी भूषण हर्षे, आनंद माळी आणि गणेश मोरे यांनी एव्हरेस्ट सर केलं होतं.आनंद पाळंदे, उषःप्रभा पागे, सुरेंद्र चव्हाण ही बुजुर्ग मंडळी आणि अनेक नवे गिर्यारोहक जमले होते. गेल्याच वर्षी गिरीप्रेमीचे ८ गिर्यारोहक एव्हरेस्टवर पोचले या पार्श्वभूमीवर यंदाचं यश अधिकच खुलून दिसत होतं. संदीप खरे यांच्या हस्ते मानचिन्हांनी या वीरांचा यथोचित सत्कार झाला. त्यांचे अनुभव साऱ्यांनाच एका वेगळ्या विश्वात घेऊन गेले. हास्यविनोदाबरोबरच नव्याजुन्या स्मृतींना उजाळा मिळत होता. माझ्या मनात एक समाधान होतं.आनंद होता. आजूबाजूचे आवाज मंद होत गेले आणि स्मरणरंजनात माझं मन इतिहासाची पानं चाळू लागलं.

१९७१ सालच्या हिवाळ्यात मी चुकून रूइया हायकिंग क्लबच्या चांदण्या रात्रीच्या माथेरानजवळील पेब 'बिकटगड' या हाइकला गेलो. नकळत बिकट डोंगरी वाटांनी वेड लावलं. आय.आय.टी.तील सहा वर्षांत मनमुराद गिरीभ्रमण, प्रस्तरारोहण केलं. १९७६-७८ साली गिर्यारोहणाचे बेसिक-ॲडव्हान्स कोर्सेस केले. ७९ साली पहिली हिमालयातील मोहीम झाली. १९८५ साली हरिश्चंद्रगडाचा अजिंक्य कोकणकडा सर झाला. या चढत्या भाजणीत ८८ साली कांचनगंगा मोहिमेचं नेतृत्व मी केलं. ८००० मीटर उंचीवरील कांचनगंगा मोहीम हा महाराष्ट्रातील, भारतातील पहिलाच



१७ मे २०१३, भूषण हर्षे एव्हरेस्टवर तिरंग फडकावताना

नागरी प्रयत्न होता. या साहसी धडपडीत गेल्या ४० वर्षांत मला डोंगरांकडून उदंड मिळालं आणि त्यामुळेच माझं अनुभवविश्व अनेकविध स्तरांवर समृद्ध झालं.

जगातील सर्वोच्च हिमराजी हिमालय याची जादूच काही और आहे. सर्व्हे ऑफ इंडियाची स्थापना १७६७ मध्ये भारतीय उपखंडाचा सर्व्हे करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीनं केली. भारतासारख्या खंडप्राय देशाचा असा भौगोलिक अभ्यास करणं ही आश्चर्याची बाब होती. इंग्रजांनी इतक्या तपशीलाचं काम इतर वसाहतींमध्ये केल्याचं दिसत नाही. १८२० ते १९२० या काळात साहेबानं विविध मोहिमांना सक्रिय पाठिंबा दिला. याच काळात राधानाथ सिकदर या सर्व्हेअरला जगातील सर्वोच्च शिखराचा शोध लागला आणि त्या शिखराला सर्व्हेअर जनरल जॉर्ज एव्हरेस्ट यांच्या सन्मानार्थ 'एव्हरेस्ट' असं नाव देण्यात आलं. या संशोधनामागे दडलेलं एक राजकीय कारणही होतं. ते म्हणजे साहेबाला रशियन आक्रमणाची मोठी भीती त्या काळात वाटत होती. सिल्क रूटमुळे हिमालयातील काही मार्ग ठाऊक होते, परंतु इतर शक्यतांचा अभ्यास करणं तेव्हा महत्त्वाचं होतं.

२० व्या शतकाच्या सुरुवातीचे एव्हरेस्ट प्रयत्न अत्यंत खडतर आणि रोमांचक होते. अलेक्झांडर गार्डिनर, 'मॅड मिशनरी' जोसेफ बुल्फ, थॉमस थॉम्पसन, मूरक्रॉफ्ट असे कितीतरी. यानंतरच्या १९२२ च्या सुमारास एव्हरेस्ट मोहिमांना विशेष आकार येऊ लागला. सुरुवातीच्या प्रयत्नात उत्तरेकडून जॉर्ज फिंच २७३०० फुटांपर्यंत पोचला.

उत्तरेकडला मार्ग रोंगबुक हिमनदीवरून एव्हरेस्टच्या पायथ्याशी पोचतो. १९२४ सालच्या मोहिमेनं मोठाच संभ्रम उपस्थित केला. जॉर्ज मॅलरी आणि आयर्विन यांनी ८ जूनला शिखरप्रयत्न केला, पण ते परतलेच नाहीत. हवामान ढगाळ होतं आणि नंतर १९९९ मध्ये अनेक वर्षांनंतर–त्यांची कलेवरं कँप ४ च्या ३००० फूट खाली सापडली. यामुळे संभ्रम असा की त्यांना १९२४ सालीच एव्हरेस्ट सर करण्यात यश आलं होतं का? याचं उत्तर फक्त इतिहासाला आणि एव्हरेस्टलाच ठाऊक!

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या मोहिमांमध्ये खंड पडला. ५१ साली दक्षिणेकडून खुंबू हिमनदीकडून प्रयत्न सुरू झाले. २९ जून १९५३ रोजी एडमंड हिलरी आणि शेर्पा तेनसिंग यांनी एव्हरेस्टवर पाऊल ठेवलं. ही विजयवार्ता एलिझाबेथ राणीच्या राज्याभिषेकाच्या दिवशी, म्हणजेच २ जूनला लंडनला पोचली आणि जल्लोष झाला. हिमालयातील गिर्यारोहणाचे एक नवीन पर्व सुरू झालं होतं. या विजयाचं हे हीरक महोत्सवी वर्ष आणि त्यामुळे एव्हरेस्टवरील यावर्षीच्या मराठी पावलांचं विशेष महत्त्व आहे.

मी गिरीभ्रमणास सुरुवात केल्यावर सह्याद्री जवळ केला. सुरुवातीच्या वर्षांत अनेक शिखरं, गडकोट पालथे घातले. प्रस्तरारोहणाचं शिक्षण घेतलं. मुंब्रा–कान्हेरी येथे सराव सुरू झाला. ७६ साली मनाली येथे बेसिक कोर्स, तर ७८ साली उत्तरकाशी येथील नेहरू इन्स्टिट्युट ऑफ माउंटेनियरिंग येथून ॲडव्हान्स कोर्स पूर्ण केला. सह्याद्रीतील गिरीभ्रमण आणि प्रस्तरारोहणा, मग बेसिक–ॲडव्हान्स कोर्स आणि मग हिमालयातील शिखर मोहीम असा तेव्हाचा प्रचलित पायंडा होता. ७९ साली मी गंगोत्री भागातील 'जोगिन शिखर मोहिमेचे' नेतृत्व केलं. डोंगरी किड्यानं कडकडून चावा घेतला होता.

तो काळ मोठा धमाल होता. ख्रिस बॉनिंग्टन याची I Chose to Climb, The Next Horizon अशी पुस्तकं वाचनात आली. आल्प्समधील बोनाती पिलर आणि आयगरची चढाई यातील साहस आणि थरार यांनी वेड लावलं. जो ब्राऊन व्यवसायानं गवंडी तर डॉन व्हिलन्स प्लंबर, या जोडगोळीनं ५०–६० च्या दशकात प्रस्तरारोहणात एक क्रांती घडवून आणली. सहसा उंच, शिडशिडीत बांध्याचे लोकच चांगले प्रस्तरारोहक होऊ शकतात असा समज होता. या कल्पनेला या काहीशा बुटक्या, दणकट बांध्याच्या जोडगोळीनं पूर्णपणे सुरुंग लावला. त्याकाळातील साधनांचा विचार करता, यांच्या ब्रिटन आणि आल्प्समधील चढाया थक्क करणाऱ्या होत्या. जो ब्राऊनला तर 'Human Fly' म्हणत असत. जो ब्राऊनचं The Hard Years आणि डॉन व्हिलन्सचं

A Portrait of a Mountaineer ही दोन्ही पुस्तकं अफाट प्रेरणादायी ठरली. बॉनिंग्टनच्या Everest – The Hard Way या पुस्तकानं मोहिमेच्या नियोजनाचे केवळ धडेच न देता त्यातील आव्हानाची गोडी लावली.

गिर्यारोहणात अनेक गोष्टींचा समावेश होतो. गिरीभ्रमण. यात एखाद्याच डोंगरावर अथवा किल्ल्यावर जाणं मोडतं तर सह्याद्रीतील ट्रेकिंगमध्ये ५ ते ७ दिवसांत तुम्ही अनेक शिखरे–गड पालथे घालता. महाराष्ट्रात ५४ साली युनिव्हर्सिटी हायकिंग क्लब मुंबईत स्थापन झाला. त्याचंच रूपांतर पुढे ‘गिरीविहार’मध्ये झालं. महाराष्ट्रात गिरीभ्रमणाचा प्रसार होऊ लागला. ‘क्लाईंबर्स क्लब’ या संस्थेनं मुंबईजवळ रॉक क्लायंबिंग कँप घ्यायला सुरुवात करून प्रस्तरारोहणाच्या शास्त्रोक्त शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. ५४ सालातच शेर्पा तेनसिंगच्या सन्मानार्थ जवाहरलाल नेहरूंनी दार्जिलिंग येथे ‘हिमालयन माउंटेनियरिंग इन्स्टिट्यूट’ची स्थापना केली. यानंतरच्या काळात महाराष्ट्रातून हिमालयात मोहिमा जाऊ लागल्या. थोडक्यात गिर्यारोहणाचे तीन मुख्य पदर– गिरीभ्रमण, प्रस्तरारोहण आणि हिमालयातील गिर्यारोहण. गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्रात अनेक क्लब–मंडळे स्थापन झाली. हरीश कापडिया यांचे Trek the Sahyadri, आनंद पाळंदे यांचं ‘डोंगरयात्रा’ अशी मार्गदर्शक पुस्तके प्रचलित झाली. प्रशिक्षणाच्या सोयी वाढल्या. आणि साहजिकच मराठी गिर्यारोहणात संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती झाली. क्षेत्र समृद्ध झालं.

गेल्या ६० वर्षांचा महाराष्ट्रातील गिर्यारोहणाचा इतिहास मोठा रोमहर्षक आणि रंजक आहे. सुरुवातीस प्रशिक्षण शिबिरात मानधन घ्यावं–द्यावं की नाही, गिर्यारोहण हा खेळ आहे किंवा नाही, असे सकच्छ की विकच्छ सारखे वादही झाले. शुक्रवार–शनिवारच्या शेवटच्या कर्जत लोकलला किंवा स्वारगेटवर वस्तीच्या एसटीसाठी पाठीवर सॅक घेतलेल्यांची गर्दी वाढतच गेली. प्रस्तरारोहणात खडा पारशी, ड्युक्स नोज, कोकणकडा अशा विक्रमी चढाया झाल्या. एकाच वर्षात ५०च्यावर सुळके सर करणारे वीरही अस्तित्वात आले. हिमालयातील मोहिमांची संख्या वृद्धिंगत होत गेली. कठीण शिखरांवर चढाया झाल्या. ८८ साली पहिली मराठी नागरी मोहीम ८००० मी उंचीवरील कांचनगंगा शिखरावर आयोजली गेली. ९८ साली सुरेंद्र चव्हाण याचं पहिलं मराठी पाऊल एव्हरेस्टवर पडलं. २०१२ साली गिरीप्रेमीचे ८ सदस्य एव्हरेस्टवर पोचले. तर याच वर्षी ३ सदस्य एव्हरेस्टवर तर एकानं ल्होत्से शिखर सर केलं. मेजर अश्विनी पवार आणि कृष्णा पाटील ह्या पहिल्या मराठी महिला एव्हरेस्टवर पोचल्या. मोहिमांचं बजेट १०–२० हजारांवरून ३ कोटीच्या वर पोचलं. गिरीप्रेमीचा पुढील वर्षी मकालु आणि येत्या काही वर्षात १४ ही ८००० मीटर उंचीवरील शिखरं सर करण्याचा मानस आहे.

मागे वळून पाहताना तेव्हा आणि आता अशी तुलना, कितीही टाळलं तरी डोकावतेच. ‘आमच्या वेळी किती छान होतं!’ किंवा ‘आजच्या पिढीत काही दम नाही!’ असा सूर तिळमात्र नाही. पण गोष्टी निश्चितच बदलल्या आहेत.तेव्हा साधनं कमी होती.’हे कसलं वांझोटं साहस’ असा नकारात्मक निरुत्साही करणारा सूर भोवताली आढळे. साहजिकच या वेडाचा पाठपुरावा करण्यात एक बंडाची भावना होती आणि



गिरीप्रेमी एव्हरेस्ट बेस कँपला



**२९ मे १९५३, पहिले एव्हरेस्टवीर एडमंड हिलरी आणि शेर्पा तेन्सिंग**

त्यात नक्कीच मजा येत असे. अनेक थरारक अनुभव पाश्चिमात्य गिर्यारोहकांच्या लेखनातून वाचलेले होते.पण त्या धर्तीच्या, तोडीच्या भारतीय चढाया नसल्यानं नव्या, अजिंक्य, अनवट अशा वाटांचं जबरदस्त आव्हान रोमांचकारी होतं. विविध गिर्यारोहण मंडळांत नवनवीन काही करण्यासंदर्भात एक चुरस होती आणि तरीही एक बंधुभावही होता. ८५ च्या कोकणकडा चढाईच्या वेळी खूप मंडळींच्या डोक्यात हेच स्वप्न आहे, अशी कुणकुण लागल्यावर आम्ही आय.आय.टी.त ४ महिने गुप्तपणे तयारी करत होतो आणि डिसेंबर ८५ मध्ये आम्ही चढाई फत्ते देखील केली. चोरून अशा गोष्टी करण्यात मजा देखील येते! पण तेच ८६ च्या भर पावसाळ्यात बातमी आली की बर्वे नावाचा एक आरोहक कोकणकड्यावर अडकला आहे. तातडीने वेगवेगळ्या क्लबची मंडळी साधनसामुग्री एकत्र येऊन आम्ही रेस्क्युसाठी बाहेर पडलो होतो. मग होता तो फक्त बंधुभाव!

त्याकाळी सेकंडहँड परदेशी इक्विपमेंट मिळत असे आणि आम्ही सारेच दुसऱ्याच्या इक्विपमेंटकडे इथिओपियातल्या दुष्काळी आधाशी नजरेनं पाहत असू. परदेशी मोहिमांबरोबर लायेझन ऑफिसर म्हणून जाऊन इक्विपमेंट मिळवणे नाहीतर नेपाळातून आणणं असा द्रविडी प्राणायाम करावा लागे. आजकाल मुंबई-पुण्यात इक्विपमेंटची अनेक दुकानं आहेत. काळही बदलला आहे आणि ऐपतही वाढली आहे.आज इक्विपमेंटचा दर्जा उच्च आहे आणि उपलब्धता सहज आहे आणि त्याचा दृश्य परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील प्रस्तरारोहणातील गेल्या ५-१० वर्षांतील अचाट वाढ. इंटरनेट, फेसबुकनं देखील कमाल केली आहे. विविध चढायांची, भ्रमंतीची माहिती-फोटो आज सहजपणे एकमेकांपर्यंत पोचतात. नव्या चढाया आणि जुन्या मार्गावरील पुनश्च चढाया यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या काळातील काही ठिकाणं म्हणजे प्लस व्हॅली. संधन गॉर्ज आणि दुर्गभंडार नव्यानंच प्रसिद्ध झाली आणि थोड्याच अवधीत लोकप्रियही ठरली. हा सारा सोशल मीडियाचा प्रताप!

एडवर्ड व्हिम्पर या इंग्लिश गिर्यारोहकानं १८६१ साली डॉफने आल्पसमधील माँट पेलव्हू शिखर पादाक्रांत केलं आणि गिर्यारोहणाची सुरुवात झाली असं मानलं जातं. भारतातील आपल्या गिर्यारोहणावर सुरुवातीच्या काळात तरी पाश्चिमात्य छाप होती. पाश्चिमात्य गिर्यारोहणातील पराक्रमाचा आलेख पाहता असं लक्षात येतं की आल्पस पर्वतावरील चढायांनंतर विशेषतः युरोपीय गिर्यारोहकांनी हिमालयाकडे मोर्चा वळवला. ८००० मीटर उंचीवरील पहिलं शिखर अन्नपूर्णा (८०९१ मी) १९५० साली सर झालं. एव्हरेस्ट ५३ साली आणि मग एक एक करत ६४ साली शिशपंग्मा हे शेवटचं १४ वं शिखर सर झालं. कुठल्याही अजिंक्य शिखरावर पहिला यशस्वी प्रयत्न सहसा सगळ्यात सोप्या मार्गानं केला जातो.

यानंतर गिर्यारोहकांनी आपला मोर्चा आणखी अवघड, खडतर आणि नव्या मार्गांकडे वळवला. अन्नपूर्णा आणि एव्हरेस्टचे नैऋत्यकडे मोहिमा यातील विशेष उल्लेखनीय. मग एव्हरेस्ट आणि इतर शिखरांवर कृत्रिम प्राणवायूशिवाय चढाया झाल्या. सर्व १४ शिखरं चढण्याचा मेसनरचा विक्रम झाला. थोडक्यात, आव्हानांना वेगवेगळे धुमारे फुटले. गिर्यारोहण म्हणजे अज्ञाताचा शोध आणि साहस आणि याचा पाठपुरावा चालू राहिला.

**एव्हरेस्ट ८८४८ मी**






गिरीप्रेमी या मराठी गिर्यारोहण संस्थेनं गेल्या वर्षी ८ तर या वर्षी ३ एव्हरेस्टवीर घडवले. यावर्षी नवे ल्होत्से शिखरही सर झाले. आता पुढील काही वर्षांत १४ ही शिखरं सर करणं अशी स्वप्नं रंगवली जात आहेत. हे सारे स्तुत्यच आहे. अशा मोहिमांना कॉर्पोरेट जगतातून आर्थिक पाठबळही मिळत आहे. गिर्यारोहण अधिकाधिक लोकाभिमुख होत आहे. या गोष्टी उत्साहवर्धक आहेत. एव्हरेस्टचं बाजारीकरण होत आहे अशी एकीकडे ओरड आहे. असं असलं तरी एव्हरेस्ट विजयाची उंची खालावत नाही. पण पुढील खरं आव्हान आहे ते म्हणजे मराठी गिर्यारोहणातील गुणात्मक विकास. अवघड शिखरं, नवे मार्ग यासारखे प्रयत्न होणं गरजेचं आहे. मिळत असलेल्या लोकप्रियतेचा गुणवत्तेकडे ओघ वळवता आला पाहिजे. यासाठी हे कल्पकतेलाही आव्हान आहे.

महाराष्ट्रात गिरीभ्रमण अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. त्यानिमित्त प्रशिक्षण व सुरक्षितता यासाठी सुविधा उपलब्ध होणं गरजेचं आहे. घेल्या २० वर्षांत ॲडव्हेंचर टुरिझम हे क्षेत्र झपाट्यानं वाढलं आहे. परंतु ते पर्यावरणास घातक ठरणार नाही याचं भान राखता आलं पाहिजे. आऊटडोअर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट या क्षेत्राचाही विकास झपाट्यानं झाला आहे. गिरीभ्रमण, आरोहण हे केवळ छंद न राहता उपजीविकेचं साधनही झालं आहे. महाराष्ट्रात गिर्यारोहण क्षेत्रानं एकत्र यावं यासाठी अनेक प्रयत्न गेल्या ४० वर्षांत झाले, पण ते पुरेसे नसल्याची खंत वाटते.

मराठीत इतिहासाच्या स्मरणरंजनातून सह्याद्रीवर बरंच लेखन झालं आहे. परंतु गिर्यारोहणातील चढाईचा थरार, वाटणारी भीती, चिकाटीनं केलेली धडपड अशा निखळ अनुभवांवर आधारित लेखन आभावानंच आहे. Touching the Void, Into Thin Air या साहसलेखनाला ललित कलाकृतींचा दर्जा प्राप्त झाला आहे. आपल्याकडे अनुभवांची ददात नसून ते रोमांचक रित्या, प्रामाणिकपणे शब्दबद्ध होणं गरजेचं आहे.

नुकत्याच झालेल्या एव्हरेस्ट मोहिमेतील भूषण हर्षेच्या शब्दातील वृत्तांत–

रात्रीचे ८.३० वाजता सर्व साधनसामग्रीसह आम्ही अंतिम चढाईसाठी सज्ज झालो. शिखरमाथ्याकडे काही 'टॉर्च' चालताना दिसत होते. आनंद, गणेश आणि मी शेर्पांसह तासभर चाललो. तोच वाऱ्याने जोर धरला, पाऊल टाकणं अवघड जात होतं. बर्फ चेहऱ्यावर आपटत होतं. वाऱ्याच्या झोताबरोबर आम्ही ५-६ फूट ढकलले जात होतो. 'जुमार'मध्ये बर्फ जमल्यानं 'रोप' ला धरून चढाई करायला लागत होती. सगळ्याशी झुंजत 'बाल्कनी' या ठिकाणी पोचलो. इथूनच गेल्या वर्षी आनंद, गणेशला परतावं लागलं होतं. मी सहज मागे वळून पाहिलं. 'साउथ कोल'पासून आमच्याबरोबर चढाई सुरू केलेल्या ४५ गिर्यारोहकांपैकी फक्त १०-१२ उरले होते. इतर परत फिरले होते. परिस्थिती प्रतिकूल होत चालली होती. क्षणभर विचार आला. 'आपणही परतावं का?' पण मग जाणीव झाली, 'ही आपली एव्हरेस्टला येण्याची दुसरी वेळ आहे. 'आता परत फिरलो तर पुन्हा येणं





अशक्य' आणि निर्धारानं पाऊल टाकलं. 'साउथ समिट'जवळ पोचल्यावर वारं कमी झालं. आकाशही स्वच्छ झालं. पहाटे ४.३० च्या सुमारास 'साउथ समिट'च्या अगदीच जवळ पोचलो होतो. वेगळंच चैतन्य संचारलं. पूर्वेकडील क्षितिजावर लालभडक रेषा उमटली. बघता बघता ती प्रखर होत गेली आणि सूर्यनारायणानं हजेरी लावली. हळूहळू परिसर उजळला. ढगांच्या अथांग सागरातून सोनेरी शिखरं डोकावू लागली. साक्षात एव्हरेस्टची त्रिकोणाकृती सावली नेपाळच्या बाजूला दिसत होती. ते दुर्मिळ क्षण आठवणीत, कॅमेऱ्यात टिपून ठेवले. काही वेळातच 'हिलरी स्टेप' नजरेस पडली. ही पार केली की एव्हरेस्ट समिट या कल्पनेनंच शहारा आला. नकळत चालायचा वेग वाढला. हातपाय थंड पडल्याचा विसर पडला. अचानक ताकद आल्यासारखं वाटू लागलं. घालमेलीत 'हिलरी स्टेप' कधी चढून आलो आणि समिट कधी १०-१५ पावलांवर येऊन ठेपलं ते कळलंच नाही. त्या क्षणी मात्र डोळ्यांत पाणी आलं. घरच्यांची, मित्रांची, हितचिंतकांची खूप आठवण आली. अखेर १७ मे २०१३, सकाळी ७.३० वाजता गणेश, आनंद आणि मी एव्हरेस्टला मनःपूर्वक अभिवादन केलं आणि गळ्यात गळे घालून जगातील सर्वोच्च बिंदूवर पोचलो.

मोहिमेतील अशा क्षणांव्यतिरिक्त अनेक ठिकाणी याच प्रयत्नातील धडपड, यशापयशाची आंदोलनं आणि थरार बऱ्याच वेळेला अव्यक्त राहतो. साऱ्याच मोहिमेची कहाणी अत्यंत रोमांचक आणि प्रेरणादायी असू शकते.

एव्हरेस्ट शेर्पा व प्राणवायूच्या मदतीनं आता मराठी गिर्यारोहकांनी अनेकदा सर केलं. त्यापलिकडील आव्हानांना सामोरं गेलं पाहिजे. लेखन ऑडिओव्हिजुअल फिल्म अशा माध्यमातून सह्याद्री आणि हिमालयातील अनुभव सकसपणे व्यक्त झाले तर मराठी मनाला ते अधिक प्रेरणादायी ठरतील. सह्याद्रीचे कडे, हिमशिखरांवरील नवे मार्ग, हिमालयातील प्रस्तरारोहण आणि खडतर चढाया अशी अनंत आव्हानं खुणावत आहेत. सध्याच्या यशाच्या पायावर पुढील कळस चढवता आला पाहिजे. तरच सार्थ अभिमानानं म्हणता येईल 'मराठी पाऊल पडते पुढे'!


**– वसंत वसंत लिमये**

ईप्सित, सर्व्हे नं. ११०/१/ए,

बळवंतपुरम, पौड रोड,

कोथरूड, पुणे ४११०३८

दूरध्वनी (०२०) २५३९४५४०/२५३९९४८६

vasantlimaye@gmail.com



**वसंत वसंत लिमये**

लिखित

**लॉक ग्रिफिन**

**गेल्या तीन पिढ्यांचा संदर्भ असलेली, आंतरराष्ट्रीय राजकीय-सामाजिक पटावर उलगडणारी उत्कंठावर्धक कादंबरी**




**मूल्य ५०० रु.**

**सवलतीत ३०० रु.**

# भटका व्यंगचित्रकार इ.पी. उन्नी

**प्रभाकर वाईरकर,** व्यंगचित्रकार



इ. पी. उन्नी यांनी मुलांची व्यक्तिरेखा (कॅरेक्टर) निर्माण केली. त्याचा वावर प्रत्येक पॉकेट कार्टूनमध्ये पाहावयास मिळतो. जसा आर.के. लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' तसा उन्नी यांचा 'न्यूज बॉय'.
उन्नी यांची कॅरिकेचरही अतिशय प्रभावी असतात. कमीत कमी रेषा तरीही त्या ठिकाणी रेषा असल्याचा आभास निर्माण करून संपूर्ण आकार दृश्य स्वरूपात आहे याचा ते भास निर्माण करतात. ही त्यांची खुबी अचंबित करते.

चहाच्या कपामध्ये बटर बुडवल्यावर क्षणातच बराच चहा शोषून घेतो तसाच प्रकार लहान मुलांच्या बाबतीत घडतो...

सात-आठ वर्षांच्या मुलाला काही कळत नाही असे समजून प्रौढ व मोठ्ठी माणसे लहान मुलांच्या समजण्या-पलीकडील, विशेषत: विनोद-घटना, चावट, इतरांची उणीदुणी, समाजात घडलेला भयंकर प्रकार मोठमोठ्याने चर्वण करतात. आजुबाजूला रेंगाळणाऱ्या लहान मुलाकडे दुर्लक्षित कटाक्ष टाकून 'त्याला काय कळते' ह्या आत्मप्रौढीने. त्यावेळी त्यांना हे कळत नाही की त्या लहानग्याचे मन किती संवेदनाक्षम आहे. आजुबाजूला घडत असलेली घटना शोषून घेण्यासाठी, मग चांगली असो वा वाईट... त्याला त्या घटनेचा वा शब्दांचा अर्थ कळू दे अथवा नको...

असाच प्रकार एका लहानग्या मुलाच्या बाबतीत घडला, अर्थातच आयुष्य घडवण्यासाठी...

१९६०च्या दशकात केरळमध्ये मल्याळम भाषेत 'मातृभूमी' साप्ताहिक प्रकाशित होत असे. मल्याळी लोकांमध्ये ते अतिशय प्रसिद्ध होते. त्यात अनेक नामवंत लेखकांचे लेख व कादंबऱ्या प्रसिद्ध होत. मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार वि.स. खांडेकर, विजय तेंडुलकर वगैरे लेखकांचे साहित्य मल्याळीमध्ये भाषांतर करून छापले जायचे. त्या साप्ताहिकाचे शेवटचे पान व्यंगचित्रकारासाठी असायचे.

त्यावेळचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार जी. अरविंदन (जे नंतरच्या काळात नावाजलेले फिल्मनिर्माते झाले) यांनी तयार केलेली व्यंगचित्रमालिका 'Little Man & The Big World' त्या साप्ताहिकाच्या मागच्या पानावर छापली जायची. त्या व्यंगचित्रमालिकेवर अनेक प्रौढ व्यक्ती मोठमोठ्याने चर्चा व विनोद करायचे. हे सर्व नेहमीच एक बालक न चुकात ऐकत असे. त्याला ते काय बोलतात याचा अर्थ कळत नसे. पण ते जे बोलतात ते 'त्या' चित्रमालिकेसंदर्भात बोलतात एवढे त्याला समजत असे. ते नेहमीच त्याबद्दल चर्चा करतात याचा परिणाम होऊन त्या बालकाला ती चित्रमालिका आवडायला

लागली, तो ती मालिका सतत न्याहाळू लागला. अर्थ समजत नव्हता पण चित्रे आवडत होती. हळुहळू विषयाचे ज्ञान होऊ लागले. एक व्यंगचित्ररूपी कादंबरी आपण वाचतो याचे भान त्याला येऊ लागले. मल्याळी मध्यमवर्गीय लोकांवर ती आधारित चित्रमालिका होती – एक मध्यमवर्गीय हुशार मुलगा ग्रॅज्युएट होऊन नोकरीसाठी दारोदारी भटकतो. नोकरी मिळत नाही. शेवटी धंद्याकडे वळतो आणि हळूहळू आपल्यामधला प्रामाणिकपणा हरवून बसतो. अशी सामाजिक कथा निर्माण करून व्यंगचित्रांची ताकद किती परिणामकारक असते व ते सादर करणे किती हुशारीचे काम आहे याची जाणीव 'तरुण' होत चाललेल्या त्या मुलाला होत होती. त्याने जी. अरविंदन यांची स्टाइल कॉपी करण्यास सुरुवात करून स्वत:च्या व्यंगचित्रकलेच्या पाया घातला. त्या प्रसिद्ध व्यंगचित्रकाराचे नाव इ.पी. उन्नी (एकनाथ पद्मनाभन उन्नी).

आकाशाला प्रथम शेंडा कोण लावतो याची सतत शर्यत लावणाऱ्या उंचच उंच माडांच्या, केरळातील 'पलक्कड' जिल्ह्यातील 'एलापुल्ली' या गावी उन्नी यांचे बालपण गेले. त्यावेळी त्यांना चित्रकलेची अजिबात आवड नव्हती. सायकल फिरवणे व वाचन करणे हेच त्यांचे छंद अभ्यासाव्यतिरिक्त.

परंतु वर सांगितल्याप्रमाणे ६०च्या दशकात मातृभूमी साप्ताहिकाने त्यांच्यामध्ये व्यंगचित्रकार रुजवला. ते म्हणतात, ''१९७० मध्ये पलक्कडमधील सरकारी व्हिक्टोरिया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हा कॉलेजमधील वातावरण राजकारणाने भारून गेले होते. बंगालएवढेच कम्युनिझमने केरळ 'लाल' झाले होते व त्याकाळी इंडियन एक्स्प्रेसमध्ये अबू अब्राहम आणि हिंदूमध्ये ओ. व्ही. विजयन यांनी व राजिंदर पुरी या राजकीय व्यंगचित्रकारांनी माझ्यावर राजकीय व्यंगचित्रकलेची मोहिनी घातली.''

त्यांचे पहिले व्यंगचित्र 'शंकर्स विकली'मध्ये १९७२ साली प्रसिद्ध झाले. व्हिएतनाम युद्धावर ते व्यंगचित्र आधारित होते.

व्हिक्टोरिया कॉलेजमधून सायन्सची पदवी घेतली त्याच कॉलेजमधून भारताच्या प्रशासनामध्ये आमूलाग्र बदल करणारे टी.एन. शेषन व इ. श्रीधरन यांचेही शिक्षण झाले हे उन्नी अभिमानाने सांगतात.

१९७५ साली आणीबाणी सुरू झाली. प्रसिद्धी–माध्यमांवरही सेन्सॉरशिप आली. व्यंगचित्रांवर बंदी होती. ते एका बँकेत ऑफिसर म्हणून रूजू झाले. पण त्या ठिकाणी मन रमले नाही म्हणून चक्क केरळ सोडून दिल्ली गाठली. १९७७ मध्ये 'द हिंदू' या वर्तमानपत्रामध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले आणि वर्तमानपत्रासाठी त्यांचे पहिले राजकीय व्यंगचित्र प्रसिद्ध झाले.

उन्नी यांच्या व्यंगचित्रांचा विचार करता त्यांच्या स्टाइलवर अबू अब्राहम वा जी. अरविंदन यांचा प्रभाव जाणवतो. ते म्हणतात, त्यांना चित्रांमध्ये सिम्प्लिसिटी खूपच भावते. त्यामुळे त्यांच्या चित्रात जास्त बारकावे नसतात. ते ब्रशने काम करतात. बोल्ड स्ट्रोक्सने त्यांना ब्लॅक अॅन्ड व्हाइट व्यंगचित्रे करायला आवडतात. वर्तमानपत्रातील व्यंगचित्र हे ब्लॅक अॅन्ड व्हाइटच जास्त प्रभावी वाटते, असे ते म्हणतात.

त्यांनी अनेक विषयांवर व्यंगचित्रे चितारली. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, खेळ वगैरे. त्यांच्या चित्रांमध्ये परस्पेक्टिव्हचा वापर सहसा केलेला आढळत नाही. ज्याप्रमाणे भारतीय मिनिएचर पेंटिंग्जमध्ये परस्पेक्टिव्हचा वापर केलेला नसतो, सर्व घटना एकाच पातळीवर घडत असतात.

त्यांनी मुलांची व्यक्तिरेखा (कॅरेक्टर) निर्माण केली. त्याचा वावर प्रत्येक पॉकेट कार्टूनमध्ये पाहावयास मिळतो. जसा आर.के. लक्ष्मण यांचा 'कॉमन मॅन' तसा उन्नी यांचा 'न्यूज बॉय'.

त्यांची काही व्यंगचित्रे–

१. मनमोहनसिंग यांच्या स्थितप्रज्ञ स्वभावावर टीका करताना सदर व्यंगचित्रामध्ये रेल्वेमंत्री व कायदामंत्री यांच्यावर भ्रष्टाचाराचेही आरोप होऊन ते राजीनामा देत नाहीत व त्यासाठी पंतप्रधानही काही अॅक्शन घेत नाही. पद्मासन घालून आपण त्यातले नाही असा आविर्भाव व्यक्त करतात व सामान्य माणसाची अवस्था कशी आहे हे 'न्यूज बॉय'च्या वाक्यातून स्पष्ट होते.

२. ज्यांना फाशीची शिक्षा झालेली आहे व त्यांनी दयेची याचना राष्ट्रपतींकडे केलेली आहे. परंतु कित्येक वर्षे राष्ट्रपती त्यावर निर्णय घेत नाहीत, यासाठी न्यूज बॉय म्हणतो, अपराध्यांना फाशी तर दिली जात नाही. निदान दयेच्या अर्जांच्या फाईलींच्या गाठी तरी सोडवा म्हणजेच निर्णय तरी द्या दयेच्या अर्जांवर. निष्क्रीय सरकारवर अशी अतिशय मार्मिक टिप्पणी केली आहे.

३. सामाजिक प्रश्नावर भाष्य करताना उन्नी यांनी दुष्काळ आणि पंतप्रधानांचे कर्तव्य यांचे चित्रण केले आहे. दुष्काळामुळे शेतकरी होरपळतो आहे. त्यासाठी त्याला पाण्याची व्यवस्था करणारा पंतप्रधान पाहिजे. सध्याचे पंतप्रधान हे जनतेलाही आकर्षित करणारे नाहीत वा दुष्काळावर मात करणारे नाहीत हे उन्नी यांना सदर







व्यंगचित्रांमध्ये व्यक्त करायचे आहे.

उन्नी यांच्या व्यंगचित्रांमध्ये जास्तीत जास्त सिम्बॉल्सचा वापर केलेला आढळतो. त्या सिम्बॉलमधून ते आपले भाष्य करतात.

४. पाकिस्तानमध्ये कसे अराजक वा हुकूमशाहीने थैमान मांडले आहे. त्याचे वाईट परिणाम भारतावर होत असतानाही भारत सरकार कसे अकार्यक्षम आहे हे दाखवण्यासाठी पाकिस्तान झेंडा व त्यामधील चांदणीमध्ये हिटलरच्या उलट्या स्वस्तिकाचे चिन्ह वापरून पाकिस्तानमध्ये कशी हिटलरशाही अवतरली आहे याचे नेमके चित्रण त्यांनी केले आहे. तरीही आपण त्यांना मानवंदना देत आहोत. केविलवाणी अवस्था!

५. आयपीएलमुळे एकेकाळी 'जंटलमन' लोकांचा खेळ किंवा भारतामध्ये क्रिकेट हा धर्म अशी ज्या खेळाची महती सांगितली जाते. त्या खेळाचे व खेळाडूंचे दयनीय चित्रण अतिशय मोजक्या रेषांमध्ये केलेले जाणवते.

उन्नी यांची कॅरिकेचरही अतिशय प्रभावी वाटतात. कमीत कमी रेषा तरीही त्या ठिकाणी रेषा असल्याचा आभास निर्माण करून संपूर्ण आकार दृश्य स्वरूपात आहे याचा ते भास निर्माण करतात. ही त्यांची खुबी अचंबित करते.

लालकृष्ण अडवाणी यांचे चित्रण करताना सर्वच व्यंगचित्रकार त्यांची मिशी संपूर्ण चितारतात. परंतु उन्नी ब्रशचे काहीच फटकारे मारून ती मिशी संपूर्ण चितारली आहे, याचा भास वाचकाला करून देतात. तसेच मनमोहन सिंग यांच्या अर्कचित्राचेही (कॅरिकेचर) उदाहरण देता येईल. त्यांची दाढी-मिशी संपूर्ण न चितारता केवळ काही रेषांमध्ये दाढी-मिशीचा आभास निर्माण करण्यात ते यशस्वी होतात. कधीही वाटत नाही की त्यांनी मनमोहन सिंग यांना दाढी-मिशी काढली नाही. यातच उन्नी यांच्या सिम्प्लिसिटीचे कौशल्य सूर्यप्रकाशाएवढे ठसठशीत जाणवते.

उन्नी यांची कौटुंबिक परिस्थिती कशी आहे याचे उत्तर देताना ते अतिशय नम्रपणे म्हणतात, ''मी एक स्वतंत्र व्यक्ती आहे. माझे कुटुंब ही माझी व्यक्तिगत बाब आहे. त्यामुळे माझ्या कौटुंबिक जीवनातील माहिती मी लोकांना का करून द्यावी?''

त्यांची व्यंगचित्रे तयार करण्याची पद्धत इतरांपेक्षा वेगळी आहे. एका केबिनमध्ये मान व कंबर यांचे धनुष्य करून बसायच्या पद्धतीचा ते तिरस्कार करतात. ज्या ज्या ठिकाणी शक्य होईल त्यावेळी ते काम स्वीकारतात आणि बाहेर जाऊन स्केच तयार करतात.

ते एक चांगले लेखकही आहेत. व्यंगचित्रकार व लेखक असल्याने त्याचा परिणाम असा झाला, की १९८९च्या सार्वजनिक निवडणुकीचे चित्रण बातम्यांसाठी करावे लागले.

परदेशी व्यंगचित्रकारांमध्ये राजकीय व्यंगचित्रकार




म्हणून हरब्लॉक आणि चॅपेट, व्यंगचित्र 'स्ट्रिप'साठी बील वॉटरसन व जुलेस फायफर; तर व्यंगचित्रमालिका वा पुस्तकासाठी वील आयनर यांचे ते खूप कौतुक करतात.

समोर घडत असलेल्या घटनेचे चित्रण करण्याच्या सवयीमुळे त्यांना अनेक घटना चित्रित करण्याची कामे मिळाली. त्यातील उल्लेखनीय म्हणजे (प्रथमच एका व्यंगचित्रकाराला मिळालेले सरकारी काम) आंध्रमध्ये जेव्हा भयाण दुष्काळ पडला त्याचे चित्रण करण्याची संधी मिळाली व त्याचे पुस्तक प्रकाशित केले... ''लँग्वेज, लँडस्केप आणि लाईव्हलीहूड.''

व्यंगचित्रे आणि प्रवास करण्याचा छंद यामुळे त्यांनी संपूर्ण केरळ फिरून तयार केलेल्या चित्रांचे पुस्तक तयार केले– 'स्पीसिस ॲन्ड सोल' तसेच 'डुडलर्स जर्नी थ्रू केरला.'

मोठ्या प्रमाणात व्यंगचित्रे चितारायची संधी त्यांना



मिळाली ती १९९१ मध्ये साप्ताहिक संडे मेलमध्ये. त्यासाठी त्यांनी पॉकेट, डिस्प्ले, स्ट्रिप, कॅरिकेचर्स स्टॅम्प साइजपासून फुलपेजपर्यंत चितारली. त्यासाठी त्या साप्ताहिकाचे संपादक टी. व्ही. आर. शेनॉय यांना ते श्रेय देतात.

याव्यतिरिक्त त्यांनी न्यूज टाइम, इंडेपेंडंट, दि पॅट्रिऑट, बिझिनेस स्टँडर्ड, दि इकॉनॉमिक टाइम्स यासाठी व्यंगचित्रकार म्हणून आपली सेवा दिली व १९९६ पासून आजपर्यंत दि इंडियन एक्स्प्रेसमध्ये मुख्य व्यंगचित्रकार म्हणून काम करत आहेत.

त्यांनी १९९७ मध्ये चित्रात्मक (ग्राफिक) कादंबरी 'फ्री इंडिया' ही इंडियन एक्स्प्रेससाठी तयार केली. त्यांची व्यंगचित्रे टोकियो व फ्रान्स व भारतमध्ये अनेक ठिकाणी प्रदर्शित झाली आहेत.

त्यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्टून्स या संस्थेने २००९ मध्ये (लाइफ टाइम अचिव्हमेंट) जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे.

दूरदर्शनने २००२ मध्ये तयार केलेल्या 'एमिनंट कार्टूनिस्ट ऑफ इंडिया' या डॉक्युमेंटरी सिरीजमध्ये उन्नी यांच्यावरही लाइट, फ्लॅश, ॲक्शन या शब्दांची उधळण झाली आहे.

व्यंगचित्रकलेच्या व्यवसायात असताना काही चांगले–वाईट अनुभव आले का, या प्रश्नाचे उत्तर देताना उन्नी म्हणतात, ''तसे पाहिले तर माझे जीवन एका सपाट पातळीवर चालले आहे. त्याला चढ–उतार (अनुभवाचे) फारसे आले नाहीत. कोणी चांगले–वाईट म्हणाले तर ऐकतो व सोडून देतो. त्यामुळे सांगण्यासारखे काही नाही. मनासारखे व्यंगचित्र तयार झाले की शांत झोपतो...''

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी–४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# मराठी भाषा एक मानसिक द्वंद्व!

रविराज गंधे

नदीचा प्रवाह आणि भाषा ही सातत्यानं बदलत असते. संक्रमित होत असते. आज मराठी भाषेचा विचार करायचा झाला तर तो ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा साहित्यिक दृष्ट्या भावनिक होऊन किंवा वृथा अभिमान बाळगून करता येणार नाही.

मराठी भाषेचा विचार करताना आपल्याला ढोबळमानानं दोन प्रकारच्या भाषांचा विचार करावा लागतो. एक रोजच्या दैनंदिन व्यवहारातील मराठी आणि दुसरी अभिजात सौंदर्यपूर्ण साहित्यप्रचुर मराठी भाषा. आज मराठी भाषेची जी दैन्यावस्था झाल्यासारखी वाटते तिचं मूळ हे आपण मराठी भाषेचा विकास, प्रसार आणि संवर्धन यांची सांगड मराठी साहित्याशी आणि त्याच्या अभिजातपणाशी घालत गेल्यामुळे झाली की काय, असं वाटतं. कारण मराठी भाषा म्हटली की आपण साहित्यिक प्रेरणांचा आधार घेतो. आपल्या शालेय शिक्षणामध्ये मराठी भाषेची ओळख थोडीशी भयावह पद्धतीनं झालेली असते. मोरापंतांच्या केकावल्या, संस्कृत भाषेतील उतारे, 'राम' ह्या धातूचे प्रयोग, शार्दुलविक्रिडित, शिखरिणी वृत्तांतील काव्यांची अन् छंदांची ओळख, उपमा-अलंकार अन् उत्प्रेक्षा, यमकप्रचुर कविता हे प्रकार शिकवल्या गेलेल्या मराठी भाषेचा आमच्या पिढीतील लोकांनीही धसका घेतला होता, मग आजच्या पिढीची बातच सोडा! भाषेचा लळा-जिव्हाळा ज्या वयात लागतो त्या वयात ती साधी-सोपी, मनाला भिडणारी, मुलांच्या-तरुणांच्या भवताल आणि भावविश्वाला साद घालणारी अशीच हवी. ती तशी न शिकवली गेल्यानं मराठी भाषेविषयी विद्यार्थ्यांची अन् सामान्यांची गोडी कमी होत गेली. तिथूनच मराठी भाषेला ओहोटी लागायला सुरुवात झाली. इंग्रजीचं आक्रमण हा नंतरचा भाग! ज्ञानेश्वरांच्या अलौकिक प्रतिभेनं कोट्यवधी मराठी मनांमध्ये श्रद्धाभाव-भक्तिभाव निर्माण केला, परंतु ज्ञानेश्वरांच्या अर्थगर्भ ओव्यांचा बोध अजूनही सर्वसामान्यांना नीटसा होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्या तुलनेत तुकारामांचे अभंग, रामदासांचे श्लोक, एकनाथांची भारुडं जनसामान्यांना जवळची, आपली वाटतात. कारण सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनातले, त्याच्या स्वभावाचे, सवयीचे अनेक दाखले देत शिकवणी सांगितलेल्या असतात. भाषेची सुलभता, सहजता हा भाषाविकासाचा, प्रचाराचा पाया असतो. दुर्दैवानं आपल्याला सदैव पांडित्यपूर्ण, संस्कृतप्रचुर मराठीचीच दुर्बोध ओळख करून देण्यात आली. ज्यांना साहित्याची-वाचनाची आवड नाही, मराठी भाषेची गोडी नाही त्यांना ती जवळची वाटली नाही हे सत्य आहे.

ज्या ब्रिटिशांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधी मावळत नव्हता त्या इंग्रजांची बुद्धिमत्ता, व्यावहारिक कौशल्य, संशोधक वृत्ती, आणि अथक परिश्रम करण्याची सवय ह्या गुणविशेषांबरोबरच एक महत्त्वाचा गुण त्यांच्याकडे होता तो म्हणजे इंग्रजी भाषेचं प्रेम आणि अभिमान! साडेतीनशे

वर्षांपूर्वी इंग्रजांनी भारतावर राज्य करायला सुरुवात केली तेव्हा अठरापगड जाती-जमातींच्या, विविध धर्म-संस्कृती, रुढी-परंपरा जपणाऱ्या भारतीयांना भाषिकदृष्ट्या एकसंध कसं करावं हा मोठाच प्रश्न इंग्रजांपुढे होता. लॉर्ड मेकॉलेनं त्यावेळी इंग्रजांना सल्ला दिला, की ''भारतीयांवर राज्य करायचं असेल तर इंग्रजी भाषेची सक्ती करणं गरजेचं आहे. प्रशासनाची, व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा इंग्रजी हीच असायला हवी. प्रादेशिक आणि लोकभाषेतून शिक्षण-व्यवहार झाले तर लोक पटकन साक्षर होतील. ज्ञानी होऊन ते संघटित होतील आणि आपलं अस्तित्व धोक्यात येईल.'' ह्या चाणक्य-नीतीमुळे इंग्रजी ही ज्ञानभाषा-व्यवहाराची भाषा झाली आणि अन्य भारतीय भाषा प्रादेशिक व बोलीभाषा म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. तीच खरी वेळ होती भारतीय भाषा ज्ञानभाषा होण्याची. ती न झाल्यानं भारतीय समाज शेकडो वर्षं जगाच्या ज्ञानापासून वंचित राहिला. मूठभरांच्या इंग्रजी ज्ञानामुळे सामान्य माणसाचं मागासलेपण दूर होऊ शकलं नाही.

दर दहा कोसांवर ज्या देशात भाषा बदलते तिथे नेमकी कुठली भाषा प्रमाणभाषा म्हणून ठरवणार, कशी रुजवणार? ह्या प्रश्नाचं उत्तर आजही आपल्याकडे नाही. स्वातंत्र्यचळवळीच्या काळात आपल्या देशभक्तांचा, स्वातंत्र्यसेनानींचा मोठा कालखंड आणि शक्ती ही ब्रिटिशांशी लढण्यात खर्ची पडली. 'स्वदेशी'चं वारं देशभर जरी पसरलं असलं तरी येणाऱ्या काळात प्रमाणभाषा अथवा ज्ञानभाषा कुठली असावी याविषयी फारसं विचारमंथन झालेलं नव्हतं! कदाचित त्यावेळी ब्रिटिशांची चाकरी करण्यात, इंग्लंडमध्ये जाऊन बॅरिस्टर होऊन 'सर' किताब मिळवून वकिली करण्यात लोक धन्यता मानत. ब्रिटिशांची भाषा आणि जीवनशैली आत्मसात करण्यात भारतीयांना कौतुक आणि मोठेपणा वाटे. आजही ती मानसिकता कायम आहे. ज्ञानार्जन करण्यासाठी इंग्रजी आत्मसात करणं गरजेचं होतं हे सत्य होतं, परंतु ह्या वाघिणीच्या दुधाचं कोडकौतुक करण्यात प्रादेशिक भाषेच्या विकासाचा, अस्मितेचा विसर आपल्याला पडला, असे वाटते. विविध राज्यांतील वैविध्यपूर्ण लोकजीवन, संस्कृती आणि भाषा यांचं वैचित्र्य आणि वैशिष्ट्य जपण्याच्या अमेरिकी आग्रहामुळे कुठलीही एक भारतीय भाषा प्रातिनिधिक होऊ शकली नाही. आणि आता जागतिकीकणाचे वारे वाहू लागल्यावर तो आग्रह कालबाह्य आणि निरुपयोगी वाटू लागला. खरं तर आता पल्ला गाठायला फार उशीर झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

जी मंडळी मराठी भाषेत छान बोलतात, लिहितात आणि पुस्तकं काढतात त्यांना मराठी भाषेच्या संदर्भात सगळं आलबेल आणि हिरवंगार आहे असंच वाटतं. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर घसरलेल्या मराठीचा जो टक्का आहे त्यास सीमित वर्गाची ही भावना आहे. बाकी कोट्यवधींच्या महाराष्ट्रातील मिश्रभाषेच्या समाजाला त्याचं फारसं सोयरसुतक नाही. तो सोयीसोयीनं, गरजेनुसार सर्व भाषांचा वापर करत व्यवहार करत आहे. आज मराठी भाषेची अवस्था दिवाळखोरीत निघालेल्या बँकेसारखी झाली आहे.

हे सर्व लिहिण्याचं कारण असं की नुकतीच मराठी भाषा संचालनालयाच्या वतीनं डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि सतीश काळसेकर यांनी मुंबईत काही भाषाप्रेमी जाणकार मंडळींची बैठक बोलावली होती. मराठी भाषेच्या विकासविषयक धोरणांचा एक आराखडा तयार करून शासनाला सादर करायचा आहे. त्या बैठकीला उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली. भाषाविकासाच्या अंगानं खूप मौलिक आणि मूलभूत विचारमंथन त्यात झालं. यामध्ये रामदास भटकळ, वसंत पाटणकर, प्रेमानंद गज्वी, दीपक पवार, अरुण फडके, उज्ज्वला मेहेंदळे आदी अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. यामध्ये राज्यशासनाची मराठीविषयक उदासीनता, बालवाडीपासून पुढील सर्व शिक्षणक्रमांत सक्तीचे मराठी, मराठी व्याकरणकोशाची निर्मिती, युनिकोडचा वापर, मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी कायदा, विविध भाषाविषयक प्रकल्प, मराठीतून संभाषणाचा आग्रह, अमराठींना मराठी शिकवण्याची चळवळ असे अनेकविध मुद्दे सुचवले गेले.

घोडा का अडला? भाकरी का करपली, तर ती वेळच न फिरवल्यानं, असं बहिणाबाई आपल्याला सांगून गेल्या. तसंच काही गोष्टी ह्या समाजात वेळीच रुजवाव्या लागतात. तरच त्या प्रातिनिधिक स्वरूप धारण करतात. त्या गोष्टी आवडीच्या न होता गरजेच्या होतात. नदीचा प्रवाह आणि भाषा ही सातत्यानं बदलत असते. संक्रमित होत असते. आज मराठी भाषेचा विचार करायचा झाला तर तो ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा साहित्यिक दृष्ट्या भावनिक होऊन किंवा वृथा अभिमान बाळगून करता येणार नाही. जागतिकीकरणच्या एकूण बदललेल्या परिप्रेक्ष्यात याचा विचार करावा लागेल. आज सर्वच देशांतील त्या त्या भाषेचं अभिजात सौंदर्य आणि दर्जा कमी-अधिक प्रमाणात ढासळत चालला आहे. शेक्सपीयर आणि बर्नार्ड शॉच्या काळातील अस्सल युरोपीय इंग्रजी आज अस्तित्वात नाही. चीन, जपान, जर्मनीमध्ये हीच अवस्था आहे. प्रत्येक भाषेत काळागणिक सोपे, साधे

बोलीभाषेतील बदल होत गेले. लोकांना ते भावले. त्यांनी ते आपलेसे केले. दैनंदिन बोलण्यात ते त्याचा वापर सर्रास करू लागले. आज आपली तरुणाईची मराठी भाषा पाहिली तर तंत्रज्ञानाच्या परिभाषेनं युक्त बहुभाषी आणि सांकेतिक अशी झालेली दिसते. उदाहरणार्थ, हाय डूड, सेंटी, ओ शीट, कूल यार, डाउन मार्केट अशा इंग्रजाळलेल्या शब्दांचा वापर अहोरात्र होत असतो. एक लग्नाळू मुलगी तिला पाहायला आलेल्या मुलाला 'तुमच्या घरी किती डस्ट बिन (म्हातारी माणसं) आहेत!' असं विचारते तेव्हा संस्कार आणि भाषा दोन्ही लयाला गेलेल्या आपल्याला दिसतात. थोडक्यात, ही भाषा फंडू, हॉट अन् सिझलिंग वगैरे झाली आहे. त्याचं प्रतिबिंब आपल्याला सिनेमा, नाटक, वर्तमानपत्र, टीव्ही आदी प्रसारमाध्यमांत पाहायला मिळतं. अशा भयावह स्थितीत कुठली डोंबलाची प्रमाण भाषा आणणार? आणि मुळात लोकांना तिची गरज तरी वाटते का?

मराठी भाषेच्या विकासाचा-प्रसाराचा प्रश्न हा आपल्या अस्मितेशी निगडित आहे; असं बऱ्याच जणांना वाटतं. ती अस्मिता दुकानांवर मराठी पाट्या लावण्यात अन् अमराठी सेलिब्रिटींना मोडकंतोडकं मराठी बोलायला लावण्यात धन्यता मानते. भाषेच्या अस्मितेचा प्रश्न हा खरं तर राष्ट्रीय पातळीवर असायला हवा. तसा तो नाही. गुगलसारख्या महाकाय कंपन्यांना चीन, जपान, सौदी अरेबिया ह्या देशांनी आमच्या भाषेत जर तुमचं सॉफ्टवेअर देणार असाल तर आम्ही तुम्हाला आमच्या देशात प्रवेश देऊ असं ठणकावून सांगितलं. आपल्याकडे प्रमाणभाषा नसल्यानं ते शक्य नाही. अर्थात विविध क्षेत्रातील तंत्रज्ञान विकणाऱ्या कंपन्यांनी व्यावहारिक फायद्यासाठी का होईना, प्रादेशिक भाषेत तंत्रज्ञान द्यायला सुरुवात केली आहे, ही समाधानाची बाब आहे. परंतु ती फक्त संगणक आणि दूरसंचार सेवांपुरती मर्यादित असता कामा नये. आजही वैद्यकीय, अंतराळ, अणुसंशोधन, जैवतंत्रज्ञान आदी विविध क्षेत्रांतील ज्ञानार्जन इंग्रजी भाषेतूनच करावं लागतं. सरकारनं हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा देऊन तिच्या प्रशासनातील वापराचा आग्रह धरला आहे. सर्व केंद्रीय आणि राज्यस्तरावरील शासकीय कारभार हा बहुतांशी इंग्रजीमधूनच होतो. भारतातील कोट्यवधी लोकांना हिंदी येत नाही आणि समजतही नाही. दक्षिणेकडे हा अनुभव येतो. बहुसंख्य लोक कामचलाऊ हिंदी बोलतात. आजही देशातल्या महामार्ग, बसस्थानकं, विमानतळ, बँका, कंपन्या इथं प्रादेशिक भाषांबरोबर इंग्रजीचा वापर अपरिहार्य झालेला दिसतो. परंतु ह्यामध्ये प्रादेशिक भाषेचा वापर हा आंतरिक उमाळ्यातून आलेला नसून स्थानिक राजकीय दहशतीतून आलेला पाहायला मिळतो. व्यावसायिक मंडळीदेखील बदललेल्या जीवनशैलीला अनुसरून इंग्रजी भाषेचा वापर करताना दिसतात. त्यातून निर्माण झालेल्या मानसिकतेतून सप्रेंच्या दुकानाचं सप्रेज, चिंतामणीज् असं भ्रष्ट अन् केविलवाणं 'नामकरण' झालेलं आपण पाहतो.

एकूणच आपल्या समाजाला आता धार्मिक विधीसाठी आणि तथाकथित संस्कारांसाठी मराठी भाषा हवी असते. एरवी ज्ञान-विज्ञान, व्यापार आणि अर्थार्जनासाठी इंग्रजीचा वापर करणं आपण नैसर्गिकच मानतो. आज चीन, जर्मनी, रशिया, जपान आदी अनेक देश जगभरामध्ये कल्चरल डिप्लोमसीचा भाग म्हणून आपापल्या मातृभाषेच्या विकास आणि प्रसारासाठी करोडो रुपये खर्च करत आहेत. त्याद्वारे त्यांना आपल्या भाषेचा जगभर डंका पिटवत अस्मिता जपायची आहे आणि व्यापारी हितही साधायचं आहे. आपल्याकडे यासंदर्भात भयाण शांतता आहे. ह्या जीवघेण्या शांततेमुळे आपल्या भाषा हळूहळू लोप पावतील. त्यांचं अभिजात सौंदर्य नाहीसं होईल. इतिहासाची खूण म्हणून त्या बाकी राहतील. या प्रक्रियेची सुरुवात कधीच झाली आहे. त्याचा शेवट काय आणि कसा होतो हे पाहायचं बाकी आहे. भविष्यकाळात, जसं शास्त्रीय संगीताचा, अभिजात चित्रकलेचा आनंद घेणारे मूठभर जाणकार रसिक असतात तसेच मूठभर भाषेचा लळा-जिव्हाळा असलेले लोक भाषेचा उत्सव आपला आपणच साजरा करत राहतील हे वास्तव नाकारता येणार नाही. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत जगाशी पैज लावण्यास निघालेल्या मराठी समाजाला आपल्या 'अमृताशी पैज' जिंकणाऱ्या मराठीची थोडीशी ओळख जरी जगाला करून देता आली तरी अर्धी लढाई जिंकली असं म्हणावं लागेल. तेवढंच आता आपल्या हाती आहे. मराठी समाजाला त्याच्या मनात असलेल्या भाषाविषयक मानसिक द्विधा मन:स्थितीमधून आणि द्वंद्वामधून निर्णायकरीत्या यथायोग्य पद्धतीनं बाहेर काढणं ही काळाची गरज आहे.

**– रविराज गंधे**
५८/८ बसंतस्मृती, पांडुरंगवाडी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com

# बदलतं मराठी नाटक

**राजीव जोशी**

ताज्या जिवंत माध्यमाची विलक्षण ओढ सकस नाट्यानुभव दिला तरच टिकून राहील आणि प्रेक्षकांना घराघरात मिळणारी टीव्हीवरची बाजारू करमणूक बाजूला ठेवू शकेल. त्यामुळेच ही नाटकाची, नाट्यकलेची जादू अजरामर राहील यात शंका नाही.

१९८० नंतरच्या दशकाकडे पाहिले तर आधीचे कानेटकर-दळवी-मतकरी हे यशस्वी नाटककार गाजत होते. त्यानंतर अशोक पाटोळे-प्र.ल. मयेकर हेही लक्षणीय कामगिरी करत होते. छबिलदास रंगमंचावर आणि एकूणच समांतर रंगभूमीवर वेगळे प्रयोग करणारे, नवीन विषय-आशय मांडणारे शफाअत खान, प्रशांत दळवी हेही व्यावसायिकतेवर स्वीकारले जात होते. व्यावसायिक प्रेक्षक म्हणजे त्यांना कानेटकरी छापातील किंवा कौटुंबिक नाटकेच आवडतात हा गैरसमज हळूहळू खोटा ठरत गेला. समस्याप्रधान नाटके, फार्स - अशा चौकटीतून 'नाटक' मोकळे होत होते. स्पर्धा रंगभूमी विशेषत: आंतर महाविद्यालयीन, राज्य नाट्यस्पर्धा, आंतरबँक आणि आंतरगिरणी, आळतेकर-कोल्हटकर अशा स्पर्धांतून ताजे, तरुण कलाकार घडत होते. नवे विषय मांडले जात होते. तद्दन बाजाची व्यावसायिक नाटके मागे पडत होती. बेतलेली, काळ्या-पांढऱ्याचा संघर्ष मांडणारी, ठरीव ठशांच्या व्यक्तिरेखा उभी करणारी व चवीला विनोद पेरणारी नाटके यांचा नवा प्रेक्षकवर्ग घडत होता. एकीकडे टीव्ही माध्यमाचा घराघरावर वाढणारा प्रभाव, घरबसल्या मिळणारी स्वस्त करमणूक ह्यापलीकडे नाटकात काहीतरी 'वेगळे' हवे ही अपेक्षाच नावीन्याची गरज निर्माण करणारी ठरली.

महानिर्वाण-महापूर अशी अ-पारंपरिक, देशी ब्लॅक कॉमेडी नाटके लिहिणारे सतीश आळेकर 'व्यावसायिक' नाटककार नाही झाले. परंतु त्यांचा 'दुसरा सामना' वेगळी वाट चोखाळणारे ठरले. विजय तेंडुलकरांनी निर्माण केलेली नवतेची पायवाट विस्तारू लागली होती. सुभाषितवजा टाळीबाज संवाद बेगडी वाटू लागले होते. 'घाशीराम'चे यश, 'अशी पाखरे येती'मधील निरागस प्रसन्नता ही कृत्रिम-कौटुंबिक ढाच्याच्या नाटकांना छेद देणारी होती. 'शांतता कोर्ट चालू आहे'ने धाडस केले, कन्यादान-कमला ह्या नाटकांनी तत्कालीन घटना आणि समस्यांवर उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. कथा-कादंबरीतून सकस व्यक्तिरेखा व प्रभावी कथानक मांडणारे साहित्यिक जयवंत दळवी हे 'महासागर', 'सावित्री', 'पुरुष', 'बॅरिस्टर' अशा नाटकांमुळे 'नाटककार' झाले. विजया मेहतांच्या दिग्दर्शन शैलीने समांतर-व्यावसायिकच्या तथाकथित सीमारेषा पुसल्या. एकांकिका हाताळून एखाददुसरे प्रायोगिक वा स्पर्धेचं नाटक लिहिणाऱ्या तरुणांना आपले नाटक लिहिण्याची प्रेरणा झाली. (एकीकडे तीन अंकी नाटकही संकोचून सुटसुटीत दोन अंकी होत होते!) 'कन्स्ट्रक्शन' आणि 'रायाची रापी' अशा सशक्त समाजभानाच्या एकांकिका लिहिणाऱ्या वामन तावडेंचे 'धिन्न' नाटक - स्मिता

पाटील, दिलीप कुलकर्णी व आशालता बावगावकर असा जुन्या-नव्या कलावंतांचा संगम साधणारे कलावंत आणि त्याद्वारे सदाशिव अमरापूरकर हा नट-दिग्दर्शक रंगभूमीला लाभला.

दिग्दर्शक कमलाकर सारंग यांच्या प्रत्येक नाटकाचा वेगळा ठसा होता. 'दोघी', 'सखाराम बाईंडर', 'सूर्यास्त', 'बेबी' ही नाटके संघर्षातून जनमानसात पोचत होती. बंदी-राजकीय दबाव अशा अडचणींतून चोखंदळ प्रेक्षकांची अभिरुची घडत होती. तरुण दमाचे दिग्दर्शक म्हणून दिलीप कोल्हटकर, विजय केंकरे, विनय आपटे, वामन केंद्रे ही दिग्दर्शक पिढी प्रयोग करून पुढे जात होती. त्यांना संधी देणारे मोहन तोंडवळकर, मोहन वाघ असे काही मूठभर निर्माते होते. 'रंगायन'चा वसा-वारसा घेऊन गोवा हिंदू, कलावैभव, श्री चिंतामणी, चंद्रलेखा, माऊली ह्या संस्था नवीन बाजाची नाटके करू लागल्या.



'बॅरिस्टर' साकारताना शैलेश दातार

'दगड का माती?', 'पौगंड' अशी प्रायोगिक नाटके करणाऱ्या प्रशांत दळवीच्या 'चारचौघी'ने प्रगत विचारांच्या स्त्रियांचा, अविवाहित मुलीच्या मैत्रीचा संघर्ष उभा केला आणि तो प्रेक्षकाने उत्साहाने स्वीकारला. जयवंत दळवींच्या महासागरमधील मध्यमवर्गीय चंपू, सावित्रीतील आधुनिक विचारांची सावित्री, 'चारचौघी'तील व्यक्तिरेखांनी स्त्रीविषयक चाकोरी दूर होण्यास मदत झाली व प्रेक्षकांसमोर सिंधू, ताई, वहिनी ह्यापेक्षा प्रगल्भ स्त्री भूमिका येऊ लागल्या हे एक महत्त्वाचे कॉन्ट्रिब्युशन म्हणता येईल.

विजय केंकरे, वामन केंद्रे आणि चंद्रकांत कुलकर्णी ह्या दिग्दर्शक त्रयीने चाकोरी मोडत प्रेक्षकांना नवे दिले. 'नातीगोती'मधील दाहक वास्तव-भावनांचा कोंडमारा सहन करणारे पती-पत्नी, राजकारण-भ्रष्टाचार ह्याचा सघन वैचारिक पैलू दर्शवणारे 'एक झुंज वाऱ्याशी', मूल नसलेल्या जोडप्याच्या मनाच्या द्वंद्वाचे 'ध्यानीमनी', धर्म-श्रद्धा ह्याचा ऊहापोह करणारे 'ज्याचा त्याचा प्रश्न' अशी काही धाडसी नाटके प्रेक्षकांचा अनुनय न करता, तरीही पचतील अशा ढंगाने सादर केली.

स्पर्धेतून येणाऱ्या नव्या फळीपैकी 'अलवरा डाकू', 'देवस्की' करणाऱ्या पुरू बेर्डेने 'टुरटूर' नाटकाद्वारे जणू स्पर्धेच्या नाटकाला वेगवान, धमाल, व्यावसायिक आकृतिबंधात बसवले. नाटक चालवण्यासाठी खऱ्या अर्थाने 'जाहिरात तंत्र' वापरले गेले. त्याआधी नानासाहेब शिरगोपीकर ट्रिक सीन्समुळे किंवा मोहन वाघांसारखे कल्पक जाहिरातीने आपली नाटके प्रेक्षकांपर्यंत पोचवत होते. रंगभूमी व्यावसायिक करण्यासाठी अशा स्थित्यंतराचा नक्कीच उपयोग झाला. सरधोपट सादरीकरण, सामान्य निर्मितीमूल्य, ठरावीक विषयांच्या ढाच्यातून 'मराठी नाटक' बाहेर पडले होते, हे मात्र खरे.

'दिवा जळू दे'चा प्रेक्षकवर्ग कमी होत गेला. विजया मेहतांचे 'शांकुतल' किंवा सई परांजपेंचे 'जास्वंदी' आणि 'खेळ माझा मांडू दे' ह्यातून बदलता समाज, नवे प्रश्न मांडले जात होते. टिपिकल नाटकांचा 'धंदा' कमी होत होता.

विनोदी नाटकांमध्ये 'फार्स'च्या ढोबळ कॉप्या निघाल्या, त्या काही प्रेक्षकांना भावल्या नाहीत. भेंडे-बबन प्रभूंच्या फार्सची सर सोम्या-गोम्यांना कशी येणार? राजा गोसावी-शरद तळवलकर ही पिढी 'रिटायर' झाली, त्यांची जागा स्लॅपस्टीकवाल्या नटांनी घेतली. अशोक सराफ, शशिकांत निकते, यशवंत दत्त, अमोल पालेकर, दिलीप प्रभावळकर, अरुण नलावडे, कुलदीप पवार, जनार्दन लवंगारे, सतीश तारे,

आंनदा नांदोस्कर आणि ताज्या दमाचे पुष्कर, अतुल, प्रसाद, वैभव मांगले, भाऊ कदम प्रेक्षकप्रिय राहिले. टीव्हीवरील स्टॅण्ड-अप शोंचे प्रमाण वाढले.

बेडरूमस्टाइल फार्स, दिवाणखान्यातील विनोद मागे पडून 'ऑल दि बेस्ट', 'बॉम्बे मेरी जान' अशा नाटकांतून देवेंद्र पेम आणि केदार शिंदे ह्या तरुण लेखक-दिग्दर्शकांनी आजची वेगवान कॉमेडी आणली. संतोष पवारने तर नाव नसलेल्या तरुण मुला-मुलींना घेऊन ज्याप्रमाणे कॉलेज स्पर्धा केल्या, तशीच नाटके व्यावसायिक हिट केली. 'यदाकदाचित'ने धुमाकूळ घातला. भरत जाधवचे 'सही रे सही' हे लॅण्डमार्क ठरले! पीजे आणि पंचेसवाली नाटके वाढली.

सामाजिक-राजकीय स्तरावरील नाटकांमध्ये 'गांधी-आंबेडकर', 'गांधी विरुद्ध गांधी', 'तांदूळ निवडता निवडता', 'मी राष्ट्रपती', 'सूर्यास्त', 'कस्तुरबा' ह्या नाटकांनी कमी-अधिक प्रमाणात व्यावसायिक यश चाखले. 'उद्ध्वस्त धर्मशाळा', 'जुलूस' ह्या नाटकांच्या मार्गाने दलपतसिंह, सत्यशोधक, बया दार उघड! शिवाजी - भीमनगर मोहल्ला अशा काही मोजक्या वेगळ्या धाटणीच्या नाटकांना प्रेक्षक प्रतिसाद लाभला. राजकीय-सामाजिक क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्त्वाच्या खासगी-सार्वजनिक आयुष्यावरील नाटकेही अधिक सखोल स्वरूपात मांडली गेली. पूर्वीच्या चरित्र नाटकातील आखीवपणा आणि व्यावसायिक बाज मागे पडून त्याऐवजी अस्सल स्वरूपातील व्यक्तिचित्रण, संघर्ष आणि सामाजिक मूल्यांचा व्यापक विचार होत राहिला.

रंगभूमीवर 'क्लासिक', 'अभिजात' नाटकेदेखील डौलात चालू होती. 'संगीत सौभद्र', 'एकच प्याला' ही नव्या-जुन्या संचात चालू असायची. 'कट्यार काळजात घुसली'ची भुरळ एका प्रेक्षकपिढीला पडलेली होती. पण वसंतराव देशपांडे ह्यांच्या तोडीचा 'नट' मिळणार नाही, गायकी पेलणार कोण? म्हणून त्या नाटकाचे पुनरुज्जीवन होऊ शकले नव्हते. पण राहुल देशपांडे व सुबोध भावे ह्यांच्या मिलाफातून ते साकारले. ते करताना पूर्वीची कट्यार, आजच्या प्रेक्षकांच्या अपेक्षांचा अंदाज घेऊन, सुटसुटीत रूपात मांडले. त्याचा परिणाम म्हणून प्रेक्षकांनी त्याला उत्स्फूर्त दाद व साथ दिली.

पूर्वीदेखील गद्य व पद्य नाटकांना नव्या रूपात पुनरुज्जीवित केले गेले. सुनील बर्वेच्या 'सुबक' पद्धतीच्या पंचवीस प्रयोगांच्या तंत्राला यश लाभले. पण तसा उपक्रम, जुन्या काही क्लासिक नाटकांना नव्याने सादर करण्याचे 'शिवधनुष्य' तितके यशस्वी ठरले नाही. आजही सुबोध भावेसारखा अपवाद सोडता सक्षम भूमिका करणारे नट कमी, कॉमेडीवालेच अधिक. उदाहरणार्थ - 'तो मी नव्हेच'मध्ये लोकांनी पंत प्रभाकर पणशीकरांव्यतिरिक्त कोणालाच स्वीकारले नाही. 'ती फुलराणी'चा वेगळ्या धाटणीचा हा केवळ प्रयोगच ठरला. त्याला प्रेक्षकपसंती लाभली नाही. हीच गोष्ट 'नटसम्राट' नाटकाची. 'लेकुरे' म्हटल्यावर दया डोंगरे-श्रीकांत मोघे ही फेमस जोडी पण नव्या जोडीलाही प्रेक्षकांनी स्वीकारले. मात्र नवीन 'लग्नाच्या बेडी'तील रश्मी-'अपिल' झाली नाही. डॉ. काशिनाथ घाणेकर, सतीश दुभाषी यांनी अजरामर केलेल्या काही भूमिका 'अनटचच' राहिल्या. सुयोगचे 'मोरुची मावशी' हे नाटख उडती गाणी व वेगवान सादरीकरण यामुळे तरुणांना भावले.

**दोनपात्री नाटकांचे युग!**

पूर्वीच्या काळी ताकदीचे अभिनेते-अभिनेत्री असूनही दोन-तीन पात्रांची नाटके तितकीशी होत नव्हती. लालन सारंग-जयराम हर्डीकर यांचे 'आरोप' हे नाटक, डॉ. लागूंचे 'सूर्य पाहिलेला माणूस' आणि 'जयप्रकाशांची डायरी' ही अपवादात्मक उदाहरणे. नंतर मात्र मॉबही व्यावसायिकवर चालला. संतोष पवारच्या आधी 'पाहिजे जातीचे', 'घाशीराम', 'महानिर्वाण' ही बहुपात्री नाटके आलेली होती.

परंतु अचानक 'यू टर्न' हे दोन पात्री नाटक क्लिक झाले. डॉ. गिरीश ओक-इला भाटे. ही जोडी प्रेक्षकांना आवडली. त्याआधी विक्रम गोखले-स्वाती चिटणीस यांचे 'संकेत मीलनाचा' हेही गाजले होते. आनंद म्हसवेकरच्या दुसऱ्या नाटकात सुहास जोशी, विक्रम गोखले ही स्टार जोडी चमकली. दोन पुरुषपात्री विनोदी नाटक म्हणून अशोक पाटोळ्यांचे 'एक चावट संध्याकाळ' गाजले.

प्रायोगिकवर आलेल्या 'फायनल ड्राफ्ट' नंतर त्याच टीमसह व्यावसायिक रंगमंचावर आले आणि तिथे गिरीश जोशी-मुक्ता बर्वे ही कलावंत जोडी तितकीच यशस्वी ठरली. आज सिरियल्स-सिनेमामुळे मुक्ता बर्वे लाखो लोकांना कळली आणि आवडू लागली. मुक्ताचा प्रभावी मुद्राभिनय, व्यक्तिरेखा सजीव करण्याची नैसर्गिक शैली आणि शब्दफेकीचे सामर्थ्य हे गुण वादातीतच आहेत, हे 'फायनल ड्राफ्ट'मधून दिसले.

एकांकिकांची 'नाटके' होण्याचे प्रमाण वाढले. परिणामी अनेक नवे नाटककार घडले. सादरीकरणाला, तंत्राला आणि वेगाला महत्त्व आल्याने मूळचे लेखकाचे नाटक आता दिग्दर्शकाच्या हाती गेले आहे. तालमीतले इम्प्रोवायझेशन



'सूर्याची पिल्ले' नव्या संचात

रुळले, तशी तालीममास्तरकी निकालात निघाली. दिग्दर्शक हे पूर्ण वेळ व्यावसायिक असल्याने त्यांनाही दर प्रयोगाची 'नाईट' मिळू लागली. लक्ष्मीकांत बेर्डेसारख्या मुख्य नटाला- गुजराती रंगभूमीप्रमाणे नाईट प्लस नफ्यातील टक्का अशी पद्धत आपल्याकडेही आली. अनुरूप नेपथ्य-प्रकाश करणारे नव्या सृजनतेचे प्रदीप मुळ्ये, राजन भिसे, शीतल तळपदे, अरुण कानविंदे, भूषण देसाई आदी आवश्यक घटक ठरले. नाटकाला पोषक असे पार्श्वसंगती, वेशभूषा करण्याची गरज आणि तशी समज असलेले कल्पक तंत्रज्ञ वाढू लागले. 'बॅरिस्टर ते प्रपोजल' असा नेपथ्याचा टप्पा पाहिला तरी आपल्याला लक्षात येईल. 'नांदी' नाट्यनिर्मितीसाठी चार निर्माते एकत्र येतात ही काळाची गरज आहे.

नाटक चालवण्यासाठी चांगला विषय आवश्यक, तरीही गर्दी खेचणारा भरत किंवा मकरंद हवाच! हेही समीकरण चालू आहे. विक्रम गोखले, संजय नार्वेकर, मोहन जोशी हे मुख्य नट सातत्याने नाटके करत असले तरी डॉ. घाणेकरांच्या नंतर हाऊसफुल्ल सम्राट म्हणून 'प्रशांत दामले' हा एकमेव विक्रमवीर नट म्हणता येईल. मच्छिंद्र कांबळेंच्या जाण्याने बोलीभाषेचा-विनोद, नट हरपला तरी मालवणी-आगरी भाषेतील नाटके येत राहिली. 'वऱ्हाड चाललंय'सारखे नाटक पुन्हा केले जाते आहे. करमणूकप्रधान 'जाऊ बाई जोरात'ने 'व्यवसाय' केला आणि 'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' व 'ठण्ठ'ने स्त्री-जीवनाची बाजू ठसठशीतपणे मांडली. केदार, देवेंद्र, पुरू बेर्डे यांच्या पाठोपाठ संतोष पवार, संजय पवार, राजेश देशपांडे यांनी लेखन-दिग्दर्शन करत नाटके केली.

जयंत पवार, अभिराम भडकमकर, प्रशांत दळवी, आनंद म्हसवेकर, शफाअत खान ह्यांच्या बरोबरीने क्षितिज पटवर्धन, अद्वैत दादरकर असे नवे-तरुण नाटककार आपली नाटके व्यावसायिकवर मांडत आहेत. ताजे दिग्दर्शक म्हणून अद्वैत दादरकर, समीर विद्वांस, सतीश मनवर ह्यांचा उल्लेख करता येईल. प्रेमानंद गज्वी, संभाजी भगत ह्यांची नाटके करमणूक न करता सामाजिक आशय मांडत राहिली. जयंत पवारच्या 'काय डेंजर सुटलाय वारा' नाटकाने मुंबईच्या घरांच्या, बदलत्या आर्थिकतेचा सामाजिक-सांस्कृतिक अंगाने वेध घेतला होता. प्रेक्षक बदलत होता. तरुणवर्ग नाटकाकडे येत राहिला हे ओळखून त्या ढंगाची नाटके लिहिणारे, दिग्दर्शन-निर्मिती करणारे ह्यांनी काळानुरूप केलेले बदल हेदेखील महत्त्वाचे आहेत. अशा लवचीक बदलत्या वातावरणामुळे मनस्विनी लता रवींद्रसारखी नाटककार - आपल्या स्त्रीविषयक जाणिवांच्या नाटकांनी इथे स्थिरावली जाते. (मात्र 'एका लग्नाच्या दुसरी गोष्ट' ह्या लोकप्रिय मालिकेची संवादलेखिका म्हणून अधिक प्रमाणात ओळखली जाते) रसिका जोशीने 'व्हाईट लिली' लिहिले-बसवले व अभिनयांकित केले. सुषमा देशपांडेचे संशोधन-लेखन-दिग्दर्शन असलेले 'बया दार उघड' ही उदाहरणे पाहिली तर स्त्री-पुरुष भेदभाव हा कलावंताबाबत मागे पडल्याचे जाणवते. पुरुष निर्मात्यांच्या भाऊगर्दीत लता नार्वेकर आणि स्मिता तळवलकर यांनी आपले स्थान निर्माण केले आहे. (हिंदी व्यावसायिक सिनेमा - विकी डोनर हा देखील एका स्त्रीनेच लिहिलेला आहे!) प्रतिमा कुलकर्णी ही चांगली दिग्दर्शिका आहे. इरावती कर्णिकनेही आपल्या लेखनाने अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

हे सगळे पाहता एक लक्षात येते, की प्रेक्षकाला सुजाण करण्याचे काम काही नाटकांनी नक्कीच केलेले आहे. त्यामुळेच तर काही अनवट-अवघड वाटणारी नाटकेही स्वीकारली गेली. त्यांचा प्रेक्षकवर्ग वाढला. रंगमंचाबाबत ही अशी सकारात्मक बाब घडत असताना टीव्ही प्रेक्षकांची आवड ही 'टीआरपी'ने ठरवली जाते. रंगमंचावर वेगळे करणारेच तिथे साचेबद्ध कामे करतात हा विरोधाभास-ही विसंगती आपल्या जीवननाट्याचे प्रतिरूपच मानायचे का?

ताज्या जिवंत माध्यमाची विलक्षण ओढ सकस नाट्यानुभव दिला तरच टिकून राहील आणि प्रेक्षकांना घराघरात मिळणारी टीव्हीवरची बाजारू करमणूक बाजूला ठेवू शकेल. त्यामुळेच ही नाटकाची, नाट्यकलेची जादू अजरामर राहील यात शंका नाही.

**- राजीव जोशी**

rmjoshi52@yahoo.co.in

# क्षितिज पश्चिमेचे

**कुमार केतकर** (पुस्तकाची प्रस्तावना)




लहानपणी इतिहास-भूगोलाचा अभ्यास करताना काही काही शब्दांचे अतिशय कुतूहल वाटत असे. पुढे अगदी दीर्घ काळ ते कुतूहल तसेच वाटत राहिले. पत्रकार झाल्यानंतरसुद्धा. त्या काळात कॉम्प्युटर, इंटरनेट, गुगल वगैरे काही नव्हते. पण एशियॅटिक लायब्ररी होती आणि काही स्कॉलर मंडळी. तरीही त्या शब्दांचा निश्चित अर्थ आणि उगम खात्रीलायक कुणी सांगू शकत नव्हते. थोडेसे 'क्लूज' मिळाले होते. पण सर्व संदर्भ मिळाले सुमारे १०-१५ वर्षांपूर्वी. 'वर्ल्ड वाइड वेब' - www- खऱ्या अर्थाने जागतिक झाल्यानंतर!

ते शब्द होते - विलायत आणि मतलई वारे! अजूनही एक शब्द होता, पण त्याचा अर्थ कॉलेजमध्येच स्पष्ट झाला होता. तो शब्द होता 'खुष्कीचा' मार्ग!

या शब्दांची आठवण झाली विनता कुलकर्णी यांच्या 'क्षितिज पश्चिमेचे' या पहिल्यावहिल्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिताना. पूर्वीच्या इतिहासाच्या पुस्तकात नेहमी सांगितले जात असे, की गांधीजी 'विलायते'ला गेले, पंडित नेहरू 'विलायते'त जाऊन शिकून आले. स्वातंत्र्यवीर सावरकरही 'विलायते'ला जाऊन बॅरिस्टर होऊन आले. 'बॅरिस्टर' पदवी म्हणजे कायद्याचे शिक्षण घेऊन वकील झाले, इतपत जुजबी ज्ञान होते. पण ही सर्व थोर मंडळी 'विलायते'ला म्हणजे नक्की कुठे जायची, हे कळायचे नाही. ते सर्व उच्च शिक्षण घेऊन येतात म्हणजे 'विलायत' हे विद्यापीठ आहे की काय? पण 'विलायत' नावाचा देश नव्हता वा विद्यापीठही नव्हते. मग ते कुठे जायचे? लंडनला म्हणजे इंग्लंडमध्ये ते जात असत, हे उघड होते. मग इंग्लंडचेच दुसरे नाव विलायत नाही? अर्थातच नाही (वा नसावे!)

पुढे जरा शोध घेतल्यानंतर कळले, की पूर्वी, म्हणजे सामुद्री मार्गाने भारतात येण्याचा 'शोध' लागण्याच्या अगोदर व्यापार होत असे तो 'खुष्की'च्या मार्गाने - म्हणजे भूप्रदेशातून - मजल-दरमजल करीत. तुर्कस्थान ऊर्फ टर्कीमधून पश्चिमेकडे म्हणजे युरोपात जाता येत असे. इस्तंबूलमधील एक पूल आजही आशिया व युरोप यांच्या सीमा दाखवतो. त्या पुलाच्या एका बाजूला उतरल्यावर आपण आशियात प्रवेश करतो आणि दुसऱ्या बाजूला उतरल्यावर युरोपात. तर अशा या तुर्कस्थानच्या आशिया-युरोप सीमेवर एक लहानसे व्यापारी गाव होते, त्याचे नाव 'विलायत'!

ते गाव ओलांडले की माणूस युरोपसाठी प्रस्थान ठेवीत असे. भारतीयांची पूर्वीची युरोपची ओळख झाली इंग्रजी राजवटीमुळे. ते सामुद्री मार्गाने आले होते (जो मार्ग वास्को-द-गामा या पोर्तुगीज साहसी खलाशाने शोधला होता.

वास्को-द-गामाला दक्षिण आफ्रिकेच्या टोकाशी पोहोचल्यावर हिंदुस्थानला कसे यायचे कळत नव्हते. त्याला तेथे एक गुजराती व्यापारी भेटला- १४९७मध्ये. त्याने वास्कोला सामुद्री दिशा सांगितल्या, पण त्यापूर्वी युरोपशी होणारा व्यापार खुष्कीच्या मार्गाने म्हणजे टर्की देशातून 'व्हाया विलायत' होत असे! असो.)

परंतु 'विलाया' हा अरबी शब्दही आहे आणि 'विलायत' हा शब्द पर्शियनही. (भारतातील पारशी पर्शिया म्हणजेच इराणमधून आले होते, त्यामुळे त्यांनीही हा शब्द रुजवला. उर्दूमध्येही तो शब्द आहे.) त्या भाषांमध्ये 'विलायत'चा अर्थ 'प्रांत' किंवा 'प्रशासकीय विभाग' असाही होतो. मात्र 'विलायत' म्हणजे 'परदेश' असेही प्रचलित झाले होते. म्हणून आपला देश सोडून परदेशात जाणे म्हणजे विलायतेला जाणे, असे मानले जाऊ लागले. तर अरबी भाषेत 'युनायटेड स्टेट्स' म्हणजे विलाया!

विनता कुलकर्णी १४ वर्षांपूर्वी अमेरिकेला गेल्या आणि तिकडच्याच झाल्या. म्हणजे पूर्वीच्या भाषेत 'विलायते'ला गेल्या. पूर्वेकडून पश्चिमेकडे गेल्या आणि आता त्याच पूर्व-पश्चिम पूल 'क्षितिज पश्चिमेचे' या पुस्तकाद्वारे बांधत आहेत. आता त्या थेट मुंबई-न्यू यॉर्क १४-१५ तास विमानप्रवास करून जाऊ शकतात. पण वास्को-द-गामासारख्या १४-१५व्या शतकातील खलाशांना सूर्य, चंद्र, वारे, हवामान यांच्या आधारे प्रवास करावा लागत असे. ईस्ट आफ्रिकेहून प्रवास करताना जे वारे सप्टेंबर ते नोव्हेंबर या काळात दक्षिणेकडे वाहत, त्यांना (विषुववृत्ताच्या प्रदेशातील) केन्यासारख्या देशात, त्यांच्या भाषेत 'मतलई वारे' म्हणत. ते वारे व्यापाऱ्यांच्या मदतीला येत म्हणून आपण भूगोलात त्यांना 'व्यापारी वारे' असे म्हणत असू.

आता जागतिकीकरणाच्या काळात तसे मतलई वारे आपल्या उपयोगाचे नाहीत. खुष्कीचे मार्ग आहेत, पण प्रवास मुख्यत: विमानाने होऊ शकतो आणि आताची विलायत म्हणजे सुशिक्षित, मध्यमवर्गीय भारतीयांच्या दृष्टिकोनातून अमेरिका!

अमेरिकेचे जगभर इतके आकर्षण का? तेथील समृद्धीमुळे, समर्थ सत्तेमुळे, स्वातंत्र्यामुळे? की हॉलिवूड, मॅक्डोनाल्ड, मायकेल जॅक्सनमुळे? की नायगारा, ग्रँड कॅन्यन, कॅलिफोर्नियामुळे? की विद्येची- संशोधनाची राजधानी आणि ज्ञानाची मक्का म्हणून?

कारणे ही व इतरही काही आहेत-असतील, पण अमेरिकेत प्रदीर्घ काळ स्थायिक झालेले आणि तरीही भारताशी-महाराष्ट्राशी नाळ जोडलेले दिलीप चित्रे म्हणतात त्याप्रमाणे अमेरिका ही 'अलिबाबाची गुहा' आहे. एकदा आत शिरले की बाहेर पडणे कठीण. काही जण बाहेर आले खरे, पण त्यातील बरेच अपरिहार्यतेपोटी. बाकी बहुतेक तेथेच राहिले – हालअपेष्टा सहन करून, थंडी-पावसाळे-हिमवर्षाव सोसून, सांस्कृतिक संघर्ष झेलत आणि कौटुंबिक समस्यांना अंगावर घेत, वेगळे राजकारण आणि समाजकारण उमजून घेत त्यांनी आपल्या जीवनाला अमेरिकन आकार दिला (बहुतेक वेळा भारतीयत्व – आणि मराठी बाणा – गाभाऱ्यात ठेवून).

विनता कुलकर्णी यांनी या पश्चिमेच्या क्षितिजावर (कॅनडा व अमेरिकेत) भेटलेल्या ४०-४५ व्यक्तींचा जीवनपरिचय या पुस्तकात करून दिला आहे. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे ही संख्या कितीतरी अधिक होऊ शकली असती. आणखी बऱ्याच कर्तबगार मराठी माणसांची भेट त्या घडवून आणू शकल्या असत्या. पण शब्दमर्यादा, पृष्ठमर्यादा आणि कालमर्यादा लक्षात घेऊन त्यांनी ती संख्या मर्यादित ठेवली आहे. अर्थातच त्यामुळे त्याचे प्रातिनिधिक स्वरूप अजिबात कमी होत नाही.

मी स्वत: गेल्या २५ वर्षांत साधारणपणे वीसेक वेळा अमेरिकेत गेलो आहे. मुख्यत: पत्रकार म्हणून आणि काही वर्षे 'व्हिजिटिंग फॅकल्टी' म्हणून तेथील विद्यापीठांमध्ये. कधी बीएमएमच्या अधिवेशनांसाठी, तर कधी महाराष्ट्र फाउंडेशनच्या अनेकविध कार्यक्रमांना हजर राहण्यासाठी. या काळात अनेक मराठी व्यक्ती व कुटुंबांचा परिचय झाला. (अपर्णा वेलणकर, सुधीर गाडगीळ असे इतरही धाडसी 'खलाशी' आहेत, जे त्या कुटुंबांचा घटक झाले आहेत!) त्यामुळे या पुस्तकातील काहींना मी ओळखत होतो, पण तरीही त्यांच्या जीवनाचे काही पैलू मला माहीत नव्हते. विनता कुलकर्णींनी त्या व्यक्ती, त्यांची कुटुंबे आणि त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांवर प्रकाशझोत टाकला आहे. (याच संबंधात ज्यांनी अगोदर वाचली नसतील त्यांनी अपर्णा वेलणकरांची पुस्तकेही वाचावीत. विशेषत: 'फॉर हिअर, ऑर टू गो?' हे पुस्तक)

या पुस्तकात संकलित झालेले लेख काहींनी 'सकाळ' वा कॅनडाहून प्रसिद्ध होणाऱ्या 'एकता'मधून वा अन्यत्र वाचलेले असतीलही; पण पुस्तक स्वरूपात ते प्रसिद्ध होत असल्याने त्याला एक वेगळे परिमाण लाभले आहे. त्या अर्थाने आधी म्हटल्याप्रमाणे हे पुस्तक म्हणजे एक सेतू आहे.

भारत-अमेरिका सेतू बांधण्याचे असे प्रयत्न अनेकांनी केले आहेत. त्यातल्या काहींची शब्दचित्रे विनता कुलकर्णी

यांनी या पुस्तकात संवेदनशीलतेने काढली आहेत. त्यापैकी एक म्हणजे जगन्नाथ वाणी, ज्यांनी ५०हून अधिक वर्षे कॅनडात व्यतीत केली आहेत. जगन्नाथ वाणींनी 'विश्वसेतू' संस्थेमार्फत असा प्रयत्न केला, पण प्रत्यक्षात त्यांनी स्वत:ला अनेक क्षेत्रांत निस्पृहपणे कसे झोकून दिले आहे, याचे चित्र या पुस्तकात पाहायला मिळते. विशेष म्हणजे, व्यक्तिगत जीवनातील कलहांवर मात करून आणि सामाजिक अडथळ्यांना पार करून एक व्यक्ती किती कार्य करू शकते, याची साक्षच त्यांच्यावरच्या लेखात मिळते. वाणींनी स्थापन केलेल्या 'स्किझोफ्रेनिया सोसायटी'ची संकल्पना आणि त्यांनी त्याबद्दल केलेला विचार तर अनोखाच आहे.

तीच कथा सुनंदा मानेंची. त्याही जगन्नाथ वाणी यांच्याप्रमाणे धुळे-जळगाव परिसरातल्या. त्यांना अमेरिकेत (न्यू यॉर्क येथे) येऊन फक्त १२-१३ वर्षेच झाली आहेत. पण निश्चित उद्दिष्ट असेल आणि वृत्ती कर्मवादी असेल तर काय करता येते, हे त्यांनी स्थापन केलेल्या 'लाही' संस्थेच्या कामातून दिसते. Lend-A-Hand India (LAHI) - ही ती स्वयंसेवी संस्था!

सर्वच माणसांना आपले मूळ गाव, मातृभाषा, आपला सांस्कृतिक परिसर याबद्दल जिव्हाळा वाटतो. परंतु त्या जिव्हाळ्याला संस्थात्मक रूप देणे सोपे नाही. एकप्रकारे ती अनेक लोकांच्या भावविश्वाची संघटना असते. विष्णू वैद्य, शरद गोडबोले आणि जया हुपरीकर यांनी उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी मंडळांसाठी संघटित मंच असावा या उद्देशाने 'बृहन्महाराष्ट्र मंडळा'ची स्थापना केली. आता ती संस्था व संकल्पना अमेरिकेतील तमाम मराठी समाजात रुजलेली आहे. तसे पाहिले तर शरद गोडबोले (ज्यांचे २००४मध्ये देहावसान झाले) हे इलेक्ट्रिकल इंजिनीयर. काहीसे अनपेक्षितपणेच ते १९६१मध्ये अमेरिकेला आले. ते मूळचे बडोद्याचे, पण त्यांची पत्नी अनिता पुन्हा धुळ्याचीच. (धुळे गाव सांस्कृतिकतेची किती मुळे जपून आहे!) गोडबोले पती-पत्नींना साथ मिळाली विष्णू वैद्यांची. (त्यांचे २००१ मध्ये निधन झाले.) वैद्य १९७० मध्ये पुण्याहून अमेरिकेत आले होते. तेही इंजिनीयरच होते, पण संगीताची आवड असेल तर विज्ञान-तंत्रज्ञानाच्या पलीकडे जाऊन माणसे एकत्र येतात. वैद्य दांपत्याने त्या स्वरांच्या आधारे मराठी-भारतीय संस्कृतीचे सेतू बांधले. त्यांना साथ मिळाली ती डॉ. शंकर हुपरीकर आणि त्यांची पत्नी जया हुपरीकर यांची. गेल्या सुमारे ३० वर्षांत बृहन्महाराष्ट्र मंडळाची १५ अधिवेशने अमेरिकेत भरली आहेत.

कॅनडा आणि अमेरिकाच नव्हे, तर पश्चिमेचे क्षितिज कवेत घेणारे त्रैमासिक म्हणजे 'एकता.' (ज्याचा वाचकवर्ग आता युरोपात, युरोपव्यतिरिक्त इतर देशांत आणि भारतातही आहे.) गेली सुमारे ३३ वर्षे टोरांटोहून 'माय मराठीच्या अतूट धाग्याने' गुंफलेले 'एकता' आता एक व्यापक साहित्यिक माध्यम झाले आहे. विनायक आणि प्रतिभा गोखले ही नावे आता परदेशस्थ मराठी माणसांच्या परिचयाची झाली आहेत, पण अशोक पांगारकर, प्रकाश अडावदकर, पिट्स्बर्गचे प्रसिद्ध डॉ. जोशी यांनी 'एकता'च्या पहिल्या 'लष्करच्या भाकऱ्या भाजल्या' असे विनता कुलकर्णी म्हणतात. कॅनडात मराठी मजकूर प्रसिद्ध करणे त्या काळी अशक्यच होते. पीसी कॉम्प्युटर अजून रुळले नव्हते आणि मराठी फॉन्ट तर अगदी अलीकडचे. अशा काळात 'एकता' परिवारातील मंडळी अख्खा अंक हाताने लिहीत असत! आता गेली २० वर्षे तो ६० पानांचा अंक संगणकावर निघतो. विनायक गोखलेंनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्यावर अंकाची जबाबदारी डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर, डॉ. अरुण जतकर, श्रीनिवास माटे आणि सुषमा येरवडेकर यांच्याकडे आली. व्यक्तिश: माझा अनुभव तर असा आहे, की 'एकता' जितक्या आत्मीयतेने मराठी भाषा जपतो, तितकी मराठीविषयीची आत्मीयता आज महाराष्ट्रातही दिसत नाही!


**मनाचे कवडसे**

**विश्वास काकडे**




**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

**टपाल खर्च ३० रु.**

'एकता' हे छापील माध्यमातून तर 'मराठी वैभव' हे रेडिओच्या माध्यमातून अमेरिकेतील मराठी संस्कृती जोपासते. स्नेहल वझे यांच्या पुढाकाराने हे श्राव्य माध्यम काही वर्षांपूर्वी सुरू झाले. या रेडिओविषयी पण मी माझा व्यक्तिगत अनुभव सांगू शकतो. कित्येकदा मला जी गाणी तिकडे ऐकता आली तितकी भारतात (मुंबईत)सुद्धा मिळत नाहीत. कदाचित असेही असेल, की तिकडे आपल्याला या गाण्यांबद्दल जशी आपुलकी वाटते तशी इकडे वाटत नसावी!

परंतु या सांस्कृतिकतेच्या पलीकडे असलेले विलक्षण लोभस व्यक्तिचित्र म्हणजे डॉक्टर श्यामला चितळे (पूर्वाश्रमीच्या दीक्षित-पटवर्धन) यांचे. त्यांचे आजचे वय ९४. 'असामान्य वनस्पतीशास्त्रज्ञ - पलिओबॉटनिस्ट' या लेखात विनताबाईंनी या विलक्षण कर्तृत्ववान, जिद्दी, धाडसी आणि बुद्धिमान स्त्रीचे रेखाटलेले चरित्र वाचल्यानंतर आपण थक्कच होतो. आपण इतकी माणसे विविध कारणांनी नाउमेद झालेली पाहत असतो- आणि इथे ही शास्त्रज्ञ स्त्री (जन्म १९१८) वयाच्या साठीत अमेरिकेत आली. अमेरिकेत आल्यावर त्यांचे जीवन सर्वार्थाने फुलून आले. त्यांना मिळालेले पुरस्कार आणि त्यांनी शास्त्रज्ञ म्हणून प्राप्त केलेले सन्मान पाहूनच आपली छाती दडपून जाते.

खरे म्हणजे, अशा अनेक सत्यचित्र-चरित्रकथांनी हे पुस्तक भरलेले आहे. मग त्यात फक्त १५ वर्षांचा इंद्रनील कसमळकर नावाचा 'गणिती' असो, वा सुरभी कदम नावाची युवा बॅडमिंटनपटू! वास्तुकलातज्ञ किशोर पाठारे असोत, वा मानसोपचारतज्ञ डॉ. दिलीप जेस्ते असोत, ब्रिज डिझायनर सुधीर कुलकर्णी असोत वा अमेरिकेतील पुणेकर संस्कृतपंडित असोत - इतक्या विविध प्रकारच्या व्यक्ती-प्रकृती आणि चरित्र-जीवनशैली या पुस्तकात येतात, की त्यांचा संदर्भ प्रस्तावनेत थोडक्यात घेणे हे त्यांना व लेखिकेलाही अन्यायकारक ठरेल. म्हणून ही प्रस्तावना संपवतो ती एकच आवाहन करून - प्रत्येक मराठी अमेरिकनाने आणि प्रत्येक महाराष्ट्रीय मराठी माणसाने संग्रही ठेवण्यासारखे हे पुस्तक आहे!

**- कुमार केतकर**
हुंडीवाले ब्लॉक्स, कोपरी
ठाणे (पूर्व)
ketkarkumar@gmail.com

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच**

**सुरेश वाघे लिखित**
**'संकल्पनाकोश'चे पाच खंड**




**संचाची मूळ किंमत ३२०० रु.**
**सवलतीत २४०० रुपयांत**
**टपालखर्च १५० रुपये**

# दृश्यकला कोश साकारताना...

**साधना बहुळकर**

‘दृश्यकला’ हा मराठीतील पहिलाच चित्र–शिल्प चरित्रकोश ४ मे २०१३ रोजी मुंबईत प्रकाशित झाला. महाराष्ट्रात चित्र–शिल्पकलेची उत्तम परंपरा असूनही येथील बरेच कलावंत लोकांना अज्ञातच राहिले. त्यांना प्रकाशात आणणे आणि महाराष्ट्रातल्या कलापरंपरेचे जतन करणे हे या कोशाचे उद्दिष्ट आहे. गेल्या दोनशे वर्षांतील महाराष्ट्राच्या दृश्यकला परंपरेची सर्वांगीण माहिती उपलब्ध असणे हे या कोशाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. चित्रकला, शिल्पकला, उपयोजित कला या शाखांत विशेष योगदान असणाऱ्या कलावंतांचा या कोशात अंतर्भाव आहे. सुहास बहुळकर आणि दीपक घारे या कोशाचे संपादक आहेत. या प्रकल्पाच्या निर्मितीत सहभागी असलेल्या चित्रकला समीक्षक आणि कोशाच्या सहसंपादक साधना बहुळकर या कोशनिर्मितीबाबत सांगत आहेत.

सहा वर्षांपूर्वी ‘विवेक’ साप्ताहिकाचे संपादक दिलीप करंबेळकर आमच्याकडे ‘आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण – शिल्पकार चरित्रकोश’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील ‘दृश्यकला’ खंडाच्या संदर्भात आले होते. या कोशाच्या निर्मितीत सहभागी होण्याचा प्रस्ताव त्यांनी आम्हा दोघांपुढे मांडला. आम्हाला त्याचा मन:पूर्वक आनंद झाला. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा ‘ज्ञानकोश’ हा पहिला कोश, वाईचा विश्वकोश, महादेवशास्त्री जोशींचा संस्कृती–कोश हे मी पाहिले होते. त्यांच्या निर्मितीविषयी ऐकले होते. असे काहीतरी मोठे काम आम्ही दोघांनी करायचे ही कल्पनाच रोमांचकारी होती. हे देखील जाणवले, की मराठीतील पहिला चरित्रकार–शिल्पकार कोश करण्याची कल्पना उगवण्यास एकविसाव्या शतकातील सातवे साल उजाडले. म्हणजे पहिल्या ज्ञानकोशानंतर सुमारे एक शतकाने हे काम हाती घेतले गेले. कोशाच्या कामासाठी अर्थातच आम्ही होकार दिला. लवकरच योजनाबद्ध काम सुरू झाले आणि सहा वर्षांत ते पूर्ण झाले. त्यात उपयोजित कलाविभागाची पूर्ण जबाबदारी दीपक घारे आणि रंजन जोशी यांनी घेतली. तर व्यंगचित्रकलेची शाखा वसंत सरवटे यांनी सांभाळली. सर्वांगांनी कोश परिपूर्ण करायचा हाच ध्यास प्रत्येकाच्या मनात होता.

या कोशासाठी सुमारे सत्तर नोंद–लेखकांनी काम केले. त्यात चित्रकार, शिल्पकार, कलाशिक्षक, कलासमीक्षक यांचा समावेश होता. त्यातील लेखनाला सरावलेल्यांची संख्या कमीच. लिहिलेली माहिती व्यवस्थित असे, विश्लेषणही योग्य प्रकारे केलेले असे, पण भाषेचे संस्करण अनेक नोंदींवर करावे लागले. प्रथमच होणारा हा कोश! फारशी संदर्भसाधनेच हाताशी नसताना चरित्रसाधनांची जमवाजमव करण्यापासून, कोशवाङ्मयाच्या शिस्तीने नोंद तयार करणे सोपे नव्हते. कोशासाठी ठरवलेल्या निकषांनुसार प्रथम चरित्रनायकांची सूची प्रयत्नपूर्वक करण्यात आली. सूची झाल्यावर माहिती मिळवणे हा टप्पा. पण तीच उपलब्ध नव्हती. त्यासाठी बऱ्याच

जणांनी बरेच उद्योग केले. त्याची ही दोन उदाहरणे –

चित्रकार सोलेगावकर (१९१२–८६) नावाचे एक अवलिया चित्रकार होऊन गेले. पूर्वी ते सांताक्रुझ (पूर्व) येथे राहत. ७०च्या दशकात सुहास बहुळकर त्यांच्याकडे अनेकदा गेले होते. १९८६ साली सोलेगावकर यांचे निधन झाले. त्या राहत्या ठिकाणी त्यांची चित्रे ठेवून त्यांचे कुटुंबीय काही कारणांनी इतरत्र स्थलांतरित झाले. सोलेगावकरांवर नोंद लिहायची तर पुरेशी विश्वसनीय माहिती, शक्य तेवढी चित्रे पाहायला मिळणे आवश्यक होते. म्हणून बहुळकर सांताक्रुझला ते राहत असलेल्या रस्त्यावर गेले. तीस–चाळीस वर्षांपूर्वीच्या कोणत्याच खुणा दिसत नव्हत्या. स्टेशनपासून हायवेपर्यंत, डाव्या बाजूच्या प्रत्येक इमारतीतील तळमजल्यावरच्या प्रत्येक दुकानात जाऊन 'येथे कोणी सोलेगावकर राहायचे का,' अशी चौकशी केली. पण काहीच माग काढता आला नाही. कोशात सोलेगावकरांची नोंद नसणार याची खंत वाटू लागली, पण इलाजच नव्हता. वर्ष–दीड वर्षांनी आम्ही एका ट्रिपला गेलो होतो. ट्रिपमधील नीला गोखले यांना आम्ही चित्रकला क्षेत्रातील आहोत हे कळताच त्या पटकन म्हणाल्या, ''वा! माझ्या एका मैत्रिणीचे वडीलही चित्रकार होते. त्यांचे आडनाव सोलेगावकर!'' आम्ही आनंदाने उडालोच. ट्रिपहून परतताच फोनाफोनी होऊन चित्रकार सोलेगावकरांच्या मुलीशी संपर्क साधता आला. आवश्यक ती माहिती मिळाली आणि त्याची विस्तृत नोंद कोशात समाविष्ट झाली. कोशातील पृष्ठ क्रमांक ५६४ वरील त्यांची नोंद सांगते, ''... गोविंद सोलेगावकर हे आधुनिकतेचे भान ठेवत, यथार्थदर्शी शैलीत व कलेतील भारतीयत्व जपत विविध प्रकारची निर्मिती करणारे चित्रकार होते... अजिंठा व बाघ येथील कलेचे रहस्य जाणून घेण्यासाठी धडपडणारे ते अभ्यासकही होते... अजिंठ्यातील चित्ररचनेमागे काहीतरी शास्त्र असावे असे त्यांना वाटे. त्यामागी संकल्पना व सूत्र शोधण्याचा ध्यास त्यांनी घेतला... त्यावर आधारित अशी चित्र काढण्याची पद्धत विकसित केली. ... व्यावसायिक व्यक्तिचित्रे रंगविली... त्यांना अनेक पारितोषिके मिळाली... एकंदरीत आयुष्य खडतर होते...''




शिल्पकार श्रीमती पिलू पोचखानवाला (१९२३–८६) यांची नोंद कोशात समाविष्ट होण्यासाठी डॉ. गोपाळ नेने या नोंदलेखकाने बरीच धडपड केली. आपल्याकडे चित्र–शिल्पकलेच्या क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प. त्यातही शिल्पकलेच्या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर पोचलेली स्त्री पोचखानवालासारखी एखादीच, अपवादानेच! त्यांनी आपल्या अमूर्त शिल्पकृतींकरता ॲल्युमिनियम, जस्त, वासे, वाळू अशा विविध माध्यमांचा एकत्रित उपयोग केला. त्यांच्या धनाकारांत आवेग, उत्स्फूर्तता असे. परंतु नोंदीसाठी अशा ठळक माहितीखेरीज इतर अनेक संदर्भांची आवश्यकता असते. पोचखानवाला यांच्या निकटवर्तीयांशी किंवा वंशजांशी संपर्क साधणे आवश्यक होते. डॉ. नेने यांनी टेलिफोन डिरेक्टरीतून सर्व पोचखानवालांचे नंबर काढून त्यांना फोन केले. एकाकडून शिल्पकार पोचखानवाला यांच्या मुलीचा फोन नंबर मिळाला. मुलीशी संपर्क साधून नेने यांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्या भेटीतून आणखी संदर्भ मिळवायचा प्रयत्न केला व त्यानंतरच कोशासाठी नोंद तयार झाली.

उपयोजित विभागाच्या नोंदी तयार होणे हे देखील जिकिरीचे काम होते. त्यासाठी या क्षेत्रातील ज्येष्ठ व प्रतिष्ठित चित्रकार भाई पत्की आणि रॉबी डिसिल्व्हा यांनी त्यांच्या समकालीनांविषयी माहिती देण्यास दीपक घारे व रंजन जोशी यांना सर्वतोपरी सहकार्य केले. उपयोजित कलाक्षेत्रातील 'कॅग' (CAG) या संस्थेचे वार्षिक अंक निघतात. त्यांचा नोंदीसाठी उपयोग करून घेण्यासाठी रंजन जोशी यांनी सातत्याने पाठपुरावा

केला व कॅगनेही सहकार्य केले. त्याचा चांगला उपयोग या विभागासाठी झाला. काही नोंदलेखक 'चरित्रनायकांच्या' उपलब्ध असलेल्या पत्त्यावर पोचले. परंतु तेथे गेल्यावर पत्ता बदलण्याने, तेथून मिळालेल्या नव्या पत्त्यावरही पोचले. कोश किंवा नोंदी याबद्दल बहुधा काहीच कल्पना नसल्यामुळे एका चित्रकाराचा फक्त बायोडेटाच पोचला. बायोडेटा म्हणजेच नोंद अशी त्यांची समज झाली असावी. संदर्भांची कमतरता, कोशाची नोंद यांची कल्पना नसणे यामुळे संपादकांना काही नोंदींत भरही घालावी लागली.

संपादक मंडळातील आम्ही सर्व कलाक्षेत्रातीलच असल्यामुळे एकमेकांच्या परिचयाचे होतो. परंतु एकत्र येऊन प्रकल्पासाठी काम करण्याची आमची ही पहिलीच वेळ. हा अनुभव आम्हा सर्वांना संस्मरणीय ठरला. सुपर्णा कुलकर्णी, दीपक जेवणे हे 'विवेक'तर्फे आमच्याबरोबर कार्यालयीन काम करत. तेही या कामाशी एकरूप झाले. अनेक कलावंतांचे म्हणजे चरित्रनायकांचे नाव-गाव त्यांना पाठ झाले. कलावंत व त्यांची नोंद लिहिणारा लेखक अशी जोडीही त्यांना त्यावेळी लक्षात असे. कोणत्या नोंदी लिहून आल्या, कुठल्या तपासल्या, कशाची डीटीपी करून झाले व त्या सगळ्यांची आकडेवारी याचा चार्टच त्यांच्याकडे असे. त्यावर वेगवेगळ्या चिन्हांच्या खुणांनी ती नोंद कामाच्या दृष्टीने कोणत्या टप्प्यावर आहे हे ते कधीही झटकन सांगत.

नोंदी तपासण्याची आमची अंतिम फेरी सुरू होती. ते काम आम्ही एकत्रच बसून करत होतो. बऱ्याच नोंदींत चरित्रनायकाची आई व/वा पत्नी यांचे नाव नसल्याचे माझ्या लक्षात आले. दृश्यकलेच्या पहिल्याच कोशात ही त्रुटी राहू नये असे माझ्या मनाने घेतले. प्रत्येक ठिकाणी वडिलांचे नाव असतेच, पण आई व पत्नीचे नाव असण्याची प्रथा नाही. परंतु पाश्चात्त्य चित्रकारांच्या संदर्भात अशी प्राथमिक माहिती सहजासहजी मिळते, हे डोळ्यांसमोर होतेच. शिवाय, मुलांच्या, नवऱ्याच्या वाटचालीत पत्नी किंवा आई म्हणून त्या त्या स्त्रीचे सक्रिय पाठबळ असते आणि तिचा नामोल्लेखही नसावा हे खुटखुटले. कामाच्या त्या अंतिम टप्प्यावर हा खटाटोप करायचा तर कामाला विलंब होईल म्हणून संपादक बहुळकर व घारे त्यासाठी अनुकूल नव्हते. पण सुपर्णा यांनीही माझे म्हणणे उचलून धरले. संपादकांनी फेरविचार केला. वेळेच्या दृष्टीने त्यावर व्यावहारिक तोडगा काढला की कोशाची सध्याची कामे न थांबवता, पाच दिवसांत जेवढी नावे गोळा होतील तेवढी घालण्याची मर्यादा आखून घ्यायची. मग आम्ही दोघींनी मोहीमच उघडली. सर्व नोंदींवर नजर टाकून राहिलेल्या नावांची वेगळी यादी फोन नंबरसकट केली. चित्रकारांना तसेच त्यांच्या घरी फोनाफोनी सुरू! कोणी 'मीटिंग'मध्ये! कोणी 'आउट ऑफ कव्हरेज एरिया!' कधी फोन 'स्वीच ऑफ!' या अडचणींसह काही वेगळ्याच अनपेक्षित अडचणी आल्या. एक तरुण चित्रकार म्हणाला, ''आमच्या ह्या व्यक्तिगत आयुष्याशी नोंदीचा काय संबंध? शिवाय या खाजगी माहितीचा दुरुपयोग अकाउंट हायजॅक करण्यासाठी केला जाऊ शकतो.'' मी गडबडलेच! मनात आले, अकाउंट हायजॅक करणारा काय कोश वाचून करणार की काय? क्वचित काही चित्रकारांची दोन लग्ने झाली होती. अशावेळी दोन्ही पत्नींचे नाव मिळणे कठीण गेले. मिळालेली नावे, संगणकावर असलेल्या नोंदीमध्ये समाविष्ट करण्याचे काम सुपर्णा यांनी केले. अशाप्रकारे कोशामध्ये चरित्रनायकांच्या आईचे व पत्नीचे नाव समाविष्ट झाले.

आमच्या या टीममध्ये व्यंगचित्रकार वसंत सरवटे सर्वात ज्येष्ठ. प्रकल्पाला सहा वर्षांपूर्वी सुरुवात झाली. तेव्हा त्यांचे वय ऐंशी! शांत, मितभाषी व दृक्कलांची उत्तम जाण असलेले हे व्यक्तिमत्त्व. अशा कामांसाठी आवश्यक असलेली विचारांची स्पष्टता, नि:संदिग्धता या वयातही टिकून आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या, आजारपणे ह्या अडचणी थोड्याफार फरकाने सर्वांना येतात. सरवटे यांनाही आल्या. पण त्यासकट व्यंगचित्रकारांच्या नोंदींच्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी वेळेत व नेटकेपणाने पार पाडल्या. दीपक घारे आणखीच मितभाषी. शांत आणि गंभीरही. कामाच्या पद्धतीतही शांत, संयत. हाती घेतलेले काम चूपचाप तडीस न्यायची सवय. त्यांचे कलाशिक्षण उपयोजित कला ह्या शाखेतील आहे. साहित्य आणि कलाक्षेत्रात त्यांना लेखक व समीक्षक म्हणून मान्यता आहे. कामासंबंधीच्या चर्चा-वाद शांतपणे ऐकत राहतील. त्यावरचे स्वत:चे मत, ठासून न सांगता खालच्या पट्टीत ठामपणे सांगतील. एकदा सांगितले की (समीक्षक असूनही) गप्प बसतील. त्यामुळे आम्हीच आमची मते त्यांच्या बोलण्याशी पुन्हा पडताळून बघत असू. कोशातील निर्दोष वाक्यरचना, अचूक विरामचिन्हे व एकंदरीत लेखनाकडे त्यांचे बारीक लक्ष होते. घारे व बहुळकर अगदी भिन्न स्वभावाचे. बहुळकर बोलके; सळसळते! झटकन आणि खाड्कन प्रतिक्रिया देणारे. 'दृश्यकला' कोश प्रकल्पाच्या आरंभीच्या टप्प्यापासून अंतिम टप्प्यापर्यंत प्रत्येक पायरीवर जातीने लक्ष आणि नियंत्रण ठेवणारे. धामधुम करत प्रकल्प पुढे रेटणारे. या

संपादक द्वयीने एकमेकांच्या कामात हस्तक्षेप न करता जरूर तेथे आदरपूर्वक दुसऱ्याला विचारात घेतले. पाच वर्षांत कधी अटीतटीच्या वेळा आल्याच नाहीत, हे विशेषच. आमच्या घरात सुहास बहुळकरांच्या इतर प्रकल्पांपेक्षा या 'कोश'प्रकल्पाचा गाजावाजा जास्त झाला. कारण यात आम्ही दोघेही सहभागी होतो. माझ्या स्वत:च्या नोंदी, माझ्यावर सोपवलेली इतर कामे वेळेपूर्वीच व्हावी म्हणून माझ्यापाठी धोशा असायचा. बैठकीत मांडायच्या मुद्यांची चर्चा सकाळच्या चहाच्या वेळेत होई. थोड्यात वेळात त्या चर्चेला वादाचे तोंड फुटे आणि चहाच्या पेल्यातले वादळ चांगलेच घोंगावू लागे. पण सकाळी धुडकावून लावलेले माझे काही मुद्दे, दुपारच्या तेथील बैठकीत विचारात घेतलेले आढळत. शेवटचे चार महिने तर सकाळपासून रात्रीपर्यंत आमच्या आमच्या बोलण्यात हा विषय असेच. रंजन जोशी बोलके, उत्साही. उपयोजित कला व फाइन आर्ट्स दोन्हीची भरपूर माहिती असणारे. सर्व प्रकारच्या कामात कायम तत्पर. दुसऱ्याकडून करवून घेताना थोडे त्यांच्या कलाने जातील. एरवी आपला मुद्दा, मत बैठकीत स्पष्टपणे मांडतील. पटवायचा प्रयत्न करतील. त्यासाठी आग्रही राहतील. तरीही कामाची शिस्त म्हणून, नेतृत्व करणारे सुहास बहुळकर किंवा संपादक दीपक घारे यांचा निर्णय हाच अंतिम मानून पुढील कामाला लागत. हे सर्व काम, मोठा प्रकल्प सुरळीत पार पडला तो प्रबंध संपादक दिलीप करंबेळकर यांच्यामुळे. उत्तम व्यवस्थापन, कार्यालयीन कामे वेळेत करून घेणे, कोणतीही कमतरता न ठेवणे, हस्तक्षेप नाही ही मला जाणवलेली त्यांची काही वैशिष्ट्ये.

ह्या कोशात गेल्या दोनशे वर्षांचा विस्तृत पट आहे. त्या पटात कलावंतांच्या ३०५ नोंदी, संपादकीय, प्रस्तावना, रंगीत छायाचित्रे, कृष्णधवल छायाचित्रे अशातून कलेचा इतिहास रंजकतेने उलगडत जातो. नोंदींबरोबर चरित्रनायकांची छायाचित्रे व त्यांच्या कलाकृतींची ८०० कृष्णधवल छायाचित्रे आहेत.

'कलासंचित' ह्या १८८ रंगीत चित्रांच्या विभागामुळे कोशाचे अंतरंग कमालीचे आकर्षक झाले आहे. ही चित्रे यापूर्वी क्वचितच प्रसिद्ध झाली होती. विशेष म्हणजे रंगीत चित्रांच्या प्रायोजकत्वात काही गतचित्रकारांची कुटुंबे आत्मीयतेने सहभागी झाली. पानपूरकात 'इतिहासाच्या पाऊलखुणा' घेतलेल्या आहेत. हा कोशातील रिकाम्या जागांचा उत्तम विनियोग. त्यात कलाक्षेत्रातील दुर्मिळ अशी प्रासंगिक छायाचित्रे, पूर्वीची मेडल्स, सर्टिफिकेट्स इत्यादी घेतले आहे. 'इतिहासाच्या पाऊलखुणा' हा ऐवज कोशाला मिळवण्याचे श्रेय सुहास बहुळकर यांचे.

महाराष्ट्रात कलाइतिहासाची हेळसांड झाली. म्हणूनच भारतीय कलेच्या इतिहासात महाराष्ट्राला योग्य स्थान नाही. वास्तविक भारतीय कलेच्या वाटचालीत 'बॉम्बे स्कूल' परंपरेचे आणि स्वातंत्र्योत्तर काळात कलाकेंद्र बनलेल्या मुंबई शहराचे महत्त्वपूर्ण योगदान होते. पण ते योगदान योग्य प्रकारे नोंदवले गेले नाही. ते या कोशाने अधोरेखित केले आहे. तसेच, 'बॉम्बे स्कूल' आणि आधुनिक भारतीय कला यांच्यातील दुवे दीर्घकाळ निखळलेलेच राहिले होते. त्यांचाही मागोवा येथे आहे. चरित्रनायकांच्या अनुषंगाने त्यांच्या व्यक्तिगत शैलींसह या सर्वांचे सम्यक्‌दर्शन घडते. तेही सोप्या भाषेत. नोंदी नीरस न होता मनोरंजक होतील याकडे संपादक मंडळाने सातत्याने लक्ष दिले. दोनशे वर्षांचा हा महाराष्ट्रातील कलेचा विस्तृत पट! तो अनेक तंतूंचा आहे. त्या तंतूंना वेगवेगळे पोत आहेत. विविध रंग आहेत. त्याची उत्तम सखोल जाण संपादकद्वयीला आहे. या द्वयीला संपादक मंडळासह समन्वयक डॉ. गोपाळ नेने, चित्रकार वासुदेव कामत यांची यथायोग्य साथ लाभली.

या कोशासाठी संपादकांसह सर्वांनीच भरपूर परिश्रम घेतले. कोशपरंपरेच्या दिंडीतील चित्र-शिल्पकलेच्या पालखीचे भोई होण्याचा आगळा आनंद व्यक्तिश: मला लाभला. ४ मे २०१३ रोजी, पहिल्या प्रकाशनाच्या वेळी व्यासपीठावर मान्यवरांच्या हातातील कोशाच्या झळकणाऱ्या प्रती बघून खूप समाधान वाटले. ते बघताना मनात आले, ''दृश्यकलेचचा सचित्र इतिहास आता काळाच्या उदरातून बाहेर आला आहे. वाचवला गेला आहे. 'वाचला' जाणार आहे आणि आता तो 'अक्षर' झालेला आहे.''

**– साधना बहुळकर**
६/७९, शिवानंद सोसायटी,
चित्रकार केतकर मार्ग,
डहाणूकर कॉलेजजवळ,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७
भ्रमणध्वनी : ९८९२९२६५८८
sadhanabahulkar@gmail.com

# प्रयोजन महाराष्ट्रनायकांच्या चरित्रकोशांचे

**दीपक जेवणे**

साप्ताहिक ‘विवेक’चे प्रकाशन करणाऱ्या हिंदुस्थान प्रकाशन संस्थेने ‘आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण – शिल्पकार चरित्रकोश’निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला आहे. सर्वप्रथम कोशप्रकल्पाची साकल्याने भूमिका मांडणारा परिचय ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर आतापर्यंत या प्रकल्पाच्या माध्यमातून इतिहास, साहित्य, विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण, न्यायपालिका–प्रशासन–संरक्षण, कृषी–सहकार व दृश्यकला–चित्रकला–शिल्पकला व उपयोजित कला हे सहा खंड प्रकाशित झालेले आहेत व अन्य खंड प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

इ.स. १८१८ मध्ये महाराष्ट्रात पेशवाईचा अस्त झाला व येथे तसेच एका अर्थाने भारतावरच ब्रिटिशांची सत्ता दृढमूल झाली. पण या सत्तेने केवळ सत्तांतरच घडले नव्हते, तर ती एक युगपरिवर्तनाची नांदी होती. या सत्तेच्या रूपाने भारतात युरोपातील औद्योगिक क्रांती आणि संस्कृतीनेच प्रवेश केला होता. भारतासारख्या प्राचीन तत्त्वज्ञानाने समृद्ध पण नवसर्जनशीलतेची ऊर्जा हरवलेल्या संस्कृतीशी या नव्या संस्कृतीचा संबंध आला. इंग्रजी राजवटीने आलेल्या औद्योगिक संस्कृतीबरोबर वैज्ञानिक क्रांती, बुद्धिवाद, न्यायासनासमोर सर्व माणसे समान असलेली न्यायव्यवस्था, कायद्याचे राज्य, लोकशाहीची मूल्ये, मानवी मूल्यांचा विकास व माहिती आणि ज्ञान यांच्या आधारावर त्यांचे वाढलेले महत्त्व, एक नवी प्रशासकीय व्यवस्था व आधुनिक शिक्षणपद्धती यांचा उदय भारतात झाला. म्हणजेच एका नव्या मूल्यरचनेनुसार समाजपरिवर्तनाला आरंभ झाला. समाजात मूलभूत बदल घडून येण्याची प्रक्रिया गतिमान झाली. या सर्व परिवर्तनाच्या प्रक्रियेत महाराष्ट्र देशभरात आघाडीवर होता. येथील सर्वच क्षेत्रांत या परिवर्तनाचे पडसाद उठले. विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक चळवळींत महाराष्ट्र अग्रेसर बनला. महाराष्ट्रात औद्योगिक क्रांती आणि सहकार क्षेत्राचा पाया रचला गेला. नव्या बदलांमुळे धार्मिक प्रेरणांना सामाजिक आशय लाभला. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत घडलेल्या बदलाचे प्रतिबिंब नव्याने सुरू झालेल्या चित्रपटसृष्टीवर तसेच नाट्यसृष्टीतही उमटले. पेशवाईच्या शेवटपासूनच्या या दोनशे वर्षांच्या कालखंडात देशभरात घडलेल्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक, कला या क्षेत्रांत झालेल्या क्रांतीची मुळे महाराष्ट्रात सापडतात. हे परिवर्तन घडवण्यात वेगवेगळ्या संस्था, संघटनांप्रमाणे त्या त्या क्षेत्रातील महनीय व्यक्तीही आघाडीवर होत्या. या बदललेल्या समाजव्यवस्थेचा आणि एकंदर सार्वत्रिक स्थित्यंतराचा आढावा चरित्रात्मक पद्धतीने घेण्याच्या दृष्टिकोनातून ‘आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण – शिल्पकार चरित्रकोश’ या प्रकल्पाचा सूत्रपात केला आहे.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीचा सुवर्णमहोत्सव झाल्याचे औचित्य

साधून हीरकमहोत्सव साजरा करून यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या साप्ताहिक 'विवेक'चे प्रकाशन करणाऱ्या हिंदुस्थान प्रकाशन संस्थेने हा प्रकल्प हाती घेतला. सर्वप्रथम कोशप्रकल्पाची साकल्याने भूमिका मांडणारा परिचय ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून इतिहास, साहित्य, विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण, न्यायपालिका-प्रशासन-संरक्षण, कृषी-सहकार, नाटक, चित्रपट-संगीत, दृश्यकला-चित्रकला-शिल्पकला व उपयोजित कला, क्रीडा-आरोग्य, समाजकारण-पत्रकारिता-राजकारण, उद्योग-अर्थकारण-भविष्यवेध, धर्म व अध्यात्म-ललितेतर साहित्य, असे बारा खंड प्रकाशित करण्याचा सूत्रपात झाला. आतापर्यंत इतिहास, साहित्य, विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण, न्यायपालिका-प्रशासन-संरक्षण, कृषी-सहकार व दृश्यकला-चित्रकला-शिल्पकला व उपयोजित कला हे सहा खंड प्रकाशित झालेले आहेत व अन्य खंड प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. ज्या थोर व्यक्तिमत्त्वांची जन्मभूमी अथवा कर्मभूमी महाराष्ट्र आहे, त्यांचा या चरित्रकोशात समावेश करण्यात आलेला आहे. जे चरित्रनायक हयात आहेत, त्यांची निवड करताना त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने किमान पंचवीस वर्षे तरी कार्य केले पाहिजे असा निकष लावण्यात आलेला आहे, मात्र कला-क्रीडा यासारख्या क्षेत्रांसाठी हा निकष अपवाद करण्यात आला आहे.

दोनशे वर्षांच्या कालखंडात घडलेल्या परिवर्तनाची पूर्वपीठिका वाचकांच्या ध्यानात यावी आणि आगामी चरित्रकोशांतील चरित्रनायकांनी आपली कामगिरी कोणत्या पार्श्वभूमीवर केली हे लक्षात यावे, या हेतूने पहिल्या इतिहास खंडाची रचना अन्य खंडांप्रमाणे व्यक्तिचरित्रात्मक न करता विविध क्षेत्रांच्या माहितीपर लेखांच्या स्वरूपात केली. या खंडात महाराष्ट्राची जडणघडण, राजघराणी, धर्म व तत्त्वज्ञान, संप्रदाय, सामाजिक वाटचाल, कला व स्थापत्य आणि भौतिक प्रगती असे सात विभाग पाडण्यात आले आणि त्यात विविध विषयांवर त्या-त्या क्षेत्रांतील नामवंतांनी लेखन केले. नामवंत इतिहासतज्ज्ञ रा. श्री. मोरवंचीकर यांनी या खंडाचे नेटके संपादन केले.

या प्रकल्पातील दुसरा खंड म्हणजे साहित्य खंड होय. पण चरित्रकोशाच्या दृष्टीने चरित्रात्मक लेख असणारा हा प्रकल्पातील पहिलाच खंड होता. एकंदर कोशाकडे नीरस, रटाळ व कंटाळवाणा साहित्यप्रकार म्हणून पाहण्याची भावना अभ्यासकांची नसली तरी सहज प्रथमच कोश हाताळणाऱ्या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना तसे वाटण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा वाचकांनाही हा कोश आकर्षक वाटेल, त्याची रचना नेत्रसुखद वाटेल याचीही पुरेशी काळजी घेण्यात आली. अनुक्रमणिका, विस्तृत प्रस्तावना आणि विवेचक परिशिष्टे हीसुद्धा या प्रकल्पातील खंडांची वेगळी वैशिष्ट्ये ठरली आहेत. चरित्रनोंदींचे नामोल्लेख नोंद, टिपणनोंद, मुख्य नोंद असे प्रकार पाडण्यात आले. अन्य खंडातील चरित्रनायकांच्या नोंदीला नामोल्लेख नोंद असे संबोधण्यात आले आहे व ज्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वांचे एकापेक्षा जास्त क्षेत्रात कर्तृत्व दिसून येते त्यांची मुख्य नोंद एका खंडात घेऊन अन्य खंडात टिपणनोंदीचा समावेश करण्यात आलेला आहे. या दृष्टीने या अनुक्रमणिकेची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. यात 'चरित्रनायकाने हाताळलेले साहित्यप्रकार' असा स्तंभ करून या स्तंभाचे काव्य, कथा, कादंबरी, समीक्षा, ललित व अन्य असे उपविभाग पाडलेले आहेत. ज्यांना या दोन शतकांतील कवींचा अभ्यास करावयाचा आहे, अथवा कादंबरीकारांचाच अभ्यास करावयाचा आहे अशा वाचकांना वर्गीकरणाचा विशेष उपयोग असा होऊ शकतो. ते अनुक्रमणिका वाचून अभ्यासासाठी वाचनार्थ निवड करू शकतात. अन्य खंडांची अनुक्रमणिकाही साहित्य खंडाच्या धर्तीवर बेतलेली आहे. जसे, विज्ञान व तंत्रज्ञान कोशात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, अभियांत्रिकी, गणित व संकीर्ण असे विभाग पाडले आहेत. यामुळे चरित्रनायकांच्या कार्यक्षेत्राची केवळ अनुक्रमणिके-वरूनच वाचकाला माहिती होते व तो आपल्या रुचीचे चरित्रनायक वाचनासाठी निवडू शकतो. शिक्षण खंडातही शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षण प्रसारक, विचारवंत, संस्थापक, संस्थाचालक, प्रशासक, असे भाग पाडलेले आहेत.

त्याचप्रमाणे कोशात अकारविल्हे चरित्र येत असल्यामुळे कालसुसंगत वाचन करणे अवघड असते. यासाठी प्रत्येक खंडाच्या प्रस्तावनेत त्या क्षेत्राचा विकासक्रम व जडणघडण लक्षात येण्याच्या दृष्टीने विवेचक माहितीपूर्ण लेखन करण्यात आलेले आहे. प्रस्तावनेच्या वाचनावरून त्या कालखंडाचा विस्तीर्ण पट वाचकासमारे उलगडला जातो व त्याच्या प्रकाशात चरित्रनायकाच्या योगदानाची माहिती तो घेऊ शकतो. तसेच प्रत्येक खंडाला माहितीपूर्ण परिशिष्टे जोडलेली असून प्रत्येक क्षेत्राचा समर्पक परिचय करून देण्याच्या दृष्टीने परिशिष्टांतून पूरक माहिती दिलेली आहे. आणखी महत्त्वाची सुविधा म्हणजे या चरित्रकोशात शब्दकोशाच्या धर्तीवर ठळक अक्षरात पानाच्या उजव्या बाजूस मराठी वर्णमालेतील अक्षरेही दिलेली आहे. तसेच प्रत्येक चरित्रनायकाच्या नोंदीला आरंभ होण्यापूर्वी त्या चरित्रनायकाची ओळख एका ओळीत करून दिलेली आहे, हेसुद्धा कोशाचे वेगळेपण होय.

गेल्या दोनशे वर्षांत महाराष्ट्रातील साहित्यप्रवाहाने कसकशी वळणे घेतली व ती वळणे घेण्यास कोणते चरित्रनायक कारणीभूत ठरले, याचा समग्र इतिहासच साहित्य खंडाच्या रूपाने वाचकांपुढे मांडण्यात आला. नामवंत साहित्यिक डॉ. सुभाष भेण्डे व डॉ. चंद्रकांत वर्तक यांनी या खंडाच्या संपादनाची धुरा सांभाळली. प्रख्यात साहित्यिकांच्या हस्ताक्षरांचा संग्रह करणारे कोल्हापूर येथील श्री. राम देशपांडे यांच्या संग्रहामुळे साहित्यिकांची अक्षरभेटही वाचकांना घडलेली आहे.

यानंतर विज्ञान-तंत्रज्ञान व शिक्षण हा तिसरा खंड प्रकाशित करण्यात आला. शिक्षणाच्या बळावर छोट्या-छोट्या युरोपीय देशांनी त्यांच्या आकारमानाच्या अनेक पट व लोकसंख्येने विशाल असलेल्या आशिया, अमेरिका व अन्य खंडांतील देशांवर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. यावरून असे लक्षात येते की, आपला भारत देश व भारतीय समाज समर्थ बनवायचा असेल तर त्यासाठी मूलभूत संशोधन करणाऱ्या व त्याचे व्यावहारिक उपयोजन करणाऱ्या वैज्ञानिकांची, तंत्रज्ञांची व नवतंत्रज्ञानाधिष्ठित उद्योग उभा करणाऱ्या उद्योजकांची गरज भासते. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात अशी प्रगती घडवून आणणाऱ्या वैज्ञानिकांची व तंत्रज्ञांची परंपरा विज्ञान व तंत्रज्ञान खंडातून वाचकांसमोर ठेवण्यात आली. हे कार्य मराठी विज्ञान परिषद व खंडाचे संपादकद्वय डॉ. बाळ फोंडके आणि डॉ. अ.पां. देशपांडे यांनी अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडले.

आधुनिक शिक्षणाची जाणीव हा प्रबोधनकाळातील महत्त्वाचा टप्पा होता. समाजाच्या ऐहिक व मानसिक प्रगतीसाठी तसेच आधुनिक जीवनमूल्यांवर समाजनिर्मिती करण्यासाठी आधुनिक शिक्षण हा रामबाण उपाय मानून स्वातंत्र्यपूर्वकाळात शिक्षणप्रसार हे समाजसेवेचे प्रमुख माध्यम बनवण्यात आले. स्वातंत्र्योत्तरकाळात नवराष्ट्र उभारणीसाठी आवश्यक मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन प्रयोग करण्यात आले. या सर्व स्थित्यंतराचा आलेख शिक्षण खंडातील विविध शिल्पकारांच्या चरित्रांतून वाचकांसमोर उभा करण्यात आला आहे. ही सर्व माहिती एकत्रित आणि संपादित करण्याचे जिकिरीचे कार्य दीपक जेवणे, आशा बापट व वर्षा जोशी-आठवले यांच्या संपादक मंडळाने यशस्वीपणे पार पाडले.

यानंतरचा चौथा खंड म्हणजे न्यायपालिका-प्रशासन व संरक्षण खंड होय. आधुनिक नागरी समाजव्यवस्थेची न्यायपालिका, प्रशासन व संरक्षण ही महत्त्वपूर्ण अंगे आहेत. या तिन्ही संकल्पना ब्रिटिशकालात आपल्याकडे रुजल्या आणि आता त्या भारतीय समाजाच्या अंगभूत घटक झाल्या आहेत. गेल्या २०० वर्षांच्या काळातील या तिन्ही क्षेत्रातील ब्रिटिश वारसा आपल्याकडे घेऊन त्यावर आपला विशिष्ट ठसा उमटवण्याची कामगिरी या क्षेत्रातील ज्या महान चरित्रनायकांनी केली त्यांची माहिती या खंडात समाविष्ट केलेली आहे. न्यायपालिका खंडाचे संपादक शरदच्चंद्र पानसे असून प्रशासन खंडाचे संपादन दीपक जेवणे, वर्षा जोशी-आठवले, सुपर्णा कुलकर्णी व आशा बापट यांच्या संपादक मंडळाने केले आहे, तसेच संरक्षण खंडाचे संपादन लेफ्टनंट जनरल द.बा. शेकटकर, अविनाश पंडित, दीपक जेवणे, राजेश प्रभु साळगांवकर व वर्षा जोशी-आठवले यांच्या संपादक मंडळाने केले आहे.

या मालिकेतील कृषी व सहकार हा पाचवा खंड होय. भारत हा कृषिप्रधान देश आहे असे म्हटले जाते. परंतु हळूहळू हे चित्र पालटत चालले आहे. ब्रिटिश प्रशासनात शेतसाऱ्याची वसुली रोखीने होऊ लागल्यामुळे शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा वाढला. त्याचबरोबर कृषि व पशुवैद्यकीय क्षेत्रात शास्त्रीय संशोधनाला सुरुवात झाली व स्वातंत्र्यानंतर हरितक्रांतीने शेती उत्पादनांचे स्वरूप आमूलाग्र बदलून टाकले. याच जोडीला दुग्धव्यवसायात श्वेतक्रांतीही घडून आली. हे परिवर्तन घडवून आणण्यात ज्यांचे मोलाचे योगदान होते अशांची कृषी खंडात नोंद घेण्यात आली आहे. या खंडाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे चरित्रनायकांच्या कार्याबद्दल पुरेशी माहिती उपलब्ध नव्हती आणि जी काही होती तीसुद्धा विस्कळीत स्वरूपात! अशा परिस्थितीत या खंडाला पूर्णत्वास नेण्यासाठी कृषी खंडाचे संपादक कृषिभूषण डॉ. द. र. बापट व त्यांचे सर्व सहकारी आणि महाराष्ट्र विज्ञानवर्धिनी, पुणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

खाजगी क्षेत्रातील शोषण आणि सरकारीकरणातून येणारी निष्क्रियता या दोन्हीतून मार्ग काढण्यासाठी आणि आर्थिक व्यवहारावर समाजाची मालकी असावी या भूमिकेतून स्वातंत्र्यपूर्वकाळातच सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या चळवळीने वेगच घेतला. विशेषत: महाराष्ट्रात ग्रामीण भागात अर्थव्यवस्थेचा विकास घडविण्यात सहकारी संस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे. महाराष्ट्रात ही चळवळ रुजवण्यात, वाढवण्यात व या चळवळीला दिशा देण्यात ज्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली अशांचा परिचय सहकार खंडात करून देण्यात आला आहे. या खंडाचे संपादक नामवंत अर्थतज्ज्ञ अभय टिळक हे आहेत.

प्रकल्पातील सहावा, दृश्यकला खंड याचे संपादक सुहास बहुळकर व दीपक घारे असून या खंडाची माहिती स्वतंत्र लेखात दिली आहे. उर्वरित सहा कोशांचा विचार करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे ज्यांना आपण कर्तृत्ववान व्यक्ती असे संबोधतो त्यांना अगदी तरुण वयात म्हणजे पंधरा ते पंचवीस

वर्षे वयातच कर्तव्यबोध झाला होता आणि त्यांनी आपल्या क्षेत्रात देदिप्यमान कार्यही उमेदीच्या काळातच करून दाखवले. याला अगदी थोडेथोडके अपवाद दिसतील की ज्यांनी प्रौढ वयात कर्तृत्व गाजवले. आज हीच कर्तृत्वप्रेरणा क्षीण झाली आहे की काय, अशी शंका मनात येते. सामाजिक बांधीलकीची भावनाही विरळ होत चालली आहे की काय, असेही वाटते. स्वैराचार, अनाचार व भ्रष्टाचार अशा अपवित्र युतीचे सर्व क्षेत्रात प्रस्थ माजले की काय असे वाटते. राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार प्रकर्षाने जाणवतो. पण अशा प्रतिकूल वातावरणातही समाजाला एकसंध, प्रगत आणि उन्नत करणारी काही व्यक्तिमत्त्वे या खंडातून आपल्याला दिसतील आणि त्यांची प्रेरणा ही आपल्या मनातही जागेल, अशी आम्हाला खात्री आहे.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर भारत जगातील महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे आव्हान केवळ भारतापुरतेच मर्यादित राहिलेले नाही, तर त्या आव्हानाचे स्वरूप जागतिक बनले आहे. महाराष्ट्राला भारतातील एक अग्रेसर राज्य म्हणून जगभरात आपली भूमिका वठवायची नवी संधी चालून आलेली आहे. आज तंत्रविज्ञानाच्या, उद्योग-व्यापाराच्या बळावर जागतिक बाजारपेठ जिंकण्याचे आव्हान महाराष्ट्रापुढे आहे.

आपल्या मराठीपणाचा अभिमान असणाऱ्या प्रत्येकाच्या संग्रही, मुखी आणि वाचनात असावा असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. या प्रकल्पाचे प्रबंध संपादक दिलीप करंबेळकर असून प्रत्येक खंडाचे स्वतंत्र संपादक मंडळ आहे. प्रकल्पाच्या संपादकीय समितीत डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, डॉ. बाळ फोंडके, डॉ. भा. र. साबडे, डॉ. द. र. बापट, डॉ. अरुण टिकेकर, प्रा. वसंत रोकडे, डॉ. विलास खोले, सुहास बहुळकर, सुधीर नांदगावकर, जयराज साळगांवकर, सूर्यकांत पाठक, विद्याधर ताठे, डॉ. अरुणा ढेरे, ले. ज. द. बा. शेकटकर, अभय टिळक व डॉ. अरुणचंद्र पाठक यांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील सुमारे २७५ तज्ज्ञ मान्यवर कार्यरत आहेत. तसेच आरोग्य खंडासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, प्राच्यविद्या खंडासाठी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, उद्योग खंडासाठी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड ॲग्रीकल्चर, कृषी खंडासाठी महाराष्ट्र असोशिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, सहकार खंडासाठी महाराष्ट्र मध्यवर्ती सहकारी संघ, अर्थकारण खंडासाठी गोखले अर्थशास्त्र संस्था अशा विविध नामांकित संस्थांसोबत खंडांचे काम सुरू आहे. दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेने या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी अगदी सुरुवातीपासून आर्थिक योगदान दिले आहे. विविध समाजघटकांना हा प्रकल्प वेगवेगळ्या प्रकारे उपयोगी पडू शकतो. समाजऋणातून उतराई होण्याचा मार्ग म्हणजे अशाच शिल्पकारांपैकी आपणही एक बनण्याचा प्रयत्न करणे. या प्रकल्पाद्वारे नव्या पिढीवर आधुनिक काळाला अनुसरून संस्कार करण्याचे माध्यम हाती येईल. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या परिवर्तनकाळात जी ऊर्जा महाराष्ट्राने दाखविली, तीच उर्जा या नव्या परिवर्तनाच्या कालखंडात दाखवून महाराष्ट्र एक अग्रेसर राज्य बनण्यासाठी आंतरिक ऊर्जा निर्माण करावी, हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

**– दीपक हनुमंतराव जेवणे**
प्रकल्प कार्यकारी संपादक
charitrakosh@gmail.com


# सारांश शून्य – संजय कळमकर




आपल्या भोवतीचं एकही क्षेत्र असं नाही की ज्यात आज भ्रष्टाचार अनुभवास येत नाही. या स्थितीचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे, तिनं माणसातलं माणूसपण, संवेदनशीलता, उपक्रमशीलता हे आणि असे सगळेच गुण गिळून टाकले आहेत आणि माणसाला अंतर्बाह्य हिडीस, ओंगळवाणं करून टाकलं आहे.

अशा परिस्थितीत, या सडलेल्या व्यवस्थेच्या विरोधात आजची तरुण पिढी निकरानं, अभिमन्यूच्या त्वेषानं लढू पाहते आहे.

या व्यवस्थेतच असणारे आणि सजगपणे परिस्थितीला सामोरं जाणारे तरुण लेखक संजय कळमकर हे त्यापैकी एक. त्यांनी शिक्षणक्षेत्रातली भ्रष्ट व्यवस्था थेटपणे, पण डोळसपणे; चिंतनशील वृत्तीनं अनुभवली आहे; याचं भान देणारी, नारायण जगदाळे या शिक्षकाची, व्यवस्थेत राहूनच तिच्या विरोधात लढण्याचा निश्चय करणाऱ्या तरुणाची ही कथा… चित्रदर्शी आणि प्रत्ययकारी…

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु. टपाल खर्च ३० रु.**

# जागर आरोग्याचा

**श्रीधर पाटील**

बदलापुरात नुकताच 'ग्रंथाली', यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ग्रंथसखा वाचनालय आणि 'संवेग फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागर आरोग्याचा' हा आरोग्यविषयक जनजागृती करणारा ४ दिवसांचा कार्यक्रम संपन्न झाला. आरोग्यविषयक तपासण्या, व्याख्याने आणि ग्रंथप्रदर्शन असे भरगच्च स्वरूप असलेल्या या कार्यक्रमात श्रोत्यांशी संवाद साधण्यासाठी डॉ. पी.एस. रामाणी, डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. संजय ओक आणि डॉ. अश्विन सावंत या दिग्गज डॉक्टरांची उपस्थिती लाभली. शहरात आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यात यशस्वी ठरलेल्या या 'आरोग्य जागराच्या'निमित्ताने...

बदलापूर तसे चहूबाजूंनी वाढणारे शहर. महागाईच्या या जमान्यात मुंबई व राज्यातील स्थलांतरितांसाठी बदलापूर हे 'घर' घेण्याच्या दृष्टीने स्वस्त शहर बनले आणि गेल्या काही वर्षांत त्याची वाढ होत राहिली. वाढते नागरीकरण, अपुऱ्या नागरी सुविधा आणि महत्त्वाचे म्हणजे या सर्वात अपुरी पडणारी रुग्णालये आणि वैद्यकीय सोयी. या अपुऱ्या वैद्यकीय सोयींच्या बरोबरीने दिसून येत होती ती अडीच लाखांवर लोकसंख्या पोचलेल्या या शहरात जाणवणारी आरोग्यविषयक अनास्था, अर्धवट माहिती. यावर उपाय म्हणून, खरे तर 'उपचार' म्हणून आरोग्यविषयक जनजागृतीवर कार्यक्रम करण्याचे निश्चित झाले. 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण जोशी यांच्या साथीने 'जागर आरोग्याचा' हा कार्यक्रम घेण्याचे ठरले. ८ ते ११ जून २०१३ अशा तारखा ठरल्या.

'जागर'चा आरंभ 'गर्भसंस्कार व स्त्री-आरोग्य' या विषयावर मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलकुरू, डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या व्याख्यानाने झाला. त्यांचे विचार ऐकण्यासाठी उपस्थित राहिलेल्या स्त्रिया, विशेषत: तरुण स्त्रीवर्ग पाहता खरेच शहरातील नागरिकांना आरोग्यविषयक माहिती व ज्ञानाची असलेली निकड दिसून आली. याच अपेक्षेने स्त्रिया डॉ. देशमुख यांना ऐकत होत्या. आपल्या मनातील प्रश्न विचारायला उभ्या राहत होत्या. यावेळी, गर्भवती स्त्रीने आपले आरोग्य राखण्याच्या दृष्टीने स्वत: काही बंधने घालून घ्यावीत व आपल्यापेक्षा मोठ्यांचे अनुभव ऐकून घ्यावेत, अनुभव नावाची महागडी शाळा असून, लहानांनी आपल्या मनाप्रमाणे वागताना मोठ्यांचे ऐकावे, असा सल्ला डॉ. देशमुख यांनी दिला. तरुण स्त्रियांच्या सध्याच्या जीवनशैलीवर नाराजी व्यक्त करत, गर्भार स्त्रीच्या नऊ महिन्यांच्या नऊ पायऱ्यांचे महत्त्व त्यांनी विशद केले. डॉ. देशमुख यांना पडलेला गराडा आमच्यासह साऱ्यांमध्ये उत्साह निर्माण करत होता.

प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दुसऱ्या दिवशीही कायम राहिली. कारण दुसऱ्या दिवशी होते मुंबईच्या के.इ.एम.



डॉ. स्नेहलता देशमुख




डॉ. संजय ओक




डॉ. अश्विन सावंत

रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता व सध्याचे डॉ. डी.वाय. पाटल अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय ओक. त्यांची मुलाखत घेण्यात आली.

साध्या वेषात आलेल्या एवढ्या मोठ्या माणसाला ऐकायला अनेकजण लांबून आले होते. मिरजेला शिकलेले डॉ. ओक, डॉ. स्नेहलता देशमुख यांच्यासारखे गुरू लाभल्याने कसा घडलो याबद्दल आपल्या गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करत होते. वैद्यकीय क्षेत्रात योग्य सर्जन व डॉक्टर यांपेक्षाही व्यवस्थापन कौशल्याची तितकीच आवश्यकता आहे, असे सांगत होते. म्हणूनच त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेतून हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटची पदवी घेतली. इथवर न थांबता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षादेखील ते उत्तीर्ण झाले. नायर रुग्णालयासाठी मिळवलेले आय.एस.ओ. प्रमाणपत्र, के.इ.एम.मध्ये सुधारणा करण्यासाठी केलेले प्रयत्न, त्यांच्यावर रुग्णांच्या नातेवाईकांकडून झालेले हल्ले आदी गोष्टींबाबत माहिती देताना डॉक्टरांच्या मनात डॉक्टरी पेशाबद्दल असलेली तळमळ दिसून आली. 'जिथे मोती वेचले तिथे माती वेचणार नाही'अशा शब्दांत त्यांनी के.इ.एम. सोडल्याबद्दलची भावना व्यक्त केली.

दुसऱ्या दिवशी 'आरोग्याचा जागर' ऐन भरात आल्याचे जाणवत होते. यात भर टाकली ती ज्येष्ठ आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. अश्विन सावंत यांनी. 'हृदयविकार टाळता येईल का?' हा जिव्हाळ्याचा विषय असल्याने, अनेकजण आकाराला आपल्या मुठीएवढे असलेले हृदय यावेळी मुठीत धरून बसले होते. यावेळी डॉ. सावंत अनेकांना आपल्या दृक्श्राव्य कार्यक्रमातून धक्के देत होते. भारतीय पुरुषांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण २०.३% आहे तर महिलांमध्ये १६.३% आणि २०१५ सालापर्यंत प्रत्येक सहावा भारतीय हा हृदयविकाराने त्रस्त असेल अशी माहिती त्यांनी दिली. हृदयातील गुंतागुंत व खरेच एखाद्याला हृदयविकाराचा धक्का कसा येतो याबाबत चित्रफीत दाखवून त्यांनी उपस्थितांना स्तब्ध केले. कार्यक्रमानंतर घरी जाताना अनेकजण डॉ. सावंत यांचा मोबाइल नंबर घेताना दिसत होते.

चौथ्या दिवशी समारोपाला उपस्थित असलेली व्यक्ती म्हणजे समस्त बदलापूरकरांसाठी भाग्याची गोष्ट ठरलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोस्पायनल सर्जन डॉ. पी.एस. रामाणी. यावेळी त्यांचा त्यांच्या वयाच्या पंच्याहत्तरीनिमित्त आणि त्यांच्या वैद्यकातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताला अभिमानास्पद कर्तृत्वाबद्दल कृतज्ञतापूर्वक मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. आपल्या मेंदूला येणारे म्हातारपण थांबवा व मनाने तरुण व्हा,



डॉ. पी.एस. रामाणी



डॉ. पी.एस. रामाणी यांचा सत्कार करताना शाम जोशी, सुदेश हिंगलासपूरकर, श्रीधर पाटील

आनंदी राहा, समाजाचे ऋण मोठे असते त्यासाठी समाजाला उपकारक काम करा असा संदेश देतानाच, धन्वंतरीने तीन हजार वर्षांपूर्वी सांगितलेली आहारप्रणाली अंगीकारावी आणि व्यायामाची, मनरंजन करणाऱ्या छंदाची कास समाजाने धरावी अशी अपेक्षा डॉ. रामाणी यांनी व्यक्त केली.

आरोग्याचा जागर करण्यासाठी उपस्थित राहिलेल्या या साऱ्याच तज्ज्ञ डॉक्टारांनी सध्याच्या 'फास्ट फॉरवर्ड' जीवनशैलीचा निषेध करत, आपल्या सुखासीन आरोग्याचे रहस्य फक्त फलाहार, हिरव्या भाज्या यांच्या सेवनातच आहे असे आवर्जून सांगितले. यासाठी त्यांनी गीता, मनाचे श्लोक, तुकारामांचे अभंग ते कुसुमाग्रज, पाडगावकर, बा.भ. बोरकर आदींच्या काव्यपंक्तींचे मोत्यासारखे सुंदर दाखले दिले.

चार दिवसांच्या या कार्यक्रमात रोज सकाळपासून विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या, त्यावर मोफत औषधोपचार, आरोग्यविषयक ज्ञान पुरवणारे 'ग्रंथाली'चे ग्रंथप्रदर्शन व संध्याकाळी योजलेली व्याख्याने याला बदलापूरकरांसह आसपासच्या परिसरातील जवळपास दोन हजारांहून अधिक नागरिकांनी प्रतिसाद दिला. 'जागर आरोग्याचा'च्या माध्यमातून आरोग्वविषयक जनजागृती करण्याचा आम्ही केलेला प्रयत्न यशस्वी झाला, हे श्रोत्यांनी व्यक्त केलेल्या भावनांतून जाणवत होते.

**– श्रीधर पाटील**
९६५७१७७४४
sdpatil73@gmail.com




## तांडव हरवताना... – रवी परांजपे

भारतीय कलाजीवनांत एक पैलूदार स्वशैलीची भर टाकणारे ज्येष्ठ कलावंत. त्यांना आजपर्यंत अनेक महत्त्वाचे कला पुरस्कार मिळाले आहेत. 'शिखरे रंग-रेषांची' हा सुबोध-सुंदर-भावस्पर्शी पूर्वसुरी चित्रकारांवरील परिचय ग्रंथ (चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९८) 'ब्रश मायलेज' हे स्व-कलाप्रवासाचे आत्मकथन (राजहंस प्रकाशन, पुणे २००६) आणि 'नील-धवल ध्वजाखाली' (कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००६) हे वैचारिक लेख संकलन, अशी पुस्तके त्यांनी आजवर लिहिली आहेत. यापैकी 'ब्रश मायलेज'ला २००६ चा 'भैरू रतन दामाणी साहित्य पुरस्कार' आणि 'नील-धवल ध्वजाखाली'ला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा २००८ चा 'अभिजात' पुरस्कार लाभला आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु. ● टपाल खर्च ३० रु**

# डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रसिद्ध विचारसंचित

## मराठी ग्रंथविश्वातील अपूर्व घटना!
## आमचा बाप आन् आम्ही नाबाद १,६०,००० प्रती

**१६१ वी आवृत्ती!**




'लसावि–माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' या ग्रंथामध्ये नरेंद्र जाधवांच्या विचारांची झेप, त्यांचे समृद्ध अनुभवविश्व–व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक–त्यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा झपाटा यांचा 'प्रोमो' वाचायला/पाहायला मिळतो.

– कुमार केतकर




मूळ किंमत १२० रुपये सवलतीत ८० रुपये
टपालखर्च २० रुपये

जनआवृत्ती मूळ किंमत ४०० रुपये
सवलतीत ३०० रुपये
टपालखर्च १०० रुपये

**डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या 'बोल महामानवाचे' आणि 'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी**













'बोल महामानवाचे' – जनआवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

'रवींद्रनाथ टागोर' – डिलक्स आवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.


www.vivacityvirar.com
VIVA HOMES
विरारला आमच्या इतकं कुणीच जाणत नाही...
विवा एज्युकेशनल ट्रस्ट
महाराष्ट्रातील सर्वात मोठे ज्युनिअर कॉलेज
प्राथमिक आणि माध्यमिक शाळा / महाविद्यालय / मॅनेजमेंट कॉलेज
हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज
विवा गृह निर्माण
वसई-विरार परिसरातील एक सर्वात मोठे विकासक
विवा प्रकल्पामध्ये १०,००० हून अधिक कुटुंबे सध्या रहात आहेत.
विवा हॉटेल्स
वसई-विरार परिसरातील एक सर्वात मोठी उपाहारगृहांची शृंखला
विवा सुपरमार्केटस्
वसई-विरार परिसरातील एक सर्वात मोठी सुपरमार्केट शृंखला
विवा चॅरिटेबल ट्रस्ट
प्राथमिक आरोग्य गरजांची पूर्तता करणारे
११ फिरते दवाखाने
नि:शुल्क मोतीबिंदू शस्त्रक्रिया
एक नवीन डायलेसिस केंद्र
अनुदानित रुग्णालय
1, 1.5 आणि 2 बी.एच्.के. सुखसंपन्न अपार्टमेंटस्
Viva City
VIRAR (W)
• निसर्गाने वेढलेला १० लक्ष चौरस फूटाचा प्रकल्प
• नामवंत शाळा प्रकल्पाच्या जवळच प्रस्तावित
• खरेदीसाठी उत्तम सोयी
• क्लब हाऊस सुविधा
• उच्च राहणीमानाला अनुरूप सुविधा
• अद्ययावत सुरक्षा व्यवस्था
...आणि त्यामुळे आम्ही एक परिपूर्ण जग घडवू शकलो...फक्त तुमच्यासाठी!
३००० हून अधिक घरे | शाळा | सुपरमार्केटस् | उपाहारगृहे | बगीचा | क्लब हाऊस | खाजगी बस सेवा
स्पेशल ऑफर ₹३१९९/- प्रति चौ. फूट पहिल्या १०० फ्लॅटस् साठी
गेल्या तीन दशकांपासून विरारच्या एकुण विकासामध्ये 'द विवा ग्रूप' सातत्याने आघाडीवर राहिला आहे. शिक्षणापासून रिटेल उद्योगापर्यंत आणि उपाहारगृहांपासून घरबांधणीपर्यंत विविध कामे करून या ग्रूपने सतत वसई-विरार भागाचा चेहरामोहरा अधिक चांगला केला आहे. याच अथक प्रयत्नांमधून साकारली आहे विरारचा शिरपेच ठरणारी वसाहत - विवा सिटी... विवा सिटी म्हणजे एक संपूर्णपणे स्वयंपूर्ण अशी एक स्वर्णिय नगरी... येथे आयुष्याच्या सगळ्या गरजा पूर्णपणे भागविल्या जात आहेत... कधीही न अनुभवायला मिळालेलं एक सुंदर आयुष्य... विवा सिटीमधल्या आपल्या देखण्या घरात आपले स्वागत आहे.
अधिक सुविधा: रेनवॉटर हार्वेस्टिंग • सुप्रसिध्द आगाशी मंदिरापासून अगदी जवळ • वरिष्ठ नागरिकांसाठी आराम करण्यासाठी जागा • अतिसुंदर लँडस्केप केलेला प्रकल्प • जलदगती एलिव्हेटर्स • स्टॅबिलाईज्ड विद्युत वितरण
संपर्क करा: (मोबाईल) +91 87968 08888 / 28888 / 38888 / 48888 • (दूरध्वनी) +91 250 329 4556 / 4557
मुख्य कार्यालय: ठाकूर आर्केड, राजा शिवाजी मार्ग, विरार (प), ठाणे-४०१३०२ • ई मेल: info@vivacityvirar.com
A Project by
VIVA WINNER VENTURE

# बोस्टन अधिवेशनात प्रसिद्ध होणारी पुस्तके

**क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी
मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये







**देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस
मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये




**समाजरंग**
ज्ञान मयूर
अनिता वाकणकर–कुलकर्णी
मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

**दत्तकवेणा**
प्रगती कोळगे
मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये







**रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत
मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये

**हुंदके टाळण्यासाठी**
ॲड. नीलिमा कानेटकर
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**







**तिचं अवकाश**
ॲड. नीलिमा कानेटकर
**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

**ग्रंथाली**




**कोहम् धाबा**
**The Why Cafe**
अनु. संजीव दहिवदकर
**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

**कथा इन्सुलिनच्या शोधाची**
डॉ. विजय आजगांवकर
**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**







**वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र?**
डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# कल्पनाच करा नुसती..

क्षितीजापर्यंत फुललेली अब्जावधी रानफुलं आणि मधोमध उभे असलेले तुम्ही..
आणि हे सारं निसर्गवैभव तुमच्या माझ्या महाराष्ट्रात,
तुम्हा आम्हाला परमप्रिय असणाऱ्या सह्यागिरीच्या माथ्यावर..

सातारा जिल्ह्यातलं हे कास पठार..
महाराष्ट्राची फ्लॉवर व्हॅली म्हणून ओळखलं जाणारं..
१५०० हून अधिक प्रकारच्या वनस्पती, १५६ प्रकारची वानसशास्त्रीय घराणी..
६८० प्रजाती, १४५२ वनजाती, ४०० औषधी वनस्पती.. आणि त्यातल्याही 33 दुर्मिळ प्रजाती..

महाराष्ट्रात पसरलेली अशी दोनशेहून अधिक पर्यटनस्थळं..
प्रत्येक स्थळाचं वैशिष्टच वेगळं, प्रत्येकाची कहाणी वेगळी..
आपण यातल्या एकातरी पर्यटनस्थळाला कधी गेलायत..

चला मग, बेधुंद भटकू या..!!

MAHARASHTRA TOURISM

Incredible India






MAHARASHTRA
unlimited

Kautilya/222

टोल फ्री क्रमांक : १८००-२२९९३०

www.maharashtratourism.gov.in

RNI NO MAHMAR4234/13/1/2013 TC



1911 पासून भारतीयांच्या स्वप्नांना बळ देत आहे...

## सेंट्रल बँक ऑफ इंडिया

### परदेशातील भारतीयांना अधिकाधिक सेवा

*भारतातील पहिली स्वदेशी बँक, आपल्या देशातील आणि परदेशातील ग्राहकांना बँकिंगच्या आनंदासह आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवा आणि उत्पादने देण्यासाठी वचनबद्ध आहे.*

***आमचे एनआरआय पॅकेज हे बँक खाते आणि पैसे हस्तांतरण ह्यांपेक्षा अधिक देते.***

- बँक खाते आपल्या जवळील निवासी नातेवाईकांसह उघडता तसेच चालवताही येऊ शकते.
- स्थायी सुचनेद्वारा दर महिन्याला तुमच्या खात्यातील ठराविक रक्कम तुमच्या कुटुंबातील सदस्याच्या खात्यात हस्तांतरीत करता येईल.
- जलद पैसे पाठविण्याची सुविधा.
- ऑनलाईन मुदत ठेव खाते भारतीय चलनात उघडता येईल.
- एनआरआय ठेव 555 दिवस – व्याजाचा उच्च दर असलेली अल्प मुदत ठेव.
- गृहनिर्माण आणि इतर कर्ज योजना.
- एनआरआय आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांकरीता एक विशेष आरोग्य विमा योजना, ज्या अंतर्गत आरोग्य, वैयक्तिक अपघात, प्रवास आणि भारतातील मालमत्तेसाठी आगीचा धोका ह्यांपासून संरक्षण मिळेल.
- स्थानिक बिल आणि करांचा भरणा ऑनलाईन करू शकता.
- आमच्या शाखांमध्ये मौल्यवान वस्तु/कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी एनआरआय ग्राहकांसाठी लॉकर्सची सुविधा देखील उपलब्ध आहे.
- निवडक बैंकिंग सेवा निःशुल्क मिळतील.

APEX/06-2013/MAR

Centralites for Customers

सेंट्रल बँक ऑफ़ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी “केंद्रित” "CENTRAL" TO YOU SINCE 1911
आयएसओ 27001:2005 प्रमाणित ISO 27001:2005 Certified

कृपया अधिक माहितीसाठी visit www.centralbankofindia.co.in वर भेट द्या

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, ‘शब्द रुची’ हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.